(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)

पृ. शी. : विदर्भात तसेच अमरावती जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सिंचनाचा अनुशेष असणे

मु. शी. : विदर्भात तसेच अमरावती जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सिंचनाचा अनुशेष असणे या संबंधी श्री. बळवंत वानखेडे यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. बळवंत वानखेडे (दर्यापूर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"विदर्भात तसेच अमरावती जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सिंचनाचा अनुशेष असणे, अमरावती विभागातील अंदाजे १०० हुन अधिक लघु व मध्यम प्रकल्पांना पंतप्रधान पॅकेज अंतर्गत सन २००६ ते २००८ या काळात मान्यता प्रदान झालेली असणे, सदर मान्यता प्रदान करण्यात आलेले सिंचन प्रकल्प लवकरात लवकर पूर्णत्वास जावे या हेतूने प्रकल्पाकरिता आवश्यक असणारी जमीन व घरे भूसंपादन कायदा १९८४ अन्वये संपादित न करता सरळ खरेदी पद्धतीने प्रत्यक्ष जमीन खरेदी केलेली असणे, सिंचन प्रकल्पात जमिनी गेलेल्या अनेक शेतकऱ्यांनी प्रशासनाला सहकार्य करून १२ हेक्टरहून अधिक प्रमाणात जमिनी शासनास हस्तांतरीत केलेल्या असणे, परंतु जमिनी संपादित केलेल्या असताना प्रत्यक्ष वाटाघाटी न होणे, ग्रामपंचायतीस विश्वासात न घेणे, कुठलीही पूर्वसूचना न देणे, संमतीपत्र वा खरेदी खताचा मसुदा न करणे, त्यास कायदेशीर अनुमती न घेणे, शासनाकडून मार्गदर्शक तत्वे न मागवणे, पुनर्वसन अनुदानाकरिता सूचना न देणे, अनुमती न देणे, खरेदीखत मसुद्यास शेतकऱ्यांची मान्यता न घेणे, अशा अनेक प्रकारच्या त्रुट्या अलीकडच्या

काळात दृष्टीक्षेपात येणे, भूसंपादन पुनर्वसन पुनःस्थापना अधिनियम २०१३ हा कायदा मंजूर होऊन दिनांक १ जानेवारी, २०१४ रोजी अंमलात आलेला असणे, एकाच प्रकल्पावर सरळ खरेदी करण्यात आलेल्या शेतकऱ्याला रु.८०,०००/- प्रती एकर ते २ लक्ष प्रती एकर एवढा मोबदला देण्यात आलेला असणे, परंतु ज्या शेतकऱ्यानी सरळ खरेदीस विरोध करून अन्य मार्गाने खरेदी केल्याने त्यांना १२ ते १४ लक्ष प्रती एकर एवढा मोबदला दिलेला असणे, याबाबत वारंवार विविध प्रकल्पग्रस्त संघर्ष समित्यांमार्फत विविध प्रकारे शासनाला न्याय देण्याची मागणी केलेली असणे, परंतु अद्यापपर्यंत सदर प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळालेला नसल्याने प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्या निकाली काढण्यासाठी विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी अमरावती यांच्या कार्यालयासमोर प्रकल्पग्रस्तांचे दिनांक ४ मार्च, २०२२ पासून अनिश्चित काळाकरिता प्राणांतिक महाउपोषण सुरु असणे, परंतु अद्यापही सदर प्रकरणी तोडगा न निघाल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.जयंत पाटील (जलसंपदा मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपाध्यक्ष : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

.....

असुधारित प्रत

श्री.बळवंत वानखेडे : अध्यक्ष महोदय, विदर्भातील सिंचन अनुशेष भरुन काढण्यासाठी सन २००६ ते सन २००८ या दरम्यानच्या काळात अनेक प्रकल्पांना मान्यता देण्यात आली होती. त्यावेळेस जमिनी व घरे सरळ पध्दतीने खरेदी करण्यात आली होती. त्या शेतकऱ्यांवर फार मोठा अन्याय झालेला आहे. कारण एकाच प्रकल्पामध्ये काही शेतकऱ्यांना ८० हजार ते २ लाख रुपयांचा मोबदला मिळाला, तर त्याच प्रकल्पात काही शेतकऱ्यांना १२ लाख ते १४ लाख रुपयांचा मोबदला मिळाला. हा त्या शेतकऱ्यांवर फार मोठा अन्याय झालेला आहे.

अध्यक्ष महोदय, ४ तारखेपासून अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जवळपास २०० ते २५० लोक, अगदी लहान मुलांपासून ते ७० ते ८० वर्षांचे वृध्द उपोषणाकरिता बसलेले आहेत. त्यांची मागणी आहे की, ही जी ८० हजार ते २ लाख रुपयांची आणि १२ लाख ते १४ लाख रुपयांची तफावत आहे, ती त्या शेतकऱ्यांना मिळणार आहे काय? लहान मुलांपासून ते वयोवृध्द उपोषणाला बसलेले आहेत. त्यांच्यावर हा एक प्रकारे अन्याय झालेला आहे, तो अन्याय सरकार कसा दूर करणार आहे?

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सन २०१३ साली भूसंपादनाबाबतच्या कायद्यात काही बदल झाले. त्या दरम्यान या प्रकल्पांच्या आधी थेट निगोसिएशन करुन तडजोडीने काही निर्णय घेऊन जमीन संपादन करण्यात आली. हा निर्णय झाल्यानंतर सुरुवातीला जे शेतकरी त्या प्रकल्पाकरिता जमीन संपादनाच्या बाबतीत सहकार्य करीत नव्हते त्यांना चारपट वगैरे रक्कमा मिळून बऱ्यापैकी फायदा झाला.

अध्यक्ष महोदय, प्रकल्पग्रस्तांची मागणी सन्माननीय सदस्यांनी सांगितली त्याप्रमाणे खरी आहे. ज्यांनी आधी जमिनी दिल्या त्या सर्वांना फार कमी मोबदला मिळाला आहे. त्या सर्व प्रकल्पग्रस्तांनी सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे उपोषण केले आहे. उपोषणानंतर बरेच .... याबाबत या लक्षवेधी सूचनेच्या लेखी निवेदनामध्ये नमूद करण्यात आलेले आहे की, त्यांना कोण कोण भेटले.

श्री.जयंत पाटील ....

अध्यक्ष महोदय, मुंबई येथील माझ्या दालनात त्या जिल्ह्याच्या पालक मंत्री माननीय ॲड. यशोमती ठाकूर यांच्या समवेत बैठक झाली. हा प्रश्न फार जटिल आहे. सन २०१३ मध्ये कायद्यात बदल होण्याच्या आधी जी जमीन संपादन केली, त्याचे ॲवार्ड झाले, त्याचे निर्णय झाले. त्या बाबत जानेवारी महिन्यामध्ये महसूल विभागाने देखील स्पष्टपणाने भूमिका स्पष्ट केलेली आहे. जमिनीचा खरेदी-विक्रीचा व्यवहार झाल्यानंतर त्या जमिनीसाठी वाढीव मोबदला देण्याची मागणी करणे, ही बाब कायद्याच्या कसोटीवर टिकणारी नाही, असे महसूल व वन विभागाचे स्पष्ट मत आहे. कायद्यातील बाब त्यांनी सांगितलेली आहे. त्यामुळे आपले हात थोडेसे बांधले गेलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, आपण एका प्रकल्पाला जर तशी ट्रिटमेंट दिली तर, महाराष्ट्रात सन २०१२-२०१३ च्या दरम्यान ज्यांचे संपादन सुरु होते, त्यातील असे अनेक प्रकल्प पुढे येतील. त्यामुळे मी त्या शेतकऱ्यांना देखील हे सांगितलेले आहे की, एकंदर असे किती प्रकल्प आहेत, त्यामध्ये किती लोकांच्या जमिनी अशा आहेत की, ज्यामध्ये निम्मे जुने मिळाले आहे आणि निम्म्या किंवा त्यापेक्षा कमी जास्त प्रमाणात जास्त पैसे मिळाले आहेत. अशी जर कमी संख्या असेल तर सरकारला काही वेगळा विचार करता येऊ शकेल. परंतु, असा बोजा फार मोठा येणार असेल तर मात्र १० वर्षांनी मागे जाऊन तेव्हाच्या संपादनासाठी निधी उपलब्ध करुन देणे, हे त्या भागातील जे सर्वच नियोजन आहे .....

नंतर श्री.शिंदे ...

श्री.जयंत पाटील...

अमरावती विभागातील भौगोलिक अनुशेष दूर करण्यासाठी बरेच काम करावयाचे आहे. त्यामुळे गोंधळ होण्याची शक्यता आहे. मी त्यांना सूचविले आहे की, शासनाला अभ्यास करण्यासाठी वेळ द्यावा व उपोषण सोडावे. एक ते दीड महिन्याच्या कालावधीत जी परिस्थिती आहे ती लक्षात येईल. सदरहू प्रकरणी प्रथमदृष्ट्या नवीन कायद्यानुसार मोबदला देता येणार नाही असे उत्तर दिले आहे. परंतु याप्रकरणी सहानुभूतीपूर्वक विचार करावयाचा असेल तर अशा प्रकारचे किती अर्ज येऊ शकतील, याचा अभ्यास करण्यासाठी वेळ मिळणे आवश्यक आहे. तांत्रिकदृष्ट्या नवीन कायद्यानुसार मोबदला देता येणार नाही, ही वस्तुस्थिती आहे.

श्री.बळवंत वानखडे : अध्यक्ष महोदय, तत्कालीन दलाल किंवा अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना भूसंपादनाच्या संदर्भात भीती दाखवली किंवा त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेतला आहे. सर्वच शेतकऱ्यांवर अन्याय झाला, असे मी म्हणणार नाही. मंत्री महोदयांच्या दालनामध्ये बैठक घेण्यात आली होती त्यावेळी त्यांनी सकारात्मक भूमिका घेतली, त्याबद्दल प्रकल्पग्रस्तांच्या वतीने मी त्यांचे आभार मानतो. या प्रकरणातील काही लोकांवर फार मोठा अन्याय झाला आहे, तो दूर करण्याच्या दृष्टीने सकारात्मक पावले उचलण्यात यावीत आणि त्या शेतकऱ्यांना न्याय देण्यात यावा, अशी माझी मागणी आहे.

श्री.राजेंद्र पाटणी : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी त्यांची भूमिका मांडली आहे. काही प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी आपली जमीन दिली नाही किंवा ते न्यायालयात गेले. त्यांची जमीन बंधनकारकपणे संपादित करण्यात आली व त्यांना तत्कालीन कायद्यानुसार मोबदल देण्यात आला. परंतु ज्या शेतकऱ्यांनी स्वेच्छेने प्रकल्पासाठी जमिनी दिल्या त्यांना ८० हजार ते २ लाख रुपये हेक्टरी मोबदला देण्यात आला आहे व ज्यांनी जमिनी दिल्या नव्हत्या त्यांना १० ते १५ लाख रुपये हेक्टरी मोबदला देण्यात आला आहे. एकाच गावातील शेतकऱ्यांना वेगवेगळ्या दराने मोबदला मिळाल्याने त्यांच्यामध्ये तफावत निर्माण झाली आहे. याकरिता ज्या

श्री.राजेंद्र पाटणी...

शेकऱ्यांनी स्वेच्छेने आपल्या जमिनी प्रकल्पासाठी दिल्या त्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात येईल काय, या विषयाच्या अनुषंगाने मंत्री महोदय किती दिवसांमध्ये अहवाल मागविणार आहेत ? अमरावती विभागाचा भौतिक अनुशेष सन २०१२ मध्ये २.३४ लाख हेक्टर इतका होता. उक्त अनुशेष वाढून सन २०२२ मध्ये किती झाला आहे ? सन २०१२ मधील उक्त विभागाचा अनुशेष २०२५ पर्यंत संपविण्यात येणार असून सन २०२२ मधील अनुशेष कधीपर्यंत संपविण्यासाठी येईल, त्यासाठी कोणते नियोजन केले आहे ? अमरावती विभागातील अनुशेषामध्ये सन २०१२ ते सन २०२२ या कालवधीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. आपल्याला तो दूर करताना भौतिक अनुशेषच ग्राह्य धरावा लागेल, आर्थिक अनुशेष ग्राह्य धरता येणार नाही. कारण पैशांची व्हॅल्यू फार कमी झाली आहे, याबाबत भूमिका स्पष्ट करावी.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांचे वाचन खूप अधिक आहे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये नमूद करण्यात आले आहे की, अमरावती विभागचा भौतिक अनुशेष माहे जून, २०२१ अखेर १.२१ लाख हेक्टर असून उर्वरित अनुशेष माहे जून, २०२५ पर्यंत दूर करण्याचे नियोजन करण्यात आले आहे, असे लेखी उत्तर दिले आहे. हे सन्माननीय सदस्य यांनी वाचले नाही. आम्ही जे लेखी देतो तेच करतो. अमरावती विभागाचा अनुशेष पूर्णपणे संपविण्याचे काम महाविकास आघाडी सरकार करील. सन २०१२ मध्ये २.३४ लाख हेक्टर अनुशेष होता. माहे जून, २०२१ अखेर १,२१,८५६ हेक्टर इतका अनुशेष शिल्लक आहे.

यानंतर श्री.तेलंग...

श्री.राजेंद्र पाटणी : अध्यक्ष महोदय, सन २०१२ च्या आकडेवारीनुसार सदर अनुशेष शिल्लक आहे, असे मला वाटते. त्यामुळे याबाबतची माहिती पुन्हा एकदा तपासून घ्यावी.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, याबाबतची माहिती तपासून पुन्हा सांगण्यात येईल. परंतु मी आता अद्ययावत माहिती दिलेली आहे. त्यामुळे यामध्ये चूक होण्याचा काही प्रश्नच उद्भवत नाही. सन्माननीय सदस्य श्री.बळवंत वानखेडे यांनी विचारलेल्या अमरावती विभागातील मूळ प्रश्नांच्या बाबत सहानुभूतीपूर्वक विचार करुन सदर माहिती घेण्यासाठी मी दीड महिन्याचा वेळ मागवून घेतलेला आहे. उपोषण करुन हा प्रश्न संपणार नाही, असे मी सभागृहामार्फत त्यांना सांगू इच्छितो. हा तांत्रिक प्रश्न आहे. एकदा अवार्ड झाल्यानंतर पुन्हा त्याच जमिनीसाठी दुसरे पैसे द्यावयाचे म्हटले तर त्या काळातील सर्वजण अशा प्रकारची मागणी करु शकतात. असे झाले तर धरणे आणि प्रकल्प उभारण्याऐवजी जमिनी संपादित करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करावा लागेल.

अध्यक्ष महोदय, सन २००१-०२ च्या दरम्यान श्री.बोंगीरवार हे राज्याचे मुख्य सचिव होते. त्यावेळी त्यांनी विदर्भातील जमीन संपादनाची एक मोहिम उभी केली होती. त्यामुळे जमीन संपादनाचा फार मोठा बोजा कमी झालेला आहे. ज्या ज्या ठिकाणी जमिनी संपादनाचा गोंधळ झालेला आहे, त्या त्या ठिकाणची माहिती घेऊन त्याबाबतचा निर्णय भविष्यामध्ये घेता येईल.

श्री.राजेंद्र पाटणी : अमरावतीमधील अनुशेष भरावयाचा असेल तर आपणास कॉस्ट नॉर्मस् बदलण्याची आवश्यकता आहे. प्रकल्पाला परहेक्टरी खर्च किती आला पाहिजे, याबाबत माहिती घेणे आवश्यक आहे. अमरावती विभागातील प्रकल्प हा तापी आणि गोदावरी खोऱ्याच्या रिजवर आहे. त्या विभागामध्ये मेजर प्रकल्प होऊ शकणार नाहीत. मध्यम प्रकल्पाला देखील मर्यादित वाव आहे. अशा परिस्थितीमध्ये अमरावती विभागातील रिजवरील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कॉस्ट नार्मस् मध्ये बदल करणार आहात काय ?

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, या प्रश्नाचे उत्तर मला off-hand देणे शक्य नाही. ज्या दोन-तीन प्रकल्पांचे काम पूर्ण करावयाचे आहे, त्या प्रकल्पाची तपासणी करुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

श्री.प्रताप अडसड : अध्यक्ष महोदय, उक्त प्रकल्पातील बराच भाग माझ्या मतदारसंघामधील आहे. आताच मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे की, दिनांक १६ रोजी बैठक झालेली आहे आणि पुढील एक-दीड महिन्यामध्ये याबाबतची सर्व माहिती घेऊन योग्य ते निराकरण करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, सदर माहिती घेण्यासाठीचा दीड महिन्याचा कालावधी जास्त होईल. कारण या सर्व प्रकल्पांची माहिती संबंधित विभागाकडे उपलब्ध असते. त्यामुळे सदर माहिती घेण्यासाठी जास्त वेळ लागणार नाही. दुसरा विषय असा आहे की, सदर कामासाठी राज्याच्या तिजोरीवर बोजा येईल. ही बाब आम्ही देखील मान्य करतो. कारण यामध्ये शंका येण्याचे कोणतेही कारण नाही. सदर प्रकल्प उभारण्यासाठी ज्या शेतकऱ्यांनी जमिनी देऊन मदत केली, त्यांच्या जमिनीला शासनाकडून फक्त ८० हजार व २ लाख रुपये इतकाच मोबदला प्राप्त झालेला आहे. परंतु ज्यांनी सदर प्रकल्पाची अडवणूक केली त्या शेतकऱ्यांच्या जमिनीला शासनाकडून १२-१५ लाख रुपये मोबदला दिला जात आहे. अर्थात, ज्या शेतकऱ्यांनी मदत केली, त्या शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. त्यामुळे शासनाने तिजोरीवरील बोजाचा विचार न करता अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना पुन्हा मदत देणार आहात काय, दीड महिन्याचा कालावधी कमी करुन उक्त प्रकरणी लवकरात लवकर निर्णय घेणार आहात काय?

अध्यक्ष महोदय, पुनर्वसन व भूसंपादनाचा सन १९९९ चा कायदा रद्द करण्यात आलेला आहे. त्यानंतर सन २०१३ मध्ये नवीन कायदा तयार करण्यात आलेला आहे. संबंधित पुनर्वसन लाभार्थ्यांना आजपर्यंत पुनर्वसनाचा लाभ दिला नसल्यामुळे शासनाने सन १९९९ च्या कायद्यानुसार लाभ न देता तो सन २०१३ च्या कायद्यानुसार लाभ देण्यात यावा, अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

श्री. प्रताप अडसड....

प्रकल्पग्रस्त बेरोजगारांकरिता कायदा संमत करण्यात आला होता. त्यामध्ये प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना नोकरी किंवा त्याबदल्यात काही पैसे देण्यात येतील, असे त्या शासन निर्णयामध्ये नमूद होते. परंतु प्रकल्पग्रस्तांना कोणताही लाभ मिळालेला नाही. अनेक कुटुंब उद्धवस्त झालेली आहेत. त्यांना लाभदेखील कमी मिळाला आहे. त्यामुळे त्यांना शासकीय नोकरीमध्ये सामावून घेतले जाणार आहे काय ? नसल्यास, ५ टक्के मिळणारे आरक्षण १५ टक्के करण्यात येणार आहे काय ? त्यांना जर शासकीय नोकरीमध्ये सामावून घेणे शक्य नसल्यास त्या बदल्यात त्यांना २० लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्यात यावी व ते लोक त्यांचा नोकरीवरील हक्क सोडण्यास तयार आहेत, अशी त्यांनी मागणी केली आहे. ही मागणी मान्य केली जाणार आहे काय ? ही भरपाई त्यांना मिळाली तर ते लोक त्यांचा नोकरीवरील हक्क सोडण्यास तयार आहेत.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी चार ते पाच प्रश्न विचारलेले आहेत. पहिल्या प्रश्नाचे उत्तर 'नाही' असे आहे. दुसऱ्या प्रश्नाबाबत अभ्यास करावा लागेल. तिसरा प्रश्न हा कालावधीसंदर्भातील आहे. तो कालावधी कमी करता येणार नाही. कारण अभ्यास करण्यासाठी वेळ लागणार आहे. चौथा प्रश्न हा प्रकल्पग्रस्तांचे आरक्षण ५ टक्क्यांऐवजी १५ टक्के करावे, अशी त्यांनी मागणी केली आहे. मी सांगू इच्छितो की, विभागानेही ही मागणी प्रस्तावित केली आहे. परंतु त्यास सामान्य प्रशासन विभागाकडून अद्यापपर्यंत मान्यता मिळाली नाही. याबाबतची सर्व कार्यवाही (प्रोसिजर) पूर्ण केल्याशिवाय मान्यता मिळणार नाही. सन्माननीय सदस्यांच्या मताशी आम्ही सहमत आहोत. ज्यांच्या जमिनी गेल्या आहेत त्यांना नोकरी मिळाली पाहिजे. नोकरी मिळाली नसेल तर त्यांना उद्योगधंदा करण्यासाठी मदत मिळाली पाहिजे. अन्यथा कोणत्याही परिस्थितीत नोकरी देण्याकरिताचे आरक्षण वाढविले पाहिजे. राज्यात ज्यांच्या जमिनी प्रकल्पांमध्ये गेल्या आहेत आणि जे लोक प्रकल्पग्रस्त झाले आहेत, त्यांच्या पुढच्या पिढीला रोजगार देण्यासाठी मोठ्या प्रमाणात ५ टक्के आरक्षणामुळे अडचणी येत आहेत.

श्री. जयंत पाटील .....

राज्यात सध्या मोठ्या प्रमाणात प्रकल्पांची कामे सुरु आहेत. त्यामुळे ५ टक्क्यांचे आरक्षण वाढवावे, असा प्रस्ताव प्रोसेसमध्ये आहे. परंतु त्या प्रस्तावावर अजून सकारात्मक निर्णय झालेला नाही. याकरिता एखादी बैठक विभागाला घ्यावी लागेल.

असुधारित प्रत

पृ.शी.: महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांसाठी केंद्र शासनाने सुरु केलेल्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेत शेतकऱ्यांचा समावेश करण्याबाबत व त्यांच्या त्रुटींची पुर्तता करण्याबाबत

मु.शी.: महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांसाठी केंद्र शासनाने सुरु केलेल्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेत शेतकऱ्यांचा समावेश करण्याबाबत व त्यांच्या त्रुटींची पुर्तता करण्याबाबत या संबंधी सर्वश्री. अभिमन्यू पवार, देवेंद्र फडणवीस, ॲड. राहूल कुल, श्री. जयकुमार गोरे, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. अभिमन्यू पवार (औसा) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांसाठी केंद्र शासनाने सुरू केलेल्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM KISAN) या योजनेच्या कामकाजावर तहसिलदार व नायब तहसिलदार संघटना, महाराष्ट्र राज्य व महाराष्ट्र राज्य तलाठी संघ यांनी सन २०२१ मध्ये बहिष्कार घातला असणे, सदरील योजनेतील अनेक शेतकऱ्यांच्या त्रुटीची पूर्तता होत नसल्याने अनेक शेतकरी या योजनेच्या मंजुरीपासून तसेच नियमित मिळत असलेल्या मदतीपासून वंचित राहत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये निदर्शनास येणे, सदर योजनेचे महसूल विभागाच्या पातळीवरील १००% कामकाज पूर्ण झाल्याने सदरील योजना तांत्रिक अडचणीसंदर्भात कामे व योजना राबविण्याबाबतची कार्यवाही कृषी विभागाने करावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य तलाठी व पटवारी मंडळ यांनी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये निवेदनाव्दारे केली असणे,

श्री. अभिमन्यू पवार .....

मा.कृषी मंत्री महोदय यांनी सदरील योजना कृषी विभागामार्फत राबविली जाईल अशी घोषणा करणे, महसूल विभागाने सदरील कामकाजावर बहिष्कार घातला असल्याने व ही वेबसाईट बंद असल्याने शेतकऱ्यांची त्रुटी पूर्तता होत नसल्याने तसेच शेतकऱ्यांना त्यांच्या खात्यात मदत जमा होत नसल्याने शेतकरी तहसील कार्यालयात खेटे मारत असणे, महसूल विभागाकडून त्यांच्या प्रश्नांची दखल घेतली जात नसणे, राज्यातील अनेक शेतकरी या योजनेपासून वंचित असणे, नगरपालिका, महानगरपालिका व नगरपंचायत मधील रहिवाशी शेतकरी या योजनेपासून वंचित असणे, परिणामी शेतकरी वर्गात तीव्र असंतोष व चिडीची भावना निर्माण होणे, सदरील योजना सक्षमरित्या राबविण्यासाठी या योजनेसाठी राज्य शासनाने पूर्णवेळ अधिकारी व कर्मचारी नियुक्त करून सदरील योजनेत राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा समावेश करण्याबाबत व त्यांच्या त्रुटीची पूर्तता करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. दादाजी भुसे (कृषी मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपाध्यक्ष : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

श्री. अभिमन्यू पवार : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने जे उत्तर दिले आहे ते सभागृहाची दिशाभूल करणारे आहे. सप्टेबर, ऑक्टोबर, २०२१ पासून हे पोर्टल बंद आहे. तरीही उत्तरामध्ये सदरहू पोर्टल सुरु असल्याबाबत सांगण्यात आले. मी या लक्षवेधी सूचनेतील प्रश्नाची थोडी अधिक माहिती सुरुवातीला देऊ इच्छितो. मागील सरकारच्या काळात ही योजना माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून राबविली गेली. शेतकऱ्यांनी या योजनेचा अतिशय चांगला लाभ घेतला. दरम्यानच्या काळात सरकार बदलले व या केंद्र सरकारच्या माध्यमातून राज्य सरकारने चांगले काम केल्याबद्दल महाराष्ट्र राज्याचा सन्मान करण्यात आला होता. राज्य सरकारने नंतर याबाबतचा कार्यक्रम आयोजित केला होता. कृषि आयुक्त आणि कृषि अधिकाऱ्यांचा सत्कार केला होता. परंतु या योजनेत महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी काम केले होते. या कार्यक्रमामध्ये कृषि विभागाच्या अधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले होते. त्यामुळे महसूल विभाग नाराज झाला होता. त्यामुळे महसूल विभागाने तेव्हापासून बहिष्कार टाकला आहे. हा बहिष्कार कायम आहे. त्याबाबत निवेदन देण्यात येत आहे. महसूल विभागाने संपूर्णपणे बायकॉट केले आहे. शेतकऱ्यांची या दोन विभागांमुळे अडचण होत आहे. लातूर जिल्ह्यामध्ये साधारणपणे ३ लाख ३२ हजार शेतकरी आहेत. त्यातील २५ ते ३० हजार शेतकरी वंचित आहेत. त्यांचे पोर्टलवर आधार फिडिंग होत नाही, नाव बदलले जात नाही. बँक खात्यांची दुरुस्ती करता येत नाही. या विविध कारणामुळे शेतकऱ्यांची ससेहोलपट होत आहे. शेतकरी या कामासाठी तलाठी, तहसिल कार्यालयात जातात. त्यांच्याकडून सांगण्यात येते की, याबाबतचा प्रस्ताव मुंबईला पाठविण्यात आला आहे.

उपाध्यक्ष : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा, अशी मी विनंती करतो.

श्री. अभिमन्यू पवार : अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेचे चुकीचे उत्तर देणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई केली जाणार आहे काय ? दुसरे असे की, दिनांक ३१ मार्च, २०२२ च्या आत केवायसी करण्यास सांगण्यात आले आहे. परंतु पोर्टल बंद असल्यामुळे केवायसी केली जात नाही. असे असताना शासनाकडून सांगण्यात

श्री. अभिमन्यू पवार .....

आले आहे की, वैयक्तीक पोर्टलवर जाऊनही नोंद करता येईल. याबाबतचा निर्णय तहसिलदारांकडून केला जातो. परंतु ते तसे निर्णय करण्यास तयार नाही. प्रशासकीय यंत्रणा काम करण्यास तयार नाही. माझा प्रश्न असा आहे की, याकरिता स्वतंत्र यंत्रणा राबविण्यात येणार आहे काय ? मंत्री महोदयांनी घोषणा करुन सांगितले की, कृषि विभागाकडून ही योजना राबविली जाईल. या घोषणेला ८ ते ९ महिन्यांचा कालावधी होत आहे. असे असताना याबाबतची कार्यवाही का होत नाही ? तसेच शेतकऱ्यांना आजपर्यंत इस्टॉलमेंट मिळालेले नाहीत. यासाठी कोण जबाबदार आहे व त्यांच्यावर कोणती कार्यवाही केली जाणार आहे ? त्यांचे इन्स्टॉलमेंट लॅप्स झाले असतील तर लॅप्स झालेले इन्स्टॉलमेंट दिले जाणार आहेत काय ?

यानंतर श्री. चौधरी....

असुधारित प्रत

श्री.दादाजी भुसे : अध्यक्ष महोदय, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM KISAN) ही योजना केंद्र सरकारमार्फत संपूर्ण देशभर राबविली जाते. केंद्र सरकारनेच या योजनेचे काही निकष निश्चित केलेले आहेत. त्यानुसार पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर चार महिन्याला २ हजार रुपये वर्ग केले जातात. या योजनेसाठी जिल्हा व तालुका पातळीवर समिती आहे. ही योजना राबविण्यासाठी महसूल, कृषी, ग्रामविकास व सहकार विभाग एकत्रितपणे काम करतात. महाराष्ट्र राज्यामध्ये फेब्रुवारी, २०१९ पासून या योजनेची अंमलबजावणी सुरु झाली. सद्यस्थितीत महाराष्ट्रात १ कोटी ५२ लाख खातेदार शेतकऱ्यांची संख्या आहे. त्यापैकी आतापर्यंत सुमारे १ कोटी ६ लाख शेतकऱ्यांची या योजनेंतर्गत नोंदणी झाली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले ते खरे आहे की, दरम्यानच्या काळात काही समज-गैरसमज झाले होते. परंतु माननीय महसूल मंत्री व कृषी मंत्री यांची एक संयुक्त बैठक होऊन ८ लाख ८६ हजार शेतकऱ्यांच्या नोंदणीमध्ये दुरुस्ती करण्यासाठी दिनांक २५ मार्चपासून राज्यभर स्वतंत्र ड्राईव्ह घेण्याचे निश्चित केले आहे. त्याची कार्यवाही देखील सुरु झालेली आहे.

अध्यक्ष महोदय, या योजनेचे पैसे आधार लिंक बेसवर वर्ग करण्याबाबत केंद्र सरकारने दरम्यानच्या काळात निर्णय घेतला. त्यामुळे काही दिवस या योजनेचे पोर्टल बंद होते, ही वस्तुस्थिती आहे. केवायसी व आधार लिंक प्रक्रियेसाठी केंद्र सरकारने दिनांक ३१ मे रोजीपर्यंतची मुदत दिलेली आहे. या मुदतीच्या आत सर्व विभागांच्या सहकार्याने स्वतंत्र ड्राईव्ह घेऊन सर्व पात्र शेतकऱ्यांना लाभ देण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, केंद्र सरकारमार्फत शेतकऱ्यांसाठी आणलेली अतिशय उत्कृष्ट अशी ही योजना आहे. या योजनेचे काम शासकीय यंत्रणेकडून काढून आऊटसोर्सिंगकडे देण्याचा निर्णय घेण्यात आला व हीच गोष्ट या योजनेच्या मुळावर उठलेली आहे.

अध्यक्ष महोदय, ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करताना पासवर्ड देणे व इतर बाबींमध्येच अवमेळ झाला आहे.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील.....

मंत्री महोदयांनी सांगितलेल्या तालुका व जिल्हा स्तरावरील समित्यांच्या माध्यमातून अगोदर हे काम व्हायचे. राज्यामध्ये या योजनेच्या अंमलबजावणीचे अतिशय उत्तम काम झाले होते. परंतु सन्माननीय सदस्य श्री.अभिमन्यू पवार यांनी सांगितल्याप्रमाणे आता या योजनेची अंमलबजावणी करण्यामधील सरकारची अनास्था अतिशय स्पष्ट दिसत आहे. कृषी आणि महसूल विभागाच्या श्रेयवादामध्ये शेतकऱ्यांचे मरण येत आहे. त्याचा परिणाम म्हणजे सुमारे ८ ते १० लाख शेतकरी या योजनेपासून वंचित राहिलेले आहेत. त्यामुळे या योजनेची अंमलबजावणी करताना श्रेयवादाची लढाई बाजूला ठेवावी. तसेच वंचित शेतकऱ्यांना प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचे पैसे कधी उपलब्ध होतील ते मंत्री महोदयांनी सांगावे. तसेच शेतकऱ्यांच्या नुकसानीस जबाबदार असणाऱ्यांवर काय कारवाई करण्यात येईल ?

श्री.दादाजी भुसे : अध्यक्ष महोदय, यामध्ये श्रेयवादाचा कुठलाही प्रश्न नाही. आपणा सर्वांचेच शेतकऱ्यांच्या प्रती दायित्व आहे. त्यामुळे मी पुन्हा सांगू इच्छितो की, मी मघाशी सांगितलेल्या सर्व विभागांच्या सहकार्याने ही योजना प्रभावीपणे राबविण्यात येईल. मी नम्रपणे सांगू इच्छितो की, आपणा सर्वांना अभिमान वाटेल असे या योजनेचे काम महाराष्ट्र राज्यामध्ये झालेले आहे. डाटा दुरुस्ती करणे आवश्यक असल्यामुळे प्रलंबित ८ लाख ८६ हजार शेतकऱ्यांना योजनेचा लाभ देण्यासाठी दिनांक २५ मार्चपासून सर्व विभागांच्या संयुक्त विद्यमाने विशेष ड्राईव्ह राबविण्यात येणार आहे.

यानंतर श्री.धुमाळे.....

श्री. दादाजी भुसे..

अध्यक्ष महोदय, यामध्ये ८ लाख ८६ हजार शेतकऱ्यांची विगतवारी बघितली तर पी.एफ.एम.एस.मुळे ८९ हजार शेतकरी राहिले आहेत. बँक व्यवहारामुळे २ लाख ४७ हजार शेतकरी राहिले आहेत. स्वत: नोंदणी केलेले, मात्र तपासणीसाठी प्रलंबित राहिलेले २ लाख ६५ हजार शेतकरी आहेत. चुकीच्या आधार क्रमांकामुळे १ लाख १७ हजार शेतकरी आहेत. यासंबंधी येत्या २५ तारखेपासून संपूर्ण महाराष्ट्रभर ड्राईव्ह राबविला जाणार आहे. त्यामधून जे शेतकरी पात्र होतील त्या शेतकऱ्यांना लाभ मिळण्याच्या दृष्टीकोनातून कार्य पार पाडले जाईल.

ॲड राहुल कुल : अध्यक्ष महोदय, मूळातच लक्षवेधी सूचनेच्या उत्तरामध्ये १०९ लाख शेतकऱ्यांना जवळपास १८१२० कोटी रुपयांचा लाभ मिळाल्याचे म्हटले आहे. त्याबद्दल मी माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोजी यांचे पहिल्यांदा आभार मानतो. याबाबत माझे २ स्पेसिफिक प्रश्न आहेत. शेतकऱ्यांना मदत करण्याच्या दृष्टीकोनातून जसे केंद्र शासन मदत करीत आहे त्या धर्तीवर राज्य शासन तशा प्रकारची योजना राबविण्याचा विचार करील काय आणि आता आपण ३ महिने वीज तोडण्याचे थांबविले असले तरी ३ महिन्यानंतर त्या वीजेची वसुली शासन करणार आहे. ती वसुली थांबवून शेतकऱ्यांना मदत करण्याचा शासन प्रयत्न करील काय, हा माझा पहिला प्रश्न आहे. मंत्री महोदयांच्या उत्तरामध्ये सांगितले की, डीबीटीद्वारे लाभार्थ्यांना लाभ दिला, ही चांगली बाब आहे. परंतु राज्य शासनाच्या वैयक्तिक स्वरुपाच्या विविध योजना आहे. आता सभागृहात माननीय उपमुख्यमंत्री उपस्थित आहेत. मी मुद्दाम त्यांना प्रश्न विचारतो की, राज्य शासनाच्या या सर्व योजना राबविताना त्यामध्ये आपण पारदर्शकता ठेवतो आणि त्यासाठी आपण लॉटरी पध्दत अवलंबितो. परंतु जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या स्तरावरील योजनांमध्ये अशी पारदर्शकता येत नाही. हा भेदभाव योजना नाही. त्यामुळे राज्य शासन ज्या पध्दतीने पारदर्शकता ठेऊन योजनांची अंमलबजावणी करते तसा विचार जिल्हा परिषदा आणि पंचायत समितीच्या स्तरावरील विविध योजनांच्या बाबतीत आपण करणार आहात काय ?

श्री. दादाजी भुसे : अध्यक्ष महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण डीबीटी ही प्रणाली संपूर्ण राज्याने स्वीकारली आहे. त्यामुळे पारदर्शकपणे संपूर्ण कार्य केले जाते. कृषी विभागाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, या विभागाच्या योजनांचा डीबीटीच्या माध्यमातून थेट लाभ शेतकऱ्यांच्या खात्यावर दिला जातो आणि ग्रामविकास व इतर बाबतीत सुध्दा सन्माननीय सदस्यांना जी अपेक्षा आहे त्याबाबत शासन सकारात्मक विचार करील.

अध्यक्ष महोदय, राज्य शासनाच्या पातळीवर अशी काही योजना प्रस्तावित नाही. मात्र कृषी विभागाच्या माध्यमातून ज्या वेगवेगळ्या राबविल्या जातात. त्यामध्ये शेतकऱ्यांसाठी पीक विमा योजना आणि इतर योजनांमधून शेतकऱ्यांना कशी मदत करता येईल आणि या योजनांचे स्वरुप कसे बदला येईल, याबाबत शासन पातळीवर विचार सुरू आहे.

असुधारित प्रत

लक्षवेधी सूचना क्रमांक ३ पुढे ढकलण्याबाबत.

उपाध्यक्ष : आजच्या कामकाज पत्रिकेत विशेष बैठकीतील दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना ३ सन्माननीय सदस्य श्री. नामदेव ससाणे यांच्या विनंतीनुसार पुढे ढकलण्यात येत आहे.

असुधारित प्रत

पृ.शी. : गुरुवर्य कै. लक्ष्मणरावजी इनामदार उपसा सिंचन योजना पूर्ण करणेबाबत

मु.शी. : गुरुवर्य कै. लक्ष्मणरावजी इनामदार उपसा सिंचन योजना पूर्ण करणेबाबत या विषयासंबंधी सर्वश्री. जयकुमार गोरे, अभिमन्यु पवार, ॲड राहूल कुल, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जयकुमार गोरे (माण) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे जलसंपदा मंत्र्याचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी मी विनंती करतो.

"गुरुवर्य कै. लक्ष्मणरावजी इनामदार उपसा सिंचन योजना, जिहे-कठापूर, सातारा या प्रकल्पामुळे माण व खटाव तालुक्यातील दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना लाभ होणार असणे, या योजनेमुळे माण व खटाव तालुक्यातील २७५०० हजार हेक्टर क्षेत्र ओलीताखाली येऊन दुष्काळी तालुक्यातील शेतकऱ्यांना फायदा होणार असणे, त्यासाठी सुमारे ७०० कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित असणे, सदरचा प्रकल्प दुष्काळी भागातील असल्याने राज्य शासन हा प्रकल्प कधीपर्यंत पुर्ण करणार व त्यास कसा निधी उपलब्ध करून दिला जाणार याबाबत काहीही नियोजन सरकारने जाहीर केलेले नसणे, याबाबतची वर्षनिहाय आकडेवारी देण्याची आवश्यकता असणे, तसेच प्रकल्प पुर्ण करणेसाठी कालबद्ध कार्यक्रम हाती घेण्याची आवश्यकता असून यामुळे माण व खटाव तालुक्यातील जनतेला दिलासा मिळणार असून, या कामांची उर्वरित निविदा काढण्यात अक्षम्य दिरंगाई होत असून त्वरीत निविदा काढण्याची आवश्यकता असणे, या योजनेचा प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेमध्ये समावेश करणेचा प्रस्ताव प्रलंबित असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री. जयंत पाटील (जलसंपदा मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपाध्यक्ष : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस :** येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री. जयकुमार गोरे : अध्यक्ष महोदय, गुरुवर्य कै. लक्ष्मणरावजी इनामदार उपसा सिंचन योजना ही पूर्वी जिहे-कठापूर नावाने ओळखली जात होती. सन १९९५-९६ मध्ये या योजनेला प्रशासकीय मान्यता मिळाली होती. तेव्हापासून या योजनेचे काम सुरू आहे.

(सन्माननीय सदस्य श्री. अभिमन्यू पवार हे त्यांच्या लक्षवेधी सूचनेवरील प्रश्नांना उत्तर न आल्याने माननीय अध्यक्षांच्या आसनाजवळ येऊन मागणी करीत असतात.)

उपाध्यक्ष : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मंत्री महोदयांनी सविस्तर उत्तर दिलेले आहे.

श्री. जयकुमार गोरे : अध्यक्ष महोदय, गेल्या २६-२७ वर्षापासून या योजनेचे काम सुरू आहे. ही दुष्काळी भागातील योजना आहे. या योजनेला १९९५-९६ ला या योजनेला प्रशासकीय मान्यता मिळाली आहे आणि आज आपण २०२२ मध्ये आहोत. म्हणून मी या निमित्ताने शासनाच्या निदर्शनास आणू इच्छितो. तसेच शासनाकडून काही प्रश्नांना उत्तरे अपेक्षित आहेत.

अध्यक्ष महोदय, आता या योजनेला दुसरी प्रशासकीय मान्यता मिळाली असून १ हजार ६१ कोटी रुपयांची ही योजना आहे. परंतु या योजनेची कामे ज्या गतीने होणे अपेक्षित आहेत त्या गतीने ती होताना दिसत नाहीत.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

श्री. जयकुमार गोरे.....

एवढया वर्षानंतर योजनेतील पहिल्या टप्प्यातील पाईपलाईनचे काम पूर्ण झालेले आता आपण बघितले आहे. त्यातून पहिल्यांदा नेर धरणात पाणी आले. त्यानंतर आंधळी बोगद्याचे काम सुरु आहे. ते काम देखील अत्यंत संथ गतीने सुरु असून मागच्या अनेक वर्षापासून सुरु आहे. या योजनेसाठी आणखी ७०० कोटी रुपयांचा निधी अपेक्षित आहे. या योजनेचा प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेमध्ये समावेश होण्यासंदर्भात केंद्र शासन स्तरावर प्रयत्न सुरु आहेत. माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी या योजनेला प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेमध्ये घेण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. तसेच नवीन प्रकल्प प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेमध्ये घेण्यासंदर्भात केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय सुद्धा झालेला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून योजनेच्या उर्वरित कामांचे टेंडर होणे अपेक्षित आहे. तरी देखील वर्षानुवर्षापासून ते टेंडर झालेले नाहीत. माननीय मंत्र्यांना माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, या कामांना गती देण्यासंदर्भात माननीय मंत्री एक कालावधी ठरवून काम पूर्ण करण्यासंदर्भात ठेकेदारांकडून काय कार्यवाही करतील ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, या योजनेच्या उर्वरित कामाच्या टेंडरच्या प्रक्रियेबाबत माननीय मंत्र्यांनी सांगितले की, मागच्या महिन्यात टेंडर करण्यासाठी मान्यता दिलेली आहे. पण हे टेंडर होत नाहीत तर या कामाचे उर्वरित टेंडर माननीय मंत्री ३ महिन्याच्या आत आपल्य विभागामार्फत स्थगित करणार काय?

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी या प्रकल्पाच्या बाबतीत माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी होकार दिलेला किंवा मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली असा उल्लेख केलेला आहे. त्यामुळे मी त्याबाबत उत्तर देऊ इच्छितो की, असे काहीही झालेले नाही. अद्यापपर्यंत या प्रकल्पासाठी केंद्र सरकारची कोणतीही मदत मिळालेली नाही. तथापी,...

श्री. जयकुमार गोरे : अध्यक्ष महोदय, माझा उत्तरावर आक्षेप आहे. कारण माननीय मंत्र्यांनी माझे म्हणणे ऐकून घेतले असते तर त्यांना असे उत्तर देण्याची आवश्यकता नव्हती. माझे म्हणणे असे आहे की, नवीन प्रकल्प प्रधानमंत्री कृषी

श्री. जयकुमार गोरे.....

सिंचाई योजनेमध्ये घेण्यासंदर्भात निर्णय झालेला आहे. तो निर्णय फक्त या प्रकल्पासंदर्भात नाही तर ओव्हरऑल प्रकल्पाच्या बाबतीत झालेला आहे. या संदर्भात माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांची भेट झालेली आहे आणि त्यांनी या योजनेचा समावेश प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेमध्ये करण्यासंदर्भात जलशक्ती मंत्रालयाला आदेशीत केले आहे. एवढेच माझे म्हणणे आहे. त्या योजनेसाठी पैसे आलेले आहे असे माझे अजिबात म्हणणे नाही. मी गेल्या १२ ते १३ वर्षापासून या योजनेचा फॉलोअप घेऊन काम करीत आहे. त्यामुळे या योजनेची प्रत्येक बाब मला माहिती आहे म्हणून मी असे काही बोलणार नाही. मी एवढाच प्रश्नविचारत आहे की, ७०० कोटी रुपये यासाठी लागणार आाहेत तर त्यासंर्भात आपल्याकडे काही निधीय तरतूदही आहे. परंतु उर्वरित कामाचे टेंडरच झाले नाही तर कामे कशी होणार आहेत. ? त्यामुळे ही टेंडरची प्रक्रिया ३ महिन्याच्या आत पूर्ण करुन या योजनेच्या कामांना आपण गती देणार आहात काय ? दुसरा विषय असा आहे की, या योजनेचे कामच संथ गतीने सुरु असून मागच्या २२ ते २३ वर्षापासून ते काम सुरु आहे. ही योजना दुष्काळी भागांना पाणी देणारी आहे तयामुळे ही कामे गतीने करण्यासंदर्भात आपण काय कार्यवाही करणार आहात ?

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, या प्रकल्पाबाबत मी सविस्तर माहिती देतो. या प्रकल्पासाठी केंद्र शासनाचा आणखी एकही रुपया आलेला नाही. तथापी, हा प्रकल्प प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेमध्ये घेण्यासाठी आपण प्रस्तावित करुन शासनाला विनंती केलेली आहे. आता ती विनंती केल्यानंतर या प्रकल्पाचा साधारणपणे खर्च १ हजार ३४ कोटी रुपयांपर्यंत आहे. केंद्र शासनाने त्यातील ४०० ते ४२५ कोटी रुपये अनुज्ञेय धरलेले आहेत. केंद्राचे म्हणणे आहे की, आम्ही त्यातील ६० टक्के किंवा ४० टक्के देतो. त्यामुळे आपल्याला त्यातील २४७ कोटी रुपये म्हणजे एकूण १ हजार ६१ कोटी रुपये मार्च, २०२१ पर्यंतची किंमत आहे. त्यातील

श्री. जयंत पाटील....

४१२ कोटी रुपये विचारार्थ धरण्यात येतील असे केंद्र शासनाचे म्हणणे आहे. त्यातील ६० टक्के म्हणजे २४७ कोटी रुपये मिळायचेचे आहे. त्यामुळे केंद्र शासन दिले तरच ते पैसे देत आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

श्री. जयंत पाटील....

माननीय पंतप्रधान यांना अधिकाधिक प्रकल्प करायचे आहेत ही चांगली, आनंदाची माहिती आपण आम्हाला दिलेली आहे. आपण सर्वांनी जाऊन प्रकल्पाकरिता आणखी मदत मागण्याची आवश्यकता आहे. या प्रकल्पाकरिता उर्वरित टेंडर प्रक्रिया लवकरात लवकर घेण्यात येईल. या प्रकल्पाचा आढावा घेण्याकरिता मी स्वत: भेट देणार आहे. ७ हजार हेक्टर पेक्षा अधिक क्षेत्रात इरिगेशन करण्याचे उद्दिष्ट साध्य केले आहे. येरळा नदीवरील ४-५ बंधारे पूर्ण झालेले आहेत. माण नदीवरील १७ पैकी १६ केटी वेअर पूर्ण झालेले आहेत. पंपगृह १ पासून नेर तलावापर्यंतची एक लाईन पूर्ण करुन पाणी सोडण्यात आले आहे. माझ्या माहितीनुसार, दुसऱ्या लाईन करिता लवकरच टेंडर निघेल. लवकरात लवकर टेंडर काढण्यात येईल, यामध्ये कोणतीही शंक नाही. नेर तलावातून नेर १ उपसा सिंचन योजना, नेर २ उपसा सिंचन योजना आंधळी पंप गृह, आंधळी मुख्य विमोचन या कामाचे नियोजन केलेले आहे.

अध्यक्ष महोदय, निवेदनातील उत्तरात असे नमूद केले आहे की, जून २०२५ अखेर पर्यंत या प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याकरिता तरतूद केलेली आहे. मला खात्री आहे की, हा दुष्काळी भागातील प्रकल्प असल्यामुळे तो पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल. पूर्वी माननीय श्री. पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री होते, तेव्हा सन्माननीय सदस्य श्री. जयकुमार गोरे हे त्यांचे कट्टर समर्थक होते. त्या वेळी माननीय श्री. अजित पवार यांनी या प्रकल्पाला अधिक गती दिली. (अडथळा) आज ते तिकडे गेले आहेत,असे आम्हाला वाटतच नाही. माननीय श्री. विखे-पाटील आपणही आमचा भाग आहात. सन्माननीय सदस्य ॲड राहुल कुल हे देखील मागे बसलेले आहेत. आपण त्यावेळी जी चिकाटी दाखवली. तशी आजही दाखवू शकता. मागील सरकारने काय केले, या सरकारने काय केले हा वाद नाही. हा प्रकल्प लवकर पूर्ण झाला पाहिजे. या प्रकल्पाला मी स्वत: भेट देणार आहे. उर्वरित कामाचे टेंडर लवकरात लवकर काढू. जेवढा निधी भरला असेल त्या वेगाने काम करण्याचे आदेश संबंधित अध्किाारी व कंत्राटदार यांना आदेश देण्यात येईल.

श्री.जयकुमार गोरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय मंत्री श्री. जयंत पाटील यांनी आपल्या गोड उत्तरात सांगितले. त्यांनी हे मान्य केले की, आम्ही या योजनेच्या मागे चिकाटी दाखवली. माननीय मंत्री श्री.अजित पवार असो, किंवा मागील सरकार किंवा हे सरकार असेल सर्वांच्याच मनात ही योजना पूर्ण होणे अपेक्षित आहे. कोणावर आरोप करण्याचा विषय नाही. मी सांगू इच्छितो की, या योजनेकरिता उर्वरित निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे. मात्र टेंडर प्रक्रिया पुढे जात नाही. उरमोडी प्रकल्पाच्या पोट कालव्यांचे टेंडर दोन वर्षे मंत्रालयात मान्यतेकरिता प्रलंबित होते. आता निधी उपलब्ध आहे. केंद्र शासनाकडून २४७ कोटी रुपये किंवा ४०० कोटी रुपये येतील हा विश्लेषणाचा भाग आहे. आपण ज्येष्ठ आहात. आपण चांगले काम करणारे मंत्री असून चांगले काम करण्याचा आपला हातखंडा आहे. आपण तातडीने कार्यवाही करावी, हे आपल्याकडून अपेक्षित आहे. टेंडर ३ महिन्यात पूर्ण करणार काय ? लवकरात लवकर हे उत्तर आम्हाला नको. आपल्या सारख्या कर्तृत्ववान मंत्री महोदयांकडून हे अपेक्षित नाही.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, ३ महिने नाही तर एक महिन्यातच काम केले जाईल. ३ महिने जास्त मुदत दिली आहे. हा प्रकल्प पूर्ण करण्याची आम्हालाच जास्त घाई झालेली आहे.

यानंतर श्रीमती गिरप...

ॲड.राहुल कुल : अध्यक्ष महोदय, माझे नाव त्या लक्षवेधी सूचनेमध्ये आहे. जी पुढची ५ वर्षांची तरतूद केलेली आहे.... मला देखील खडकवासलाच्या बाबतीत अशी बरेच उत्तरे मिळाली. ती अंमलबजावणी झालेली आहे. सभागृहातील उत्तरे आहेत. याची अंमलबजावणी आपण करणार काय, हा माझा पहिला प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, जलसंपदा विभागाचे मंत्री माननीय श्री.जयंत पाटील आपण सर्वांचे पालनकर्ते आहात. माननीय श्री.अजित पवार सभागृहात उपस्थित आहेत. शेतकऱ्यांवर जलसंपदा विभागाकडून कायम अन्याय होतो. हा अन्याय ३ प्रकारे होतो. जे जलसंपदा प्रकल्प झाले आहेत, त्यांची दुरुस्ती होत नाही. कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांपासून ते कॅनॉल नादुरुस्त झालेले आहेत. त्या करिता तरतूद नाही. शहरे अन्याय करीत आहेत. त्याकडे कोणी लक्ष देत नाही. शेतीचे पाणी शहराकडे वळविले जात आहे. ते जायला विरोध नाही. परंतु, शहरामध्ये पाणी देताना ते रिसायकल करुन परत द्यावे, या संदर्भात आपण धोरणात्मक निर्णय घेणार काय?

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ते ज्या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतात तेथे पाण्याची फार मोठ्या प्रमाणात अडचण आहे याची मला जाणीव आहे. त्यामुळे पुणे शहरामध्ये रिसायकलचे प्लांट सुरु व्हावेत.... पुणे महानगरपालिकेला एमडब्ल्यूआरआरएने दोन-तीन वेळा पत्र पाठविलेली आहेत. श्री.गायकवाड हे तेथे आयुक्त असताना दोन-तीन वेळा मी फोन करुन प्रकल्पाचे टेंडर लवकर काढा असे सांगितले होते.

अध्यक्ष महोदय, काढलेले टेंडर मागच्या ५ वर्षांत रद्द झाले. मी असे म्हटले की, आता मी काही बोलू शकत नाही. तेथे जे लोक महानगरपालिकेमध्ये होते, त्यांना ते टेंडर काढून त्याचा निर्णय घेण्यात असमर्थता दर्शविण्यात आली. निर्णय झाला नाही. तो कशामुळे त्याचा तपशील मला माहीत नाही. परंतु, आता पुन्हा आपल्याला रिसायकलचे प्रोजेक्ट पूर्ण केले पाहिजेत. ज्यांना जायकाचे फंडिंग देखील आहे....

अध्यक्ष महोदय, मी आता परत चौकशी केली आहे. माझ्या माहिती प्रमाणे बहुतेक सर्व निर्णय आता झाले आहेत. परंतु, ते ४ वर्षांपूर्वी झाले असते, तर आपल्यावर हा प्रश्न मांडण्याची वेळ आली नसती. आता होत आहे. परंतु, ३-४ वर्षे

श्री.जयंत पाटील ...

तुम्हाला तुमच्या विकासापासून वंचित ठेवण्याचे काम कोणी केले, याचा अभ्यास तुम्ही केला पाहिजे. तुमचे येथे सरकार होते, तुमचेच तेथे पुण्यामध्ये सरकार होते, तरी देखील हे झाले नाही म्हणून जनतेने रिसायकल केले व आम्हाला येथे आणून बसविलेले आहे. त्यामुळे तुमचे काम आम्ही लवकरात लवकर करु. काही काळजी करु नका.

.....

असुधारित प्रत

पृ. शी. : हिंगोली जिल्हयातील सिंचनाचा अनुशेष भरुन काढणे व इतर मागण्यांबाबत

मु. शी. : हिंगोली जिल्हयातील सिंचनाचा अनुशेष भरुन काढणे व इतर मागण्यांबाबत या संबंधी श्री.संतोष बांगर, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.स. नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"हिंगोली जिल्हयातील सिंचनाचा अनुशेष भरुन काढणे व इतर मागण्यांकरिता दिनांक २ जानेवारी, २०२२ रोजीपासून हिंगोली जिल्हा सिंचन संघर्ष समितीतर्फे तहसिल कार्यालय, कळमनुरी येथे ट्रॅक्टर मोर्चा व इसापूर धरणाच्या उजव्या कालव्याचे गेट बंद आंदोलन सुरु असणे, जिल्हयात अनेक सिंचन योजना प्रस्तावित असूनही त्यावर अदयाप अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास येणे, याउलट हिंगोली जवळील मौ.खरबी या गावाजवळ कयाधू नदीवर बॅरेज बांधून येथून इसापूर धरणात पाणी वळविण्याचा शासनाचा असलेला घाट, जिल्हयातील कयाधू नदी ही एकमेव जिवंत नदी असून हिंगोली जिल्हयाची जीवनरेखा असलेल्या या कयाधू नदीचे पाणी वळविल्यास जिल्हयातील कयाधू नदी काठावरील संपूर्ण भागाचे अक्षरशः वाळवंट होण्याची निर्माण झालेली भिती, कयाधू नदी ही पुराचे पाणी आल्यावर भरलेली असते नाहीतर ती कोरडी पडत असल्याने खरबीचा बंधारा झाल्यास परिसरातील गावांना पिण्याकरिता पाणी सुध्दा मिळणे शक्य होणार नसल्याची वस्तुस्थिती असणे, याकरिता जिल्हा सिंचन संघर्ष समितीने प्रस्तावित बॅरेजला मान्यता देऊ नये याकरीता मागणी करणे, सदरहू समितीने हिंगोली

श्री.तानाजी मुटकुळे ...

जिल्ह्यातील सिंचनाचा अनुशेष भरुन काढण्याच्या दृष्टीने संबंधित विभागाकडे केलेला पत्रव्यवहार, याकडे शासनाचे जाणीवपर्वूक होत असलेले दुर्लक्ष, याकरिता हिंगोली जिल्हा सिंचन संघर्ष समितीने केलेले आंदोलन, याकडे शासनाने गांभीर्याने लक्ष घालून शासन स्तरावर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

श्री.जयंत पाटील (जलसंपदा मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपाध्यक्ष : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

.....

असुधारित प्रत

श्री.तानाजी मुटकुळे : अध्यक्ष महोदय, मी एक मिनिटामध्ये या विषयाची पार्श्वभूमी सांगणार आहे. हिंगोली जिल्ह्याचा सिंचनाचा अनुशेष सन २०१६ साली त्यावेळेचे माननीय राज्यपाल तसेच मुख्यमंत्री महोदयांच्या शिफारशीवर मान्य झाला. हिंगोली जिल्ह्यातील प्रकल्पांना मागच्या काळात मंजुऱ्या देखील मिळालेल्या आहेत, परंतु ते अर्धवट राहिलेले आहेत. जलसंपदा विभागामध्ये रिक्त पदे मोठ्या प्रमाणात आहेत. त्यामुळे अधिकारी काम करु शकत नाहीत. मंत्री महोदय आपण हिंगोली येथे आला होता.

अध्यक्ष महोदय, खरबीचा बंधारा करुन कयाधू पैनगंगा खोऱ्यामध्ये जे पाणी नेले जात आहे त्यामुळे ही नदी ६५ कि.मी. एवढी पूर्णपणे कोरडी राहणार आहे. कळमुनरी विधानसभा क्षेत्रातील लोकांचा त्याला मोठा विरोध होणार आहे. आमच्या वसमत येथील विधानसभा मतदारसंघात गेल्या १५ वर्षांपासून ५ बंधारे होऊ घातले आहेत. ते देखील होत नाहीत. त्या संदर्भात देखील आपण सभागृहाला माहिती द्यावी.

अध्यक्ष महोदय, आमच्या जिल्ह्याचा डी.पी. आपण तयार करणार आहात काय? ४ लाख हेक्टर पेरणीलायक क्षेत्र आहे. केवळ ५६ हजार हेक्टर सिंचन आहे. ३५ टक्के सिंचन असेल तर सिंचन अनुशेष नाही असे शासन म्हणत आहे. माननीय श्री.अजित पवार यांच्या काळात आमच्या पैनगंगा नदीवर मोठे बंधारे झाले. त्यातील ६० टक्के पाणी विदर्भाला व ४० टक्के मराठवाड्याला ... माननीय ऊर्जा मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. विदर्भामध्ये सबस्टेशन्स झाले. मात्र मराठवाड्यात एकही सबस्टेशन झाले नाही, त्याकडे देखील मंत्री महोदयांनी विशेष लक्ष द्यावे व आमच्या जिल्ह्याचा डी.पी तयार करुन आमच्या जिल्ह्याचा सिंचन अनुशेष त्वरित भरुन देण्याचे काम करावे.

अध्यक्ष महोदय, खरबीच्या बॅरेजसबाबत माझी आपल्याला हात जोडून विनंती आहे की, खरबीचा बॅरेज रद्द करुन ते पाणी सरळ नदीने जाऊन नवीन प्रकल्प हाती घेण्याबाबत आम्हाला मदत करावी. आमची रिक्त पदे आपण भरुन देणार काय, हा विषय तसेच खरबीचा विषय, असे आमचे दोन विषय आपण मार्गी लावणार आहात काय?

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, मी जेव्हा जिल्ह्यात गेलो होतो. त्यावेळेस बैठक झाली होती. त्यावेळेस देखील सन्माननीय सदस्यांनी ही चिंता व्यक्त केली होती. सापळी येथे जो बंधारा होणार होता तो १९९....

नंतर श्री.शिंदे ....

असुधारित प्रत

उपाध्यक्ष : सभागृहाच्या कामकाजाची वेळ ५ मिनिटे वाढविण्यात येत आहे.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, १९९ द.ल.घ.मी. सापळी बंधाऱ्याची क्षमता होती. त्यामधून हिंगोली जिल्ह्याचा ७,९१० हेक्टरचे जलसिंचन अनुशेष दूर करण्यासाठी ६१.४३ द.ल.घ.मी.पाणी राखून ठेवण्यात आले आहे. उर्वरित १३७.५७ द.ल.घ.मी. मधील १०२ द.ल.घ.मी. पाणी इसापूर येथील धरणात वळविण्यात येत आहे. यामुळे कयाधू नदी आटून जाईल व पुढील लोकसंख्येवर मोठा परिणाम होईल म्हणून सन्माननीय सदस्य यांचा विरोध आहे. परंतु कयाधू नदीच्या पुढील भागामध्ये ४ बंधारे बांधावयाचे आहेत. सदरहू नदी उथळ असल्याने तिची पाणी वहन क्षमता मर्यादीत असल्याने उच्च पातळीचे बंधारे बांधता येत नाही. तरी देखील आपण ३५.५७ द.ल.घ.मी. पाणी कयाधू नदीमध्ये ठेवणार आहोत. लहान बंधारे असल्याने जलसंधारण विभागास सर्व बंधारे बांधून देण्याकरिता सूचविण्यात आले आहे. उर्वरित ३५ द.ल.घ.मी. पाणी कयाधू नदीमध्ये राहील. त्यामुळे नदी आटेल किंवा पाणी मिळणार नाही, अशी परिस्थिती नाही. त्याकरिता जल तज्ज्ञांनी आराखडा तयार केला आहे.

श्री.चंद्रकांत ऊर्फ राजूभैय्या नवघरे : अध्यक्ष महोदय, सदरहू लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्य श्री.संतोष बांगर यांनी उपस्थित केली असून ते आता सभागृहामध्ये अनुपस्थित आहेत. सन्माननीय सदस्य श्री.तानाजी मुटकुळे यांनी आमच्या जिल्ह्याचा मागील ५ वर्षांचा अनुशेष काढला आहे. त्यांनी व सन्माननीय सदस्य श्री.संतोष बांगर यांनी इसापूर धरणासंदर्भातील प्रश्न उपस्थित केले आहेत. माझ्या मतदारसंघातील पूर्णा बॅरेजमधील अनुशेष दूर करण्याकरिता एसएलडीटीकडे प्रस्ताव प्रलंबित असून त्यास मापदंडाची अडचण येत आहे. हिंगोली जिल्हा नवनिर्मित जिल्हा असल्याने त्याचा अनेक बाबींमध्ये अनुशेष आहे. आमचा सिंचनाचा खूप मोठा अनुशेष तयार झाला आहे. आमच्या भागासाठी मापदंड शिथील करण्यात यावेत व जिल्ह्यातील सिंचनाचे प्रश्न सोडविण्यात यावेत, अशी माझी विनंती आहे.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांच्या मागणीनुसार ३ बंधारे धरण्यात आले असून पाण्याची उपलब्धता झाली आहे. ते मापदंडामध्ये बसत नसले तरी पाणी उपलब्धतेस अधिक महत्त्व निर्माण झाले आहे. सन्माननीय सदस्य यांनी केलेल्या सूचनेपूर्वीच त्याबाबत राज्य सरकारने विचार केला असून कार्यवाही सुरु आहे. यासंदर्भातील निर्णय नजिकच्या काळात लवकर घेण्यात येतील.

श्री.तानाजी मुटकुळे : अध्यक्ष महोदय, कयाधू नदी येथून खरबी मार्गे पाणी नेण्यात येत आहे. आमच्या जिल्ह्यात नवीन बंधारे व धरणे बांधण्यासाठी एक डी.पी.प्लॅन तयार करण्यात यावा. सदरहू पाणी घेऊन जाण्याची आवश्यकता नाही. इसापूर व येलदरी धरणे आमच्या जिल्ह्यातील असून त्याचे एक थेंब पाणी आमच्या जिल्ह्यास मिळत नाही. माननीय उप मुख्यमंत्री यांचेवर मागील काळात आरोप करण्यात आले, ते आम्ही वर्तमानपत्रामध्ये वाचले आहेत. परंतु त्यांच्या प्रकल्पामुळेच आमच्या जिल्ह्यातील ३ हजार हेक्टर सिंचनाखाली आहे. काही बंधारे केवळ मंजूर असून त्याचे काम न झाल्याने त्या भागात मागील ५ वर्षांच्या कालावधीत १ हेक्टर सिंचन झाले नाही. सदरहू प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल काय ? सन २०१६ पासून बंधारे सुरु असून त्यांना मुदतवाढ दिली आहे. पुणे येथील जलसंधारण विभागाने आमच्या जिल्ह्यासाठी २३ हजार विहिरी मंजूर केल्या आहेत. तसेच सन २०१७ मध्ये औरंगाबाद येथे झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत १० हजार विहिरींना मंजूरी देण्यात आली आहे. उक्त विहिरींचे काम पूर्ण करण्यासाठी आदेश देण्यात येतील काय ?

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांनी माननीय उप मुख्यमंत्री यांचेवर त्यावेळी करण्यात आलेले आरोप चुकीचे होते, त्यांनी खरोखर काम केले आहे, हे कबूल केले. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

यानंतर श्री.तेलंग...

श्री.जयंत पाटील.....

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील जलसिंचनाची कामे करताना शासनाने काही धाडसाने निर्णय घेतलेले आहेत. त्यातील हा एक निर्णय आहे. आपल्या जिल्ह्यातील अनुशेष दूर करण्यासाठी आपल्यासह सन्माननीय सदस्य श्री.संतोष बांगर यांना पाचारण करुन माननीय श्री.अजित पवार यांच्या उपस्थित एक विशेष बैठक घेण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, सदर प्रश्न हिंगोली जिल्ह्यातील असल्यामुळे नांदेडमधील सन्माननीय सदस्यांना पाचारण करता येणार नाही. यासाठी आपण मला एक स्वतंत्र पत्र द्यावे. नांदेडकरांचा प्रश्न सोडविणे सोपी बाब नाही. नांदेडला मोठ्या प्रमाणावर पाणी दिलेले आहे.

अध्यक्ष महोदय, मी हिंगोले येथे गेल्यानंतर सांगितले होते की, हिंगोली येथील पाण्याचा अनुशेष दूर करणे हे एक मोठे आव्हान आहे. त्या भागामध्ये पाणी कमी असल्यामुळे मोठ्या प्रमाणवर पाण्याचे distributio करणे अवघड आहे. पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी ठिबक सिंचनाचा उपयोग कसा करता येईल, याबाबत देखील विचार करणे आवश्यक आहे. त्या ठिकाणी अतिरिक्त पाणी उपलब्ध करुन दिले तर त्या पाण्याचे वाटप दोन-तीन तालुक्यांना कसे करता येईल, हे देखील पाहणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, आपल्या मतदारसंघामध्ये व कळमनुरी तालुक्यामध्ये पाण्याचे दूरर्भीक्ष आहे. त्यामुळे गंभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. आता तयार केलेल्या आराखड्यासंदर्भात उक्त बैठकीमध्ये चर्चा करण्यात येईल. परंतु कयाधू नदी कोरडी होईल, ही शंका मनातून काढून टाकावी, असे मी सांगू इच्छितो.

उपाध्यक्ष : सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता पुन्हा होईल.

(सभागृहाची बैठक सकाळी १०.५२ ते ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

(स्थगितीनंतर)

(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)

पृ.शी./मु.शी. : तोंडी उत्तरे

अनुदानित मागासवर्गीय वसतिगृहातील अंशकालिन पदवीधर अधिक्षकांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत

(१) * ४१४१३ **श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : सन्माननीय सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअंतर्गत चालविल्या जाणाऱ्या अनुदानित मागासवर्गीय वसतिगृहात काम करणा-या अंशकालीन पदवीधर आणि पदवीधारक (बी.एड) अधीक्षकांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांच्याकडे दिनांक २१ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार अधीक्षकांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. धनंजय मुंडे : (१) होय. हे खरे आहे.

(२) अनुदानित वसतिगृहातील अधीक्षक हे पद मानधन तत्वावर मंजूर असल्याने त्यांना शासन सेवेत सामावून घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

ता.प्र.क्र. ४१४१३.....

श्री. सुधीर मुनंगटीवार : अध्यक्ष महोदय, मागील २५ वर्षापासून अनुदानित मागासवर्गीय वसतिगृहातील अंशकालीन पदवीधर अधीक्षक संघर्ष करीत आहेत. सरकार सहानुभूतिपूर्वक वसतीगृहातील अधीक्षक हे पद शासन सेवेत सामावून घेण्यासंदर्भात सकारात्मक भूमिका घेईल, असे वांरवार सांगण्यात आले. मी या निमित्ताने मंत्री महोदयांना स्पेसिफिक प्रश्न विचारणार आहे. अर्थसंकल्प मांडत असताना माननीय वित्त मंत्री तथा उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी आमदार निधीत वाढ केली, आमदारांच्या वाहन चालकांच्या मानधनामध्ये वाढ केली आहे, त्याबाबत आम्ही अभिनंदन केले आहे. या अधीक्षकांसंदर्भातील सर्व शासन निर्णय आपल्याकडे उपलब्ध आहेत. त्यांनी २५ वर्षे सेवा केली आहे. अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी शासन खर्च करीत असते. या अंशकालीन पदवीधर अधीक्षकांना शासन सेवेत सामावून घेतले जाणार आहे काय ? यापूर्वी असे अनेक समूह, पदे, कर्मचारी यांना शासन सेवेत सामावून घेतले गेले आहे. त्यामुळे ज्यांनी २५ वर्षापेक्षा अधिक कालावधीची ज्यांनी सेवा केली आहे, त्यांना शासन सेवेत सामावून घेतले जाणार आहे काय ?

श्री. धनंजय मुंडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी अतिशय महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. हा प्रश्न यापूर्वीही अनेकदा या सदनामध्ये आणि सरकारसमोर उपस्थित झाला होता. यातील काही कर्मचारी माननीय उच्च न्यायालयात गेले होते. माननीय उच्च न्यायालयाने आदेश देऊन सांगितले की, या विषयाबाबत शासनाच्या उच्चाधिकार समितीकडे हा विषय न्यावा. त्यामध्ये याबाबतचा निर्णय घ्यावा. अंशकालीन कर्मचाऱ्यांना संस्थांनी मानधन तत्त्वार कामावर घेतले आहे. त्यामुळे माननीय न्यायालयाने देखील सांगितले की, या कर्मचाऱ्यांना प्रशासकीय सेवेत सामावून घ्यावयाचे असेल, वेतनश्रेणी द्यावयाची असेल तर त्यासाठी उच्चाधिकारी समितीची मान्यता लागेल. त्यावेळेस उच्चाधिकार समितीने याकरिता नकार दिला होता. इतकेच नव्हेतर, सन २०१३-१४ मध्ये मंत्रीमंडळासमोरही हा विषय उपस्थित झाला होता. मंत्रीमंडळानेदेखील हा विषय

ता.प्र.क्र. ४१४१३.....

श्री. धनंजय मुंडे.....

नाकारला होता. तरीही सामाजिक न्याय मंत्री म्हणून या विभागाची मी जबाबदारी घेतल्यानंतर माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांच्याकडे मी एक बैठक आयोजित केली होती. त्याद्वारे या कर्मचाऱ्यांकरिता काहीतरी करावयास हवे, असे सांगितले. त्यावेळेस अधीक्षकांचे पूर्वीचे मानधन ९ हजार रुपये होते. त्यामध्ये वाढ करुन ते १० हजार रुपये करण्यात आले. स्वयंपाकी पदाचे पूर्वीचे मानधन ६ हजार ९०० होते. त्यात वाढ करुन ८ हजार ५०० रुपये इतके करण्यात आले आहे. तसेच मदतनीस पदाचे पूर्वीचे मानधन ५ हजार ७५० इतके होते. त्यात वाढ करुन ते ७ हजार ५०० करण्यात आले व चौकीदार पदाचे पूर्वीचे मानधन ५ हजार ७५० ऐवजी ७ हजार ५०० करण्यात आले आहे.

अध्यक्ष महोदय, मानधनावर असलेल्या शाळेवरील कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही. दुसरे असे की, अंशकालीन कर्मचाऱ्यांकरिता समांतर आरक्षणामध्ये शासनाने १० टक्के राखीव जागा ठेवल्या आहेत. ही शासनाची पॉलिसी आहे. त्यामुळे अंशकालीन कर्मचाऱ्यांना १० टक्के आरक्षण मिळत असते. म्हणून या कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेणे किंवा त्यांना शासकीय वेतनश्रेणी लागू करणे, शक्य होणार नाही.

यानंतर श्री. चौधरी....

ता.प्र.क्र.४१४१३.....

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, या कर्मचाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या मानधनाबाबत मंत्री महोदयांनी आताच माहिती दिली. मी मंत्री महोदयांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, त्यांच्या पक्षाचा शपथनामा माझ्याकडे आहे, तो त्यांनी पाहावा. हा केवळ जाहीरनामा नसून शपथनामा आहे. वचननामा, शपथनामा या शब्दांचे वेगळे महत्त्व आहे. या शपथनाम्यामध्ये सांगितलेले आहे की, "आम्ही किमान वेतन २१ हजार रुपये एवढे देऊ." हवे तर मी मंत्री महोदयांना याची छायांकित प्रत देतो. २१ हजार किमान वेतन देण्याचे काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आपल्या शपथनाम्यामध्ये सांगितलेले असताना मंत्री महोदयांनी आता सांगितलेले ६ हजार रुपये, ९ हजार रुपये, त्यामध्ये ८०० रुपये वाढ करण्यात आली या बाबी कितपत योग्य आहेत ? अर्थात, मंत्री महोदय लगेच मानधन वाढविण्याबाबत घोषणा करु शकत नाहीत याचीही मला जाणिव आहे. कारण असे करण्यापूर्वी वित्त विभागाची परवानगी घेणे आवश्यक आहे. परंतु माझा मंत्री महोदयांना प्रश्न आहे की, या विषयाच्या अनुषंगाने आपल्या दालनामध्ये बैठक आयोजित करणार का ? तसेच अंशकालीन उमेदवारांना १० टक्के आरक्षण दिले जात असल्याबाबत आपण आताच सांगितले. दिनांक २२ फेब्रुवारी, २०२१ रोजी सामान्य प्रशासन विभागामार्फत काढण्यात आलेल्या परिपत्रकामध्ये नमूद केले आहे की, अंशकालीन उमेदवारांना १० टक्के आरक्षण देण्यात येते व त्यासाठी ५५ वर्षांची वयोमर्यादा करण्यात आली आहे. परंतु स्थानिक भरती प्रक्रियेमध्ये मात्र या उमेदवारांना सांगितले जाते की, तुम्ही वयोमर्यादेमध्ये बसत नाहीत. त्यामुळे माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, आपण आपल्या विभागाच्या माध्यमातून मानधन दिल्या जाणाऱ्या सर्व संस्थांना याबाबत लेखी सूचना देऊन ५५ वर्षे वयोमर्यादा असल्याबाबत पुन्हा एकदा जाणीव करुन देणार का ?

श्री.धनंजय मुंडे : अध्यक्ष महोदय, सदर विषयाच्या अनुषंगाने माझ्या दालनात बैठक घेण्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी मागणी केली आहे. त्याला मी होकार देत आहे.

ता.प्र.क्र.४१४१३.....

श्री.धनंजय मुंडे.....

लवकरात लवकर या विषयाच्या अनुषंगाने बैठक घेण्यात येईल. तसेच त्यांनी शपथनाम्याचा देखील उल्लेख केला. शपथनामा आहे हे बरोबर आहे परंतु तो कधीपर्यंत पूर्ण करायचा याबाबत महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांचे नेते एकत्रितपणे ठरवतील. तसेच त्यांनी सूचना केली की, अंशकालीन कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या १० टक्के आरक्षणासाठी उमेदवारांची वयोमर्यादा ५५ वर्षे असल्याबाबत सर्व संस्थांना कळविण्यात यावे. त्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, शासनाच्या माध्यमातून सर्व संस्थांना तसे सांगण्यात येईल.

श्री.संजय सावकारे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे वसतीगृहातील कर्मचाऱ्यांना मानधन वाढवून दिले जाते. परंतु त्याचा परिणाम असा होतो की, वसतीगृह चालविणारे लोक दहा-दहा पंधरा-पंधरा वर्षे काम केलेल्या अधीक्षक किंवा इतर कर्मचाऱ्यांना कामावरुन काढून टाकून नवीन लोकांकडून पैसे घेऊन कामावर घेतात. त्यामुळे माझी विनंती आहे की, ज्या लोकांनी किमान पाच-सात वर्षे किंवा आपण जे ठरवाल तेवढे दिवस काम केले असल्यास त्यांना सबळ कारणाशिवाय कामावरुन काढता येणार नाही, असा निर्णय करावा. तो आपण करणार का ?

अध्यक्ष महोदय, माझा दुसरा मुद्दा असा आहे की, किमान अधीक्षक पदावरील कर्मचाऱ्यांना तरी सेवेत कायम केले पाहिजे. कारण यासाठी खर्च होणारे सर्व पैसे सरकारचे आहेत परंतु त्यावर नियंत्रण मात्र शासनाचे नाही. सर्व नियंत्रण खासगी लोकांमार्फतच केले जात आहे. त्यामुळे किमान अधीक्षक हे पद तरी शासकीय पध्दतीप्रमाणे भरले जाईल का ?

श्री.धनंजय मुंडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, कर्मचाऱ्यांसाठीचे पैसे संस्थेकडे जातात व संस्थेमार्फत कर्मचाऱ्यांना दिले जातात. अनेकदा या संस्था चार, पाच वर्षांनी कर्मचाऱ्यांना कामावरुन काढून त्या ठिकाणी

ता.प्र.क्र.४१४१३.....

श्री.धनंजय मुंडे.....

नवीन कर्मचाऱ्यांनी नेमूणक करतात. परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, आपण असे करणाऱ्या स्पेसिफिक संस्थेची माहिती दिल्यास त्याबाबत नक्कीच चौकशी करण्यात येईल. तसेच सामाजिक न्याय विभागाने देखील निश्चित केलेले आहे की, ठराविक काळ मानधनावर काम केलेल्या कर्मचाऱ्याला व्यक्तिगत कारण असल्याशिवाय बदलता येणार नाही. तरीही सन्माननीय सदस्यांची सूचना विचारात घेऊन निर्णय करता येईल. तसेच दुसरी बाब अशी की, अधीक्षक पद असले तरीही ते मानधनावरच राहील.

(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.दीपक चव्हाण)

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.४१४१३...

श्री. रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न प्रामुख्याने अनुदानित मागासवर्गीय वसतिगृहांच्या बाबतीत आहे, विनाअनुदानित नाही. त्यामुळे या प्रश्नाच्या अनुषंगाने मी एक प्रश्न विचारु इच्छितो की, संपूर्ण राज्यभरात अनुदानित मागासवर्गीय वसतिगृहे किती आहेत व या वसतिगृहामध्ये किती पदवीधर अंशकालीन अधीक्षक पदावर कार्यरत आहेत, याची माहिती मंत्री महोदयांनी द्यावी.

श्री. धनंजय मुंडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी खूप मोठी माहिती मागितली आहे. ही माहिती मी पटलावर ठेवतो. अनुदानित वसतिगृहांची एकूण संख्या आणि त्यामध्ये अधीक्षकांसह इतर सर्व पदांची माहिती मी पटलावर ठेवतो.

असुधारित प्रत

मागासवर्गीय विद्यार्थी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित असल्याबाबत

(२) * ४१९५७ श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन उच्च शिक्षण घेण्यासाठी व विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण कमी होण्याकरिता मॅट्रिकोत्तर शिक्षण शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात आली असून केंद्र शासन व राज्य शासनाच्यावतीने सदर शिष्यवृत्ती योजनेकरिता मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद केली जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१७ ते २०२१ या कालावधीत केंद्र आणि राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीतून ८८१ कोटी रुपये अखर्चित राहिल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेसाठी प्राप्त तरतूदी पैकी आठशे कोटीहून अधिक निधी अखर्चित असतानाही अद्यापही हजारो विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित राहावे लागत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मोठ्या प्रमाणावर शिष्यवृत्तीचा अखर्चित निधी उपलब्ध असतानाही मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला नाही याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले तद्नुषंगाने शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित ठेवणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, राज्यातील मॅट्रिकेत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रलंबित शिष्यवृत्तीची रक्कम देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विजय वडेट्टीवार : (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.

ता.प्र.क्र.४१९५७...
श्री.विजय वडेट्टीवार...

(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात इमाव, विजाभज व विमाप्र या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रलंबित शिष्यवृत्ती / फ्रिशिपसाठी अर्थसंकल्पित असलेला १०० टक्के निधी (रु.१४६४ कोटी) महाडिबीटी प्रणालीवर वितरीत करण्यात आला आहे. सद्यस्थितीत सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील रु. ५३० कोटी शिष्यवृत्ती/फ्रिशिप प्रलंबित आहे. तसेच सन २०२१-२२ चे हिवाळी अधिवेशनात रुपये १२६० कोटी पुरवणी मागणी मंजूर झाली असून निधी वितरणाची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, सन २०१७ ते २०२१ या आर्थिक वर्षांमध्ये केंद्र व राज्य शासनाकडून मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी अनुक्रमे किती निधी प्राप्त झाला होता, याचा वर्षनिहाय तपशील मंत्री महोदयांनी द्यावा. तसेच सन २०१७ ते २०२१ या आर्थिक वर्षांमध्ये मंजूर केलेल्या निधीपैकी किती निधी अखर्चित राहिला होता आणि त्याची कारणे काय आहेत ?

श्री. विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, सन २०१८-१९ मध्ये जवळपास ९ लाख ५६ हजार विद्यार्थ्यांना १९२५ कोटी रुपये वितरित झाले आहेत. सन २०१९-२० मध्ये ९ लाख २३ हजार विद्यार्थ्यांनसाठी १९४६ कोटी रुपये वितरित झाले आहेत. २०२०-२१ मध्ये ९ लाख ५० हजार विद्यार्थ्यांसाठी १६७९.६४ कोटी रुपये वितरित झाले आहेत.

अध्यक्ष महोदय, हे खरे आहे की, सन २०२०-२१ या वर्षाचा विचार करता दरवर्षी बजेटमध्ये जेव्हा मागणी येते तेव्हा मार्च महिन्यापर्यंत त्या वित्तीय वर्षामध्ये येत नाही तर ते वित्तीय वर्ष संपल्यानंतर येते. यानुसार २०२०-२१ या आर्थिक वर्षांमध्ये जी मागणी होती ४३२ कोटी ४४ लाख रुपये आता आमच्या विभागाला पुरवणी मागण्यांमध्ये मंजूर झाले आहेत. तो सर्व निधी महाडीबीटी पोर्टलकडे सुपूर्द केला आहे. मला असे वाटते की, येत्या ४-५ किंवा ८ दिवसात हा संपूर्ण निधी वितरित केला जाईल. महाडीबीटीकडे कोणताही निधी अखर्चित राहिलेला नाही.

ता.प्र.क्र.४१९५७...
श्री. रविंद्र वायकर...
आज रोजी मी माहिती घेतल्यानुसार ते १४ कोटी रुपये होते. परंतु आज एकही रुपया अखर्चित नाही. कालच्या पुरवणी मागण्यांद्वारे जे ४३२ कोटी रुपये उपलब्ध झाले ते सर्व महाडीबीटीला दिले आहेत.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, खरं म्हणजे या डीबीटी प्रक्रियेला या वर्षी उशीर झाला. आता आपल्याला तो निधी मिळाला आहे. परंतु दरम्यानच्या काळामध्ये काही महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून फी घेतली आहे. आता डीबीटीच्या माध्यमातून ती पुन्हा संबंधित महाविद्यालयांना मिळणार आहे. त्यामुळे पहिल्यांदा ज्या महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून फी घेतली आहे त्याची माहिती घेऊन त्यांना ती फी परत करायला लावली पाहिजे. तसेच त्यांना तंबी दिली पाहिजे की, आपल्याला अशा प्रकारे फी वसूल करण्याचा अधिकार नाही. याबाबत शासन माहिती घेऊन त्याबाबतचे कडक निर्देश देईल काय ?

श्री. विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेते यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे तो खरा आहे. शासनाकडून डीबीटीचा निधी उपलब्ध झाला नसल्यामुळे काही महाविद्यालयांनी काही अभ्यासक्रमांच्या बाबतीत, जसे आपण व्हीजेएनटी आणि एसबीसी घटकातील विद्यार्थ्यांसाठी शासन १०० टक्के प्रतिपूर्ती करते. त्यामध्ये प्रोफेशनल आणि नॉन-प्रोफेनशल अभ्यासक्रमांचाही समावेश आहे. परंतु ओबीसीसाठी विना अनुदानित संस्थांना ५० टक्के निधी वितरित केला जातो. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांकडून ५० टक्के रक्कम संबंधित महाविद्यालये वसूल करतात, अशा तक्रारी शासनाकडेही प्राप्त झाल्या आहेत. या संदर्भात शासनाने पत्रक काढले आहे आणि जर त्यांनी ते पैसे परत केले नाहीत तर शासन त्यांच्यावर कडक कारवाई म्हणजे फौजदारी स्वरुपाची कारवाई करेल. कारण हे चुकीचे आहे. कारण शासन डीबीटीद्वारे त्या संस्थेला निधी पुरवितो. परंतु त्यांनी विद्यार्थ्यांकडून ते आधीच वसूल केले असतील तर त्यावर नक्की कडक कारवाई करु आणि त्यासंबंधी निर्देश देण्यात येतील.

औसा व निलंगा (जि.लातूर) तालुक्यातील महावितरण उपकेद्रांची क्षमता वाढ करण्याबाबत

(३) * ४३५६६ श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा व निलंगा (जि.लातूर) तालुक्यातील महावितरण विभागाच्या उप केंद्राच्या परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतीपंपास कमी दाबाने विदयुत पुरवठा होत असून तेथील वाहिन्यांवर अतिभार निर्माण झाल्याने विदयुतपंप सुरळीत चालत नाहीत तसेच गावांना एक दिवसाआड विदयुत पुरवठा होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उपकेंद्राची क्षमता वाढ करण्याच्या कामास मंजूरी देऊन काम त्वरित करण्याबाबत औसा विधानसभा येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सन २०२१ मध्ये ऊर्जा मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे तसेच दिनांक ११ डिसेंबर, २०२१ रोजी मा.उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी, लातूर येथे झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या आढावा बैठकीत कृषी ऊर्जा धोरण, २०२० अंतर्गत निधीतून मंजूरी देण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने उपकेंद्राचे काम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. नितिन राऊत : (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
लोकप्रतिनिधींकडून अशा आशयाचे पत्र महावितरण कंपनीस प्राप्त झाले आहे.
(३) औसा व निलंगा तालुक्यातील वीज ग्राहकांना योग्य दाबाने गुणवत्तापूर्वक अखंडित वीजपुरवठा करणे शक्य व्हावे यासाठी कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० अंतर्गत मौजे माळुंब्रा येथे ३३/११ के. व्ही. ५ एमव्हीए क्षमतेचे नवीन उपकेंद्र तसेच सुधारीत वितरण क्षेत्र (RDSS) योजनेअंतर्गत तीन नवीन ३३/११ के. व्ही., ५
ता.प्र.क्र.४३५६६...

डॉ. नितीन राऊत...
एमव्हीए क्षमतेची उपकेंद्रे आणि एकूण पाच ३३/११ के. व्ही. उपकेंद्रामध्ये अतिरिक्त ५ एमव्हीएचे रोहित्र उभारणे व एक उच्चदाब रोहित्र क्षमतावाढ करण्याबाबतचे तांत्रिक प्रस्ताव प्रस्तावित करण्यात आले आहेत. सुधारीत वितरण क्षेत्र (RDSS) योजनेस मान्यता मिळाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार सदर कामे प्राधान्याने हाती घेण्यात येतील.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. अभिमन्यू पवार : अध्यक्ष महोदय, माझ्या मतदार संघातील बेलकोंड, उजनी आणि कासार शशी येथील प्रचंड लोड असल्याने साधारणपण टाका, गुळखेडा, वाडी, मसुर्डी, एकंबी, एकमेवाडी, तांडा, आशिव आदि गावांमध्ये अतिशय कमी दाबाने आणि १ दिवसाआड वीज पुरवठा होत आहे.

अध्यक्ष महोदय, शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत तर अतिशय कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्याने शेतकरी प्रचंड अडचणीत आहे. दरम्यानच्या काळात मी मंत्री महोदयांनी भेटलो सुध्दा होतो. मौजे वाळंब्रा येथे महावितरणचे नवीन उपकेंद्र आर.सी.एफ. निधीमधून सन २०२१ मध्ये मंजूर झाले आहे परंतु त्यासंबंधी अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे ही कार्यवाही कधी होणार, हा माझा पहिला प्रश्न आहे.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

ता.प्र.क्र. ४३५६६....

श्री. अभिमन्यु पवार....

अध्यक्ष महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, सन २००७ मध्ये अशिव, ता.औसामध्ये उपकेंद्र मंजूर झालेले असून भूसंपादनाची कार्यवाही देखील झालेली आहे परंतु ते पूर्ण करण्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही होत नाही. माझा तिसरा प्रश्न असा आहे की, माझ्या मतदारसंघामध्ये ऐली आणि हत्तरगा(हलसी) या ही भागामध्ये उपकेंद्र ओव्हडलोड झाल्यामुळे विद्युत पुरवठा योग्य पद्धतीने होत नाही. त्यामुळे या ही भागामध्ये नवीन उपकेंद्र मंजूरीसाठी महावितरण कंपनीने मुख्य कार्यालयास प्रस्ताव दिलेला आहे. परंतु अद्यापपर्यंत त्या प्रस्तावावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही. माझा चौथा प्रश्न असा आहे की, माझ्या मतदारसंघामध्ये नागरसोगा, जावळी, शिवणी, एरंडी, खारोसा, अलमला, बेटा, वानवडा या उपकेंद्राची क्षमता ५ एमव्हीएने वाढविण्यासाठीची मागणी मी माननीय मंत्र्यांना भेटून दिनांक १० फेब्रुवारी, २०२१ रोजी केली होती. त्यावरही माननीय मंत्र्यांकडून सकारात्मक उत्तर आलेले नाही. माननीय मंत्र्यांनी या चारही प्रश्नावर आपल्यामार्फत मला उत्तर द्यावे, ही विंनती आहे.

डॉ. नितिन राऊत : अध्यक्ष महोदय, हा विषय लातूर परिमंडळातील आहे. औसा विधानसभा मतदारसंघामध्ये औसा व निलंगा तालुक्यांचा समावेश होतो. त्यामध्ये औसा, निलंगा, किल्लारी आणि शिरुर अनंतपाळ हे चार उप विभाग येतात. या संबंधीचा विषय सन्माननीय सदस्यांनी मांडला आहे. तर त्यावर निश्चितपणे कार्यवाही करण्याचे निर्देश आम्ही दिलेले आहेत. औसा विभागांतर्गत ३३/११ के.व्ही. बेलकुंड उपकेंद्र आहे. तिथे ५ एमव्हीए क्षमतेचे दोन रोहित्र आहेत. सदर उपकेंद्रातील ११ के.व्ही. तापशी कृषी वाहिनीवरुन कमाल भार जानेवारी, २०२२ मध्ये १९५ ॲम्पियरपर्यंत गेला होता. त्यावेळी वीज ग्राहकांना ८ दिवसांसाठी सुनियोजित चक्राकार पद्धतीने वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला होता. या सर्व बाबी लक्षात घेतल्यानंतर नवीन टॅब एबी स्विच तिथे बसविण्यात आला आणि काही आवश्यक तांत्रिक कामे सुद्धा पूर्ण करण्यात आली. नवीन उपकेंद्रासंबंधीची माहिती सन्माननीय सदस्यांनी विचारली आहे.याबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, कृषी

ता.प्र.क्र. ४३५६६....

डॉ. नितिन राऊत....

वीज धोरणांतर्गत आम्ही नवीन वीज उपकेंद्र घेतलेले आहे. ते प्रस्तावित आहेत. औसा, निलंगा तालुक्यातील वीज यंत्रणेच्या सक्षमीकरणाचा हा भाग म्हणून उर्वरित उपकेंद्रामध्ये रोहित्र क्षमता वाढ करण्याचे सुद्धा आम्ही प्रस्तावित केलेले आहे.

ॲड. राहुल कुल : अध्यक्ष महोदय, वीज तोडणीच्या नंतर परत ती जोडणी झाल्यामुळे थोडासा दिलासा मिळत असल्यामुळे राज्यातील बऱ्याच भागामध्ये विशेषत: पुणे जिल्ह्यातील बऱ्याच भागात पूर्ण ८ तास वीज मिळत नाही व वीज पुरवठा वारंवार खंडीत होत आहे. त्या समस्येसंदर्भात किंवा त्या सबस्टेशनसंदर्भात आपण गंभीर नसतो. त्यामुळे जास्त लोड वाढल्यांनतर अशा समस्यांना सामोरे जावे लागते. त्या संदर्भात आपण काय उपाययोजना करणार आहात हा माझा पहिला प्रश्न आहे. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, आपण जरी ३ महिन्यासाठी विजेच्या बाबतीत तात्पुरता दिलासा दिला असला तरी त्यानंतर आपण शेतकऱ्यांसाठी काय धोरण घेणार आहात, याची माहिती द्यावी. कारण मागच्या अधिवेशनापुरती वीज कपात थांबविली होती आणि परत आपण वीज तोडणी सुरु केली. त्यामुळे आता परत आपण तेच केले तर शेतकऱ्यांच्या वतीने विनंती आहे की, आपण याबबतीत त्यांना दिलासा देऊन सभागृहाला अवगत करावे.

डॉ. नितिन राऊत : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य मला भेटायला देखील आले होते. त्यांच्या सूचनेनंतर माननीय मंत्री श्री. अमित देशमुख आणि सन्माननीय सदस्य श्री. धीरज देशमुख यांनी सुद्धा विनंती केली होती. त्यांच्या सांगण्यावरुन एक बैठक सुद्धा आयोजित केली होती. ती बैठक आयोजित केल्यानंतर मी सर्व संबंधीत अधिकाऱ्यांना निर्देश दिलेले होते की, या सर्व अडचणीच्या संदर्भात आपण लोकप्रतिनिधींच्या भावना लक्षात घेऊन त्या क्षेत्रातील अडचणी दूर कराव्यात. त्या अनुषंगाने एसीएफमध्ये आणि नवीन आरडीएसएसयोजनेमध्ये त्यामध्ये उजनी, अशीव, हत्तरगा(हाळसी), शिवपूर असे अनेक लोकेशन प्रस्तावित केले आहेत.

ता.प्र.क्र. ४३५६६....

डॉ. नितिन राऊत....

त्यानंतर आम्ही काही नवीन योजना सुद्धा आणलेल्या आहेत. आरडीएसएसमध्ये बांधकाम भवन, राजीव गांधी चौक, शिवाजी चौकी, सिद्धेश्वर मंदिर आणि ॲडिशनल एमआयडीसी सुद्धा घेतलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले आहे ते सुद्धा आरडीएसएसमध्ये प्रस्तावित करुन नव्याने क्षमता वाढ करण्यासंदर्भातील प्रस्ताव आम्ही पुढे पाठवलेला आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

ता. प्र.क्र. ४३५६६.....

श्री. अभिमन्यू पवार : अध्यक्ष महोदय, माझ्या पहिल्या प्रश्नाला मंत्री महोदयांनी 'अंशत: खरे आहे' असे उत्तर दिलेले आहे. हे अंशत: खरे कसे काय असू शकते ? हे १०० टक्के खरे आहे. आमच्या भागातील ८ ते ९ गावे मोठया प्रमाणात बाधित आहेत. येथे एक दिवसाआड पाणी पुरवठा होतो. येथील विद्युत पंप पूर्णपणे बंद आहेत. वीज पुरवठा जर २४ -४८ तास केला जात नसेल तर येथील लोकांनी काय करायचे ? या लोकांना एक दिवसाआड ७ ते ८ तास केवळ वीज पुरवठा केला जातो. माझ्या पहिल्या प्रश्नाला ठोस उत्तर दिले पाहिजे. बेलकुंड, उजनी, कासार हे ओव्हरलोड झाले आहेत. त्यांना न्याय दिला पाहिजे. टाका, गुळखेडा, वाडी, मासुर्डी, एकंबी, एकंबीवाडी, तांडा, औसी, शीव, आशिव या गावांना न्याय मिळाला पाहिजे. येथे एक दिवसाआड केला जाणारा वीज पुरवठा थांबला पाहिजे. शासनाने या भागात नियमित ८ तासाचा वीज पुरवठा देण्याकरिता ठोस उपाययोजना केली पाहिजे.

डॉ. नितीन राऊत : अध्यक्ष महोदय, मी या पूर्वीच सांगितले आहे की, रब्बी हंगामात उच्च दाबाच्या वीजेच्या मागणीमध्ये बरीच वाढ होते. अनेक कृषी वीज वाहिन्या अतिभारित होत असतात. यामुळे योग्य दाबाने वीज पुरवठा होत नाही व तांत्रिक अडचणी निर्माण होतात. या ठिकाणी मुबलक पाऊस पडला होता. यामुळे वीजेची मागणी वाढली असल्याने वीज तुटवडा निर्माण झाला होता. या अनुषंगाने जेवढे प्रश्न उपस्थित झाले ते प्रस्तावित केले आहेत. आपल्या येथे नवीन डीपीआर करुन केंद्र शासनाची नवीन आरडीएसएस ही योजना येथे आलेली आहे. कृषी वीज धोरणांतर्गत जेवढा एसीएफ आपल्याकडे तयार झाला आहे, यामधून कामे होती घेतली आहेत.

श्री. उदयसिंह राजपूत : अध्यक्ष महोदय, गेल्या २ वर्षांपासून माननीय ऊर्जा मंत्री यांच्याकडे लेखी पत्रव्यवहार केलेला आहे. तसेच मुख्य अभियंता, उप अभियंता या सर्वांना पत्र दिलेले आहे. कन्नड- सोयगावला लागून जळगाव भाग येतो. येथे

ता. प्र.क्र. ४३५६६.....

नियमित वीज पुरवठा होत नाही. २-३ दिवस लाईन बंद असते. येथे १३२ केव्ही सबस्टेशन बसविण्याची विनंती केली आहे. तरी देखील तेथे काहीच होत नाही. यासंबंधी मंत्री महोदयांनी लक्ष देऊन मार्ग काढावा,अशी विनंती आहे.

डॉ. नितीन राऊत : अध्यक्ष महोदय, नोंद घेण्यात आली आहे.

ॲड. राहुल कुल : अध्यक्ष महोदय, मी मघाशी दोन प्रश्न विचारले होते. या दोन्ही प्रश्नांचे उत्तर मिळाले नाही. वारंवार वीज पुरवठा खंडित होत आहे. या संबंधी पायाभूत यंत्रणेकडे लक्ष दिले जात नाही. यामुळे पुणे जिल्ह्यात ८ तासही वीज पुरवठा मिळत नाही. वारंवार वीज पुरवठा खंडित होत आहे. याचे उत्तर दिलेले नाही. शेतकऱ्यांची विनंती आहे. ३ महिन्यानंतर काय होणार आहे या बाबत राज्यात उत्सुकता आहे. या संबंधी आताच धोरण ठरवावे. अधिवेशन संपल्यानंतर वेगळे निर्णय घेतले जातात असे आमचे मत होऊ नये. आता धोरण ठरवले तर ते शेतकऱ्यांच्या व अधिकाऱ्यांच्या लक्षात येईल.

तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण) : हा प्रश्न केवळ औसा व निलंगा तालुक्यातील उपकेंद्रांची क्षमता वाढ करण्यासंबंधी आहे. प्रश्न विचारण्यास माझी हरकत नाही, मी केवळ आपल्याला सांगितले आहे.

डॉ. नितीन राऊत : अध्यक्ष महोदय, कृषी वीज धोरणांतर्गत या भागातील जेवढया शेतकऱ्यांना योजनेचा लाभ घेतला आहे, त्यामध्ये ५० टक्के आधीच निर्लेखन केलेले आहे. या नंतर ५० टक्के जी रक्कम येते ती त्यांनी भरण्याचा प्रयत्न केला तेव्हा विलंब आकार, व्याज यामध्ये सवलत दिली जाते. अशा प्रकारे पुन्हा ५० टक्के वीज बिल कमी करण्यात येते. त्यांना थकबाकी मुक्त केले जाते. सन्माननीय सदस्यांच्या मतदारसंघात जेवढा एसीएफ तयार झाला असेल, जेवेढे लोक थकबाकीमुक्त झाले असतील त्या प्रमाणात कामे उपलब्ध करुन देण्यात येतात. ती

ता. प्र.क्र. ४३५६६.....

डॉ. नितीन राऊत .....

योजना आता १० दिवसांपर्यंत आहे. माझी सदनाला विनंती आहे की, त्यांनी आपापल्या मतदारसंघात वीज बिले भरुन थकबाकीदारांना मुक्तता मिळवून दिली तर निश्चितपणे एसीएफ जास्त तयार होईल व त्यांना त्याचा फायदा मिळेल.

तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण) : सन्माननीय सदस्य ॲड. राहुल कुल यांनी प्रश्न विचारला की, वीज तोडणी आपण थांबवली असून ३ महिन्यांची मुदतवाढ दिली आहे, या संबंधी कोणता ठोस निर्णय घेतला जाणार आह. या बाबत उत्तर द्यावे.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ४३५६६ ...

डॉ.नितीन राऊत : अध्यक्ष महोदय, आपण वीज तोडणी ३ महिने थांबविलेली आहे. त्याचा संबंध वीज बिल वसुलीशी आहे. असे होऊच शकत नाही की, वीज खाते किंवा कंपनी पैशांशिवाय चालू शकेल. वीज वितरण करताना आम्ही कोणाकडून तरी वीज विकत घेत असतो. वीज निर्माण करण्याकरिता कोळसा लागतो. आम्हाला जर काही मदत करावयाची असेल तर, बँकांचे कर्ज देखील मोठ्या प्रमाणात घ्यावे लागते. जी वीज बिले येतात, त्या वीज बिलांची दुरुस्ती आता शिबिरांद्वारे होऊ लागली आहे. ती दुरुस्ती करुन त्या लोकांनी वीज बिले भरावीत, या संदर्भात आम्ही सर्व आमदार महोदयांना पत्र लिहिलेले आहे. त्या अनुषंगाने त्यांनी जर प्रयत्न केला तर विलासराव देशमुख अभय योजना व कृषी धोरण योजना या २ योजनांचा लाभ शेतकरी व सामान्य ग्राहकांना मिळू शकेल व त्यातून त्यांची सुटका होऊ शकेल.

श्री.श्यामसुंदर शिंदे : अध्यक्ष महोदय, लोहा व कंधार तालुक्यामध्ये २२० के.व्ही.चे सबस्टेशन .... पॉवर स्टेशन मंजूर आहे. मी याबाबत गेली २-३ वर्षे पाठपुरावा करीत आहे. ते २२० के.व्ही.चे सबस्टेशन माननीय ऊर्जा मंत्री तेथे कधी सुरु करतील, याबाबत त्यांनी सांगावे, अशी माझी विनंती आहे.

डॉ.नितीन राऊत : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांचा प्रश्न या विषयाशी संबंधित नाही. मात्र त्यांनी मला भेटून निवेदन दिलेले आहे, त्याबाबत योग्य तो विचार करण्यात येईल.

श्री.राम सातपुते : अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील साळमुख, दहिगाव या दोन सबस्टेशन्सची क्षमता वाढविली पाहिजे. साळमुख सबस्टेशनची क्षमता ५ एसव्हीए करुन, त्याची निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन त्याबाबत तत्काळ कार्यवाही झाली पाहिजे. तांदुळवाडी या गावातील शेतकऱ्यांना मागच्या एक वर्षांपासून केवळ ४ तास लाईट मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड हाल होत आहेत. मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, माझ्या मतदारसंघातील साळमुख व दहिगाव या उपकेंद्रांची क्षमता आपण वाढवणार काय?

ता.प्र.क्र. ४३५६६ ...

डॉ.नितीन राऊत : अध्यक्ष महोदय, मी आमदार महोदयांना धन्यवाद देऊ इच्छितो. ते आपल्या मतदारसंघाविषयी फार जागरुक आहेत. हीच जागरुकता त्यांनी वीज कृषी धोरणांतर्गत जी वीज बिल वसुली आहे, जे थकबाकीदार मुक्त करण्यात येणार आहेत आणि जी आरडीएसएसची योजना आहे त्यातून जर त्यांच्याकडे विकासाची कामे करुन घ्यावयाची असतील तर त्यांनी सर्व ग्राहकांना विनंती करावी व आपल्या मतदारसंघात एसीएफ क्रिएट करावा, तरच निश्चितपणे याचा लाभ आपल्याला मिळू शकेल.

श्री.हरिभाऊ बागडे : अध्यक्ष महोदय, रोहित्रांचा प्रश्न राज्यभर आहे. आज सर्व रोहित्रे ही ओव्हरलोड आहेत. आपण त्यावर सतत नवनव्या मोटारी जोडत जातो. ६३ चा असेल तर सव्वाशेचा लोड, १०० चा असेल २०० चा लोड त्यावर असतो. त्यामुळे डी.पी. नेहमी खराब होतात. १५-१५ दिवस पाणी मिळत नाही. या दिवसांत १५ दिवस पिकाला पाणी दिले नाही तर, पीक वाया जाते.

अध्यक्ष महोदय, मला आपल्याला व आपल्या मार्फत अर्थ मंत्री महोदयांना विनंतीपूर्वक विचारावयाचे आहे की, हे रोहित्र विकत घेण्यासाठी आमदारांच्या स्थानिक विकास निधीतून काही निधी देता येईल का? मागच्या वेळेस आम्ही १-१ कोटी रुपयांच्या ॲम्ब्युलन्स दिल्या. आमदार निधीतून अशी रोहित्रे दिली तर, काही शेतकऱ्यांना त्याचा लाभ होईल. आम्ही आमदार निधीतून तो देऊ शकतो. सिमेंटचा १० लाख रुपयांचा रस्ता केला, तर तो २-३ वर्षे देखील टिकत नाही. हे निदान २५ वर्षे तरी टिकतील व शेतकऱ्यांना त्याचा लाभ होईल, आपण तसे कराल काय?

डॉ.नितीन राऊत : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य हे ज्येष्ठ सदस्य आहेत तसेच ते या विधानसभेचे माजी अध्यक्ष आहेत. ते माझे मित्र देखील आहेत. त्यांना याची कल्पना आहे की, हा नियोजन विभागाचा भाग आहे. मी निश्चितपणे त्यांची विनंती त्यांच्याकडे पाठविण्याची व्यवस्था करेन.

ता.प्र.क्र. ४३५६६ ...

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हरिभाऊ बागडे यांनी जो प्रश्न विचारलेला आहे, त्याबाबत ज्या आमदारांना स्थानिक विकास निधी या कामाकरिता खर्च करावयाचा असेल, त्यांना विशेष बाब म्हणून परवानगी देण्यात येईल.

तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण) : मंत्री महोदय यामध्ये मी एक सूचना करतो. आपण एसीएफ योजना सुरु केली. आपले धोरण ठरविले. त्यामध्ये ३३ टक्के गावांसाठी, ३३ टक्के तालुक्यांसाठी व ३३ टक्के जिल्ह्यांसाठी.... त्यामध्ये आपण सुरुवातीला काय केले तर ...(अडथळा)...

यानंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.४३५६६...

डॉ.नितीन राऊत : अध्यक्ष महोदय,३३ टक्के ग्रामपंचायत व ३३ टक्के जिल्हा क्षेत्रासाठी सांगितले आहे.

तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण) : अध्यक्ष महोदय, आपण या अंतर्गत डी.पी.व इतर सार्वजनिक कामे घेण्यास सांगितले आहे. परंतु आपल्या विभागाचे अधिकारी सांगतात की, शेती पंपाच्या जोडण्यांना प्राधान्य द्यावयाचे आहे. डी.पी. व रोहित्र यासंदर्भातील सार्वजनिक कामे अगोदर करण्यात यावीत. त्यानंतर शेती पंप वीज जोडणीची कामे हाती घेण्यात यावीत.

डॉ.नितीन राऊत : अध्यक्ष महोदय, नोंद घेण्यात येत आहे.

असुधारित प्रत

पांढरकवडा आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी लाच मागितल्याबाबत

(४) * ४३८४० श्री.नामदेव ससाने (उमरखेड) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदापूर (जि.यवतमाळ) शाळेच्या सहा कर्मचा-यांची माननीय न्यायालयाच्या आदेशावरुन मंजूर झालेली १ कोटी २७ लाख रुपयांची देयके काढून देण्यासाठी पांढरकवडा आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील दोन कर्मचाऱ्यांनी २० लाख रुपयांची लाच मागितल्याचे दिनांक १ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले, तद्नुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी : (१) हे खरे नाही.

(२) दि.०१.०२.२०२२ रोजीच्या सुमारास अशी घटना घडली नसल्याने कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही. तथापि, सन २०१९ मधील निनावी तक्रारीच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणाची चौकशी करण्याकरिता अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांच्या दि.११.०२.२०१९ च्या पत्रान्वये श्री.प्रविण इंगळे, सहायक आयुक्त (लेखा) (समितीप्रमुख), श्री.गजानन गणबावले, सहायक आयुक्त (शिक्षण) (सदस्य सचिव), अपर आयुक्त कार्यालय, आदिवासी विकास, अमरावती व कनिष्ठ लिपीक, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा यांचा समावेश असलेली चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. प्रस्तुत प्रकरणी सदरील समितीने पुढीलप्रमाणे निष्कर्ष दिले होते.

i) सदर प्रकरणी कोणतीही लेखी तक्रार प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा यांच्याकडे प्राप्त न झाल्याचे निर्दशनास आले.

ii) सदर प्रकरणाशी संबंधित प्रकल्प कार्यालयातील तसेच अनुदानित आश्रमशाळेतील संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्या बयानावरून आर्थिक बाबीसंदर्भात कोणताही व्यवहार/मागणी/लेखी व तोंडी तक्रार करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले. तसेच संबंधित कर्मचाऱ्यांना त्यांच्या वेतन देयकाच्या सर्व रकमा थकबाकीसह यापूर्वीच अदा करण्यात आल्या होत्या.

ता.प्र.क्र.४३८४०...
ॲड. के.सी.पाडवी...

iii) सदर प्रकरणी चौकशी समितीस तक्रारीच्या अनुषंगाने काहीही माहिती प्राप्त न झाल्याने प्रकरण दप्तरी दाखल करण्याची शिफारस चौकशी समितीने केली होती.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.संदीप धुर्वे : अध्यक्ष महोदय, उक्त तारांकित प्रश्न उपस्थित करणारे सन्माननीय सदस्य अनुपस्थित आहेत. पांढरकवडा येथील प्रकल्प कार्यालय संवेदनशील असून तेथील कर्मचारी नेहमीच पैशांची मागणी करतात. सदरहू कार्यालयातील आयएएस संवर्गातील प्रकल्प अधिकारी हेच उप विभागीय अधिकारी असून ते प्रकल्प अधिकारी कार्यालयात अतिशय कमी वेळ हजर असतात. त्यामुळे त्यांच्या अनुपस्थितीत तेथील खालील संवर्गातील अधिकारी पैशांची मागणी करतात. सदरहू बाब खरी नसल्याचे मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये नमूद केले आहे. परंतु ही बाब माझ्या मनाला पटत नाही. कारण अनेक लहानसहान प्रश्नांच्या संदर्भात उक्त कार्यालयातील कर्मचारी पैशांची मागणी करतात, यासंदर्भातील तक्रारी मला प्राप्त झाल्या आहेत. मागील आठवड्यात माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.भास्कर जाधव यांनी आपणास टोला लगावला होता, त्यावेळी मला अत्यानंद झाला होता. या प्रकरणाच्या संदर्भात काही कारवाई करण्याची मंत्री महोदयांनी घोषणा केली तर मला आनंद होईल.

ॲड.के.सी.पाडवी : अध्यक्ष महोदय, या प्रकरणीची कोणतीही तक्रार मला प्राप्त झाली नाही. सन्माननीय सदस्य यांचेकडे तक्रार असल्यास त्यांनी ती सादर करावी. त्यांच्याकडे अधिकची माहिती असल्यास निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, निनावी तक्रारीच्या संदर्भात कारवाई करण्यात येऊ नये, असा शासन निर्णय असतानाही उक्त प्रकरणी निनावी तक्रारीची चौकशी का करण्यात आली आहे ?

ता.प्र.क्र.४३८४०...

ॲड.के.सी.पाडवी : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांनी दिनांक १ फेब्रुवारी, २०२२ रोजी घटना घडल्याचे सांगितले आहे. सदरहू चौकशी अगोदरच्या प्रकरणातील आहे. दोन्ही प्रश्न वेगवेगळे आहेत, त्यांचा एकमेकांशी संबंध नाही. माननीय विरोधी पक्ष नेता यांना विनंती आहे की त्यांनी मोघम प्रश्न विचारु नयेत.

असुधारित प्रत

राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी वसतिगृहे बंद असल्याबाबत

(५) * ४२४८१ श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनाचा प्रादुर्भाव कमी होताच विविध क्षेत्र सुरु करण्यात आली असुन सामाजिक न्याय विभागांतर्गत प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी असलेली वसतिगृहे अद्यापही बंद असल्याचे दिनांक १३ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसतिगृहांमधील विविध कामांची कंत्राटे देखील यापूर्वीच संपली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वसतिगृहे सुरु करण्यासंदर्भात शासनाला तसा प्रस्ताव पाठविण्यात आला असून लवकरच वसतिगृहे सुरु होतील असे सामाजिक न्याय विभागाचे आयुक्त यांनी सांगितले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार वसतिगृह सुरु करण्यासंदर्भात माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान पाठविण्यात आलेल्या प्रस्तावावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. धनंजय मुंडे : (१) अंशत: खरे आहे. मुलांचे शासकीय वसतिगृह, रत्नागिरी या वसतिगृहाची इमारत वापरण्यास अयोग्य असल्याने तसेच, पुणे विभागातील १० व औरंगाबाद विभागातील ५ वसतिगृहांच्या इमारती स्थानिक प्रशासनाच्या ताब्यात असल्याने राज्यातील एकूण १६ वसतिगृहे सद्यस्थितीत बंद आहेत.

(२) होय, भोजन ठेक्याबाबतची ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी स्थानिक स्तरावर भोजनाची व्यवस्था करण्याच्या सूचना आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांनी प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण यांना दिलेल्या आहेत.

(३) होय.

(४) दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२१ च्या शासन पत्रान्वये दिनांक ०४ ऑक्टोबर, २०२१ पासून विभागांतर्गत वसतिगृहे सुरु करण्याबाबत आयुक्त, समाज कल्याण

ता.प्र.क्र. ४२४८१

श्री. धनंजय मुंडे...

यांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार आयुक्तालयाने सर्व प्रादेशिक उपायुक्त व सहाय्यक आयुक्त यांना वसतिगृहे सुरु करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

ॲड.राहूल कुल : अध्यक्ष महोदय, दिनांक १ ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये वसतिगृह सुरु करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. आतापर्यंत किती वसतिगृहे सुरु करण्यात आली आहेत व किती सुरु करणे शिल्लक आहेत ? नवीन वसतिगृहांना मान्यता देण्यात आली आहे परंतु त्यासंदर्भातील कार्यवाही अनेक वर्षांपासून सुरु आहे, त्यांची संख्या किती व ती केव्हा सुरु करण्यात येतील ?

श्री.धनंजय मुंडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांना सांगू इच्छितो की, सामाजिक न्याय विभागाची एकूण ४४१ वसतिगृहे असून त्यापैकी ४३० वसतिगृहे सद्य:स्थितीत सुरु आहेत. त्यामधील पुणे, सांगली व सातारा येथील ११ वसतिगृहे असून ती सुरु करण्यात आली नव्हती. त्यांची आज माहिती घेतल्यानंतर आज ५ वसतिगृहे सुरु करण्यात आली आहेत, अशी माहिती मिळाली आहे. एकूण वसतिगृहांच्या संख्येपैकी ६ वसतिगृहे सुरु नाहीत. नवीन वसतिगृहांसाठी काही वसतिगृहांना जागा मिळाली नाही, काही अर्धवट अवस्थेत आहेत व अनेक वसतिगृहांच्या इमारतीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागास सामाजिक न्याय विभागाने निधी उपलब्ध करुन दिला आहे.

यानंतर श्री.तेलंग....

ता.प्र.क्र.४२४८१.....

श्री.धनंजय मुंडे.....

त्यामुळे बांधकामाची अनेक कामे प्रलंबित राहिलेली आहेत. परंतु येणाऱ्या वर्षामध्ये आराखड्यामध्ये नमूद केलेल्या सर्व वसतीगृहांचे बांधकाम करण्यात येईल.

श्री.संजय सावकारे : अध्यक्ष महोदय, राज्यामध्ये वसतीगृह मोठ्या प्रमाणावर बांधण्यात येत आहेत. परंतु या वसतीगृहाकडे जाणारा कोणताही रस्ता कधीच व्यवस्थित राहत नाही. मागासवर्गीयांचे वसतीगृह हे गावाच्या बाहेर बांधले जातात. त्यामुळे त्या वसतीगृहाकडे जाणारा रस्ता सुस्थितीत राहत नाही. सामाजिक न्याय विभागातील निधी व्यपगत होतो आणि तो दुसऱ्या विभागाकडे वर्ग केला जातो. त्यामुळे मुख्य रस्त्यापासून वसतीगृहापर्यंतच्या रस्त्याचे काम सामाजिक न्याय विभागामार्फत करणार आहात काय?

श्री.धनंजय मुंडे : अध्यक्ष महोदय, यापूर्वी बांधण्यात आलेल्या वसतीगृहाकडे ये-जा करण्यासाठी व्यवस्थित रस्ता नसेल तर तो रस्ता सुस्थितीत करण्याची जबाबदारी आज सामाजिक न्याय विभाग घेत आहे. तसेच यानंतर सामाजिक न्याय विभागामार्फत बांधण्यात येणाऱ्या वसतीगृहाच्या अंदाजपत्रकामध्ये मुख्य रस्त्यापासून ते वसतीगृहापर्यंतच्या रस्त्याचा समावेश करण्यात येईल.

श्री.संग्राम थोपटे : अध्यक्ष महोदय, सामाजिक न्याय विभागामार्फत बांधण्यात आलेले काही वसतीगृह बंद असल्याबाबत हा प्रश्न मांडण्यात आलेला आहे. माझ्या मतदारसंघातील काही वसतीगृहासंदर्भात मी मंत्री महोदयांना अनेक वेळा पत्रव्यवहार केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या भोर मतदारसंघातील सामाजिक न्याय विभागाचे वसतीगृह भाड्याच्या इमारतीमध्ये सुरु आहेत. त्यामुळे उक्त वसतीगृहासाठी शासन अनुदान उपलब्ध करुन देणार आहे काय?

श्री.धनंजय मुंडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य मागील दीड वर्षांपासून सदर वसतीगृहाच्या प्रश्नांबाबत पाठपुरावा करीत आहेत.

ता.प्र.क्र.४२४८१.....

श्री.धनंजय मुंडे.....

आपणास माहिती असेल की, दिनांक ४ मे, २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार नवीन कोणतेही काम करता येत नव्हते. परंतु मी आता आपणास विश्वास देतो की, आपण निश्चित कराल त्या दिनांकास सामाजिक न्याय विभागामार्फत उक्त वसतीगृहाचे भूमिपूजन करण्यात येईल.

श्री.अभिमन्यू पवार : अध्यक्ष महोदय, सामाजिक न्याय विभागाचे अनेक वसतीगृह भाड्याच्या इमारतीमध्ये आहेत. परंतु माझ्या मतदारसंघातील लामजना येथे सन २०१२-१३ मध्ये वसतीगृह बांधण्यात आलेले आहे. परंतु अद्याप सदर वसतीगृह सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सामाजिक न्याय विभागाकडे हस्तांतरित करण्यात आलेले नाही. याबाबत माहिती विचारली असता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अशी माहिती देण्यात आली आहे की, सदर वसतीगृह सामाजिक न्याय विभाग हस्तांतरित करुन घेत नाही. उक्त वसतीगृह बांधण्यासाठी करोडो रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. परंतु सदर इमारत धूळखात पडलेली आहे. मध्यंतरी कोरोनाच्या काळामध्ये त्या इमारतीचा उपयोग करण्यात आला आहे. परंतु ती इमारत वापराविना पडून असल्यामुळे साफसफाई करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च आला होता. सदर इमारत उभी करण्यासाठी करोडो रुपये खर्च करुन ती वापराविना पडून असेल तर त्या इमारतीचा काय उपयोग आहे? त्यामुळे सदर इमारत सामाजिक न्याय विभाग हस्तांतरित करुन घेणार आहे काय, घेणार असेल तर किती दिवसांमध्ये घेणार आहात?

श्री.धनंजय मुंडे : अध्यक्ष महोदय, काही ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वसतीगृह बांधण्यात आलेली आहेत. परंतु अंदाजपत्रकानुसार सदर वसतीगृहाचे काम करण्यात आलेले नाही. उक्त वसतीगृह बांधकामाच्या अंदाजपत्रकामध्ये प्लास्टर, लाईट फिटींग, bathroom acessory सह अशा अनेक कामांचा समावेश होता. काही वसतीगृहामध्ये लाईट फिंटींग करण्यात आलेली नाही, bathroom acessory चे काम पूर्ण करण्यात आलेले नाही.

ता.प्र.क्र.४२४८१.....

श्री.धनंजय मुंडे.....

तसेच अशा प्रकारची काही कामे अजूनही अर्थवट अवस्थेमध्येच आहेत. अशा प्रकारचे अर्धवट वसतीगृह सामाजिक न्याय विभागाने हस्तांतरित करुन घेणे हे नियमाला धरुन नाही. ज्या वसतीगृहाचे काम पूर्ण झाले असेल ते वसतीगृह तत्काळ ताब्यात घेण्यात येईल.

असुधारित प्रत

उरण, पनवेल, पेण (जि.रायगड) तालुक्यातील महामुंबई सेझ कंपनीने शेतकऱ्यांकडून प्रकल्पाकरीता संपादित केलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत करण्याबाबत

(६) * ४२२३७ श्री.सुनील राणे (बोरीवली) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महामुंबई सेझ कंपनीने उरण, पेण व पनवेल तालुक्यातील १०००० हेक्टर जमिनीवर महामुंबई सेझ प्रकल्प उभारण्याची घोषणा करून यासाठी शासनातर्फे महामुंबई सेझ कंपनीने सन २००५ मध्ये उरण, पनवेल व पेण तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सुमारे साडेतीन हजार एकर जमिनी, मिळकती संपादन करुन जमिनी परस्पर स्वत:च्या नावावर करुन घेतल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमिनी संपादीत करुन १५ वर्षांचा कालावधी उलटूनही सदर सेझ प्रकल्प अस्तित्वात न आल्याने संपादीत केलेली जमीन शेतकऱ्यांना परत करावी अशी मागणी श्री. दत्तात्रेय नवाळे, प्रकल्पग्रस्त शेतकरी सामाजिक विकास संघटनेचे अध्यक्ष अरुण पाटील, श्रीमती वृषाली पाटील यांनी रायगड जिल्हाधिकाऱ्यांकडे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकास आयुक्त उद्योग यांनी त्यांचे दिनांक १६ जून, २००५ रोजीच्या आदेशानुसार खरेदी केलेल्या जमिनी, मिळकतीचा पंधरा वर्षांमध्ये वापर न केल्यास अथवा त्या जमिनीवर प्रकल्प उभा न केल्यास संबंधित शेतकऱ्यांनी मागणी केल्यास त्या जमीन संबंधित शेतकऱ्यांना मूळ किंमतीला परत करावे लागतील असे अध्यादेशात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार प्रकल्पासाठी संपादीत केलेली जमीन शेतकऱ्यांना परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई : (१) महामुंबई विशेष आर्थिक क्षेत्र लि. मुंबई यांना मुंबई कुळ

ता.प्र.क्र. ४२२३७.....

श्री.सुभाष देसाई.....

वहिवाट व शेत जमिन अधिनियम, १९४८ (सुधारणा १९९४) मधील कलम ६३(I)A(II)मधील तरतुदीनुसार विकास आयुक्त (उद्योग) यांच्या दिनांक ०८/०८/२००३ व दिनांक १६/०६/२००५ च्या आदेशान्वये ११६६०.०१ हेक्टर शेत जमीन खरेदी करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.

रायगड जिल्हयातील उरण, पेण व पनवेल तालुक्यांतील ४५ गावांतील ८२५७-७९-३५ हे.आर जमीन एसईझेडकरीता संपादन करणेकामी भूसंपादन अधिनियम १८९४ मधील कलम ४ प्रमाणे प्राथमिक अधिसूचना सन २००६ मध्ये शासनाच्या राजपत्रामध्ये प्रसिध्द झाली होती. त्यानंतर सन २००७ मध्ये ८१३४-९७-९१ हे.आर. जमिनीकरीता कलम ६ ची अधिसूचना सन २००७ मध्ये महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाली होती.

वरील जमिनीपैकी एकूण ३११३ प्रकरणी भूसंपादन अधिनियम कलम ११(२) प्रमाणे संमतीदर्शक निवाडे जाहीर होऊन त्या निवाडयाद्वारे १५०४-९१-३४ हे.आर जमीन संपादन करण्यात आलेली आहे व त्या जमिनीचा ताबा महामुंबई सेझ कडे देण्यात आलेला आहे. उर्वरीत जमीन भूसंपादनाच्या प्रक्रियेतून वगळण्यात आलेली आहे.

महसूल व वन विभागाचे दि. १८/०२/२०११ च्या पत्रान्वये संमती निवाडे झालेले क्षेत्र वगळता उर्वरीत क्षेत्रातील गाव नमूने ७/१२ मधील इतर हक्कातील भूसंपादनाचे शेरे काढून टाकण्याबाबतचे आदेश विभागीय आयुक्त कोकण व जिल्हाधिकारी, रायगड अलिबाग यांना दिले होते. त्यानुषंगाने तहसीलदार, पेण यांनी ७ गावातील एकूण २६२.१६.९१ हे.आर. क्षेत्राच्या ७/१२ वरील इतर हक्काचे शेरे कमी केले व उर्वरीत १७ गावांचे ७/१२ वर नोंदी न ठेवल्याने इतर हक्कातील शेरा कमी करण्याचा प्रश्न उद्भवला नाही. तसेच उरण तालुक्यातील २० गावातील ३५९३.६७.६२ हे.आर. इतक्या क्षेत्राच्या ७/१२ वरील इतर हक्कातील शेरे कमी करण्यात आले आहेत. तसेच पनवेल तालुक्यातील एका गावाचे ९६.६९.२० हे.आर. क्षेत्राच्या ७/१२ वरील इतर हक्कातील शेरे कमी करण्यात आले.

(२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) रायगड जिल्हयातील मुंबई बहुउद्देशीय सेझ विकसित करण्याकरिता ता.प्र.क्र. ४२२३७.....

श्री.सुभाष देसाई.....

केंद्र शासनाने दिनांक ०८/०८/२००३ रोजी तत्वत: मंजूरी दिल्यानंतर पाच वेळा मुदतवाढ देऊनसुध्दा तसेच १५ वर्षापेक्षा अधिक कालावधी होवून देखील महामुंबई सेझ कंपनीमार्फत विशेष आर्थिक क्षेत्र विकसित झालेले नाही. ही बाब विचारात घेता, ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी सदर विशेष आर्थिक क्षेत्राकरीता खरेदी केल्या आहेत, अशा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे मुंबई कुळवहिवाट व शेत जमीन अधिनियम, १९४८ (सुधारणा १९९४) च्या कलम ६३ (१) (अ) मधील तरतूदीनुसार त्यांच्या जमिनी मूळ किंमतीला परत करण्याबाबत विनंती केली आहे. संबंधित प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांकडून प्राप्त झालेल्या निवेदनावर सुनावणीची प्रक्रीया जिल्हाधिकारी, रायगड यांच्या स्तरावर सुरु आहे.

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, उक्त प्रश्नाच्या अनुषंगाने मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे की, महामुंबई एसईझेड मुंबईजवळ होणार. त्यामुळे अनेकांना नोकरीची संधी प्राप्त होणार आहे. शेतकऱ्यांमध्ये, गावकऱ्यांमध्ये व एमएमआरडीए रिझनमध्ये राहणाऱ्या लोकांमध्ये सुभता येईल, या कल्पनेतून सदर प्रकल्प पुढे आलेला आहे. दिनांक ८ ऑगस्ट, २००३ व दिनांक १६ जून, २००५ च्या आदेशान्वये, ११६६०.०१ हेक्टर शेत जमीन खरेदी करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.

अध्यक्ष महोदय, त्यानंतर मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये असे सांगितले आहे की, रायगड जिल्हयातील उरण, पेण व पनवेल तालुक्यांतील ४५ गावांतील ८२५७-७९-३५ हे.आर जमीन एसईझेडकरीता संपादन करणेकामी भूसंपादन अधिनियम १८९४ मधील कलम ४ प्रमाणे प्राथमिक अधिसूचना सन २००६ मध्ये शासनाच्या राजपत्रामध्ये प्रसिध्द झाली होती. त्यानंतर सन २००७ मध्ये ८१३४-९७-९१ हे.आर. जमिनीकरिता कलम ६ ची अधिसूचना सन २००७ मध्ये महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

ता.प्र.क्र. ४२२३७.....

ॲड. आशिष शेलार.....

परंतु प्रत्यक्षात राजपत्रात प्रसिद्ध केल्यानुसार ८ हजार १३४ हेक्टर आर. जमिनीची अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. तसेच उत्तरामध्ये या जमिनीचे शेरे काढले आहेत, असे सांगितले आहे. हा प्रकल्प झालेला नाही. असे असतानाही शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावर शेरे चढले आहेत. काही शेतकऱ्यांची जमीन संपादित केलेली आहे तर काहींची जमीन विकत घेतली आहे. प्रकल्प झाला नसल्यामुळे ज्या शेतकऱ्यांच्या जागा विकत घेतल्या असतील किंवा संपादित केल्या असतील त्या जागेवरील शेरे काढावयास हवे होते. उत्तरातील माहितीनुसार जवळपास ३ हजार ९५५.५३ हेक्टर जमिनीवरील शेरे काढले आहेत. याचा अर्थ ८ हजार १३४ हेक्टर जमिनीची अधिसूचना प्रसिद्ध केली गेली. ३ हजार ९५५ हेक्टर जमिनीवरील शेरे काढण्यात आले आहेत. सदर ८ हजार १३४ हेक्टर जमिनीपैकी प्रत्यक्षात १ हजार ५०४ हेक्टर आर. जमिनीचा ताबा घेण्यात आला आहे. याचा अर्थ ६ हजार ६३० हेक्टर जमिनीवर संपदानाची अधिसूचना प्रसिद्ध केली गेली. त्यापैकी ३ हजार ९५५ हेक्टर जमिनीवरील शेरे काढले आहेत. असे असतानाही जवळपास २ हजार ६८५ हेक्टर आर. जमिनीचा हिशेब लागत नाही. ही जमीन शेतकऱ्यांची आहे. तेथे प्रकल्प न झाल्यामुळे शेतकऱ्यांना ती जमीन परत मिळाली पाहिजे. त्यामुळे उर्वरित २ हजार ६८५.५२ हेक्टर आर. जमिनीवरील शेरे तातडीने किती दिवसात काढण्यात येणार आहेत ? दुसरे असे की, या प्रश्नातील अ.क्र. ३, ४ व ५ मधील प्रश्नाचे एकच उत्तर देण्यात आले आहे. १५ वर्षांपेक्षा अधिक कालावधी होऊन महामुंबई सेझ प्रकल्प न झाल्यामुळे मूळ शेतकऱ्यांना ती जागा परत किंमतीला देण्याचा विचार आहे. यावर रायगड जिल्हाधिकारी यांच्याकडे सुनावणी सुरु आहे. मी विचारु इच्छितो की, ही सुनावणी कधीपर्यंत पूर्ण होणार आहे ? त्या सुनावणीतून शेतकऱ्यांना कधीपर्यंत न्याय मिळणार आहे ? तिसरे असे की, सेझकरिता राज्य शासनाने विविध सूविधा दिल्या आहेत. स्टॅम्प ड्युटी, रजिस्ट्रेशनमध्ये सूट दिली आहे. या सुटीचा फायदा एसईझेड विकासकाला झाला आहे. ती सूट परत घेण्याबाबत राज्य सरकार कोणती भूमिका

ता.प्र.क्र. ४२२३७.....

ॲड. आशिष शेलार.....

घेणार आहे ? मी पुन्हा माझे प्रश्न मंत्री महोदयांना सांगू इच्छितो. २ हजार ६८५ हेक्टर जमिनीवर शेरे आहेत. ते शेरे कधीपर्यंत परत केले जातील ? शेतकऱ्यांच्या उताऱ्यावरुन ते शेरे कधीपर्यत काढले जातील ? दुसरे असे की, या प्रकरणातील सुनावणी कधीपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे ? तसेच देण्यात आलेल्या विविध सुटींचा फायदा एसईझेड विकासकाला झाला आहे. याबाबत राज्य सरकारचे धोरण काय आहे ?

श्री. सुभाष देसाई : अध्यक्ष महोदय, ८ हजार १३४ हेक्टर आर. जमिनीपैकी केवळ १ हजार ५०४ हेक्टर क्षेत्र संपादित करण्यात आली आहे. उर्वरित जमिनींवर शेरे नाहीत. त्यामुळे त्या जमिनी शेतकऱ्यांच्याच आहेत. १ हजार ५०४ हेक्टर जमीन संपादित झाली आहे. त्यावर महामुंबई एसईझेड लि. या कंपनीने कोणतेही काम केलेले नाही. त्या कंपनीने त्याठिकाणी विकास केला नाही. मुदतवाढ देऊनही तेथे कोणतीही प्रगती झालेली नाही. ही परिस्थिती असल्यामुळे शेतकऱ्यांनी त्या जमिनी परत करण्याची मागणी केली आहे. याबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे सुनावणी सुरु आहे. ती सुनावणी लवकरात लवकर पूर्ण केली जाईल. यात १ हजार ५०४ हेक्टर आर. जमिनीमध्ये अनेक अर्जदार आहेत. काही अर्जदारांनी या जमिनी परत मिळण्यासाठी निवेदने दिली आहेत. त्यावर सुनावणी सुरु आहे. सुनावणीची प्रक्रिया वेगाने पूर्ण करुन त्याबाबत निर्णय द्यावेत, अशी सूचना देण्यात येत आहे. त्यासाठी तीन महिन्यांची मुदत देण्यात येत आहे.

श्री. महेश बालदी : अध्यक्ष महोदय, या शेतकऱ्यांना न्याय मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींसोबत मंत्री महोदयांनी बैठक घ्यावी. ३ महिन्यामध्ये जिल्हाधिकारी या प्रकरणांचा निवाडा करतील, जिल्हाधिकारी स्तरावर मंजुरी मिळेल, असे आश्वासन मंत्री महोदयांनी दिले आहे. मंत्री महोदय या विषयाबाबत सकारात्मक आहेत. ही अतिशय आनंदाची बाब आहे. परंतु माझे असे म्हणणे आहे की, पाताळगंगा एमआयडीसी देखील याच तालुक्यात आहे. १५ वर्षाबाबतचा

ता.प्र.क्र. ४२२३७.....

श्री. महेश बालदी.....

कायदा आहे. परंतु ३० वर्षे होऊनही तेथील एमआयडीसीमध्ये एकही काम झालेले नाही.

यानंतर श्री. चौधरी...

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.४२२३७.....

श्री.महेश बालदी.....

आपल्या पुढच्या पिढीला नोकऱ्या मिळतील म्हणून तेथील शेतकऱ्यांनी एम.आय.डी.सी. साठी जागा दिली होती. परंतु ३० वर्षे उलटून देखील तेथे अद्याप काहीही काम झालेले नाही. त्यामुळे या जमिनी परत देण्याबाबत शासन विचार करेल का ?

श्री.सुभाष देसाई : अध्यक्ष महोदय, मी आताच स्पष्ट केले आहे की, जिल्हाधिकाऱ्यांच्या पातळीवर यासंदर्भातील सुनावण्या सुरु आहेत व ती प्रक्रिया तीन महिन्यांमध्ये पूर्ण व्हावी. तरीही आवश्यकता भासल्यास यासंदर्भात बैठक घेण्याची आमची तयारी आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी दुसरा मुद्दा पाताळगंगा एम.आय.डी.सी. संदर्भातील मांडला आहे. त्यांनी सांगितले की, १५ वर्षे उलटून देखील तेथे काहीही विकास झालेला नाही. मी सांगू इच्छितो की, जर तेथे काहीही विकास झालेला नसेल तर तेथील शेतकऱ्यांसोबत नक्कीच बैठक घेतली जाईल.

श्री.अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, यामध्ये १५०० हेक्टर जमीन संपादित करुन त्याला सुमारे १५ वर्षे उलटली आहेत. यासंदर्भात प्रत्येकाची व्यक्तिगत सुनावणी केली जाणार... तसेच महामुंबई विशेष आर्थिक क्षेत्र लि., मुंबई ही कंपनी शेतकऱ्यांच्या जमिनी परत देण्यास विरोध करीत आहे का तर तसे नाही. त्यामुळे माझी विनंती आहे की, एक्झिक्युटिव्ह ऑर्डर काढून सदर जागा शेतकऱ्यांना परत करावी. अशी ऑर्डर काढण्याचा सरकारचा विचार आहे का ? कारण १५ वर्षे उलटूनही तेथे काहीही कार्यवाही झालेली नाही. गेल्या सरकारच्या काळात याच सभागृहाने कायदा पारित केला होता की, शेतकऱ्यांची जमीन उद्योगाकरिता घेतली गेली व पुढील पाच वर्षे उलटूनही तेथे काहीही कार्यवाही न झाल्यास सदर जमीन शेतकऱ्यांना परत देण्यात यावी. सदर कायद्याच्या आधारे एका फटक्यात या प्रकरणातील जमिनी शेतकऱ्यांना परत करणार का ?

ता.प्र.क्र.४२२३७.....

श्री.सुभाष देसाई : अध्यक्ष महोदय, आपला भू-संपादन कायदा अतिशय चांगला व शेतकऱ्यांना न्याय देणारा आहे. त्यामुळे कुठेही सक्तीचे भू-संपादन होत नाही व जबरदस्तीचाही प्रश्न येत नाही. सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, उद्योगांकरिता जमिनी घेतल्यानंतर ५ वर्षांची नव्हे तर १५ वर्षांची मुदत आहे. ही मुदत उलटून गेल्यानंतर मात्र शेतकऱ्यांना आपल्या जमिनी भू-संपादनातून वगळण्याची मागणी करण्याचा हक्क आहे. नंतर त्यावर सुनावणी घेऊन कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली जाते. मी सन्माननीय सदस्यांना विश्वास देऊ इच्छितो की, याबाबतीत शेतकऱ्यांच्या भावना व मागण्या विचारात घेऊन योग्य निर्णय घेतले जातील.

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, ८ हजार १३४ हेक्टरपैकी १ हजार ५०४ हेक्टरवर आपण ताबा घेतला आहे व हा तेवढयापुरताच विषय आहे. परंतु उत्तरामध्ये नमूद केले आहे की, "८ हजार २५७ हे.आर. जमीन एसईझेड करिता संपादन करणेकामी भू-संपादन अधिनियम १९८४ मधील कलम ४ प्रमाणे सन २००६ मध्ये प्राथमिक अधिसूचना काढण्यात आली. तसेच ८ हजार १३४ हे.आर. जमिनीकरिता कलम ६ ची अधिसूचना सन २००७ मध्ये महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द केली." याचा अर्थ ८ हजार १३४ हे.आर. जमीन आपण महाराष्ट्र शासन राजपत्रात अधिसूचित केलेली आहे. त्यापैकी १ हजार ५०४ हे.आर. जमिनीचा आपण ताबा घेतलेला आहे, हे बरोबर आहे. परंतु उर्वरित ६ हजार ७३० हे.आर. जमीन गैर अधिसूचित करणार का ?

श्री.सुभाष देसाई : अध्यक्ष महोदय, १ हजार ५०४ हे.आर. जमिनीचे प्रत्यक्ष भू-संपादन झालेले आहे. परंतु महामुंबई विशेष आर्थिक क्षेत्र लि., मुंबई या कंपनीला यामध्ये कोणतेही स्वारस्य उरलेले दिसत नाही. त्यांना पाच वेळा मुदतवाढ देऊन देखील कोणतेही काम केलेले नाही. त्यामुळे १ हजार ५०४ हेक्टर व्यतिरिक्त उर्वरित जमिनी घेण्याचा प्रश्नच येत नाही. अर्थात, यामध्ये स्पष्टता येण्यासाठी काही निर्देश निर्गमित करणे आवश्यक असल्यास तशी कार्यवाही निश्चितपणे करण्यात येईल.

शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील आदिवासी पाडयांसाठी मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करण्याबाबत

(७) * ४११६१ श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि. ठाणे) तालुक्यातील बोरशेती, पोढ्याचा पाडा, लोभीपाडा, साकडगाव, तळयाची वाडी, अधई ठाकूरपाडा, वेहलोंडे-सापटेपाडा, अतोंडी-तईचीवाडी, टेंभा-आंबिवली, कोठारी-वेढा, फुगाळे-वरसवाडी, अजनूप-दापूरमाळ, शिरोळ-सावरकूट, उंब्रई-कातकरी वस्ती तसेच बारोळा-दहिगाव ग्रामपंचायतील कांडोळपोई, तुंबडेपाडा, तळवाडा, सिसवली या गावपाडयातील ग्रामस्थ रस्त्याअभावी आरोग्य, शिक्षण व रोजगार आदी सोयी-सुविधां पासून वंचित राहिल्याने अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असून अनेक आंदोलने करून लोकप्रतिनिधींनी निवेदन देउनही कोणतीच कार्यवाही होत नसल्याने दिनांक २४ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास तीव्र आंदोलन केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या एकूण अर्थसंकल्पातील ९ टक्केच निधी हा आदिवासी विकास विभागाच्या योजनासाठी खर्च करणे बंधनकारक असताना, अधिकाऱ्यांनी यांच्या जाणीवपुर्वक कलेल्या दुर्लक्षामुळे सदरहू निधीचा योग्य प्रकारे वापर न होता, मोठया प्रमाणावर या निधीत गैरव्यवहार होत असल्याने रस्ते निर्माण करणे गरजेचे असतानाही त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शहापूर तालुक्यातील गाव-पाडयांतील रस्ते तयार करुन ते मुख्य रस्त्यांना जोडण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ता.प्र.क्र.४११६१.....

ॲड. के.सी.पाडवी : (१), (२) व (३) आदिवासी विकास विभागाकडून आदिवासी उपयोजनेतंर्गत करण्यात येणारी रस्त्यांची कामे ही सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामविकास विभाग यांसारख्या विभागांच्या योजनांसाठी पुरक स्वरुपाची योजना असल्याने या विभागामार्फत आदिवासी भागातील रस्त्यांना मर्यादीत स्वरुपात निधी देण्यात येतो.

सन २०२१-२२ या वित्तीय वर्षामध्ये ५०५४, ५११७ या लेखाशिर्षातंर्गत शहापूर तालुक्यातील रु. ८.३० कोटी इतक्या रुपयांच्या २३ रस्त्यांच्या कामांना तसेच ३०५४, २७२२ या लेखाशिर्षांतर्गत रु. १.८० कोटी इतक्या रुपयांच्या १६ रस्त्यांच्या कामांना मान्यता देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.४११६१.....

श्री.दौलत दरोडा : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरालाच माझी हरकत आहे. शहापूर (जि. ठाणे) तालुक्यातील बोरशेती, पोढ्याचा पाडा, लोभीपाडा, साकडगाव, तळयाची वाडी, अधई ठाकूरपाडा, वेहलोंडे-सापटेपाडा, अतोंडी-तईचीवाडी, टेंभा-आंबिवली, कोठारी-वेढा, फुगाळे-वरसवाडी, अजनूप-दापूरमाळ, शिरोळ-सावरकूट, उंब्रई-कातकरी वस्ती येथील स्पेसिफिक प्रश्न आहेत. परंतु त्याबाबतचे स्पेसिफिक उत्तर मंत्री महोदयांकडून देण्यात आलेले नाही. त्यामुळे माझा प्रश्न आहे की, उपरोक्त नमूद गावांसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल का ? तसेच दिनांक २४ जानेवारी रोजी एक शासन निर्णय काढण्यात आला.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.४३८४०..

श्री. दौलत दरोडा..

अध्यक्ष महोदय, दिनांक २४ जानेवारी रोजी जो शासन आदेश काढला त्यामध्ये माझा मतदार संघ वगळण्यात आला आहे. जिल्हा परिषद, ठाणे आणि जिल्हा परिषद, पालघर यांनी ३०५४ आणि २७२२ अंतर्गत जनजातीचे राज्यस्तरीय प्रस्ताव पाठविले, त्यांना आपण तातडीने मंजुरी देणार आहात काय ?

ॲड के.सी. पाडवी : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नासंबंधी मी सांगू इच्छितो की, ज्या ज्या गावांना कामे झाली आहेत त्याची यादी माझ्याकडे उपलब्ध आहे. सन्माननीय सदस्यांना हवे असेल तर ती यादी मी पटलावर ठेवतो. यामध्ये प्रत्येक गावाला काम दिलेले आहे. त्यामध्ये ठक्कर बाप्पा योजनेतून असेल किंवा डीपीसीमधून असेल. दापूर ते माळ हे गाव वन विभागात येत असून त्या विभागाची त्यासाठी हरकत आहे. तरी देखील वन विभागाच्या अधिकाऱ्यांशी आमच्या अधिकाऱ्यांनी चर्चा केली आहे. त्यानुसार आता ते ३ (२) अंतर्गत मंजूर करण्याचे ठरले आहे. तो रस्ता करण्यास ते परवानगी देत आहेत. २०२२-२३ या वर्षाच्या यादीमध्ये प्रत्येक गावाला म्हणजे किमान ७ गावांना ३-३ लाख रुपये इतका निधी दिलेला आहे. ही बजेटमधील कामे आहेत. ठक्कर बाप्पामधील कामे २ ते ३ लाखांची आहेत. परंतु ही कामे आपण मंजूर केली आहेत. बजेटमध्ये ती मंजूर झाल्यानंतर निश्चितपणे त्या कामांची वर्क ऑर्डर देता येईल.

श्री. जयकुमार रावल : अध्यक्ष महोदय, हा आदिवासी पाडे आणि वस्त्यांसंबंधीचा प्रश्न आहे. जवळपास पावणे दोन कोटी आदिवासी बांधव महाराष्ट्रात राहतात. आपल्या राज्याच्या संपूर्ण बजेटपैकी ९ टक्के इतका निधी आदिवासी विकास विभागासाठी आरक्षित केला जातो. परंतु दरवर्षी मार्च अखेरपर्यंत हा निधी कसा खर्च करावा यासंबंधी चढाओढ सुरू असते. या विभागाचे नियम अत्यंत किचकट आहेत. यामध्ये टीएसपीला आणि ओटीएसपीला वेगवेगळा नियम आहे. परंतु आपण जर आदिवासी बांधवांना हा निधी देत असू तर त्याचा लाभ प्रत्येक आदिवासी बांधवाला झाला पाहिजे. म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, दलित

ता.प्र.क्र.४३८४०..

श्री. जयकुमार रावल...

वस्ती सुधार योजनेच्या धर्तीवर आदिवासी वस्ती सुधार योजना आपण लागू करणार आहात काय आणि लागू करणार असाल तर ती किती दिवसात करणार आहात ?

ॲड के.सी. पाडवी : अध्यक्ष महोदय, पूर्वी लोकसंख्येच्या प्रमाणात निधी मिळत होता. परंतु निती आयोग आल्यापासून या निधीचे प्रमाण कमी होत आहे आणि आस्थापनावरील खर्च वाढत आहे. योजनांमधील निधी आस्थापनांवर वापरला जातो आणि त्यामुळे विकासाला निधी कमी पडतो. याबाबत मला जर संधी मिळाली तर बजेटच्या भाषणाच्या वेळी मी बोलेन. परंतु सन्माननीय सदस्यांनी जो स्पेसिफिक प्रश्न विचारला आहे की, इतर ठिकाणी म्हणजे ज्याप्रमाणे सामाजिक न्याय विभागामार्फत जशी तरतूद आहे तशी तरतूद या विभागात ठक्कर बाप्पा योजनेमध्ये आहे. त्यामुळे याबाबत पुढील मंत्रिमंडळ बैठकीमध्ये विषय घेतला जाईल. याबाबत धोरणात्मक निर्णय होईल आणि त्यामुळे ज्या आदिवासींना...

अध्यक्ष महोदय, हे खरे आहे की, टीएसपी किंवा ओटीएसपी हे राज्य सरकारने ठरविले नाही तर ते केंद्र सरकारकडून ठरवून आले आहे. ते जुन्या पध्दतीप्रमाणे आहे. परंतु ज्या आदिवासींना यामधून निधी मिळत नाही त्यांच्यासाठी ठक्कर बाप्पा योजनेतून दिला पाहिजे. म्हणून ही योजना वरच्या स्तरावर आणण्याचा माझा प्रयत्न आहे.

श्री. विक्रमसिंह सावंत : अध्यक्ष महोदय, माझा प्रश्न या प्रश्नाच्या स्कोपच्या बाहेरील आहे. तरी देखील माझ्या मतदार संघामध्ये जत शहर, सुसलात, उमदी, पांडवजरी, या ठिकाणी आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात आहे. या समाजाच्या लोकांना दाखले मिळविण्यासाठी घोडेगांव येथे यावे लागते. त्यामुळे यासाठी महिन्यातून १ ते २ दिवस जत शहरात कॅम्प लावता येईल काय, हा माझा पहिला प्रश्न आहे. पांडवजरीमध्ये आमचा आदिवासी समाज मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे त्यांना विविध सोयी सुविधा आजअखेरपर्यंत मिळालेल्या नाहीत. जागा उपलब्ध

ता.प्र.क्र.४३८४०..

श्री. विक्रमसिंह सावंत...

नसल्यामुळे शासन त्यांना अशी जागा उपलब्ध करुन देणार आहे काय आणि शासनाकडून त्यांना घरकुलसंदर्भात शासन काही तरी योजना राबविणार आहे काय?

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ४११६१...

ॲड. के.सी.पाडवी : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांसोबत माझ्या नेहमीच गप्पा होत असतात. माझा मतदारसंघ क्र. १ आणि त्यांचा २८८ आहे. त्यामुळे त्यांचाही विकास करणे गरजेचे आहे. त्या भागात पारधी समाज मोठया प्रमाणावर राहतो. त्यांच्यासाठी १०० कोटी रुपयांचे पॅकेज होते ते आता यावर्षी १२५ कोटी रुपयांचे केलेले आहे. तेथील लोकांना जातीचे दाखले मिळत नसतील तर निश्चितपणे कॅम्प आयोजित केले जातील. त्या लोकांसाठी विशिष्ट प्रकारच्या योजना द्याव्याच लागतील आणि १२५ कोटी रुपयांच्या निधीमध्ये त्या योजना दिल्या जातील. त्यांना जी जमीन दिली जाते त्यासाठी पावसाळयामध्ये एक शासन निर्णय काढलेला होता त्याचा निश्चितपणे त्यांना फायदा होईल. त्यानुसार त्यांना जमीन दिली जाईल तसेच त्यांना घरकुलासाठी सुद्धा पॅकेज आहे.

श्री. सुभाष धोटे : अध्यक्ष महोदय, हा विषय शहापूर जिल्ह्याचा असला तरी देखील माननीय मंत्र्यांना माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यामध्ये आदिवासींची संख्या मोठया प्रमाणावर आहे. ठकरबाप्पा योजना ही ३०:५४ किंवा ५० :५४ असेल तरी हा निधी वितरीत करीत असताना खरे जी आदिवासी गावे टीएसपी आणि ओटीएसपीमध्ये मोडतात. त्या भागामध्ये तो निधी वितरीत न करता अनेक बिगर आदिवासी भागांना निधी वितरीत केला जातो. माननीय मंत्र्यांना मला एवढेच विचारायचे आहे की, ज्या भागामध्ये आदिवासी संख्या जास्त किंवा कमी जास्त असेल तर त्याप्रमाणे निधी वितरीत करणार काय ? चंद्रपूर जिल्हयात आदिवासी समाज मोठ्या प्रमाणावर असताना सुद्धा जात वैधता प्रमाणपत्राचे काम आम्हाला गडचिरोली जिल्ह्यात जाऊन पूर्ण करावे लागते. त्यामुळे जात वैधता प्रमापत्राचे कार्यालय चंद्रपूर जिल्ह्यामध्ये उघडले जाईल काय ?

ॲड. के.सी.पाडवी : अध्यक्ष महोदय, जात वैधतेबाबतचा प्रश्न वेगळा आहे. परंतु याची सुद्धा निश्चितपणे दखल घेतली जाईल. सन्माननीय सदस्यांनी जी मागणी केली आहे त्याचा विचार केला जाईल. निधीच्या बाबतीत त्यांचा जो प्रश्न आहे त्याबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, टीएसपी किंवा ओटीएसपी हा केंद्र शासनाने

ता.प्र.क्र. ४११६१...

ॲड. के.सी.पाडवी....

ठरवून दिलेला आहे. त्या शिवाय मी मघाशी उत्तर दिल्याप्रमाणे ठकरबाप्पा योजनेच्या माध्यमातून त्यांना पैसे दिले पाहिजे. आदिवासी समाज राज्यभरात आहेत त्यामुळे आम्हाला त्यांच्यासाठी बजेटमध्ये तरतूद करावी लागते. परंतु काही ठराविक लोकांना काम मिळत नाही किंवा त्यांच्या वाट्याला निधी येत नाही हे खरे आहे. त्यामुळे मंत्रीमंडळातील सर्व नेत्यांना मी विनंती करुन ठकरबाप्पा ही योजना पुढच्या कॅबिनेटच्या बैठकीसमोर ठेवून त्याला मंजुरी घेईल.

प्रा. डॉ. अशोक उईके : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्र्यांनी सांगितले की, सन १९८४ पासून म्हणजे आदिवासी विभागाची निर्मिती झाली तेव्हापासून महामंडळ होते आणि सन १९८४ मध्ये आदिवासी विभाग निर्माण झाला. माननीय मंत्री हे केंद्र शासनाचे नाव घेत आहेत त्यामुळे मी त्यांना सांगू इच्छितो की, टीएसपी आणि ओटीएसपी ची महाराष्ट्रातील आदिवासी विभागाला आदिवासी लोकसंख्येच्या अधीन राहून महाराष्ट्र सरकारच ठरवते. रेकॉर्डवर चुकीचे येऊ नये म्हणून मी बोलत आहे की, महाराष्ट्र शासनाची जबाबदारी आहे की, महाराष्ट्र राज्यामध्ये १ कोटी ३५ लाख लोकसंख्या असल्यामुळे त्या त्या पोळावर किती आदिवासी निधी द्यायचा हे ठरविण्याचे अधिकार आदिवासी विभागाला आहेत. माझी विनंती आहे की, महाराष्ट्रामध्ये समस्त आदिवासींचे पोळ, तांडे, आदिवासी वस्ती यांच्या जोडणीसाठी विशष बाब म्हणून निधी उपलब्ध करुन देणार काय ?

ॲड. के.सी.पाडवी : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.डॉ. अशोक उईके यांच्याच पक्षाचे सरकार केंद्रामध्ये आहे. तर मी त्यांना सांगू इच्छितो की, हा निर्णय किंवा नियम आपल्या सरकारमध्ये झालेला नसून आमच्याही सरकारच्या कालावधीमध्ये झालेला आहे. केंद्रामध्ये सन १९७२ नंतर हा शासन निर्णय झालेला आहे. यामध्ये बदल करण्यात यावा यासाठी केंद्र शासनाला आपण विनंती करु. सन्माननीय सदस्यांनी मागणी केली की, आदिवासी समाजासाठी वेगळा निधी देणार काय ठकरबाप्पा योजनेच्या माध्यमातून तो निधी दिला जाईल.

ता.प्र.क्र. ४११६१...

श्री. दौलत दरोडा : अध्यक्ष महोदय, माझा प्रश्न अनुत्तरीत राहिलेला आहे. मी मागच्यावेळी सुद्धा प्रश्न विचारला होता की, जिल्हा परिषद, ठाणे आणि जिल्हा परिषद, पालघर यांनी ३०:५४ आणि २७:२२ चे जे प्रस्ताव पाठवले आहेत त्यांना माननीय मंत्री मंजूरी देणार आहेत काय ?

ॲड. के.सी.पाडवी : अध्यक्ष महोदय, होय मंजुरी दिली जाईल.

श्री. संजय सावकारे : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्र्यांनी उत्तरामध्ये सांगितले आहे की, १० कोटी, १० लाख रुपयांच्या ३९ रस्त्यांना मंजुरी दिलेली आहे.

तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण) : आता प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर.....

असुधारित प्रत

वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन

तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण) : सभागृहाचे सन्माननीय सदस्य व माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री श्री. अमित देशमुख यांचा आज वाढदिवस आहे. मी त्यांना सभागृहाच्या वतीने हार्दिक शुभेच्छा देतो.

असुधारित प्रत

पृ. शी. : लेखी उत्तरे

मु. शी. : अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ७६ ते ९० सभागृहासमोर ठेवणे

उप सचिव (श्री. आठवले): अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक ७६ ते ९० सभागृहाच्या समोर ठेवतो.

तालिका सभाध्यक्ष : अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ७६ ते ९० सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे. सदरहू याद्या विधानमंडळाच्या संकेतस्थळांवर उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

असुधारित प्रत

पृ. शी. : शोक प्रस्ताव

मु. शी. : श्री. शंकरराव गेणूजी कोल्हे यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव

तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण) : अध्यक्ष महोदय, श्री. शंकरराव गेणूजी कोल्हे माजी वि.स.स. व माजी मंत्री, यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

" श्री. शंकरराव गेणूजी कोल्हे यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

कै. शंकरराव गेणूजी कोल्हे यांचा जन्म २४ मार्च, १९२९ रोजी अहमदनगर जिल्ह्यात कोपरगांव तालुक्यातील येसगाव येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.एस्सी पर्यंत झाले होते.

कै. कोल्हे यांनी संजीवनी एज्युकेशन सोसायटी, संजीवनी शैक्षणिक ग्रामीण विश्वस्त संस्था, संजीवनी सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक-अध्यक्ष म्हणून उत्तम कार्य केले होते. त्यांनी इंडियन शुगर इंडस्ट्रीज इम्पोर्ट ॲन्ड एक्सपोर्ट कॉर्पोरेशन लि., महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, गोदावरी खोरे सहकारी दूध उत्पादक संघ, यशवंत कुक्कुटपालन व्यावसायिक सहकारी संस्था, नॅशनल फेडरेशन को. ऑप. शुगर फॅक्टरीज, संजीवनी सहकारी पतसंस्था, नॅशनल हेवी इंजिनिअरींग को. ऑप. लि., देवयानी सहकारी बँक, संजीवनी मत्स्य सहकारी संस्था, संजीवनी ॲग्रो को. ऑप. मार्केटिंग सोसायटी अशा अनेक संस्थांचे संचालक म्हणूनही कार्य केले होते. त्यांनी डेक्कन शुगर रिसर्च इन्स्टिटयुट, महाराष्ट्र को. ऑप. फर्टीलायझर ॲन्ड केमिकल, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे संचालक म्हणूनही कार्य केले होते. सहकार क्षेत्रातील अनेक संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता.

तालिका सभाध्यक्ष.....

कै. कोल्हे यांनी कोपरगांव पंचायत समितीचे सभापती, अहमदनगर जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणून कार्य केले होते. ते सन १९७२, १९७८, १९८०, १९९०, १९९५ व १९९९ असे सहा वेळा अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगांव मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते. त्यांनी मार्च १९९० ते मार्च १९९३ या कालावधीत सहकार, राज्य उत्पादन शुल्क, कृषी व फलोत्पादन, परिवहन तसेच नागरी जमीन कमाल धारणा खात्याचे मंत्री म्हणून उत्तम कार्य केले होते.

अशा या जेष्ठ समाजसेवकाचे बुधवार, दिनांक १६ मार्च, २०२२ रोजी दु:खद निधन झाले. सन्माननीय सदस्यांनी स्तब्ध उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात.)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत व विधानमंडळाचे स्मृतीपत्र शोकाकुल कुटूंबियांकडे पाठविण्यात येईल.

.....

असुधारित प्रत

पृ.शी /मु.शी : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

डॉ. विश्वजीत कदम (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण राज्य मंत्री): अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र ग्राहक संरक्षण (राज्य व जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद) नियम, २०२२ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक ग्रासंनि – २०२० / प्र.क्र.३९ / ग्रासं-२, दिनांक १७ फेब्रुवारी, २०२२ सभागृहासमोर ठेवतो.

तालिका सभाध्यक्ष : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

असुधारित प्रत

श्री. संजय बनसोडे (संसदीय कार्य राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढीलप्रमाणे अहवाल सभागृहासमोर मांडतो.

(क) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे सन या २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक लेखे

(ख) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचे सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक लेखे (अंकेक्षण अहवालासह)

(ग) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक लेखे

(घ) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक लेखे

(ङ) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचा दिनांक १ एप्रिल,२०२० ते ३१ मार्च, २०२१ या कालावधीचा वार्षिक अंकेक्षण अहवाल

(च) महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, औरंगाबाद यांचे सन २०१७-२०१८,सन २०१८-२०१९, सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ चे वार्षिक अहवाल

(छ) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे वार्षिक लेखे आणि अंतर्गत लेखापरीक्षण अहवाल

तालिका सभाध्यक्ष : वार्षिक लेखे, वार्षिकअहवाल व लेखापरिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आलेले आहेत. सदरहू अहवाल विधानमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

असुधारित प्रत

हरकतीचा मुद्दा

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, मी पुन्हा पुन्हा हे लक्षात आणून देत आहे कारण एक विधानसभा सदस्य म्हणून माझे ते कर्तव्य आहे. आपल्या विधानसभेच्या नियमानुसार व या आधी अध्यक्ष महोदयांनी दिलेल्या निर्देशानंतर देखील पुन्हा पुन्हा सन २०१७-२०१८, सन २०१८-२०१९ अशा वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येत आहेत.

अध्यक्ष महोदय, आपल्या विधीविदानानुसार साधारणपणे प्रलंबाची कारणे सांगावीत एवढ्या चौकटी पुरते ते मर्यादित नाही. एखाद्या असाधारण परिस्थितीमध्ये ते ठीक आहे. परंतु, महाराष्ट्र विधी विद्यापीठाचा सन २०१७-२०१८ चा अहवाल आता सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येत आहे.

अध्यक्ष महोदय, आपण याबाबत काही तरी स्पेसिफिक निर्देश द्यावेत. या अगोदरचे विधानसभेचे जे जे माननीय अध्यक्ष होते त्यांनी त्या त्या समयी अतिशय कडक निर्देश दिले आहेत. ही विधानसभा या कोरोनाच्या संदर्भापासून जेव्हा पासून निर्माण झाली तेव्हा पासून गंभीरता संपली आहे. कोणालाच कोणाची भीती राहिलेली नाही. आपल्याकडून मला अपेक्षा आहे. एखाद्या असाधारण परिस्थितीमध्ये हे समजू शकतो.

अध्यक्ष महोदय, २ लक्ष कोटी रुपये वेतनावर खर्च करणाऱ्या महाराष्ट्रात... २ लक्ष कोटी ... शेतकऱ्यांच्या हक्काचे पैसे, कामगारांच्या हक्कांचे, असंघटित क्षेत्रातील हक्काचे पैसे खर्च करतो. आज देखील १७ टक्के गरीब आहेत. त्यांचे हातावर पोट आहे. त्यांच्या दोनवेळेच्या जेवणाची व्यवस्था नाही. तरी देखील अतिशय उत्तम प्रशासन रहावे याकरिता वेतनावर २ लक्ष कोटी रुपये खर्च करतो ते कामकाज प्रलंबित करण्यासाठी का? विधानसभेने याची काही तरी गंभीर नोंद घेतली पाहिजे. एकदा तरी कडक निर्बंध लावून त्या त्या वर्षाला अहवाल सादर करण्यात यावेत, याबाबत आपण निर्देश द्यावेत, अशी विनंती आहे.

तालिका सभाध्यक्ष : मंत्री महोदयांनी याची नोंद घ्यावी.

श्री.संजय बनसोडे : अध्यक्ष महोदय, मी याची नोंद घेतो.

.....

श्री.संजय बनसोडे (संसदीय कार्य राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांचा सन २०२०-२०२१ चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

तालिका सभाध्यक्ष : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे. सदरहू अहवाल विधानमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

.....

असुधारित प्रत

पृ.शी./ मु.शी. : स्थगन प्रस्तावाच्या सूचना

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य सर्वश्री श्री.देवेंद्र फडणवीस, श्री.चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, सुभाष देशमुख, राम कदम, रवि राणा, अभिमन्यू पवार, वि.स.स., यांनी " मराठा समाजाच्या आरक्षण व अन्य मागण्यांसंदर्भात माननीय मुख्यमंत्री यांनी दि.२८ फेब्रुवारी, २०२२ रोजी आयोजित केलेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांच्या अनुषंगाने झालेल्या कार्यवाहीबाबत " या विषयावर स्थगन प्रस्तावाची सूचना दिली आहे. सदरहू सूचनेतील विषय स्थगन प्रस्तावाचा होत नसल्याने, मी या सूचनेस दालनात अनुमती नाकारली आहे. परंतु, सन्माननीय सदस्यांना त्यावर आपले म्हणणे मांडावयाचे असल्यास त्यांच्यापैकी एकाने ते थोडक्यात मांडावे.

श्री.चंद्रकांत पाटील : अध्यक्ष महोदय, दोन वर्षांपूर्वी माननीय सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षण रद्द केल्यानंतर मराठा समाज वारंवार ही मागणी करीत आहे की, या सरकारने त्या निकालाचा अभ्यास करण्यासाठी जी भोसले समिती नियुक्त केली, त्या भोसले समितीने सुचविलेल्या सूचनांची अंमलबजावणी करावी.

अध्यक्ष महोदय, भोसले समितीने असे म्हटले होते की, ज्या कारणाने आरक्षण रद्द झाले, पुरेसा डेटा समोर आला नाही, मराठा समाज सामाजिक, आर्थिक, शैक्षणिकदृष्ट्या मागास आहे असे सिध्द करता आले नाही. हा डेटा आपल्याला आणखी वाढविला पाहिजे. या निर्णयापासून किंवा भोसले समितीच्या निकालापासून आपण एकही स्टेप पुढे गेलेलो नाही.

अध्यक्ष महोदय, सर्वात महत्वाचे म्हणजे माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांनी मराठा आरक्षण मिळेपर्यंत ज्या सोईसवलती मराठा समाजाला दिल्या, जे ओबीसींना ते मराठ्यांना... प्रामुख्याने ६०५ कोर्सेसची निम्मी फी सरकारच्यावतीने भरली जायची. जवळजवळ ७५० कोटी रुपये प्रती वर्ष याप्रमाणे २ वर्षे ही फी भरली गेली. मग हे सूत्र या सरकारला मान्य नाही काय, सारथी विषयामध्ये चाललेली दिरंगाई सरकारला मान्य आहे काय?

नंतर श्री.शिंदे ...

श्री.चंद्रकांत पाटील ...

अणासाहेब महामंडळ प्रकरणी सरकारचा खेळखंडोबा सुरु आहे. उक्त महामंडळ बरखास्त झाले असून ते नियोजन विभागकडे स्थलांतरित करुन त्याची स्वायत्तता का घालविण्यात येत आहे ?

अध्यक्ष महोदय, माझा आजचा स्थगन प्रस्ताव हा नजिकच्या काळातील घटनांच्या संदर्भातील आहे. यासर्व मागण्या मान्य होत नाहीत. त्याकरिता श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज यांनी उपोषण केले होते. छत्रपती शाहू महाराज यांच्या वंशजांना उपोषण करावे लागते, ही बाब राज्यासाठी लांच्छनास्पद आहे. त्यांच्या उपोषणाच्या अंती काही मागण्या मान्य करण्यात आल्या होत्या. त्याचे वेळापत्रक मी आपणास वाचून दाखवितो. त्यावर चर्चा करण्याची संधी मला द्यावयाची की नाही, याबाबतचा निर्णय आपण घ्यावा. त्यासाठी सर्व आवश्यक असलेले माननीय विरोधी पक्ष नेता श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या तत्कालीन सरकारच्या काळामध्ये किती शासन निर्णय निर्गमित करण्यात आले होते, त्यावेळी किती सवलती देण्यात आल्या होत्या, वसतिगृह, पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता याबाबतीतील सर्व माहिती मी सोबत आणली आहे. दिनांक २८ फेब्रुवारी रोजी बैठक घेण्यात आली होती. त्यावेळी निर्णय घेण्यात आला होता की, सारथीच्या माध्यमातून कौशल्य विकासाचे कार्यक्रम एका महिन्यात सुरु करण्यात येतील, सारथीमधील रिक्त पदे १५ मार्च, २०२२ पर्यंत भरण्यात येतील, सारथी संस्थेच्या ८ उपक्रमांसाठी १५ मार्च, २०२२ पर्यंत जमीन देण्यात येईल, अणासाहेब पाटील मागास महामंडळास निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. अशी मोठी यादी आहे. आरक्षण मिळाले व रद्द झाले या कालावधी दरम्यान ज्या पद भरतीसाठी जाहिराती देण्यात आल्या, परिक्षा घेण्यात आल्या, मुलाखती घेण्यात आल्या, वैद्यकीय चाचण्या घेण्यात आल्या व त्या उमेदवारांना केवळ नियुक्तीपत्र देणे बाकी आहे. अशा उमेदवारांच्या नोकऱ्यांबाबत कोणता निर्णय घेण्यात येणार आहे ? माननीय सर्वोच्च न्यायलायने या विषयाच्या संदर्भात काही नमूद केले नव्हते. ज्या कालावधीत आरक्षण सुरु होते त्या कालावधीतील नोकर

श्री.चंद्रकांत पाटील ...

भरती करण्यात आलेल्या उमेदवारांना नियुक्ती पत्र दिले पाहिजे. ही छत्रपती संभाजी महाराजांची फसवणूक सुरु असून त्याचा मी निषेध व्यक्त करतो. यासंदर्भात छत्रपती यांचे उपोषण सोडविण्यासाठी स्वाक्षरी करुन १५ मुद्दे मान्य करण्यात आले आहेत. दिनांक २८ फेब्रुवारी रोजी मान्य केलेल्य १५ मुद्यांवर सरकारने याच अधिवेशनात निवेदन करावे. मराठा आरक्षणाचे भवितव्य काय आहे ? मागास महामंडळांना इतर मागासवर्ग आरक्षणाचे काम देण्यात आले आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाने आयोग गठीत करण्यास सांगितले होते, तो स्थापन करण्यात आला आहे काय, त्याची अद्याप घोषणा करण्यात का करण्यात आली नाही ? इतर मागसवर्ग यांच्या राजकीय आरक्षणाच्या संदर्भात तोंडाला पाणी पुसण्यात येत आहेत. मराठा समाजाच्या आरक्षणाचा विदा जमा करण्याचे काम कोणत्या आयोगाकडे देण्यात येणार आहे ? यासर्व प्रश्नांची उत्तरे सरकारने दिली पाहिजेत. दोन्ही सभागृहामध्ये १३८ सन्माननीय सदस्य हे मराठा समाजाचे आहेत. सकल मराठा यांच्या वतीने सर्व आमदार महोदयांच्या घरावर मोर्चा काढण्यात येणार आहे, त्याकरिता पोलीस संरक्षण वाढविण्यात आले आहे. माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार हे सभागृहात उपस्थित आहेत, ते शब्दाला पक्के आहेत. मी त्यांना विनंती करतो की, पुढील २-३ दिवसांमध्ये या विषयावर निवेदन करावे, अशी माझी सभागृहाच्या माध्यमातून विनंती आहे.

पृ.शी./मु.शी. : स्थगन प्रस्तावाच्या सूचना.

तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण) : सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी " दिनांक १६ मार्च, २०२२ रोजी चंद्रपूर शहरालगतच्या सोलारा गावालगत मित्राला भेटण्यासाठी गेलेल्या २० वर्षीय तरुणीचा संशयास्पद मृत्यू" आणि सन्माननीय सदस्य सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील व इतर सन्माननीय सदस्य यांनी "पोलीस व्हॅन फॉरमॅलिटीची पूर्तता केल्याशिवाय मॅग्नम हॉस्पिटल, नाशिक यांचेकडून पोलीस कर्मचारी यांचा मृतदेह ताब्यात देण्यास नकार देण्यात येत असल्याबाबत" या विषयावर स्थगन प्रस्तावाची सूचना दिली आहे. आज सोमवार, दिनांक २१ मार्च, २०२२ रोजी सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदानाचा दुसरा दिवस असल्याने म.वि.स.नियम २५१ (२) अन्वये स्थगन प्रस्ताव घेता येणार नाहीत. परंतु सूचनेतील विषय स्थगन प्रस्तावाच्या निकषात बसणारा नसला तरी विषयाचे गांभीर्य लक्षात घेता शासनाने अधिवेशन समाप्तीपूर्वी निवेदन करावे, असे निदेश देऊन मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. उर्वरित स्थगन प्रस्तावाच्या सूचना मी दालनात नाकारतो. आता सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत (दादा) पाटील यांनी विषय मांडला त्याची दखल घेऊन सरकारने निवेदन करावे, अशी सूचना करतो.

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, रोजगार हमी योजनेतील १६६ कोटी रुपये देणे बाकी आहेत. रोजगार हमी योजनेमध्ये काम करणारे मजूर हे हातावर पोट घेऊन जगतात. बँकेतून कर्ज घेऊन ठेकेदार म्हणून काम करणारे हे लोक नाहीत. या मजुरांसाठी १०० रुपये मजुरी देखील खूप महत्त्वाची असते. त्यामुळे यासंदर्भात देखील मंत्री महोदयांनी निवेदन करावे, अशा सूचना देण्यात याव्यात.

अध्यक्ष महोदय, अनेक दिवसांपासून धानाचे बोनस देण्यात आलेले नाही. त्यामुळे अशा दोन्ही विषयावर निवेदन करण्यासाठी मंत्री महोदयांना सूचना करावी. कारण हे पुण्याचे काम आहे. उक्त दोन विषयांवर निवेदन करण्याच्या सूचना दिल्या तर आपणास पुण्य लागेल.

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी उपस्थित केलेल्या दोन्ही विषयाच्या संदर्भात शासनाने निवदेन करावे, अशी मी सूचना करतो.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेता श्री.देवेंद्र फडणवीस, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील आणि सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार यांना विनंती केली होती की, अनुदानाच्या मागण्यावर चर्चा सुरु करण्यापूर्वी वित्त विभागाचे एक विधेयक संमत करुन त्यानंतर अनुदानाच्या मागण्यावरील चर्चेला सुरुवात करावी. त्यावर त्यांनी होकार दिला होता. त्यामुळे आता सदर विधेयक मांडण्यास परवानगी द्यावी.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, माननीय वित्त मंत्री श्री.अजित पवार यांनी केलेली विनंती आम्हाला मान्य आहे.

अध्यक्ष महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांची तिथीप्रमाणे जयंती साजरी करण्यासाठी माननीय मुख्यमंत्री एका कार्यक्रमाला गेलेले आहेत. भारतीय जनता पार्टीच्या आमदार महोदयांसह अन्य काही पक्षाच्या आमदार महोदयांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्या जवळ जाऊन नमन, वंदन व अभिवादन केले.

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

अध्यक्ष महोदय, ज्या ज्या महामानवांची जयंती असते, त्या त्या महामानवांचा फोटो लिफ्टसमोर ठेवला जातो. त्यानंतर प्रत्येक सन्माननीय सदस्य त्या फोटोला पुष्प अपर्ण करतात. या राज्याचे कार्यकारी प्रमुख माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे हे तिथीप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करीत आहेत. परंतु मी काही अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली असता त्यांनी सांगितले की, आम्हाला तिथीप्रमाणे शिवजयंती मान्य नाही. त्यामुळे आता द्विधा मन:स्थिती निर्माण झालेली आहे. कारण एकीकडे राज्याचे माननीय मुख्यमंत्री तिथीप्रमाणे जयंती साजरी करीत आहेत आणि दुसरीकडे अधिकारी मात्र छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म दिनांक १९ फेब्रुवारी, १६३० रोजी झाला म्हणून आम्ही १९ फेब्रुवारी रोजीच जयंत साजरी करणार असे सांगत आहेत. त्यामुळे राज्यातील अशी द्विधास्थिती चांगली नाही. काँग्रेस पक्षाच्या एका सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे की, छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती ही तिथीप्रमाणेच साजरी करण्यात यावी. छत्रपती शिवाजी महाराजांच्या फोटोला रोज वंदन, नमन किंवा अभिवादन केले तर ते वावगे नाही. परंतु माननीय मुख्यमंत्री हे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती तिथीप्रमाणे साजरी करीत असतील, भारतीय जनता पार्टी, शिवसेना व समाजवादी पार्टीच्या आमदार महोदय तिथीप्रमाणे जयंती साजरी करीत असतील तर १९ फेब्रुवारी रोजीच शिवजयंती साजरी करणार, असे शासनाकडून उत्तर अपेक्षित नाही. त्यामुळे तिथीप्रमाणे शिवजयंती साजरी करण्याचे आदेश द्यावेत व लिफ्टसमोर छत्रपती शिवाजी महाराजांचा एक फोटो लावावा, अशी मी विनंती करतो.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, महाविकास आघाडी सरकार सत्तमध्ये येण्यापूर्वी सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी अर्थ मंत्री म्हणून ५ वर्षे काम केलेले आहे. त्यावेळी मी देखील या सभागृहामध्ये येत होतो. परंतु त्यांच्या काळामध्ये तिथीप्रमाणे शिवजयंती साजरी करण्यासाठी लिफ्टसमोर कधीही फोटो ठेवण्यात आलेले नव्हता. छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती तिथीप्रमाणे साजरी करावी की, तारखेनुसार साजरी करावी, यामध्ये वाद घालण्यापेक्षा त्यांच्या विचाराचे

श्री.अजित पवार.....

अनुकरण करणे अपेक्षित आहे. कारण ते आपल्या सर्वांचे दैवत आहेत. ही बाब त्रिवार सत्य आहे. यामध्ये दुमत असण्याचे कोणतेही कारण नाही. परंतु मागील काळामध्ये आमचे सरकार होते तेव्हा स्व.रामकृष्ण मोरे हे एका विभागाचे मंत्री होते. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म केव्हा झाला, याबाबतची सखोल माहिती घेतली असता तेव्हा असे निदर्शनास आले होते की, छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म दिनांक १९ फेब्रुवारी, १६३० रोजी झालेला आहे. तेव्हापासून राज्याचे माननीय मुख्यमंत्री शिवनेरी किल्ल्यावर जाऊन शिवजयंती साजरी करतात. तीच परंपरा आजतागायत सुरु आहे. या परंपरचे सर्वच मुख्यमंत्री महोदय अनुकरण करतात. त्यामुळे सरकारच्या वतीने दरवर्षी दिनांक १९ फेब्रुवारी रोजीच शिवजयंती साजरी केली जाते.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

असुधारित प्रत

श्री. अजित पवार....

माननीय मुख्यमंत्री श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे हे मुख्यमंत्री म्हणून तेथे गेले नसून ते शिवसेना पक्ष प्रमूख म्हणून तेथे गेले आहेत. शिवसेना पक्ष सुरुवातीपासून म्हणजेच स्व. बाळासाहेब ठाकरे हयात असतानादेखील ते तिथीप्रमाणेच शिवजयंती साजरी करीत आहेत. आम्ही देखील सरकारमध्ये असताना शिवजयंती तारेखनुसार साजरी करतोत. आजही काही सन्माननीय सदस्य व माननीय मंत्री श्री. आदित्य ठाकरे मला म्हणाले की, मी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करुन येतो. आताही ते एका कार्यक्रमामध्ये उपस्थित राहून आले आहेत. शिवसेना, राष्ट्रवादी-काँग्रेस, काँग्रेस, समाजवादी पक्ष किंवा भारतीय जनता पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना किंवा सर्वसामान्य नागरिकास जर तिथीनुसार छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करावयाची असेल तर ते महाराजांच्या पुतळ्यासमोर जाऊन अभिवादन करु शकतात. यात कारण नसताना विविध चर्चा केली जाते. दिनांक १९ फेब्रुवारी, रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीमुळे शासकीय सुट्टी दिली जाते. त्यानुसार शिवजयंती साजरी केली जाते. आता आज सुट्टी नसते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीकरिता सुट्टी देणे, हे देखील महत्त्वाचे आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांनी कामालाही महत्त्व दिले आहे. तिथीप्रमाणे शिवजयंतीच्या दिवशी काम करणे, हे देखील महाराजांना अभिप्रेत आहे. त्यानुसार तसे करण्यात येत आहे.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, मागील काळात एखादी गोष्ट केली नसेल तर भविष्यात ती गोष्ट करता येत नाही काय ? आज सर्वदूर शिवजयंती साजरी केली जात आहे. आम्ही सूचना केली होती की, छत्रपती शिवाजी महाराजांचा एक फोटो लावून त्यांना पुष्प अर्पण करावेत. यास अशा प्रकारे उत्तर देणे अपेक्षित नाही. आमची अपेक्षा आहे की, जेव्हा एखादी गोष्ट आपल्या लक्षात येते तेव्हा त्यात सुधारणा केली पाहिजे. ही बाब लक्षात आल्यानंतर आम्ही याबाबत प्रशासनाकडे विचारणा केली. प्रशासनाने सांगितले की, असे करता येणार नाही. राज्याचे माननीय मुख्यमंत्री हे तिथीनुसार शिवजयंती साजरी करीत आहेत. तेव्हा आपणास असे करण्यास काय हरकत आहे ?

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, विधान भवनच्या प्रांगणामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा सिंहासनाधिष्ठित पुतळा आहे. ज्यांना छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करावयाचे आहे, त्यांनी तेथे जाऊन अभिवादन करावे. फोटोऐवजी सिंहासनावर बसलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर जाऊन अभिवादन करावे. सन्माननीय सदस्यांना ऊन्हामध्ये जाऊन अभिवादन करण्यासाठी त्रास होत आहे काय ?

श्री. सुनिल प्रभू : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी हा विषय उपस्थित केला आहे. आज छत्रपती शिवाजी महाराजांची तिथीनुसार जयंती आहे. यावर सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले की, विधान भवनमध्ये ही जयंती का साजरी केली नाही ? मी सांगू इच्छितो की, विधान भवनामध्ये सर्वप्रथम माननीय उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे आणि शिवसेना, राष्ट्रवादी-काँग्रेस, काँग्रेस व इतर काही पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला हार घातला आहे. त्यांनी विधान भवनमध्ये शिवजयंती साजरी केली आहे. ती देखील शासनाची आहे. छत्रपती शिवाजी महाराज अतिशय महान आहेत. त्यामुळे त्यांच्याबद्दल ३६५ दिवस भावना व्यक्त केल्या पाहिजेत. त्यांची ३६५ दिवस जयंती साजरी केली पाहिजे, इतके ते महान आहेत. केवळ तारखेनुसार किंवा तिथीनुसार शिवजयंती साजरी करुन त्यांच्या गौरव आपल्या मनात राहणार नाही. मला वाटते की, छत्रपती शिवाजी महाराजांची ३६५ दिवस जयंती साजरी करावी, असे त्यांचे व्यक्तीमत्व आहे.

माहितीच्या मुद्दयाबाबत

श्री अबू आजमी : अध्यक्ष महोदय, मेरा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन है. उप मुख्यमंत्री सम्माननीय श्री अजित पवार जी हमारे मुखिया और सबकुछ है, ऐसा मैं समझता हूं. मैं उनसे एक बात कहना चाहता हूं.

अध्यक्ष महोदय, सन १९९९ से तन्झिम मुस्लिम सोसायटी, सानपाडा ने रिजर्वेशन की एक जमीन धार्मिक कामों और मस्जिद के लिए सिडको से मांगी. उसको रोज जमीन दिखाओ, कल दिखाओ, परसों दिखाओ, ऐसा करते करते सन १९९९ से २००८ तक का समय हो गया. उसके बाद पुलिस विभाग ने एनओसी दी और कहा कि ये जमीन ठीक है.

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री अबू आझमी जी, आपण कोणत्या विषयावर बोलत आहात ?

श्री अबू आजमी : अध्यक्ष महोदय, मुझे बोलने दीजिए. यह बहुत ही महत्वपूर्ण मुद्दा है. अगस्त,२०११ में गृह विभाग से उस मस्जिद की जगह के लिए एनओसी मिल गई. अप्रैल २०१२ में नगर विकास विभाग से भी एनओसी मिल गई. लेकिन वहां के रहिवासियों ने मोर्चा निकाला और कहा कि सिडको ने जगह नहीं देनी चाहिए. उसके बाद ये लोग दिनांक ०४ अगस्त, २०१४ को कोर्ट में गए. कोर्ट ने सिडको को इन्स्ट्रक्शन दिया कि इनको ये जगह दी जाए. ...(व्यवधान).... [***] फिर उन्होंने सी.सी. के लिए अप्लाय किया. महानगरपालिका ने उसको रिजेक्ट कर दिया. ....(व्यवधान)...

[***] आदेशानुसार विलोपित मजकूर

....यानंतर श्री चौधरी

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

तालिका सभाध्यक्ष : सरकारने नोंद घ्यावी... (अडथळा...) मी सरकारला नोंद घेण्याबाबत सूचना केली आहे. सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की त्यांनी मांडलेल्या मुद्दयाबाबत पूर्ण माहिती द्यावी. कारण त्यांनी बोलताना नगरविकास, गृह अशा दोन-तीन विभागांची नावे घेतली आहेत. माननीय मंत्री श्री.दिलीपराव वळसे-पाटील, माननीय मंत्री श्री.एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करुन यातून मार्ग काढण्यात येईल. कारण सिडको हे महामंडळ नगरविकास विभागाच्या अखत्यारित येते. असे करताना तेथील कायदा व सुव्यवस्था टिकून राहील याचाही विचार करण्यात येईल.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

तालिका सभाध्यक्ष : चुकीचे असेल ते रेकॉर्डवरुन काढले जाईल. आता आपण शासकीय विधेयके घेऊ... (अडथळा...) सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

असुधारित प्रत

पृ.शी. : कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत विधेयक.

L.A. BILL NO. IX OF 2022

(A BILL TO PROVIDE FOR SETTLEMENT OF ARREARS OF TAX, INTEREST, PENALTY OR LATE FEE WHICH WERE LEVIED, PAYABLE OR IMPOSED, RESPECTIVELY UNDER VARIOUS ACTS ADMINISTERED BY THE GOODS AND SERVICES TAX DEPARTMENT AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री.अजित पवार (वित्त मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ९- वस्तू व सेवा कर विभागाकडून अंमलबजावणी केल्या जाणाऱ्या विविध अधिनियमांखाली जो आकारण्यात आला होता, प्रदेय होता किंवा लादण्यात आला होता अशा अनुक्रमे कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

अध्यक्ष महोदय, मी सदर विधेयकाची पार्श्वभूमी थोडक्यात सांगू इच्छितो. आपणा सर्वांना माहिती आहे की, गेल्या दोन वर्षांपासून संपूर्ण जग कोरोनासारख्या महामारीच्या अभूतपूर्व संकटातून जात आहे. याची झळ व्यवसाय जगतास मोठया प्रमाणात बसली आहे. त्याचा परिणाम आर्थिक विकासावर झाला आहे. आता उद्योग व व्यापार क्षेत्र या संकटातून बाहेर पडून उभारी घेत आहे. उद्योग व व्यापार क्षेत्राला दिलासा देण्यासाठी मी या विधेयकाच्या माध्यमातून अभय योजना मांडत आहे.

श्री.अजित पवार.....

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्प सादर करतानाच मी त्यामध्ये या बाबीचा उल्लेख केला होता. या योजनेची ठळक वैशिष्टये मी सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार हे अर्थमंत्री असताना त्यांनी देखील अशा प्रकारच्या दोन अभय योजना आणल्या होत्या...(अडथळा...) ठीक आहे.

अध्यक्ष महोदय, सदर विधेयक मंजूर करावे अशी मी आपल्या माध्यमातून सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत

श्री.भास्कर जाधव (गुहागर) : अध्यक्ष महोदय, माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार हे या विधेयकाची ठळक उद्दिष्टये सांगत होते. हे विधेयक सर्वानुमते मंजूर करायचे असल्याने त्याबाबत कोणाचाही काही आक्षेप असण्याचे कारण नाही. परंतु मी मघापासून हे विधेयक अनेक वेळा मिळविण्याचा प्रयत्न केला असता सदर विधेयक अद्यापपर्यंत पिजन होलमध्ये उपलब्ध करुन देण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे हे विधेयक एकमताने मंजूर होणार असले तरीही माझी माननीय उप मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की यातील ठळक मुद्दे सांगावेत.

असुधारित प्रत

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, सदर अभय योजनेचे नाव "महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क तडजोड-२०२२ " असे असेल. सदर अभय योजना उद्योग व व्यापार क्षेत्राला दिलासा देण्यासाठी आहे. वस्तू व सेवा कर लागू होण्यापूर्वी विक्री कर विभागातर्फे राबविण्यात येणारे विविध कर यांच्या संदर्भातील ही योजना आहे. या अभय योजनेंतर्गत आवश्यक रकमेचा भरणा करण्याचा कालावधी साधारणत: दिनांक १ एप्रिल, २०२२ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ पर्यंत असेल. विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध कर कायद्यांतर्गत एका वर्षात वैधानिक आदेशान्वये साधारण रुपये १० हजारांपर्यंत थकबाकीची रक्कम असल्यास सदर थकबाकीची रक्कम पूर्णपणे माफ करण्यात येणार आहे. त्यामुळे लहान व्यापाऱ्यांच्या सुमारे १ लाख प्रकरणांमध्ये याचा फायदा होणार आहे. ज्या व्यापाऱ्यांची वैधानिक आदेशान्वये थकबाकीची रक्कम दिनांक १ एप्रिल, २०२२ रोजी १० लाख किंवा त्यापेक्षा कमी असेल अशा व्यापाऱ्यांना अविवादित कर, विवादित कर, शास्ती यांचा वेगवेगळा हिशेब न करता सरसकट एकूण थकबाकीच्या २० टक्के रक्कम भरण्याचा पर्याय उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. अजित पवार...

अशी ठोक २० टक्के रक्कम भरल्यास उर्वरित ८० टक्के रकमेसंबंधी माफी देण्यात येणार आहे. त्यामुळे साधारणपणे जसे १० हजारापर्यंतच्या १ लाख व्यापाऱ्यांना त्याचा फायदा होणार आहे तसे १० हजारांच्या पुढे आणि १० लाखापर्यंत २ लाख २० हजार प्रकरणांमध्ये निश्चितपणे फायदा झाल्याशिवाय राहणार नाही. या विधेयकाचा सारांश मला असा सांगायचा आहे की, सदर अभय योजना ही कोविडच्या संकटमध्ये जे उद्योग आणि व्यापार क्षेत्र असेल त्यांच्यासाठी ही अभिनव पध्दतीने आखणी करण्यात आली आहे. त्यामुळे मला खात्री आहे आणि या सरकारलाही खात्री आहे की, या योजनेमध्ये व्यापारी जगताकडून निश्चितपणे उत्तम प्रकारचा प्रतिसाद मिळेल आणि महाराष्ट्राला पुन्हा एकदा गतिमान करण्यासाठी आपण कटिबध्द होऊ. अशा पध्दतीचे हे विधेयक आहे. या विधेयकाच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी असा मुद्दा मांडला होता की, हे विधेयक ज्या दिवशी सभागृहात मांडले होते त्याच दिवशी सभागृहाच्या पिजनहोलमध्ये उपलब्ध करुन दिले होते. याबाबत मी माहिती घेतली आहे. सर्व सन्माननीय सदस्यांना हे विधेयक मिळाले आहे. त्यामुळे मी सभागृहाला विनंती करतो की, हे विधेयक मंजूर करावे.

श्री. योगेश सागर (चारकोप) : अध्यक्ष महोदय, माननीय उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री श्री.अजित पवार यांनी अतिशय चांगले विधेयक या सभागृहात मांडले आहे.

अध्यक्ष महोदय, या विधेयकाच्या माध्यमातून शासनाने १० हजारापर्यंत आणि १० हजारापासून १० लाखापर्यंत अशा एकूण ३ लाख व्यापाऱ्यांचा आपण समावेश करीत आहात. परंतु मला वित्तमंत्र्यांच्या निदर्शनास आणायचे आहे की, १० लाखांपेक्षा अधिकच्या रकमेसंबंधी मी तत्कालीन अधिकारी श्री. जलोटा यांच्यासमवेत चर्चा करुन पाठपुरावा करीत होतो. जे १० लाखांच्या वर आहेत त्यांच्या बाबतीत एखादी "वन टाईम सेटलमेंट"सारखी योजना राबविण्याची आवश्यकता आहे. राज्याला निधीची गरज आहे. यामध्ये छोटे छोटे व्यापारी विवाद करीत नाहीत. जे १० हजारापर्यंतचे व्यापारी आहेत त्यांना माहिती सुध्दा पडणार

श्री. योगेश सागर...

नाही की शासनाने त्यांची ही रक्कम माफ केली आहे. ती प्ररकणे आपण बंद करणार आहात. "वन टाईम सेटलमेंटनुसार" आपण १० हजारापासून २ लाखापर्यंत आणि जास्तीत जास्त १० लाखापर्यंत जेवढी रक्कम असेल त्याच्या २० टक्के रक्कम भरुन आपण अशी प्रकरणे बंद करणार आहात. राज्याला यामधून उत्पन्न घ्यायचे असेल आणि या सर्व अडचणींमधून मुक्त व्हायचे असेल.. कारण ही प्रकरणे अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत. त्यासाठी लागणारा स्टाफ, त्याचे मेन्टेनन्स, त्याच्या रिकरींग खर्च, त्याच्या नोटीसेस, त्याच्या सुनावणी या सर्व गोष्टी वाढत वाढत जात आहेत. म्हणून माझी विनंती आहे की, १० लाखापर्यंतच्या प्रकरणात आपण "वन टाईम सेटलमेंट"सारखी तरतूद करण्यासाठी आपण अधिकारी आणि तज्ज्ञांशी चर्चा करुन विचार विनिमय करावा आणि तसे आश्वासन हे विधेयक मंजूर करताना द्यावे, एवढीच माझी आपल्या माध्यमातून माननीय अर्थमंत्र्यांना विनंती आहे.

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. योगेश सागर यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, या अभय योजनेच्या सवलतींचा लाभ घेण्यासाठी एकरकमी भरणा विहित कालावधीमध्ये करावा लागेल. तथापि, ज्या व्यापाऱ्यांची एका आर्थिक वर्षाची थकबाकी ५० लाखांपेक्षा जास्त आहे अशा व्यापाऱ्यांना अभय योजनेंतर्गत भरावयाच्या आवश्यक रकमेसाठी हप्ते सवलतीचा पर्याय सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आला आहे. एकूण ४ हप्त्यांमध्ये आपण ते विभागणी करीत आहोत. पहिला हप्ता त्यांनी ताबडतोब म्हणजे २५ टक्के रक्कम भरणा करायची आणि त्यानंतर पुढील ९ महिन्यात म्हणजे दर ३-३ महिन्यांमध्ये शिल्लक राहिलेले ३ हप्ते म्हणजे ७५ टक्के रक्कम भरायची आहे. अशा पध्दतीने ९ महिन्यांमध्ये पुढील ३ हप्ते भरणा करायचे आहेत. दिनांक १४ ऑक्टोबर २०२३ पूर्वी त्यांनी संपूर्ण रक्कम भरणा करायची आहे. १० लाखांच्या वरील रकमेसाठी सुध्दा हे लागू केलेले आहे. मी सांगताना ० ते १० हजार, १० हजार १ पासून १० लाखापर्यंत आणि १० लाखाच्या वरच्यांना सुध्दा आपण हप्ते पाडून दिले आहेत. शिवाय जे व्यापारी अशा प्रकारे ठोक रक्कम भरण्यास पात्र ठरणार

श्री. अजित पवार...

नाहीत अथवा हा पर्याय निवडणार नाहीत अशा व्यापाऱ्यांच्या थकबाकीच्या तडजोडीसाठी प्रस्तावित योजनेमध्ये अविवादित करात कुठलीही सवलत देण्यात येणार नाहीत. अविवादित करावा १०० टक्के भरणा करावा लागेल. मात्र विवादित करापोटी ३१ मार्च २००५ पूर्वीच्या कालावधीत ३० टक्के भरणा करावा लागेल. त्याचप्रमाणे व्याजापोटी १० टक्के व शास्तीपोटी ५ टक्के भरणा करावा लागेल.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. अजित पवार...

याचा अर्थ दिनांक १ एप्रिल, २००५ ते ३० जून २०१७ या कालावधीसाठी विवादीत रकमेपोटी ५० टक्के, व्याजापोटी १५ टक्के, शास्तीपोटी ५ टक्के आणि विलंब शुल्कापोटी ५ टक्के रकमेचा भरणा केल्यानंतर त्याची उर्वरित थकबाकी माफ करण्यात येईल. परंतु त्यांना १० हजार किंवा १० लाखापर्यंतचा जो लाभ दिलेला आहे तसा दिला जाणार नाही कारण या रकमा खूप मोठ्या आहेत. तुम्ही देखील अर्थ मंत्रालय सांभाळलेले आहे. त्यामुळे ही वेगळी पद्धत म्हणजे छोटा १ लाख रुपये आणि २.२५ लाख रुपये अशी ३.५ लाख रुपयांपर्यंत व्यापाऱ्यांना मदत केलेली आहे. पण पुढच्यांना मदत केली आहे परंतु एवढया मोठया प्रमाणावर न करता कमी प्रमाणात केलेली आहे. अशा प्रकारचे हे विधेयक आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश:विचारात घेण्यात येईल.

खंड २ ते २० (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि.क्र. ९ संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून एकमताने संमत झाला.

तालिका सभाध्यक्ष : सन २०२२ चे वि.स.वि. क्र. ९ संमत झाले आहे.

माहितीच्या मुद्याबाबत

श्री. वैभव नाईक : अध्यक्ष महोदय, माझा माहितीचा मुद्दा आहे. माननीय अर्थमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. गेल्या वर्षीपासून आपण भात खरेदी करीत आहोत. शासनाने कोकणामधील अनेक शेतकऱ्यांची भात खरेदी केलेली आहे. त्यांची जी आधारभूत किंमत ठरलेली आहे ती सरकारने दिलेली आहे. परंतु या वर्षीचा बोनस जाहीर झालेला नाही. त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यात वेगवेगळी आंदोलने सुरु आहेत. त्यामुळे आपण लवकरात लवकर बोनस जाहीर करावा, अशी मी आपल्याला विनंती करतो.

तालिका सभाध्यक्ष : शासनाने याची नोंद घ्यावी.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, चांगल्या विषयावर आपले एकमत होते. त्यामुळेच आता आपण विधेयक एकमताने संमत केलेले आहे. ६०० कोटी रुपये आधारभूत किंमतीच्या फरकाचे पैसे अजून देण्यात आलेले नाहीत. आपण विभागाला २५०० कोटी रुपये मंजूर केले आणि त्यापैकी १९०० कोटी रुपयांचे वाटप झालेले आहे. माननीय अर्थमंत्र्यांना माझी विनंती आहे की, आपण सरकारी यंत्रणेला ताबडतोब गती देवून ६०० कोटी रुपयांचे वाटप करावे. तसेच धानाच्या बोनस संदर्भात आपण आयटीची मदत घ्यावी किंवा टेक्नॉलॉजी बदलवावी.

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, राहिलेले ६०० कोटी रुपये ताबडतोब देण्याची व्यवस्था करण्यात येईल.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्र्यांना माझी विनंती आहे की, आपण ६०० कोटी रुपये ही खरेदीची किंमत देणार असे सांगितले. सन्माननीय सदस्य धान उत्पादक शेतकऱ्यांचे प्रतिनिधीत्व करतात. आपण सन २०१३ पासून बोनस देत आहोत. मागच्या अधिवेशनात माननीय अर्थमंत्री असे म्हणाले की, हा बोनस देण्याच्या पद्धतीमध्ये आम्हाला काही लिकेजस् वाटतात. आम्ही ते मान्य केले, ठीक आहे. तिथे कुठे लिकेजस् असतील तर आपण ते बंद करा. परंतु महाराष्ट्रातील सर्वांत गरिबातील गरीब म्हणजे बीपीएल मधील बीपीएल शेतकरी

श्री. सुधीर मुनगंटीवार....

कोणी असेल तर तो धान उत्पादक आहे. माननीय मंत्र्यांना माझी आग्रहाची विनंती आहे की, सन २०१३ पासून आजपर्यंत आपण बोनस दिला आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

श्री. सुधीर मुनगंटीवार.....

या वर्षी असे काय झाले, आपल्याला धान उत्पादक शेतकऱ्यांवर काय राग आला आहे ? माझी विनंती आहे. २ लक्ष कोटी रुपये प्रशासनावर खर्च करतो तर ज्यांच्यासाठी हे प्रशासन आहे, त्यांना जर बोनससाठी २००-५०० कोटी रुपये देऊ शकत नसेल तर हे अनुचित होईल, अन्यायकारक होईल. आपल्याला माझी विनंती आहे. आपण धान उत्पादक शेकऱ्यांची बैठक आपल्या दालनात घ्यावी. धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस दिलाच पाहिजे. हा त्यांचा हक्क आहे. माझी आपल्याला हजार वेळा विनंती आहे. आपण धानाचा बोनस घोषित करावा.

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, या संबंधी मी मागील वेळी चर्चा करताना सांगितले आहे. आम्ही बोनस देणार नाही. बोनसच्या ऐवजी जे कोणी शेतकरी स्वत: धान पिकवतात, अर्धा एकर, १०-२० गुंठे, दीड,दोन –चार- पाच एकर जागेत त्यांना क्षेत्राच्या प्रमाणात.. बोनसचा फायदा शेतकऱ्यांना मिळण्याच्या ऐवजी व्यापारी, दलाल हे स्वत:चा फायदा जास्त करुन घेतात. शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडतात. हा अनुभव गेल्या अनेक वर्षांपासून लक्षात घेता, मंत्रिमंडळामध्ये अशी चर्चा झाली की, बोनसच्या ऐवजी त्याना वेगळया मार्गाने मदत द्यावी. पीकपाणीच्या माध्यमातून धान्याचे रेकॉर्ड आपल्याकडे असते. ते बघून आपल्याला मदत करता येते काय, याचा विचार करु. आजुबाजूची राज्ये उदा. मध्यप्रदेश, छत्तीसगड इ. राज्यांमधे काय परिस्थिती आहे. अनेकदा असे होते की, आपण बोनस जाहीर केला की, शेजारच्या राज्यातील माल येथे येतो व ते देखील बोनस मागतात. अशा घटना घडल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, मी देखील शेतकरीच आहे. या शेतकऱ्यांचे दु:ख आम्हालाही चांगले माहीत आहे. शेतकऱ्यांच्या नावाखाली मिळणारी रक्कम शेतकऱ्याच्याच हातात जावी, एवढाच महत्त्वाचा मुद्दा आहे. म्हणून बोनस ऐवजी प्रति एकर मदत करता येते काय, अशी चर्चा सुरु आहे. आता त्यांनी ६०० कोटी रुपयांचे सांगितले असून ती रक्कम पहिल्यांदा क्लिअर करतो. तो त्यांचा हक्काचा

श्री. अजित पवार....

पैसा आहे. आता आमच्या समोर चर्चा करुन काय मार्ग निघतो त्या नुसार करु. मात्र आम्ही बोनस देणार नाही. बोनसच्या ऐवजी प्रति एकरी मदत देऊ. ६०० कोटी रुपये मी लगेच देणार आहे.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, ...

तालिका सभाध्यक्ष : शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत मंत्री महोदयांनी सांगितले आहे.

असुधारित प्रत

पृ. शी. : अनुदानाकरिता मागण्या

मु. शी.: सन२०२२-२०२३च्या अनुदानाकरिता मागण्या:

१) कृषि, पशुसंवर्धन , दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

३) वित्त विभाग

४) सार्वजनिक बांधकाम विभाग

५) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

६) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

तालिका सभाध्यक्ष : : आता १) कृषि, पशुसंवर्धन , दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग २) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग ३) वित्त विभाग ४) सार्वजनिक बांधकाम विभाग ५) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग ६) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक डी- २, डी-३, डी-४, डी-५, डी-६, डी-७, डी-८, डी-९, डी-११, ई -२, ई-३, ई-४, ई-५, जी-१, जी-२, जी-४, जी-५, जी-६, जी-७, जी-८, जी-१०,एच-२, एच-३, एच-४, एच-५, एच-६, एच-७, एच-८, एच-९, एच-११, व्ही-२, व्ही-३, व्ही -५,व्ही-६, झेडडी -१ , झेडडी – २, झेडडी – ३, झेडडी – ४, झेडडी – ५, झेडडी – ६ चर्चेला घेण्यात येतील. या मागण्यांचा तपशील कार्यक्रमपत्रिकेबरोबर वितरित केला आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलले मागण्यासंबंधीचे जोडपत्र छापावे)

तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण) :आता १) कृषि, पशुसंवर्धन , दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग २) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग ३) वित्त विभाग ४) सार्वजनिक बांधकाम विभाग ५) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग ६) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग या विभागांच्या मागण्या चर्चेला घेण्यात येतील. विभागांच्या मागण्यांचा तपशील व स्वीकृत कपात सूचनांची यादी सदस्यांना टपालखणाद्वारे वितरित करण्यात आली आहे. कपात सूचना न मांडता मान्य करण्यात आलेल्या कपात सूचनांची उत्तरे मा. मंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने तीस दिवसांच्या कालावधीत सदस्यांना पाठविण्याची प्रथा माहे जुलै, २०१० पासून मान्य झाली असल्यामुळे आता कोणीही कपात सूचना मांडणार नाही असे मी गृहीत धरतो.

या चर्चेसाठी तीन तास वेळ देण्यात येईल. या तीन तासापैकी सत्तारुढ पक्षास संबंधित मंत्र्यांच्या उत्तरासह निम्मा वेळ व विरोधी पक्षास निम्मा वेळ देण्यात येईल. सदस्य वेळेचे बंधन पाळून मला सहकार्य करतील, अशी मी अपेक्षा करतो. आता चर्चेला सुरुवात होईल.

असुधारित प्रत

श्री. प्रशांत बंब (गंगापूर) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, आज या ठिकाणी ६ विभागांच्या मागण्या आहेत. राज्यातील जनतेचा, आमदारांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सा.बा. विभागाशी संबंध येतो. या विभागावर मी आता चर्चा करणार आहे. आपल्याकडे ३०-४० पोर्टफोलिओ आहेत. साधारणपणे ५० टक्क्यांच्या वर आपल्याकडे सा.बा.ि विभागामार्फत खर्च होतो.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.प्रशांत बंब...

त्यामध्ये शाळेच्या खोल्या, अंगणवाड्या, सामाजिक सभागृहे किंवा राज्यातील सर्व तहसील कार्यालय, सब रजिस्ट्रारची कार्यालय, गोदामे सर्व येतात. थोडक्यात कॉमन मॅनच्या प्रत्येक बाबीवर सार्वजनिक बांधकाम खात्याचा संबंध येतो. इतका मोठा पसारा किंवा इतके मोठे खर्चिक असे हे खाते असते. अर्थसंकल्पाचे सादरीकरण संपल्यावर प्रत्येक आमदार महोदय, बॅगेतील व्हाईट बुक पाहून आपल्या मतदारसंघामध्ये कोणते रस्ते आले आहेत किंवा आपल्या भागात काय काय मंजुऱ्या झाल्या हे पाहतात.

अध्यक्ष महोदय, हे खाते इतके महत्वाचे आहे तर आपल्या या सभागृहाची देखील जबाबदारी आहे की, प्रत्येक टप्प्यातील जनतेला या खात्यामार्फत न्याय दिला पाहिजे. त्यावर काम करताना आपण पाहिले तर सार्वजनिक बांधकाम हे खाते असे आहे की, ज्यामध्ये सर्व इंजिनिअरिंग बाय बुक चालते. याचा अर्थ ते लिखित असते. प्रत्येक गोष्टीबाबत कायदा आहे. आपण सार्वजनिक बांधकाम खात्याची चर्चा सुरु असताना सार्वजनिक बांधकाम खात्यावर बोलण्यास उभे राहिलो की, ताबडतोब सर्वांच्या डोक्यात खड्डे भरणे, रस्ते घेणे, त्यातील दर्जा खराब, इमारतींची कामे खराब अशा सर्व गोष्टी येतात. परंतु, माझा दावा आहे की, जर आपण या खात्याला दिलेल्या कायद्याप्रमाणे, नियमाप्रमाणे चालविले तर, आपण राज्य व देशाला भरभरुन देऊ शकतो, प्रत्येक टप्प्यातील माणसाला देऊ शकतो.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये आपण साधा एक खड्डा जरी भरला तरी त्याचे हँडबुक असेल किंवा लॉ असतील किंवा रुल्स असतील त्याप्रमाणे तो कसा भरावा, रस्ता कसा असावा, एक नवीन रस्ता आपल्याला घ्यायचा असेल तर सर्वात आधी सीबीआर व्हॅल्यू म्हणजे कॅलिफॉर्निया बेअिरिंग रेशिओ व्हॅल्यू पाहतो. त्याची ट्रॅफिक इन्टेसिटी पाहतो, त्यानंतर तो रस्ता कसा डिझाईन करायचा, किती वर्षांसाठी डिझाईन करायचा हे सर्व ठरते.

अध्यक्ष या खात्यामध्ये असे आहे की, प्रत्येक कामाच्या रुपयान रुपयाचा हिशोब लेखी असतो. त्याचे पुरावे कधी नष्ट होत नाहीत. या खात्यामध्ये प्रामुख्याने

श्री.प्रशांत बंब...

मंत्री महोदयांपासून ते कनिष्ठ स्तरावरील गँगमन पर्यंत प्रत्येकाची जबाबदारी आहे की, इमानदारीने, आपली इंटेग्रिटी साबूत ठेवून हे काम राज्याला दिले पाहिजे. इतर बाबतीत समजा एखादा मर्डर झाला तर, तो लांब होता, जवळ होता, चाकू असा होता, तसा होता अशा बऱ्याच कारणांनी आरोपी असूनसुध्दा सुटतात. परंतु, सार्वजनिक बांधकाम खाते असे आहे की, तेथे कोणत्याही प्रकारची सुटका नाही.

अध्यक्ष महोदय, मी सरळ मुद्दयांवर येतो. मला आज सर्व सभागृहाला हे सांगावयाचे आहे की, आपण किमान या वर्षी जर सार्वजनिक बांधकाम खात्याचे तंतोतंत पूर्ण काम जर असलेल्या पैशांनी केले तर आपल्या राज्याचे पुढच्या २० वर्षांचे भविष्य आपण साबूत ठेऊ शकणार आहे. सन २०१९ नंतर सरकारमध्ये काही बदल झाला. त्या अगोदर हायब्रिड ॲन्युईटी मॉडेलची जवळपास ३२ हजार कोटी रुपयांची ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ॲप्रुव्हल बजेटमध्ये सँक्शन झाली होती. मागच्या वर्षीचे १५ हजार कोटी, या वर्षीचे १५ हजार कोटी, जवळपास ६० हजार कोटी ...बाकीच्या सर्व खात्यातील पैसे मिळून जवळपास १ लाख कोटी रुपयांची कामे राज्यामध्ये आज सुरु आहेत. ज्याबाबत आपण हे वचन दिले आहे की, हे पैसे आम्ही काँट्रॅक्टरला वेळेत देऊ.

अध्यक्ष महोदय,बजेटमध्ये यावर्षी आपण १५ हजार कोटी रुपयांची तरतूद केली. याचा अर्थ असा की, काँट्रॅक्टरने जर ती कामे केली तर त्यांना तो पैसा द्यावा लागेल. परंतु, मला दुर्दैवाने असे सांगावे लागत आहे की, मागचा स्पील, आताची सर्व कामे व सर्वातून ग्रॅब करुन ज्या वेगवेगळ्या व्यवस्था अधिकाऱ्यांनी तयार केलेल्या आहेत, त्याला मोठा छेद देऊन आपल्याला इमानदारीने काम करण्याची आवश्यकता आहे. त्याचे कारण असे आहे की, आज दुर्दैवाने हे सांगावे लागत आहे की, आपल्या राज्याचे या खात्याचे प्रमुख प्रचंड करप्शनमध्ये बुडालेले आहेत. प्रचंड करप्शन करीत आहेत. त्यामुळे हे आपले खाते दिवसेंदिवस डिटोरिएट होत आहे.

श्री.प्रशांत बंब...

अध्यक्ष महोदय, मी जेव्हा बोलत आहे तेव्हा मला हे सांगावे लागेल की, यामध्ये हे कसे होत आहे. हायब्रिड ॲन्युईटी मॉडेलची कामे सुरु झाली. डिसेंबर, २०१९ मध्ये हा सर्व पैसा मोबिलायजेशन ॲडव्हान्स म्हणून त्यांना ५ टक्के देण्यात आला.

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.प्रशांत बंब...

माहे डिसेंबर, २०१९ मध्ये जेव्हा हायब्रीड ॲन्युईटी मॉडेलची कामे सुरु करण्यात आली तेव्हा मोबीलायझेशन ॲडव्हान्स म्हणून ५ टक्के निधी देण्यात आला होता. हा विभाग चालवित असताना खूप निधी हाती असल्याने एक सिंडीकेट तयार करण्यात आली. त्यामध्ये श्री.धोंडगे हे आता नांदेड येथे कार्यरत आहेत, श्री.भायेकर, श्री.तोडावार, श्री.हांडे, श्री.के.टी.पाटील यासर्वांनी सिंडीकेट तयार केली आहे. माननीय मंत्री महोदय भ्रष्टाचारामध्ये तुडूंब बुडालेले आहेत. कारण मी या प्रकरणी सन २०१९ पासून आजतागयात त्यांना पुराव्यासह ३७ पत्रे लिहिलेली आहेत. अनेक तांत्रिक बाबी मंत्री महोदयांच्या लक्षात येत नसतात. परंतु त्या ज्यावेळी लक्षात आणून देण्यात येतात त्यावेळी ते त्याचा गैरफायदा घेतात. त्यामुळे राज्याचे प्रचंड नुकसान होते.

अध्यक्ष महोदय, हायब्रीड ॲन्युईटी मॉडेल अंतर्गत कामांचा सर्व निधी आहे. त्यामध्ये भ्रष्टाचार करण्यासाठी मार्ग काढण्यात आले. प्रत्येक हायब्रीड ॲन्युईटी मॉडेलच्या कामामध्ये कंत्राटदाराचा ४० टक्के व विभागाचा ६० टक्के हिस्सा होता. तो कंत्राटदाराने ३० टक्के खर्च केल्यानंतर दिला पाहिजे. परंतु असे झाले नाही. सुरुवातीपासून या प्रकरणी एक मोठी सिंडीकेट तयार करण्यात आली. हायब्रीड ॲन्युईटी मॉडेलच्या कामांचे सर्व कंत्राटदार एकत्र आले व त्यांनी मागणी केली होती. त्यावेळी त्यांना सांगण्यात आले की, आम्हाला काही बाबी लागतील त्यानंतरच पैसे देण्यात येतील. त्यामुळे कंत्राटदार हतबल झाले. त्यांनी सांगितले की, सदरहू रस्त्यांच्या कामाचे ४० टक्के पैसे पुढील १० वर्षात मिळणार आहेत. हायब्रीड ॲन्युईटी मॉडेल असे मॉडेल आहे की, ज्यामध्ये आपण रस्ता बनवितांना Earthwork embankment, subgrade, GSB, WMM, DBM आणि BC असे थर देण्यात आले आहेत. ही कामे उत्कृष्ट व्हावीत, त्याची तपासणी करण्याकरिता दक्षता विभाग असतो. त्यास बाजूला ठेवण्यात आले. याप्रकरणी ॲथॉरिटी इंजिनिअर दिले होते. कारण ते विभागाच्या अधिकाऱ्यांपेक्षा अधिक चांगले

श्री.प्रशांत बंब...

काम करुन घेतील. समजा Earthwork embankment आहे, या Earthwork embankment मध्ये ०.७५ मायक्रॉनपासून ७५ एमएमवर पार्टीकल साईज चालत नाही. याचा उल्लेख माझ्या पत्रामध्ये व कॅसेटमध्ये आहे. त्यानंतरही त्या ठिकाणी बोल्डर्स टाकण्यात आली आहेत. ७५ एमएम वरती चालत नाही. १० वर्षे हा रस्ता टिकला तरी चालेल त्यांची क्वालिटी कशीही असो, असे सांगण्यात आले. यामुळे अत्यंत घातकपणे रस्त्याचे काम करण्यात आले व Earthwork embankment मध्ये बोल्डर्स टाकण्यात आली. सबग्रेडमध्ये मध्ये जेव्हा Earthwork embankment करतो. त्यात सबग्रेड चे २५०-२५० चे दोन थर असतात. त्यामध्ये ५० एमएम पेक्षा अधिक पार्टीकल साईज चालत नाही. परंतु त्यामध्ये १-१ फूटापर्यंतची दगडे वापरण्यात आली आहेत.

अध्यक्ष महोदय, मी या सर्व रस्त्यांच्या कॅसेट मंत्री महोदयांना पाठविल्या आहेत. मी मंत्री महोदयांनी पदभार घेतल्यानंतर त्यांना भेटण्याचा प्रयत्न केला होता, त्यावेळी मला त्यांची वेळ मिळाली नाही. त्यानंतर मी टिळक भवन येथे मंत्री महोदयांनी भेट घेऊन सदरहू कामे चुकीच्या पद्धतीने सुरु असल्याचे सांगितले होते. मंत्री महोदयांनी मला सांगितले की, तुझ्या खूप तक्रारी आहेत. मी त्यांना विनंती केली की, माझ्या तक्रारीमध्ये तथ्य नाही, हे मला सांगावे. मला दीड वर्षे कालावधीत कोणत्याही तक्रारीचे उत्तर देण्यात आले नाही. सदरहू कार्यवाही कामाच्या व्यापामुळे राहून गेली असेल, असे मला वाटले. त्यामुळे मी ८ स्मरणपत्रे पुराव्यासह दिली आहेत. त्यानंतरही सदरहू कामांच्या कंत्राटदारांना ३ हजार कोटी रुपयांचे हप्ते अदा करण्यात आले. सबग्रेड मध्ये प्रॉब्लेम आहे, WMM, GSB मध्ये फ्लॅपी मटेरिअल वापरले. DBM ची साईज ६० होती आणि बीसीची साईज ४० ची होती.

यानंतर श्री.तेलंग....

श्री.प्रशांत बंब.....

मी नांदेड येथील कामांना भेट दिली तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.राजेश पवार सोबत होते. अधिकाऱ्यांना बोलावून सकाळपासून संध्याकाळपर्यंत म्हणजे पूर्ण दिवस पीट घेऊन सर्व रस्ते तपासले होते. आपणास आश्चर्य वाटेल की, एकही आयटम स्पेसिफिकेशनप्रमाणे असल्याचे आढळून आले नाही. त्यानंतर मी मंत्री महोदयाची भेट घेऊन या सर्व बाबी त्यांच्या निदर्शनास आणून दिलेल्या आहेत. सदर कामाचे सर्व पुरावे देखील मंत्री महोदयांकडे सादर केलेले आहेत. तरी देखील मंत्री महोदयांनी संबंधित कंत्राटदाराची देयके अदा केलेली आहेत. जर आपण इमानदारीने काम केले असते तर अशी अवस्था निर्माण झाली असती काय, आपण संबंधित कंत्राटदाराची देयके का अदा केलेली आहेत?

अध्यक्ष महोदय, नांदेड येथील कोणत्याही रस्त्याच्या १०० मीटरचे काम स्पेसिफिकेशनप्रमाणे केले असेल तर मी या सभागृहाच्या दरवाजामध्ये देखील पाय ठेवणार नाही, मंत्री महोदयांना माझे हे आव्हान आहे. सदर रस्त्यांची कामे पूर्णपणे स्पेसिफिकेशाविरुद्ध केलेली आहेत.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये एक रॅकेट सुरु केलेले आहे. या विभागातील सर्व अधिकारी खराब आहेत, असे मी म्हणत नाही. या विभागातील काही अधिकाऱ्यांची पीएचडी असून देखील त्यांना चांगल्या पदावर नियुक्त न करता डिप्लोमा होल्डरना चांगल्या पदावर नियुक्त केले आहे. याबाबतचे मी दोन-चार उदाहरणे देऊ इच्छितो. श्री.हांडे नावाचे अधिकारी नाशिक येथे एस.ई. या पदावर कार्यरत होते. परंतु त्यांची बदली पीएमजेएसवाय येथे करण्यात आली. त्यानंतर त्यांना मुंबई सर्कलच्या एस.ई. चा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे. हा अतिरिक्त कार्यभार आपण कोणत्या कायद्यानुसार दिलेला आहे? मुंबई येथे दुसरे अधिकारी नव्हते काय ? मुंबई सर्कल एस.ई चा अतिरिक्त कार्यभार दिल्यानंतर पुणे येथील पीएमजेएसवाय व सीएमजेएसवाय यांच्या सी.ई. ना बाजूला करण्यात आले. त्याच श्री.हांडे यांना पुणे येथील मुख्य अभियंता या पदाचा देखील अतिरिक्त कार्यभार दिलेला आहे. म्हणजे पुणे येथे बसलेले एस.ई. मुंबईमधील कामे करीत होते.

श्री.प्रशांत बंब.....

[***] तेव्हापासून श्री.हांडे, श्री.प्रशांत निलावार, श्री.के.टी.पाटील, श्री.नवले, श्री.भायेकर, श्री.तोडावार व श्री.शंकर धोंडगे यांची सिंडीकेट आहे. त्यावेळी देखील अनेक तक्रारी केल्या होत्या. त्यानंतर त्यांनी मला स्वत:च्या स्वाक्षरीचे पत्र दिलेले आहे. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, सदर २९ तक्रारींमध्ये स्कोप मोठा आहे. आम्ही काही लोकांवर शिस्तभंगाची कारवाई करीत आहोत. तसेच उक्त तक्रारींच्या काही चौकशा प्रलंबित आहेत. काही चोकशांच्या चार्जसीट देण्यात येईल. सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये स्कोप वैगेर असे काहीही नसते. एखाद्या रस्त्याची सकाळी तपासणी केली तर संध्याकाळपर्यंत उक्त रस्त्याबाबत अहवाल द्यावा लागतो. यामध्ये व्हिजीलंन्स आहे, सर्व बुकप्रमाणे चालते. एकदा काम संपल्यानंतर असे काम करणे आवश्यक होते, तसे काम करणे आवश्यक होते, असे तपासणी अधिकारी सांगत नाही. सदर रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर उक्त रस्त्यामध्ये कोणकोणत्या बाबींची कमतरता आहे, हे संबंधित तपासणी अधिकाऱ्यांने सांगणे आवश्यक आहे. तसेच अमूक प्रकारे काम केले नसल्यामुळे Loss to Government इतका झालेला आहे, असे सांगणे आवश्यक आहे. परंतु अधिकाऱ्यांनी सांगितले की, अमूक कामामध्ये अमूक दोष आढळतो. सदर काम असे केले असते तर तसे झाले असते. यासाठी मुख्य अभियंता यांची परवानगी घेतली असती तर असे झाले असते. या सर्व बाबी काम करण्यापूर्वी करणे आवश्यक असते. सदर काम पूर्ण झाल्यानंतर मॅन्युअल असे सांगते की, संबंधित तपासणी अधिकाऱ्यांनी सुस्पष्ट Loss to Government काढणे आवश्यक आहे. जर सदर काम अतिशय चांगले केले असेल तर Loss to Government नाही, असे सांगणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, श्री.हांडे यांना मुंबई सर्कलचा ए.सी. पदाचा अतिरिक्त कार्यभार दिल्यानंतर त्यांना मुंबई सर्कलच्या सी.ई. पदावर नियुक्ती द्यावयाची होती. कारण प्रेसिडेंसी व यांची अनेक कामे श्री.राजपूत नावाचा एक कार्यकारी अभियंता करीत होता.

श्री.प्रशांत बंब.....

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये एक नवीन प्रकार सुरु झालेला आहे. उदाहरणार्थ एका अधिकाऱ्यांने ३० लाख रुपये किंवा १ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केला. तर तो अधिकारी अजिबात सापडत नाही. जर भ्रष्टाचार केल्याचे आढळून आले तर ३० लाख रुपये भरुन त्यांना पुन्हा कामावर घेतले जाते. कारण हे अधिकारी ब्रॅन्डेड भ्रष्टाचारी आहेत. नवीन भ्रष्टाचार करण्यासाठी शासन त्यांना एक प्रकारे मुभा देत आहे. अशाच प्रकारे श्री.राजपूत नावाच्या कार्यकारी अभियंता यांच्याकडून ३० लाख रुपये वसूल केले व त्यानंतर त्यांना प्रमोशन देण्यात आले आहे. श्री.हांडे यांनी प्रेसिडेन्सीमध्ये भ्रष्टाचार केल्याचे आढळून आले होते. समजा लोक दरोडे टाकतात, चोऱ्या करतात, तेव्हा त्यांना पकडून त्यांनी चोरी केलेला मुद्देमाल जप्त केला जातो. तेव्हा आपण त्यांना तसेच सोडून देतो काय? परंतु अशी पद्धत सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये सुरु आहे. ज्यांनी ६५० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केला त्यांना शासनाने प्रमोशन दिलेले आहे. नाशिक येथील तपासणी अधिकाऱ्यांनी सांगितले होते की, श्री.के.टी.पाटील मुख्य अभियंता यांच्यावर चार्जशीट दाखल करावी.

[***] आदेशानुसार विलोपित मजकूर

यानंतर श्री.कुलकर्णी.....

श्री. प्रशांत बंब.....

अध्यक्ष महोदय, जे दोषी आढळून आले आहेत, ज्यांच्यावर चौकशी सुरु आहे, ज्यांच्यावर एफआयआर दाखल करण्यात आला आहे, त्यांना पदोन्नती न देता त्यांना पदावनत केले जाते किंवा त्यांना साईड पोस्ट दिली जाते. असे असताना त्या अधिकऱ्यास रेल सेक्रेटरी म्हणून नियुक्ती दिली आहे. त्या अधिकाऱ्यास रस्ते सचिव या पदावर घ्यावयाचे होते. श्री. हांडे यांनाही मुख्य अभियंता हे पद द्यावयाचे होते. परंतु मुख्य अभियंता या पदावर येण्यासाठी ते ८ व्या क्रमांकावर होते. त्यांना मुख्य अभियंता या पदावर घेण्यासाठी नवीन पदे निर्माण केली गेली. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि एमजेपी यांचा आतापर्यंत कधीही संबंध आलेला नाही. एमजेपीने पत्र देऊन सांगितले की, एमजेपीकरिता ३ मुख्य अभियंता देण्यात यावे. त्याठिकाणी ३ मुख्य अभियंता यांना नियुक्ती दिली गेली. श्री. भोंगे, उप अभियंता हे कोकण भवन येथे काम करीत असतात. त्यांच्यासाठी मुख्य अभियंता हे नवीन पद निर्माण केले. तसेच महा आरोग्यकरिताही मुख्य अभियंता यांचे पद निर्माण केले. अशा प्रकारे ८ पदे तयार करुन श्री. हांडे यांचा नंबर लागला होता. श्री. हांडे यांचा नंबर लागल्यानंतर त्यांना महा आरोग्य येथे नियुक्ती द्यावयास हवी होती. परंतु त्यांना मुंबई सर्कलच्या मुख्य अभियंता या पदावर नियुक्ती दिली गेली. यात नांदेड येथील श्री. शंकर धोंडगे हे आहेत. मी सांगू इच्छितो की, विरोधी पक्षाच्या आमदारांना जास्तीत जास्त ५ कोटी पर्यंत निधी दिला जातो. सत्ताधारी पक्षातील आमदारांना याच्या दुप्पट निधी दिला तर समजू शकतो. परंतु तसे न करता यांच्याकडे हजार कोटी रुपये आहेत. त्यातील ३०० कोटी रुपयांचे नांदेड येथे ओव्हेरलॅपिंग झाले आहे. याचा अर्थ असा की, नांदेड येथे गुरुतागद्दी कार्यक्रमावेळेस माननीय मंत्री हे मुख्यमंत्री असताना जी कामे केली होती तीच कामे आता पुन्हा घेतली गेली आहेत. ही कामे अचानक आलेली नाहीत. नियोजनपूर्वक हे आलेले आहेत.

श्री. अशोक चव्हाण : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांना जर माझे नाव घेऊन बोलावयाचे असेल तर त्यांनी मला अगोदर नोटीस दिली पाहिजे. त्यांना विभागाबद्दल जे मत मांडावयाचे आहे ते त्यांनी मांडावे. परंतु ज्यावेळेस त्यांना माझे

श्री. अशोक चव्हाण .....

नाव घेऊन बोलावयाचे आहे, त्यावेळेस त्यांनी मला नियमाप्रमाणे अगोदर नोटीस दिली पाहिजे. माझी विनंती आहे की, ज्या ज्या ठिकाणी त्यांनी माझे नाव घेतले आहे तो भाग सभागृहाच्या पटलावरुन काढून टाकला पाहिजे.

तालिका सभाध्यक्ष : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी कोणाचेही नाव न घेता भाषण करावे. त्यांनी केवळ विभागावर मत मांडावे.

श्री. प्रशांत बंब : अध्यक्ष महोदय, मी आतापर्यंत माननीय मंत्री श्री. अशोक चव्हाण, असे नाव घेतले आहे काय ? आपल्या सभागृहाची पद्धत आहे. अनेकदा आपण बोलताना सांगत असतो की, तुम्ही मंत्री, मुख्यमंत्री असताना.... अशा प्रकारे आपण बोलत असतो. मी हे सभागृहाच्या प्रथा, परंपरेच्या विरुद्ध बोलत आहे काय ?

श्री. अशोक चव्हाण : अध्यक्ष महोदय, आजच्या कामकाजामध्ये जे विभाग दर्शविण्यात आलेले आहेत, त्या विभागाचा मी मंत्री आहे. सन्माननीय सदस्यांचे काही व्यक्तीगत मते असतील तर, त्याबाबत मी बोलणार नाही. परंतु ज्यावेळेस त्यांना माझ्या नावाचा उल्लेख करावयाचा असेल तेव्हा त्यांनी मला याबाबतची सूचना दिली पाहिजे, हा माझा मुद्दा आहे.

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री जे सांगत आहेत त्याबाबत आम्ही सहमत आहोत. त्यांनी सांगितलेली प्रथा, परंपरा आहे. माननीय मंत्र्यांचे नाव घ्यावयाचे असेल तर त्याबाबत नोटीस किंवा सूचना दिली पाहिजे. परंतु सन्माननीय सदस्य श्री. प्रशांत बंब यांचे भाषण मी शांतपणे ऐकत होतो. त्यांच्या भाषणातील मुद्दे मंत्री महोदय लिहित आहेत. ते खात्यांतर्गत असलेल्या अधिकाऱ्यांचे नाव घेत आहेत आणि ते त्या अधिकाऱ्यांच्या नावे बोलत आहेत. माननीय मंत्री श्री. अशोक चव्हाण यांच्याबद्दल आमच्या मनात आदर आहे. या विषयाबाबत सभागृहाच्या बाहेर गैरसमज व्हावयाचा नसेल तर अधिकाऱ्यांचे नाव घेतल्यामुळे

ॲड. आशिष शेलार .....

आपण उभे राहिलात, असा गैरसमज पसरू नये. सन्माननीय सदस्य आपले नाव घेत नसून ते अधिकाऱ्यांचे नाव घेत आहेत आणि विभागावर त्यांचे मत मांडत आहेत.

श्री. अशोक चव्हाण : अध्यक्ष महोदय, ज्याठिकाणी माझा व्यक्तीगत उल्लेख करण्यात आला तो सभागृहाच्या पटलावरुन काढावा, अशी मी विनंती करतो.

श्री. बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रशांत बंब यांनी भाषण करीत असताना अनेक अधिकाऱ्यांची नावे घेतली आहेत. तोपर्यंत माननीय मंत्री श्री. अशोक चव्हाण काही बोलले नाहीत. परंतु ज्यावेळेस त्यांनी म्हटले की, ते मुख्यमंत्री असतानाचे अधिकारी..... त्यामुळे हा प्रश्न निर्माण झाला आहे.

श्री. योगेश सागर : अध्यक्ष महोदय, मी देखील साडेचार वर्ष सभागृहाचे कामकाज चालविले आहे. मलाही नियम, कायदे, प्रथा, परंपरा माहिती आहेत. मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य अतिशय पोडतिडकीने विषय मांडत आहेत. त्यांनी ३७ पत्रे, ८ स्मरणपत्रे लिहिली आहेत. असे असतानाही उत्तर मिळणार नसेल तर ते योग्य नाही. विभागातील व्यक्तींचे नाव घेऊन, कामाचा उल्लेख करुन, अधिकाऱ्यांची नावे घेऊन पदोन्नतीकरिता कशी व्यवस्था केली आहे, हे सांगितले तर ती बाब व्यक्तीगत घ्यावयाची नसते.

यानंतर श्री. चौधरी.....

श्री.योगेश सागर.....

सन्माननीय सदस्यांचा कुठलाही मुद्दा माननीय मंत्री श्री.अशोक चव्हाण यांच्या संदर्भातील नाही तर ते ज्या पदावर काम करीत आहेत व त्यांच्या अखत्यारितील विभागामध्ये ज्या गोष्टी घडत आहेत त्यासंदर्भातील आहेत. तसेच त्या गोष्टी मंत्री महोदयांच्या नजरेस आणून देण्याचा प्रयत्न ते करीत आहेत. त्यांना यासंदर्भात न मिळालेल्या प्रतिसादाबाबत देखील सन्माननीय सदस्य बोलत आहेत.

तालिका सभाध्यक्ष : ठीक आहे. परंतु सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की आपण कोणाचेही नाव घेऊ नका. तसेच आपण माझ्याकडे हातवारे करुन बोलावे.

श्री.प्रशांत बंब : अध्यक्ष महोदय, सुमारे १३ वर्षांपासून मी या सभागृहाचा सदस्य आहे. माझ्या नेमक्या कोणत्या बोलण्यावर आक्षेप घेतला जात आहे ? मी जर कोणाच्या पदाचाही उल्लेख करायचा नसेल तर मी नेमके बोलायचे काय ? मी जे बोलत आहे ते खोटे असेल तर मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरामध्ये तसे सांगावे.

अध्यक्ष महोदय, भ्रष्टाचार कशाला म्हणतात हे मी थोडे अधिक स्पष्टपणे सांगतो. त्यामध्ये सर्व बाबी अंतर्भूत असतात. आस्थापना खर्च, छुपे चार्जेस, वेगवेगळया contingencies असतात, स्थानिक व्यक्ती काय करु शकतो, इतर लोक काय करतील, इत्यादी सर्व बाबी त्यामध्ये अंतर्भूत असतात. स्पेसिफिकेशनमध्ये फरक पडता कामा नये ही बाब हे सभागृह आणि मंत्री महोदयांचा विभाग सांगतो. ज्या खात्यासाठी लाख-लाख कोटी रुपयांची तरतूद केली जाते त्या खात्यामध्ये असे लफडे होत असतील तर आम्ही त्याबाबत या ठिकाणी बोलायचे नाही तर कुठे बोलायचे ?

अध्यक्ष महोदय, रस्त्याच्या सिग्नलवरील दृश्य पाहिले तर असे दिसते की, कडेवर मूल असणारी स्त्री देखील भिक मागून खात आहे. भ्रष्ट मार्गाने जाणारा हा पैसा त्या लोकांचा आहे. मी दाव्याने सांगू इच्छितो की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संपूर्ण राज्यातील भ्रष्टाचाराचे माहेरघर नांदेड झालेले आहे.

श्री.प्रशांत बंब.....

मी जर त्या ठिकाणी असतो तर माझ्या मनाला देखील काहीतरी वाटायला पाहिजे होती. माझ्या हाताखाली इतके.... माझे आपणास आव्हान आहे की, आपण याची चौकशी करावी. यांनी केलेला कोणताही १०० मिटरचा रस्ता देखील स्पेसिफिकेशनप्रमाणे केलेला असेल तर मी या सभागृहामध्ये पाय देखील ठेवणार नाही. एकसुध्दा रस्ता असा सापडणार नाही.

अध्यक्ष महोदय, थोडया-फार चुका होतात हे मान्य आहे परंतु जाणुनबुजून ओव्हरलॅपिंग केले जाते. गुरु-दा-गद्दी कार्यक्रमावेळी १७०० कोटी रुपये देण्यात आले होते. मी काही रस्त्यांची नावे वाचून दाखवितो. या रस्त्यांची कामे याच वर्षी दोन वेळा स्पेशल रिपेअरींमध्ये घेण्यात आली आहेत. आमच्या आमदार महोदयांना याबाबत माहिती देखील नसते कारण ते अर्थसंकल्पिय प्रकाशनामध्ये नमूद नसते. नॉन प्लॅन्ड् चे काम एस.आर. मध्ये घेण्यात आले व ते पुन्हा बजेटमध्ये दाखविण्यात आले आहे व त्यालाच पुन्हा हॅममध्ये घेण्यात येत आहे. जुना मोंढा, गोदावरी नदीवरील पूल, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथील रस्त्याच्या सिमेंट काँक्रीटीकरणाच्या कामासाठी ५० कोटी रुपये तरतूद करण्यात आली. हे काम दिनांक २२ जानेवारी, २०२१ च्या शासन निर्णयानुसार एस.आर. मध्ये घेण्यात आले. तेच काम करण्यासाठी आता टेंडर पब्लिश झाले आहे, Construction of CC road, RCC drain, जुना मोंढा, गोदावरी रिव्हर ब्रिज. म्हणजे तेच ३ किलोमीटरचे काम ८८ कोटी ९० लाख रुपयांचे आहे. म्हणजे समृध्दी महामार्गापेक्षा जास्त स्पेसिफिकेशन आहेत का ? मी याची कागदपत्रे आपल्याकडे पाठवितो. यापुढे जाऊन मी सांगू इच्छितो की, या सर्व रस्त्यांची कामे झालेली आहेत.

अध्यक्ष महोदय, स्पेसिफिकेशनप्रमाणे जर रस्त्यांची कामे झाली नाहीत तर ७०० पटीने नुकसान होते. नियमानुसार सर्व थर दिले तर त्या रस्त्याचे आयुर्मान किमान ४० वर्षे असते. डी.एल.पी. केवळ तीन ते पाच वर्षांची असते हे मला मान्य आहे. परंतु त्याचा अर्थ असा होत नाही की तेवढया कालावधीनंतर तो रस्ता उखडून पुन्हा नवीन बनवायचा आहे तर त्या कालावधीनंतर कधी तरी तो रस्ता दुरुस्त

श्री.प्रशांत बंब.....

करावा लागेल असा त्याचा अर्थ होतो. ४० वर्षांनंतर रस्त्यावरील ट्रॅफिक इन्टेन्सिटी वाढते व आपण नवीन मोठा रस्ता हाती घेतो. परंतु नांदेड जिल्हयामध्ये तेच रस्ते पुन्हा दहा वर्षांनी हाती घ्यावे लागत असतील व त्याच रस्त्यांवर पुन्हा खर्च केला जात असेल तर माझा प्रश्न आहे की, इतर ठिकाणी रस्त्यांची कामे करणे गरजेचे नाही का ? हे सांगण्याचे कारण असे आहे की, या रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाली आहेत.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. प्रशांत बंब...

कारण ते सर्व रस्ते निकृष्ट दर्जाची झाली आहेत म्हणून मी हे सांगतो. मी श्री. हांडे, निलावार या अधिकाऱ्यांची नावे घेतल्यानंतर कोणाला राग येण्याचे कारण नाही. कारण यांच्या सिंडीकेट पुराव्यासह मी बोलत आहे.

अध्यक्ष महोदय, नाना पवार नावाचे एक कार्यकारी अभियंता होते. यांच्या भ्रष्टाचाराचे नवीन नवीन प्रकार मी या खात्यामधील सांगतो. ॲन्टी करप्शनच्या चौकशा जर थंड बस्त्यामध्ये टाकायच्या असतील तर अमुक इतके इतके तू कर... मी चौकशी करीत नाही. ॲन्टी करप्शनची केस आहे. मग आपण चार्जशीट का दाखल करीत नाहीत. स्वत:चे खाते सांभाळा. त्यामध्ये किती चौकशा शिल्लक आहेत. त्या सर्व प्रकरणांच्या चौकशा झाल्या पाहिजेत. कित्येक लोकांवर एफआयआर दाखल आहेत आणि आपण त्यांना पदोन्नत्या देता. श्री. ए. बी. गायकवाड नावाच्या अधिकाऱ्याला आपण सचिव (बांधकामे) या पदावर बसतो. त्या इमारत खात्याच्या कामात त्याच्यावर माननीय न्यायालयाने ताशेरे ओढून एफआयआर दाखल आहे. ज्यांच्यावर ज्या विभागाची चौकशी लागली असेल त्याच खात्याचे ते सचिव होतात. ते दुसऱ्या कोणालाही सचिव होऊ देत नाहीत. नंतर सचिव पदावर पदोन्नती घेतल्यानंतर ते सर्व पुरावे नष्ट करतात. सर्व कोर्टातील प्रकरणे कॉम्प्रोमाईजेस करतात. स्वत: प्रमुख असताना नंतर इमारत खात्याचे सचिव म्हणून प्रमुख होतात. एक एक गोष्ट बोललो तर... श्री. नाना पवार यांची ॲन्टी करप्शन ब्युरोची की कुठली तरी एक चौकशी होती. ती चौकशी करण्याचे ठरले. त्यांचे काही ठरले नाही. त्याच्याबरोबर यांचे काही ठरले नाही. तो म्हणला की, माझे वरती फार चांगले संबंध आहेत. मी तिकडून करुन घेईल. यांनी त्याची चौकशी करावी, अशा पध्दतीची फाईल माननीय मुख्यमंत्र्यांकडे गेली. मुख्यमंत्र्यांनी सुध्दा चौकशी करावी म्हणून त्यावर सही करुन ती फाईल पाठविली. त्या माणसाने माननीय मुख्यमंत्री यांच्या शेऱ्याच्यावर लिहिले की, चौकशी करण्यात येऊ नये.

अध्यक्ष महोदय, जो माणूस माननीय मुख्यमंत्र्यांच्या सहीच्या वर शेरा मारतो, आज त्या घटनेला जवळपास एक ते सव्वा वर्षे पूर्ण झाले आहे. याबाबत कोणीही

श्री. प्रशांत बंब...

सांगेन की, असा माणूस डिसमिस व्हायला नको काय ? पुन्हा यांचे काही तरी ठरले आणि त्याला साईड पोस्टींग देण्यात आली. आजही तो साईड पोस्टींगवर काम करीत आहे. त्याच्या चौकशीवर माननीय मुख्यमंत्र्यांची सही आहे.

तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण) : मी सन्माननीय सदस्यांना विचारु इच्छितो की, आपण आणखी किती वेळ बोलणार आहात. कारण अर्धा तास झाला आहे. त्यामुळे आपल्या पक्षाचा वेळ कमी होईल. आपल्या पक्षासाठी ८० मिनिटांचा वेळ दिलेला आहे आणि त्यापैकी आता ३० मिनिटे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे पुढच्या लोकांना बोलण्याची संधी मिळणार नाही.

श्री. प्रशांत बंब : अध्यक्ष महोदय, मला असे वाटते की, मी पुराव्यासह जे सांगतो... त्यावर आपले सभागृह कशासाठी आहे तर मी बोलावे आणि त्यावर काहीच होणार नाही... पुन्हा ये, पुन्हा बोल, पुन्हा घरी जा असे तर यामध्ये नाही ना. कारण मी या ठिकाणी पुराव्यासह सांगत आहे.

तालिका सभाध्यक्ष : मी आपल्याला सांगू इच्छितो की,इतर सन्माननीय सदस्यांना देखील बोलण्यासाठी वेळ ठेवावा.

श्री. प्रशांत बंब : अध्यक्ष महोदय, मला आणखी बरेच पुरावे द्यायचे आहेत. कारण १ लाख कोटी रुपयांचा विषय आहे. कारण त्यांच्या हातामध्ये आपले १ लाख कोटी रुपये आहेत. आपल्या राज्यातील कोणताही माणूस असो. मग तो फेरीवाला असो की उद्योजक असो. त्या सर्वांना सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंध येतो. यामध्ये असे अपेक्षित होते की, प्रत्येक पात्रतेच्या उमेदवाराला नोकरी मिळाली पाहिजे. या खात्यामधून दरवर्षी किमान २५ हजार लोकांना नोकऱ्या मिळाल्या पाहिजेत. हे करप्शन होत असताना आपण सर्व विसरुन जातो. यांनी व्हीजिलन्स विभागाला पंगू करुन टाकले. तेथे अधिकारच ठेवले नाहीत. त्यांच्यावर चार्जवर चार्ज दिले आहेत. जेव्हा आपला आवाका वाढतो तेव्हा आपले व्हीजिलन्स अधिकारी वाढले पाहिजेत.

श्री. प्रशांत बंब...

अगोदर गँगमन होते. रोड कारकून होते. ओवरशेअर होते. जे.ई., डी.ई. आणि कार्यकारी अभियंते हे सर्वजण लक्ष ठेवत होते.

अध्यक्ष महोदय, हे एकटेच याला जबाबदार आहेत असे मी म्हणत नाही तर हे केव्हापासून सुरू झाले ते मी आपल्याला सांगू इच्छितो. जेव्हा एमपीएससीमार्फत भरती प्रक्रिया सुरू झाली तेव्हापासून हे सुरू झाले. यांनी मागची प्रकरणे मिटविण्याकरिता आताचे प्रयत्न करतात त्यावर मी बोलतो. एमपीएससीमार्फतचे सर्व अधिकारी खराब नाहीत. त्यामध्ये श्री. वांडेकर, कातकडे किंवा जनबंधू, भोंगे असे अधिकारी असतील ते चांगले काम करतात. पण त्यांना हे साईड पोस्ट देतात.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. प्रशांत बंब.....

हे पद कोणाला देतात हा यांचा लूकआऊट आहे. पण नियमाच्या व्यतिरिक्त किंवा कायदा-कानूनच्या बाहेर जाऊन का देता हा माझा मुद्दा आहे. हायब्रीड अन्युईटी मॉडेल संदर्भात चर्चेसाठी मी गेलो होतो. मी यापूर्वी आपल्याला जसे सांगितले की, स्पेसिफिकेशनची आम्हाला गरज नाही. एक आडवा रस्ता, एक सरळ आणि एक मधील रस्ता असेल तर एका रस्त्याची ट्राफिक इंटेन्सिटी १० एमएसए, दुसऱ्या रस्त्याची १० एमएसए आणि मधल्या रस्त्याची १०० एमएसए आहे. समृद्धी महामार्गाची ट्राफिक इंटेन्सिटी ३० वर्षानंतर ७० एमएसए होणार आहे. आपल्याकडे असा रस्ता आहे का की, गाड्या वरुन हेलिकॉप्टरने येतील, मग त्या रस्त्यावर फक्त १५ किमी चालतील आणि पुन्हा हेलिकॉप्टरने उचलल्या जातील. हे सर्व कशासाठी केले आहे तर एक पातळी वाढवून त्याचे पैसे... आपण २० कोटी रुपयांसाठी गोरगरिबांच्या २०० कोटी रुपयांचे नुकसान करणार आहात काय? हायब्रीड ॲन्युईटी मॉडेलमध्ये बाजूला पिचिंग दिल्या आहेत. किमान २५ किलोचा दगड असला पाहिजे, असा निकष आहे. प्रत्यक्षात मात्र ५ किलो, ७ किलो किंवा १० किलो वजनाचे दगड ठेवले जातात. म्हणजे पैसे खाण्याच्या अशा वेगवेगळया क्लृप्त्या मी आपल्याला सांगत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव श्री. सौनिक हे प्रचंड भ्रष्टाचारामध्ये बुडालेले व्यक्ती आहेत. या अपर मुख्य सचिवांची श्री. ठाकरे नावाच्या एका अधिकाऱ्यांनीच तक्रार केली आहे. आजही त्यांच्याकडे या खात्याचा कार्यभार आहे आणि मागील चार ते पाच वर्षांपासून ते या विभागात कार्यरत आहेत. हे तिथे का आहेत? याचे कारण असे आहे की, याबाबत कॅटने निर्णय दिला की, यांची सीबीआय चौकशी लावण्यात यावी. याबाबत आपण विचार करा. एवढेच नाही तर श्री.सौनिक यांची चौकशी का केली नाही. यासाठी एजी नागपूर मधील २ अधिकारी यांची देखील चौकशी लावा. त्यांनी फक्त रिव्ह्यु पिटिशन दाखल केली आणि आजपर्यंत ज्या व्यक्तीची सीबीआय चौकशी झाली पाहिजे असे ट्रीब्युनलने सांगितले तरी त्यांना या पदावर का ठेवण्यात आले आहे, त्यांना काढून का टाकण्यात आले नाही? त्यांच्या काळातील क्लेम बघितले तर आपल्या लक्षात येईल की, श्री. सौनिक हे क्लेममास्टर होते.

श्री. प्रशांत बंब.....

अध्यक्ष महोदय, मी आता आपल्याला सर्व राडा-पसारा सांगणार नाही. कारण मला बऱ्याचवेळा बोलण्यापासून थांबविण्यात येईल, असे माझ्या लक्षात येत आहे. जेव्हा ही कोणी सदस्य मागण्यांवरील चर्चेस प्रारंभ करतो तेव्हा त्या सदस्यास एक ते सव्वा तासाचा वेळ असतो. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाबतीत मी १० तास देखील बोलू शकतो. परंतु मी वेळेची मर्यादा पाळत असल्यामुळे एवढेच सांगू इच्छितो की, नांदेड जिल्ह्यात अडचणी वाढल्यानंतर मुख्य अभियंता श्री. धोंडगे यांच्यासाठी आणखी एक विभाग बनविण्यात आला. श्री. धोंडगे यांनी चार ते पाच कार्यकारी अभियंत्यांचे सर्व पैसे स्वत: घेण्यास सुरुवात केली. मी ज्या बाबी सांगत आहे, त्या बारकाईने लक्षात घेतल्या पाहिजे. माननीय मंत्र्यांचे आणि माझे असे काही वैयक्तिक वैर नाही. परंतु मी आपल्याला वारंवार लक्षात आणून देत आहे की, आपले पैसे गेले तर समोरची व्यक्ती कोर्टात जाईल कारण की त्याचा डीएलपी संपलेला आहे. त्यामुळे यांच्यावर पण कारवाई का होऊ नये किंवा हे सुद्धा त्यामध्ये समाविष्ट आहेत किंवा नाही ? मी माननीय मंत्र्यांसोबत बरेच पत्रव्यवहार करुन त्यांना या बाबत सांगितले आहे. एक एक प्रकार असे आहेत की, कोणतेही काम आपल्याला बजेटमध्ये मंजूर करायचे असतील तर त्यासाठी आपण ॲडमिनिस्ट्रेटीव्ह ॲप्रुव्हल देतो. त्यानंतर टी.एस. देतो. त्याचेच देयके काढतो. श्री. के.टी. पाटील यांनी अशी देयके काढली आहेत की, ॲडमिनिस्ट्रेटीव्ह ॲप्रुव्हल दुसऱ्या कामाची तर टेक्निकल सँक्शन तिसऱ्या कामाची आणि देयके तर चौथ्या कामाची काढली आहेत. आपण त्यांचा दोष सिद्ध झाल्यानंतरही त्यांना प्रमोशन दिले व त्याच जागेवर ठेवून पुन्हा भ्रष्टाचार करण्यासाठी मोकळे सोडले आहे...(अडथळा)..

अध्यक्ष महोदय, माझी सभागृहाला विनंती आहे की, या सर्व प्रश्नांची उत्तरे शासनाकडून घेतली पाहिजे. मी सर्व सन्माननीय सदस्यांकरिता हे बोलत आहे. कारण त्यांच्या मतदासंघात काय आले, हे मला माहिती आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर....

श्री. प्रशांत बंब....

तुमच्या मतदारसंघात काय अवस्था आहे, हे मला माहीत आहे. प्रत्येक आमदाराचे हे दु:ख आहे. मतदारसंघात जर आपण १५ हजार कोटी रुपयांची कामे दिली तर (अडथळा)

तालिका सभाध्यक्ष : खाली बसून कोणी बोलू नये.

श्री. प्रशांत बंब : अध्यक्ष महोदय, मतदारसंघात ५० कोटी, १५० कोटी रुपयांची कामे जेव्हा २५ टक्के पूर्ण होतात तेव्हा अधिकाऱ्यांनी मागणी लाईनमध्ये पाठवली पाहिजे. औरंगाबाद विभाग असेल, येथे जी कामे प्राधान्याने झाली आहेत त्याची मागणी पाठवली पाहिजे. मात्र येथे अशी सिस्टीम नाही. आपण ऐकून घ्यावे. आपल्या मतदारसंघातील कामे दुसऱ्या वर्षी बंद पडतात याचे कारण कंत्राटदाराला निधी मिळत नाही. कायदेशीरपणे जी कामे आधी झालेली आहेत त्याची मागणी येत नाही. मुख्य अभियंता यांच्याकडे चिठ्ठया पाठवल्या जातात की, या कामाची मागणी पाठवा. जी कामे आधी झालेली आहेत, त्यांची मागणी पाठवली पाहिजे, त्यास निधी मिळाला पाहिजे. मात्र येथे तसे होत नाही. १० कोटी रुपयांचे जर काम असेल तर स्पेसिफिकेशनमध्ये फरक न पडता सर्व गोष्टी इनबिल्ट आहेत. मात्र यांनी नवीन प्रकार सुरु केला आहे. गुणवत्ता खराब करा, मला काम द्या. एखादा माणूस त्यांच्याकडे गेला की, मला पैसे पाहिजे तर त्याची चिठ्ठी पाठवतात, याची मागणी पाठव. मात्र असे चालत नाही. जी कामे झाली आहेत त्याची मुख्य अभियंता यांच्याकडून मागणी दिली पाहिजे. चेक करुन पटलावर ठेवा. मुख्य अभियंता यांनी जी कामे झालेली होती त्याची मागणी का दिली नाही. अशा चिठ्टया देऊन जर पैसे दिले जात असतील तर आमच्या मतदारसंघातील कामे कशी होतील ? मतदारसंघात जर एखादे काम झाल्यानंतर त्या करिता पैसे मिळाले नाहीत तर त्याला एस्कलेशन द्यावे लागते. यामुळे खर्च वाढतो. जर त्याने काम वेळेवर केले नाही तर दंड का लावला जात

श्री. प्रशांत बंब....

नाही ? एक तर दंड त्याला लावला पाहिजे किंवा त्याचे पैसे दिले पाहिजेत. यामुळे प्रत्येक आमदारांचे ४ कोटीने नुकसान होते. असे करत करत एक दिवस असा येतो की, आम्हाला जवळजवळ २० हजार कोटी रुपये खर्च न करता वाया जातात. याचे कारण आम्हाला त्यांचे क्लेम द्यावे लागतात, एस्कलेशन द्यावे लागतात.

अध्यक्ष महोदय, सिमेंट काँक्रीटच्या रस्त्याचे आयुष्य किमान ८० वर्षे आहे. माझ्या मतदारसंघातील मी सांगतो. फुलंब्री ते खुलताबाद या रस्त्याचे काम झाले. आता पर्यंत तेथे श्री. विनय देशपांडे होते. ते देखील असेच. या बाबत मी काही बोलत नाही. मी त्यांना सांगितले. आज सिमेंट काँक्रीटचा फुलंब्री ते खुलताबाद या रस्त्याकरिता सर्व अनडयु इनफ्ल्युएन्स तयार झाले आहेत. डांबराचा रस्ता पूर्ण झाल्यानंतर तर रफनेस इंडेक्स काढण्याकरिता एक मशीन फिरवली जाते. हा आकडा जर १८०० एमएम प्रति कि.मी च्या वर गेला तर त्याचा अर्थ तो रस्ता खराब आहे. माझे आवाहन आहे. तसेच मंत्री महोदयांना विनंती आहे. आज आपल्याकडे २७ टोल नाके सुरु आहेत. या टोल नाक्याचे पैसे उद्या पासून आपण जमा करा. ते बंद करा, असे मी सांगणार नाही. टोल नाका घेण्याकरिता तो रस्ता ज्या स्थितीत असला पाहिजे तसा तो नसल्यामुळे नुकसान भरपाई देण्याची गरज नाही. यामुळे आपले वर्षाचे २हजार कोटी रुपये वाचतील. त्याला मुभा मिळणार नाही. हे पैसे आपण जमा करा. रफनेस इंडेक्सची मशीन जर आपण कोणत्याही टोल नाक्यावरून फिरवली तर तो आकडा अडीच ते तीन हजार एवढा असेल. नांदेड, हिंगोली, परभणी, औरंगाबाद, तसेच माझ्या मतदारसंघातील फुलंब्री ते खुलताबाद येथील काँक्रीटचे रस्ते आपण बघावेत. येथे अडीच ते साडे तीन हजार एवढा रफनेस इंडेक्स आहे. याचा अर्थ खालच्या embankment settle झालेल्या आहेत. यावर हा रस्ता टिकू शकणार नाही. ८० वर्षे हा रस्ता टिकणार नाही. केवळ १० ते १५ वर्षे तो टिकेल, पुन्हा लाख –दोन लाख कोटी रुपये खर्च करावा लागेल.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.प्रशांत बंब ...

या पध्दतीने आपल्याला काम करावे लागेल. माझी विनंती आहे, आपण बदल्यांपासून ते पैशांपर्यंत व कामाच्या दर्जापासून ते आपल्या आमदारांपर्यंत सर्वांना सारखा न्याय दिला पाहिजे. आपला पैसा वाचला पाहिजे. कित्येक महिला, माता भगिनी अधिकारी असतात ते यांचे काही करु शकत नाहीत त्यामुळे त्यांना दूर दूर पाठवले जाते. असे प्रकार घडल्यामुळे हे खाते अगदी डिटोरिएट झालेले आहे, क्षतीग्रस्त झालेले आहे. ... (अडथळा)... खरेच मला आता पाणी हवे आहे बरोबर आहे. परंतु, एक लक्षात ठेवा मी चांगल्या चांगल्यांना पाणी पाजत असतो.

अध्यक्ष महोदय, कोणतेही आमदार महोदय असोत मी कोणाबाबतही विरोधात आहे म्हणून बोलत नाही. परंतु, माझा राग असा आहे की, मागचे पुरावे नष्ट करण्याकरिता आता जे प्रयत्न सुरु आहेत, त्यावर चौकशी झाली पाहिजे. माझ्या ४-५ मागण्या मी आता सांगणार आहे.

अध्यक्ष महोदय, तुम्ही आतापर्यंत किती चौकशा बंद केल्या त्याबाबतची माहिती त्याच्या कारणासह पटलावर ठेवावी. ज्या बदल्या तुमच्या नियमानुसार आहेत, त्या सोडून नियमा व्यतिरिक्त तुम्ही ज्या ज्या बदल्या तुमच्या कार्यकाळात केल्या, त्याची माहिती पटलावर ठेवावी. हे नका सांगू की, अगोदर असे झाले, नंतर तसे झाले. तुम्ही तुमचे पाहून त्या बदल्यांबाबतची माहिती पटलावर ठेवावी.

अध्यक्ष महोदय, नांदेड विभागाची, राज्यातील सर्वच विभागांची चौकशी केली पाहिजे. परंतु, भ्रष्टाचाराचा आगार हा नांदेड झाल्यामुळे मी नांदेडबाबत सांगत आहे. नांदेडच्या प्रत्येक रस्त्याची म्हणजे, हायब्रीड ॲन्युइटी मॉडेलचा रस्ता असेल तर, एसआरचा रस्ता असेल तर, करंट रिपेअरिंगचा असेल तर किंवा बजेटेड वर्क असेल तर किंवा इमारती असतील तर, शहरातून जेव्हा माननीय उच्च न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, आता ५०० मीटरपर्यंतची दारुची दुकाने बंद होतील. तेव्हा मागे सर्व रस्ते कार्पोरेशनला बहाल करण्यात आले. कार्पोरेशनला दिल्यानंतर तेच रस्ते पुन्हा आता घेऊन त्यावर देखील पैसे टाकण्यात आले नांदेडमध्ये आपण या सर्व गोष्टींची चौकशी .... माझ्या तक्रारीबाबत सांगतो.

श्री.प्रशांत बंब ...

अध्यक्ष महोदय, मी दोन महत्वाच्या बाबींबाबत सांगत आहे. आरटीआयमध्ये माहिती मागितल्यावर देत नाही. मी तक्रार करीत असेन तर तुम्ही असे सांगा की, तुझी तक्रार अशा अशा कारणामुळे चुकीची आहे. एकाही तक्रारीचे उत्तर देत नाहीत. मला शेवटी आरटीआयमध्ये माहिती मागावी लागते. माझी कित्येक प्रकरणे आता राज्य माहिती आयोगापर्यंत आलेली आहेत. ती थोडीथोडकी नाहीत. जो रस्ता नसताना बनविण्यात आला, जो रस्ता अस्तित्वात असताना त्यावर दुसरा टाकण्यात आला. जे डांबराचे पैसे, डांबराचे चलन जेव्हा आपण एका रस्त्याचे काम करतो तेव्हा डांबराचे चलन कारण डांबर हे कंट्रोल्ड आयटम आहे. या डांबराचे चलन आपल्याला गर्व्हनमेंट रिफायनरीमधूनच मिळते.

अध्यक्ष महोदय, डांबर आपल्याला मार्केटमध्ये मिळत नाही. तो गर्व्हनमेंट रिफायनरीतून घेतो. ते चलन एकदा घेतल्यावर काम संपल्यावर विभागाला लावावे लागते. यांनी काय केले, बरेच अधिकारी आहेत त्यात खास नवले आहेत त्यांनी ड्युप्लीकेट कलर डांबर चलन छापून घेतले. ते सर्व लावून खोटे पैसे काढले.

अध्यक्ष महोदय, जेव्हा मी अशा तक्रारी करतो त्यावर तुम्ही ते चूक आहे की बरोबर आहे ते सांगितले पाहिजे. डांबराचा रस्ता झाला. काँक्रिटचे पीक्यूसी म्हणजे Pavement Quality Concrete याचे देखील असेच आहे. असे खोटे चलन लावून तुम्ही पैसे काढणार.... त्याचा हेतू काय होता डांबराचे ओरिजनल चलन एकदा लावले की, त्याला नवीन डांबर पर्चेस करावेच लागेल. त्याला ते काम करावयाचे नव्हते. डांबराचे चलन लावायचे होते. मग कलर झेरॉक्स करुन किंवा दुसरे नंबर टाकून दुसरे चलन लावून नवले, तोडावा, त्यावेळेचे तुंगे या सर्वांनी हे प्रॉब्लेम्स क्रिएट केले होते. आजही डांबराचे ड्युप्लीकेट चलन लावून पैसे काढले जातात. इतक्या गंभीर बाबी आपल्या खात्यामध्ये घडत आहेत.

अध्यक्ष महोदय, माझी विनंती आहे, ठीक आहे, मी असे समजतो की, आजपर्यंत लक्षात आले नसेल. काही राहून गेले असेल किंवा मी रिमाईंडर देऊन देखील ३७ पत्रांपैकी काही गोष्टी राहून व्यापात राहून गेल्या असतील. परंतु, माझी

श्री.प्रशांत बंब ...

मंत्री महोदयांकडून अपेक्षा आहे. इतके अनुभवी मंत्री महोदय आम्हाला फार कमी भेटतात. तुमच्या अनुभवाचा फायदा राज्याला हवा आहे.

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.प्रशांत बंब....

आपण खरे आहात, याबाबत मला काही बोलावयाचे नाही. आपण माझ्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत, ही मला अपेक्षा आहे. नांदेड व औरंगाबाद विभागातील उक्त कामांची चौकशी करण्यात यावी. मी माझ्या मतदारसंघातील उक्त प्रकारची ३ कामे अशा गोष्टींमुळे नाकारली आहेत. हायब्रीड ॲन्युईटी मॉडेलच्या रस्त्यांची ५ हजार कोटी रुपयांची कामे वाढविण्यात आली आहेत. अशा पद्धतीचे सुमारे ३० हजार कोटी रुपयांची कामे स्पेसिफिकेशनप्रमाणे आहेत, त्यामुळे पैसे दिले, असे मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणात सांगावे. त्यानंतर मी पुढे माझे मत मांडेन. अन्यथा सदरहू स्पेसिफिकेशनची चौकशी करुन ज्या रस्त्यांची कामे स्पेसिफिकेशनप्रमाणे नसतील ते रिजेक्ट करुन संबंधितांकडून १७ हजार कोटी रुपये रक्कम वसूल केली पाहिजे. आपण उक्त कामांचा सर्व ३० हजार कोटी रुपये निधी वाटप केला नसला तरी जी कामे झाली त्यांची मागणी विभागाकडे आली आहे. रस्त्यांवर बीबीएम झाल्याबरोबर पॅचेस पडले होते, त्यावर बीसी टाकून ते पुरावे नष्ट करण्यात आले आहेत. मी अधिक बोलणार नाही. उक्त प्रकरणांच्या चौकशा किती दिवसांमध्ये पूर्ण करण्यात येतील ? हे मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरामध्ये सांगावे.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ग्रामीण व जिल्हा मार्गांसाठी २५-२५ कोटी रुपयांच्या रस्त्यांच्या कामांचा समावेश करण्यात आला आहे. या प्रकरणी काही उपाय काढला असेल, ठीक आहे. सदरहू कामांचा समावेश ग्रामविकास विभागाच्या कामामध्ये केला असता तर हरकत नव्हती. सर्व मतदारसंघामध्ये कमी जास्त प्रमाणात ग्रामीण व जिल्हा रस्ते आहेत. उक्त कामे आमदार महोदयांना का देण्यात आली नाहीत ?

अध्यक्ष महोदय, अनेक सन्माननीय सदस्य यांना बोलावयाचे आहे. त्यामुळे मी अधिक वेळ घेणार नाही. मंत्री महोदय यांनी माझ्या बोलण्याचा राग मानून घेऊ नये. सर्व हायब्रीड अन्युईटी मॉडेल रस्त्यांची रॅन्डमली १०-१० मीटरनुसार १० ठिकाणी याप्रमाणे १०० मीटर रस्त्यांची चौकशी करण्यात येईल काय ? प्रत्येक

श्री.प्रशांत बंब....

विभागवार दक्षता खाते स्वतंत्र तयार करण्यात यावे. त्या अधिकाऱ्यांची बदली प्रमुख खात्यामध्ये करण्यात येऊ नये. तोपर्यंत दक्षता विभागाच्या २०० अधिकाऱ्यांच्या माध्यमातून उक्त सर्व रस्त्यांच्या स्पेसिफिकेशनची तपासणी करण्यात यावी. मी नांदेडच्या रस्त्यांचा वारंवार उल्लेख केला आहे. आपण १० टक्के सूट दिली तरी ९० टक्के चांगली कामे आपल्याला मिळाली पाहिजेत. मी तांत्रिकदृष्ट्या तपासणीबाबत बोललो नाही, स्पेसिफिकेशननुसार तपासणी करण्याची मागणी केली आहे. कामांचे पैसे अगोदर दिले, Escrow Account मध्ये त्यांनी नंतर भरले किंवा ते नंतर उघडले किंवा उघडलेच नाही, अशा तांत्रिक गोष्टींमध्ये मी जाणार नाही. कंत्राटदारांना पैसे देताना डीडक्शन झाले नाही. एवढ्या मोठ्या गोष्टी घडल्या आहेत. आपण कंत्राटदारांना १ रुपया दिला असेल तर त्याचा माल भेटला नाही, अशा बाबीं संदर्भात चौकशा करण्यात याव्यात. सदरहू रस्त्यांच्या कामांतील एक एक रस्ता ३००-३०० कोटी रुपयांचा आहे. त्यांच्या चौकशा आपण केल्या पाहिजेत. बदल्यांच्या विषयाबाबत पटलावर निवेदन ठेवण्यात यावे.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी एसीबी व इतर चौकशा त्यांच्या कार्यकाळात बंद केल्या असतील तर त्यांची माहिती पटलावर ठेवण्यात यावी. सर्व रस्ते स्पेसिफिकेशननुसार करुन घेण्यात येतील, असे मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सांगावे.

अध्यक्ष महोदय, मी माझे बोलणे थांबवतो. मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. धन्यवाद !

अल्पवयीन मुलीवर वार केल्याबाबत

श्री.सुनिल टिंगरे : अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघात पुणे येथे मागील आठवड्यामध्ये इनामदार स्कूल या शाळेत जाऊन १० वीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या अल्पवयीन मुलीवर ५ वार केले आहेत. त्यामुळे तिच्या पोटामध्ये मोठी जखम झाली आहे, तिच्या लिव्हरलाही जखम झाली आहे. सदरहू घटना घडल्यानंतर शाळा परिसरातून त्या मुलीला कोणी उपचारासाठी घेऊन गेले नाही. त्या मुलीच्या मैत्रिणीच्या वडिलांनी तिला रुग्णालयामध्ये दाखल केले.

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

श्री.सुनिल टिंगरे.....

परवा मी पीडित मुलीची भेट घेतली तेव्हा तीने इयत्ता १० वीची परीक्षा देण्याची इच्छा व्यक्त केली होती. ती अतिशय गरीब कुटुंबातील मुलगी आहे. त्यामुळे सदर पीडित मुलीच्या उपचाराचा सर्व खर्च शासन करणार आहे काय ?

अध्यक्ष महोदय, दुसरी बाब अशी आहे की, जखमी झाल्यामुळे ती इयत्ता १० वीची परीक्षा देऊ शकत नाही. त्यामुळे तीची तब्येत चांगली झाल्यानंतर तीची स्वंतत्र उर्वरित विषयांची परीक्षा देण्याची संधी उपलब्ध करुन दिली जाणार काय?

तालिका सभाध्यक्ष : उक्त प्रकरणाची सरकारने नोंद घ्यावी व त्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, पीडित मुलीच्या उपचाराचा खर्च शासनाने करावा, अशी सन्माननीय सदस्यांनी अपेक्षा व्यक्त केलेली आहे. त्यामुळे याबाबतची सर्व माहिती सन्माननीय सदस्याकडून घेऊन पुढील उपचाराची सर्व व्यवस्था शासनाकडून करण्यात येईल.

असुधारित प्रत

पृ. शी. : अनुदानाकरिता मागण्या

मु. शी. : सन२०२२-२०२३च्या अनुदानाकरिता मागण्या:

१) कृषि, पशुसंवर्धन , दुग्धव्यवसाय विकास व त्स्यव्यवसाय विभाग

२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

३) वित्त विभाग

४) सार्वजनिक बांधकाम विभाग

५) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

६) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

(चर्चा पुढे सुरु.....

श्री.योगेशदादा कदम (दापोली) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील व महर्षी धोंडू केशव कर्वे यांच्या मुरुड या जन्मगावी शाळेसाठी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आलेला आहे. तसेच ज्यांनी महाराष्ट्रामध्ये शिक्षणाचा पाया मजबूत केला आशा साने गुरुजींच्या गावातील शाळेसाठी देखील निधी मंजूर केलेला आहे. त्याबद्दल मी माननीय श्री.अजित पवार व महाविकास आघाडी सरकारचे अभिनंदन करतो व आभार मानतो.

अध्यक्ष महोदय, या राज्यातील जिल्हा परिषद शाळांची परिस्थिती अतिशय वाईट झालेली आहे. मी कोकणातील दापोली मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करीत आहे. माझ्या मतदारसंघातील जिल्हा परिषद शाळांची अवस्था अतिशय वाईट आहे. जिल्हा परिषद शाळांची आकडेवारी माझ्याकडे प्राप्त झाली आहे. ही आकडेवारी अतिशय धक्कादायक आहे आणि तेवढीच महत्त्वाची देखील आहे.

श्री.योगेशदादा कदम.....

अध्यक्ष महोदय, शालेय शिक्षण विभागाने स्थूल उत्पन्नाच्या ६ टक्के निधी शाळांवर खर्च करणे अपेक्षित आहे. परंतु मागील १० वर्षांची सरासरी पाहिली तर फक्त १.८८ टक्के इतकाच निधी खर्च केल्याचे दिसून येत आहे. जवळपास ४.५ ते ५ टक्के निधी कमी खर्च करतो तेव्हा शाळाची काय अवस्था होत असेल हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रामध्ये शासकीय व खाजगी अशा दोन्ही मिळून १ लाख १० हजार शाळा आहेत. परंतु त्यापैकी १५ हजार ३१८ शाळांमध्ये वीज उपलब्ध नाही. ही बाब अतिशय गंभीर स्वरुपाची आहे. त्यामुळे शालेय शिक्षण विभागाने याकडे विशेष लक्ष देऊन सदर शाळांचा शोध घेऊन चालू वर्षे संपण्यापूर्वी उक्त सर्व शाळांमध्ये वीज उपलब्ध करुन देण्यात यावी, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, शासकीय व खाजगी क्षेत्रातील सर्व शाळांमध्ये शौचालय असणे आवश्यक आहे, अशी भूमिका राज्य व केंद्र सरकारने मांडली होती. परंतु या राज्यातील १ लाख १० हजार शाळांपैकी जवळपास ४ हजार ५०० शाळांमध्ये शौचालयाची व्यवस्था नाही. त्यामुळे या आर्थिक वर्षामध्ये सदर ४ हजार ५०० शाळांमध्ये शौचालय उपलब्ध करुन देण्यात यावे, अशी मी मागणी करीत आहे.

अध्यक्ष महोदय, कोकण विभाग हा शाळेच्या बाबतीमध्ये अव्वलस्थानी राहिलेला आहे. कोकणातील शिक्षणाची टक्केवारी अतिशय चांगली आहे. ज्या जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या ५ पेक्षा कमी असेल ती शाळा बंद करण्यात यावी, असे शासनाने आदेश दिले होते. उक्त आदेशाची अंमलबजावणी टप्प्या-टप्प्याने सुरु आहे. परंतु शासनाच्या या भूमिकेला माझा स्पष्ट विरोध आहे. कोकणामध्ये एका शाळेपासून दुसरी शाळा किमान ३ ते ४ किलोमीटर अंतरावर आहेत.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

श्री. योगेशदादा कदम.....

अध्यक्ष महोदय, माझा मतदारसंघ हा डोंगरी भागातील आहे. असे असताना डोंगरी भागातील विद्यार्थ्यांनी ३ ते ५ कि.मी. लांब पायी चालत कशा प्रकारे जावयाचे ? म्हणून माझा या भुमिकेला विरोध आहे. जिल्हा परिषदेच्या सर्व शाळा चालू ठेवाव्यात. जिल्हा परिषदेतील शाळांच्या शिक्षणाचा दर्जा कशा प्रकारे वाढेल, यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. मी विधानसभा सदस्य म्हणून पहिल्यांदा निवडून आलो आहे. राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळा बंद होण्यामागील प्रमुख कारण म्हणजे तेथे इंग्रजी भाषेत शिक्षण दिले जात नाही. माझ्या मतदारसंघातील किंवा इतरही ठिकाणी जिल्हा परिषदेच्या शाळेतून विद्यार्थ्यांना काढून त्यांना हायस्कूलमध्ये प्रवेश देण्याची प्रथा आता सुरु झाली आहे. याचे कारण असे की, जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये इंग्रजी माध्यमातून शिक्षण दिले जात नाही. काही शाळा सेमी इंग्लिश आहेत. परंतु त्यांची टक्केवारी कमी आहे.

अध्यक्ष महोदय, माझे इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतचे शिक्षण मराठी भाषेतून झाले आहे. त्यानंतर महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना मला इंग्रजी बोलण्यासाठी अडचण येत होती. असे असतानाही मी इंग्रजी व इतरही भाषा आत्मसात केल्या आहेत. इंग्रजी भाषेवर प्रभूत्व मिळविण्याचा मी प्रयत्न केला आहे. परंतु सर्वच विद्यार्थ्यांना इंग्रजी हा विषय येईलच, असे आपण सांगू शकत नाही. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये इंग्रजी माध्यमातून शिक्षण ठेवले पाहिजे. या निमित्ताने मी एक प्रसंग या सभागृहाला सांगू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, मराठी माणसांच्या न्याय हक्कासाठी लढण्यासाठी शिवसेना प्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेना पक्षाची स्थापना केली होती. त्याच स्व. बाळासाहेब ठाकरे यांचा एक प्रसंग मी येथे सांगू इच्छितो. माझे वडील शिवसेना नेते आहेत. त्यांच्या माध्यमातून माझी अनेकदा स्व. बाळासाहेब ठाकरे यांची भेट होत असे. त्यावेळेस स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी सहज मला एक प्रश्न विचारला होता की, 'तुला मराठी व्यतिरिक्त अन्य कोणत्या भाषा बोलता येतात ?' मी त्यांना सांगितले की, 'मला मराठी, हिंदी, गुजराती, इंग्रजी या भाषा येतात.' त्यावेळेस ते म्हणाले की,

श्री. योगेशदादा कदम.....

तुला फ्रेंच भाषा का येत नाही ? त्यांनी त्यांच्या पद्धतीने मला सांगितले की, उद्या तुला जर एखाद्या फ्रेंच व्यक्तीने समोर येऊन शिवी घातली तर ती तुला समजणारदेखील नाही. तुझ प्रत्येक भाषेवर प्रभुत्व असले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, मला वाटते की, हीच भूमिका राज्य सरकारने स्वीकारली पाहिजे. मी माननीय शिक्षणमंत्री महोदयांना विनंती करतो की, जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये इंग्रजी माध्यमातून शिक्षण देणे सुरु झाले पाहिजे. अन्यथा मराठीचा टक्का, भाषेचा टक्का कमी होत असताना जिल्हा परिषदेच्या शाळा बंद होतील. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी खाजगी शाळेमध्ये शिक्षण घेण्यासाठी कोठून पैसे आणावयाचे ? यावर शिक्षण विभागाने लक्ष द्यावे. या सर्व जिल्हा परिषदेच्या शाळांमधून इंग्रजी शिक्षण सुरु झाले पाहिजे व त्या शाळा टिकल्या पाहिजेत. माननीय शिक्षण मंत्र्यांनी या विषयाचा गांभीर्याने विचार करावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघात दोपोली आणि मंडणगड येथे दोन वर्षापूर्वी आलेल्या चक्रीवादळामुळे अनेक शाळा जमीनदोस्त झाल्या आहेत. मदत व पुनर्वसन विभागाकडून प्रत्येक शाळेला दोन-दोन लाख रुपये दिले गेले. जी शाळा जमीनदोस्त झाली आहे ती दोन लाख रुपयांत कशी उभी राहिल ? जिल्हा परिषदेकडे या शाळांच्या बांधकामासाठी मागणी केली तर सांगितले जाते की, शिक्षण विभागाकडून हा निधी घेण्यात यावा. शिक्षण विभागाकडून सांगण्यात येते की, जिल्हा नियोजन समितीकडून यासाठी निधी घ्यावा. जिल्हा नियोजन समितीकडून सांगण्यात येते की, राज्य सरकारकडून याची मागणी करावी. माझ्या मतदारसंघामध्ये कोविड कालावधीनंतर शाळा सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. असे असताना माझ्या मतदारसंघातील अनेक विद्यार्थी उघड्या जागेवर शिक्षण घेत आहेत. संपूर्ण रत्नागिरी, रायगड जिल्ह्यात ही परिस्थिती आहे. निसर्ग चक्रीवादळामध्ये ज्या ज्या शाळा जमीनदोस्त झाल्या आहेत त्या सर्व शाळांच्या बांधकामासाठी आजच्या पुरवणी मागण्याच्या माध्यमातून तरतूद करावी व त्या शाळा बांधण्यात याव्यात.

श्री. योगेशदादा कदम.....

अध्यक्ष महोदय, मी मत्स्य व्यवसाय विभागाबाबत माझे मत मांडू इच्छितो. कोकणामध्ये कोळी आणि मच्छीमार बांधव मोठ्या प्रमाणात आहेत. शेतकऱ्यांसाठी निधी दिला पाहिजे. शेतकरी आत्महत्या करीत आहेत म्हणून आपण त्यांच्यासोबत सहानुभूती दाखवित आहोत. त्यांच्याकरिता अनेक योजना करुन त्यांना निधी दिला जाते. त्यांना अनेक गोष्टीमध्ये शिथिलता दिली जाते. वीज तोडणीवर बंदी आणावयाची, त्यांची थकबाकी घ्यावयाची नाही. असे अनेक विषय मार्गी लावण्यात आले आहेत. शेतकऱ्यांकरिता ३३ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी दिली आहे. २३ हजार ८८८ कोटी रुपये प्रोत्साहनपर अनुदानाच्या माध्यमातून प्रत्येक शेतकऱ्यांना ५० हजार रुपये दिले जाणार आहेत. भूविकास बँकामार्फत ९६४ कोटी रुपयांची कर्जमाफी शेतकऱ्यांना दिली आहे. मच्छीमारांनी एनसीडीसीचे तीन ते चार वर्षापूर्वी कर्ज घेतले आहे.

यानंतर श्री. चौधरी...

असुधारित प्रत

श्री.योगेशदादा कदम.....

केंद्र व राज्य सरकारने हे हप्ते द्यायचे आहेत. परंतु सांगायला खेद वाटतो की, राज्य सरकारचा हिस्सा मच्छिमारांना मिळूनही केंद्र सरकारकडून मात्र अद्यापपर्यंत पैसे मिळालेले नाहीत. काही प्रमाणात आले असले तरीही १०० टक्के न आल्यामुळे मच्छिमारांनी कर्ज घेऊन बोटी बांधण्यास सुरुवात केली. त्यांना २५ टक्के पैसे मिळाले. त्यातून केवळ अर्धी बोट तयार होऊ शकली परंतु उर्वरित बोट बांधण्यासाठी पाच-सहा वर्षे निधीच मिळालेला नाही. त्यामुळे बोटीचे काम पूर्ण करण्यासाठी नाईलाजाने मच्छिमारांना घरावर कर्ज काढावे लागले, दागिने गहाण ठेवावे लागले. सहा वर्षे होऊनही त्यांना आपण एक रुपयाही देऊ शकलेलो नाहीत. या मच्छिमारांची मागणी किती आहे हे पाहिले तर केवळ ४५० ते ५०० कोटी रुपयांची मागणी आहे. एका बाजूला शेतकऱ्यांना वर्षभरामध्ये पन्नास-पन्नास हजार कोटी रुपयांची मदत केली जात असताना दुसऱ्या बाजूला मच्छिमारांसाठी केवळ ४५० ते ५०० कोटी रुपये देखील निधी उपलब्ध करुन दिला जात नाही. यापुढे जाऊन सांगायचे झाले तर हा निधी एकाच वेळी देखील देण्याची गरज नाही तर हप्त्यांमध्ये द्यायचा आहे. या ठिकाणी माननीय मत्स्यविकास राज्यमंत्री उपस्थित आहेत. माझी त्यांना विनंती आहे की, आपण यासंदर्भात त्वरित माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करावी. मी देखील त्यांच्याकडे याबाबत मागणी करणार आहे. तसेच माननीय उप मुख्यमंत्र्यांना देखील माझी विनंती आहे की, आपण मच्छिमारांचे प्रश्न मार्गी लावावेत.

अध्यक्ष महोदय, मच्छिमारांचा डिझेल परताव्याचा देखील प्रश्न आहे. सरकारने जाहीर केले की, आम्ही तुम्हाला डिझेल परतावा देऊ. परंतु पाच-सहा वर्षे उलटून देखील अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. यासाठी केवळ ३०० कोटी रुपये आवश्यक आहेत. संपूर्ण राज्यातील मच्छिमारांना आपण ३०० कोटी रुपये देऊ शकत नाहीत का, हा या निमित्ताने माझा प्रश्न आहे. या विभागाचा सुमारे तीन-चार हजार कोटी रुपयांचा अर्थसंकल्प असतानाही मच्छिमारांवर अशा प्रकारे अन्याय होत असेल तर त्याचे निवारण होणे अत्यंत गरजेचे आहे.

श्री.योगेशदादा कदम.....

अध्यक्ष महोदय, राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचे हर्णे हे बंदर माझ्या मतदारसंघामध्ये आहे. हजारो मच्छिमार मासेमारी करुन आल्यानंतर आवश्यक मूलभूत सुविधांची येथे अतिशय निकड आहे. मासेमारी करुन आल्यानंतर कोळी बांधवांना आपली बोट उभी करण्यासाठी देखील तेथे बंदर उपलब्ध नाही. मोठया बोटीतून लहान बोटीमध्ये माल टाकून किनाऱ्यावर आणावा लागतो व तेथून बैलगाडीमध्ये टाकून बाजारापर्यंत न्यावा लागतो. तेथे चांगले बंदर नसल्यामुळे ही परिस्थिती आहे. तेथे बंदर बांधण्यासाठीचा डी.पी.आर. तयार आहे. त्यामुळे माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री व मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, महाविकास आघाडी सरकारने महाराष्ट्र राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचे बंदर पुढील एका वर्षामध्ये बांधून मच्छिमारांचा प्रश्न सोडवावा.

अध्यक्ष महोदय, माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांचे मी अभिनंदन करतो. कारण हिंगोली येथे हळद पिकावरील संशोधन केंद्र स्थापन करण्यासाठी त्यांनी १०० कोटी रुपये निधीची तरतूद केली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी सरळ आणि सोपी भूमिका मांडलेली आहे की, पिकेल ते विकेल. माझ्या मतदारसंघातील दापोली येथे कोकण कृषी विद्यापीठ आहे. या विद्यापिठाने काही संशोधने केली आहेत. परंतु माझी अशी तक्रार आहे की, विद्यापिठामार्फत केलेले संशोधन विद्यापिठाच्या बाहेर कधी पडतच नाही. अनेक सन्माननीय सदस्यांची देखील हीच तक्रार असेल. विद्यापिठाने केलेल्या संशोधनाचा उपयोग शेतकऱ्यांना कसा होईल यासाठी प्रयत्न झाल्याचे मी आजपर्यंत कधी पाहिलेले नाही. मी त्या विद्यापिठामध्ये ई.सी. सदस्य म्हणून काम करीत आहे. आमच्या विद्यापिठाने बांबू शेतीसंबंधीचे संशोधन करुन यातून शेतकऱ्यांचे उत्पादन कशा प्रकारे वाढेल व शेतकरी कसा सक्षम होईल याचा अभ्यास केला आहे. आपल्याला आश्चर्य वाटेल की, आपल्या देशामध्ये सुमारे १५०० टन अगरबत्ती दररोज वापरली जाते. या अगरबत्तीसाठी आवश्यक काडया चीन व इतर देशांमधून आयात केल्या जातात. सुमारे साडे चार लाख टन अगरबत्त्यांच्या काडया आपण आयात करतो.

श्री.योगेशदादा कदम.....

आपल्याकडे केवळ ७५० टन काडया तयार केल्या जातात. कोकणामध्ये बांबू शेतीला प्रचंड संधी आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, ज्याप्रमाणे आपण हळदीच्या पिकाला प्रोत्साहन देण्यासाठी व संशोधन करण्यासाठी १०० कोटी रुपये निधी उपलब्ध करुन दिला आहे त्याच धर्तीवर कृषी विभागाने देखील बांबू शेतीवर लक्ष केंद्रीत करुन त्याच्या संशोधनासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा व शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी माझी या निमित्ताने मागणी आहे. आपण मला या चर्चेमध्ये सहभागी होण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. चेतन तुपे (हडपसर) : अध्यक्ष महोदय, मी सन २०२२-२३ च्या राज्याच्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी व त्यांना पाठिंबा देण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, आज कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, वित्त विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग अशा ६ विभागांवर चर्चा आहे. परंतु अनेक सन्माननीय सदस्यांना बोलायचे आहे. त्यामुळे सर्वांचा मान राखून मी जास्त वेळ न घेता काही ठराविक विभागांवर या ठिकाणी चर्चा करणार आहे.

अध्यक्ष महोदय, आज खरे तर छत्रपती शिवाजी महाराजांची तिथीनुसार जयंती आहे. आम्ही त्यांच्या या आवारात असलेल्या सिंहासनाधिष्टीत पुतळ्याला जाऊन वंदन केले. त्यांना मानाचा मुजरा केला. याबाबत आज खरंच भाग्याचा क्षण आहे. मी माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री आणि महाविकास आघाडी सरकारचे अभिनंदन करतो की, त्यांनी छत्रपतींचे गडकिल्ले आणि गनिमीकावा ही युध्दपध्दती यांचा जागतिक वारसा म्हणून घोषित व्हावे याकरिता युनोस्कोमध्ये प्रस्ताव पाठविला. प्रत्येक भारतीयाची मान उंचावेल असा हा प्रस्ताव आहे. कारण आज जगामध्ये छत्रपतींच्या युध्द कलेची कुठेही तोड नाही. त्यामुळे मी महाविकास आघाडी सरकारने मनापासून अभिनंदन करतो. त्याचबरोबर गडकिल्ल्यांच्या विकासासाठी मोठा निधी शासनाने दिला आहे. तसेच तीर्थक्षेत्र विकासासाठी सुध्दा मोठा निधी दिला आहे. त्यामुळे निश्चितपण पर्यटनाला यामधून चालना मिळणार आहे. आमच्या पुणे जिल्ह्यात स्वराज्य रक्षक संभाजी महाराज यांचे स्मारक उभारण्यासाठी शासनाने २५० कोटी रुपयांचा निधी दिला त्याबद्दल मी माननीय उपमुख्यमंत्री यांचे अभिनंदन करतो. तसेच छत्रपती संभाजी महाराजांच्या नावाने शौर्य पुरस्कार देण्याचा अभिनव उपक्रम राज्य सरकारने सुरू केला आहे आणि तो उपक्रम निश्चितपणे आदर्श ठरणार आहे, याची मला खात्री आहे.

श्री. चेतन तुपे...

अध्यक्ष महोदय, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून फुले दाम्पत्याच्या फुलेवाडा या स्मारकाच्या विस्तारीकरणासाठी १०० कोटी रुपयांचा निधी दिलेला आहे, त्याबद्दल मी शासनाचे मनापासून अभिनंदन करतो. परंतु या सर्व गोष्टी होत असताना पुणे शहरात आणि महाराष्ट्रात अनेक वस्तू संग्रहालये आहेत. पुण्यामध्ये महात्मा फुले वस्तू संग्रहालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संग्रहालय, राजा दिनकर केळकर संग्रहालय, पेशवे संग्रहालय अशी अनेक वस्तू संग्रहालये आहेत आणि दरवर्षी त्या ठिकाणी सुमारे ५० ते ६० हजार पर्यटक भेट देत असतात. परंतु कोरोनाच्या संकटामुळे गेली २ वर्षे ही सर्व वस्तू संग्रहालये बंद होती. शासन त्यांना निश्चित अनुदान देते. परंतु या काळात त्यांची अडचण झाली आहे. तेथील वस्तू दुरुस्त करण्यासाठी किंवा मेन्टेन्ड करण्यासाठी लागणाऱ्या निधीबाबत अडचण निर्माण झाली आहे. मंत्री महोदयांनी याकडे लक्ष दिले आणि थोडा निधी या वस्तू संग्रहालयांना मिळाला तर गेल्या २ वर्षात त्यांची जी तारांबळ उडाली किंवा गैरसोय झाली त्यातून त्यांना निश्चितपणे मार्ग काढता येईल.

अध्यक्ष महोदय, खरं म्हणजे शासनाने गडकिल्ले आणि पर्यटनासाठी मोठी तरतूद केल्याचे मी सांगितले आहे. एका बाजूला महाविकास आघाडी सरकार राज्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी गडकिल्ल्यांचा विकास करीत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या युध्द पध्दतीला आणि गडकिल्ल्यांना जागतिक वारसा घोषित करण्यास सांगत आहे. मात्र काही वर्षापूर्वी याच गडकिल्ल्यांवर तलवारीच्या खणखणाटाऐवजी घुंगरांचा छणछणाट झाला पाहिजे, असा प्रकारचा प्रस्ताव मांडला गेला होता. हे प्रस्ताव मांडणारे एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला महाराजांचे असामान्य शौर्य जगापुढे यावे, हा जागतिक वारसा व्हावा, असे सांगणारे राज्यातील महाविकास आघाडी सरकार आहे. विचारांमधील फरक आपण लक्षात घ्यावा. छत्रपतींचा फोटो फक्त फायद्यासाठी आणि मतांसाठीच करणार आहात काय, हा विचार नाही तर छत्रपती आदर्श आहेत आणि छत्रपतींचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन

श्री. चेतन तुपे...

महाविकास आघाडी सरकारने हा एक नवीन उपक्रम म्हणजे जागतिक वारसा निर्माण करण्याच्या प्रयत्नाबद्दल सरकारचे जेवढे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. चेतन तुपे....

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत अनेक उपक्रम राबविले जातात. भूपृष्ठ वाहतूक, जल वाहतूक किंवा हवाई वाहतूक असेल तर त्या माध्यमातून अनेक ठिकाणी कामे करण्यात आली आहेत. याबाबत बोलत असताना मी वेळेअभावी माझ्या मतदारंसघापुरते आणि जिल्ह्यापुरते बोलणार आहे. पुण्याच्या रिंगरोडसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला आहे. तसेच त्याच्या भूसंपादनाचे काम सुरु करण्यात येणार आहे. त्यामुळे निश्चितपणे पुणे जिल्ह्याच्या भूसंपादनाला वेग आल्यामुळे आजुबाजुच्या सर्व लोकांचा फायदा होऊन दळणवळण सुरळित होणार आहे. तसेच शेतकऱ्यांना, व्यापाऱ्यांना आणि उद्योगांना त्याचा फायदा होणार आहे. यामुळे निश्चितच संपूर्ण महाराष्ट्रामध्ये चांगल्या प्रकारची दळणवळणची साधने उपलब्ध करुन देता येतील. दुसरा विषय हा पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वेचा आहे. हा मार्ग किंवा एलिवेटेड रेल्वे माझ्या हडपसर मतदारसंघातून जातो. त्यामुळे निश्चितच त्या भागात रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होणार आहेत. शेतकऱ्यांचा शेतीमाल हा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी अवघ्या काही तासात पोहोचणार आहे. अगदी तरुण उद्योजक सुद्धा या ठिकाणाहून नाशिकपर्यंत किंवा तिथून पुण्यापर्यंत वेळेत येणार आहेत.

अध्यक्ष महोदय, माझा पुढचा विषय हा हडपसर येथील मेट्रोचा आहे. काही वर्षापूर्वी पुण्याच्या मेट्रोचे डीपीआर झाले परंतु अत्यंत पुणे शहराच्या बाबतीत अत्यंत अपुरे डीपीआर करण्यात आले.खरे म्हणजे माझ्या मतदारसंघात दोन भाग येतात त्या ठिकाणाहून देखील मेट्रो जायला पाहिजे होती. स्वारगेट ते हडपसर आणि स्वारगेट ते कात्रज असे दोन मेट्रो मार्ग होते. परंतु मागच्या डीपीआरमध्ये हे दोन्ही विषय टाळण्यात आले. त्यामुळे माननीय वित्त मंत्री श्री. अजित पवार यांचे मी विशेष अभिनंदन करेल की, त्यांनी हडपसरकरांच्या व्यथा जाणून यावेळी स्वारगेट ते कात्रज या मेट्रो मार्गासाठी निधी देऊन हडपसरचा डीपीआर तयार करायला लावला आहे. पूर्वीचा डीपीआर हा शिवाजी नगर येथून हडपसर येथे मेट्रो होती. परंतु त्यामध्ये फुटफॉलच नव्हता. त्यामुळे सर्व प्रवासी वाहतूक स्वारगेट मार्गे चालत होती. या

श्री. चेतन तुपे....

प्रकल्पाला गती देण्यासाठी माननीय वित्त मंत्री श्री. अजित पवार यांनी जे प्रयत्न केलेले आहेत त्यामुळे हडपसरची जनता निश्चितच सुखावणार आहे. हा मार्ग सोलापूर हायवे आहे. याबाबत माझी एक सूचना किंवा विनंती आहे, त्यावर जर आपण दूमजली मेट्रो मार्गिका केली तर खालच्या रस्त्यावरून, भूपृष्ठावरुन जी स्थानिक वाहतूक होते ती सुरु राहिल. पहिल्या मजल्यावरुन ज्यांना सोलापूरला निघून जायचे ते जातील त्याला टोल जरी लावला तरी त्या माध्यमातून उत्पन्न मिळेल. दुसऱ्या मजल्यावरून मेट्रो नेली तर वाहतुकीचा congestion दूर होईल आणि मेट्रो सुद्धा सुरळितपणे सुरु राहिल. यामुळे माझ्या या सूचनेचा निश्चित विचार होईल अशी मला खात्री आहे. त्याचप्रमाणे हडपसर ते खराडी ही सुद्धा मेट्रोची नवीन लाईन होत आहे. हे सर्व डीपीआर मध्ये करीत असताना आम्हीमहामेट्रोला आणि आपल्यालाही विनंती केलेली आहे त्या विनंतीचा आपण निश्चित विचार करावा.

अध्यक्ष महोदय, मला पुढे कात्रज-कोंडवाच्या रुंदीकरणावर बोलायचे आहे. हा बाह्यवळण मार्ग अनेक वर्षापासून अडकलेला आहे. याच्या भूसंपादनासाठी पैसेच धरण्यात आलेले नाहीत. त्यामुळे लोक जमिनीचा ताबा देत नाहीत म्हणूनच हा रोड पुढे सरकत नाही. माझी अशी विनंती आहे की, पुणे महानगरपालिकेने या भूसंपादनाच्या कारवाया लवकर करण्यासाठी शासनाने यामध्ये लक्ष घालावे, हस्तक्षेप करावा आणि तेथील नागरिकांची वाहतूक कोंडीतून सुटका करावी.

अध्यक्ष महोदय, शेवटच्या एका विभागावर २ मिनिट बोलून मी थांबणार आहे. खरे म्हणजे आजच आपण उद्योगासाठी अभय योजनेचे विधेयक मांडलेले आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. कारण त्यामुळे अनेक लहान व्यापाऱ्यांना त्याचा फायदा होणार आहे. अर्थसंकल्प हा राज्याच्या धोरणाचा खराखुरा चेहरा असतो, प्राधान्यक्रमाचा अर्थ असतो त्यामुळे अर्थसंकल्पातील तरतुदी या राज्यातील

श्री. चेतन तुपे....

दिनदुबळया घटकांच्या जीवनावर काय प्रभाव टाकतातयावर सभागृहात चर्चा व्हावी, अशी अपेक्षा असते. परंतु हे होत असताना विरोधक प्रत्येकवेळी त्याच्या विरोधात बोलत असतात आणि सत्ताधारी त्याचे समर्थन करीत असतात.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

श्री. चेतन तुपे.....

विरोधकांचे मी समजू शकतो. पुणे महानगरपालिकेमध्ये मी विरोधी पक्ष नेता म्हणून काम केलेले आहे. कितीही चांगले काम केले तरी काही तरी शोधायचे व त्यावर बोलायचे हे त्यांना करावेच लागते. त्यामध्ये वावगे काही नाही. विरोधक त्यांचे काम चांगल्या प्रकारे करीत आहेत. त्यांनी पुढील ५-२५ वर्षे असेच विरोधी पक्षाचे काम करावे, अशा माझ्या त्यांना शुभेच्छा आहेत.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी अर्थसंकल्पावर काही चर्चा केली गेली, खर्चावर चर्चा केली गेली. ४ लाख ८४ हजार, ९० कोटी ६७ लाख एवढया रकमेचा मागील अर्थसंकल्प होता. प्रत्यक्ष खर्च ७.४८ टक्क्याने कमी झाला असे काही जणांनी सदनाच्या निदर्शनास आणून दिले. याला आर्थिक बेशिस्त आहे, असे सांगितले गेले. आता किती शिस्त गेल्या ५ वर्षात होती ते एकदा आपण बघू या. सन २०१५-१६ मध्ये अर्थसंकल्पीय तरतूद २ लाख ४७ हजार ३२४ कोटी रुपये असून खर्च २ लाख २९ हजार ५८४ कोटी रु. होता. म्हणजेच एकूण तरतुदीपेक्षा प्रत्यक्ष खर्च १७ हजार ७४० कोटी रुपयांनी कमी झालेला आहे. ९ टक्के खर्च कमी झालेला आहे. त्यावेळी कोणतेही संकट नव्हेते, कोरोना नव्हता, कोणतीही अडचण नव्हती. सन २०१६-१७ मध्ये तरतूद २ लाख ८२ हजार ४५४ कोटी रुपये केली असून , खर्च २ लाख ५६ हजार ९४२ कोटी रु. म्हणजे १० टक्के कमी झालेला आहे. सन २०१७-१८ ३ लाख २३ हजार ६५२ कोटी रु तरतूद होती, खर्च २ लाख ८६ हजार ७८६ कोटी रु. खर्च म्हणजे १२ टक्के कमी झालेला आहे. हाच कित्ता या पुढील वर्षी गिरवला गेला. सन २०१८-१९ मध्ये ३ लाख ७३ हजार २३४ कोटी रु. खर्च ३ लाख २८ हजार ७३२ कोटी रु, म्हणजे १२ टक्के खर्च कमी झाला. सन २०१९-२० मध्ये ४ लाख १६ हजार ९२१ कोटी रुपयांची तरतूद असून ३ लाख ७८ हजार ६००कोटी रु खर्च झाला. म्हणजेच १० टक्के कमी खर्च झाला. नशीब हे सरकार आठच महिने होते. वर्षभर चालले असते तर १५ टक्के कमी खर्च झाला असता. याला म्हणतात शिस्त. विनोद

श्री. चेतन तुपे.....

किती करावेत याला देखील काही तरी सुमार असावा. आपण १२ टक्के कमी खर्च करतो व साडे ७ टक्के कमी खर्च झाला तर बेशिस्त म्हणायचे. आपली १२ टक्कें कमी खर्चाची शिस्त आहे काय ?

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी सर्वांना माहीत आहे. आम्ही अनेक वर्षे समाजकारणात,राजकारणात काम केले असून लोकांनी आम्हाला निवडून दिलेले आहे. बजेटमध्ये विभागवार पैसे दिले जातात. असे सांगितले गेले की, अमुक राजकीय पक्षाला अमुक निधी दिला गेला. राष्ट्रवादी, काँग्रेस व शिवसेनेला एवढा निधी दिला. मी लक्षात आणून देऊ इच्छितो की, तेव्हा काय परिस्थिती होती. सन २०१८-१९ मध्ये एकूण बजेट ३६५ लक्ष ०१ कोटी रुपये होते. भाजपकडे जे विभाग होते त्यांना एकूण बजेटच्या ९९ .३९ टक्के निधी दिला गेला. शिवसेनेकडील विभागांना २ हजार २२८ कोटी रुपये देण्यात आले. म्हणजे ०.६१ टक्के निधी दिला गेला. महाराष्ट्राच्या जनतेला चुकीची माहिती मिळू नये. रेकॉर्डवर चुकीचे जाता कामा नये. या करिता मी हे सांगत आहे. या पक्षाला एवढे टक्के दिले, असे होऊ नये. हा विषय विभागवार असतो. सदनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, हा निधी पक्षाला मिळत नाही. शिवसेनेला किती, राष्ट्रवादीला किती असे नसते. सरकारमध्ये जे विभाग असतात त्यांना हा निधी मिळतो.

यानंतर श्रीमती गिरप...

श्री.चेतन तुपे ...

अध्यक्ष महोदय, सन २०१९-२०२० मध्ये परत एकदा बीजेपीने ९९.४० टक्के इतके पैसे घेतले. शिवसेनेच्या खात्यांना २४३७ कोटी म्हणजे ०.७ टक्के दिले. कसलीही अडचण नाही, कोठेही काही नाही तरी देखील या पध्दतीचे काम, या पध्दतीची शिस्त .... (अडथळा)... याकरिताच तुम्हाला सोडून ते इकडे बसले. ते फसले नाहीत. ते तुम्हाला सोडून इकडे बसले. तुम्ही अर्धा टक्का देत होता म्हणून त्यांनी तुम्हाला सोडले. तुमचे २५ चे स्वप्न आहे ना, ते देखील आता ते पूर्ण होऊ देणार नाहीत.

तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण): सन्माननीय सदस्य आपण आपल्या भाषणाचा समारोप करावा.

श्री.चेतन तुपे : सन्माननीय सदस्य श्री.सागर साहेब आपले २५ चे स्वप्न पूर्ण होणार नाही. आपण काळजी करु नका.

अध्यक्ष महोदय, मी माननीय श्री.अजित पवार यांचे विशेष अभिनंदन करतो. कोरोना काळ असताना देखील, महामारीमुळे अडचण असताना देखील कुठलीही करवाढ न करता, महाराष्ट्राच्या जनतेवर कसलाही बोजा न लागता सर्वांना चांगल्या पध्दतीचा अर्थसंकल्प त्यांनी दिलेला आहे.

अध्यक्ष महोदय, मी मराठी भाषा समितीचा समिती प्रमुख आहे. त्यामुळे जाता जाता मी एक अभिनंदन करणार आहे. मराठी भाषेच्या विकास व संवर्धनासाठी १०० कोटी रुपयांचे मराठी भाषा भवन बांधण्यासाठी निधी दिल्याबद्दल मी माननीय श्री.अजित पवार यांचे मनापासून अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याकरिता संधी दिली, त्याबद्दल मी आपले आभार मानतो. धन्यवाद.

.....

माहितीचा मुद्दा

श्री.राम कदम : अध्यक्ष महोदय, या क्षणाला या ठिकाणी सभागृहाचे कामकाज सुरु आहे आणि माझ्या घाटकोपर मतदारसंघामध्ये आता जो नवीन एलबीएस रोड तयार झाला आहे, १२ वर्षांच्या मेहनतीनंतर मी ज्या रस्त्याचे रुंदीकरण करुन घेतले, तो तयार झालेला रस्ता कोणतीही परवानगी न घेता महापालिकेचे सर्व कर्मचारी आहेत असे भासवून त्या ठिकाणी ऑप्टिकल फायबर टाकण्याचे काम सुरु आहे.

अध्यक्ष महोदय, सभागृहात माननीय श्री.आदित्य ठाकरे, माननीय पालक मंत्री महोदय तसेच माननीय श्री.अजित पवार उपस्थित आहेत. मी त्यांना हे सांगू इच्छितो की, हा विषय केवळ मुंबई महानगरपालिकेचा नाही. पूर्ण महाराष्ट्रभरामध्ये ज्या मेट्रो सिटिज आहेत त्या ठिकाणी हे ऑप्टिकल फायबरवाले सर्रासपणे अशा पध्दतीने डिव्हायडर उभे करतात की, पोलिसांनाही असे वाटते की, हे सरकारी काम सुरु आहे. महापालिकेला देखील असे वाटते की, सरकारी काम सुरु आहे.

अध्यक्ष महोदय, त्यातील काही अधिकारी प्रामाणिक असतील. परंतु, बरेचसे अधिकारी संगनमताने... रातोरात त्या ठिकाणी रस्ता तोडण्याचे काम सुरु आहे. रस्ता खोदून त्या ठिकाणी अनऑथराईज ऑप्टिकल फायबर केबल टाकली. परंतु, तो रस्ता बनवणार कोण? आता हा घाटकोपरचा एलबीएस रोड महानगरपालिकेने बनवला. त्यानंतर तो एका आठवड्यात पूर्ण तोडला.

अध्यक्ष महोदय, मी स्वत: काल त्या ठिकाणी गेलो. श्री.कोकाटे नावाचे घाटकोपर येथील चिरागनगर पोलीस स्टेशनचे प्रामाणिक अधिकारी तेथे आले. आम्ही त्यांच्याकडे परवानगी आहे का असे विचारले. परंतु, त्या कॉंट्रॅक्टरकडे कुठलीही परवानगी नव्हती. आज पुन्हा जवळपास दीड-दोन कि.मी. चा पट्टा त्यांनी तोडला. आज पुन्हा त्यांनी कल्पतरु सोसायटीच्या समोर आर सिटी मॉल आहे, त्या ठिकाणी पूर्ण रस्ता तोडला आहे. त्या आधी महिनाभरापूर्वी घाटकोपर विक्रोळी पार्कसाईटला आंनदगड नाक्यापासून ते बंबखान्यापर्यंतचा रस्ता तोडला. त्याला कुठलीही परवानगी नाही.

श्री.राम कदम ....

अध्यक्ष महोदय, माझी आपल्याला विनंती आहे, हा प्रश्न केवळ मुंबईचा नाही. मुंबई, पुणे, औरंगाबाद या सर्व ठिकाणी अशा पध्दतीने अनऑथॉराईज ऑप्टिकल फायबर केबल टाकण्याच्या नावाखाली रस्ते तोडले जात आहेत. कुठलीही परवानगी घेतली जात नाही. महसूल बुडविला जात आहे. अधिवेशन सुरु आहे आणि अशा पध्दतीचे कायदेबाह्य काम सुरु आहे. आपण निर्देश देऊन सरकारकडून याबाबतीतील सर्व माहिती मागविण्याची आवश्यकता आहे. हे जे चुकीचे प्रकार चालले आहेत ते तातडीने थांबविणे व जे करीत आहेत त्यांच्यावर कारवाई करणे अपेक्षित आहे.

.....

(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.संजय शिरसाट)

असुधारित प्रत

पृ. शी. : अनुदानाकरिता मागण्या

मु. शी.: सन२०२२-२०२३च्या अनुदानाकरिता मागण्या:

१) कृषी, पशुसंवर्धन , दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

३) वित्त विभाग

४) सार्वजनिक बांधकाम विभाग

५) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

६) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

(चर्चा पुढे सुरु ...

श्री.सुभाष देशमुख (सोलापूर) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी आदरणीय अर्थ मंत्री श्री.अजित पवार यांच्याकडेच पहिली मागणी करणार आहे. अनेक विषय आहेत. हा विषय जरी आपल्या विभागाचा नसला तरी आपण पैसे देणाऱ्यांमध्ये आहात. आपण पंचसूत्री कार्यक्रम जाहीर केलेला आहे. त्यामध्ये पाटबंधारे, कृषी सिंचन खूप मोठ्या प्रमाणात घेण्याचा विचार आहे.

यानंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.सुभाष देशमुख....

माझ्या मतदारसंघातील वडापूर येथील बॅरेजला तांत्रिक व प्रशासकीय मान्यता मिळाली असून त्याकरिता विशेष निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. तसेच सोलापूर दक्षिण भीमा व सीना नदीच्या जोड कालव्याच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, सोलापूर शहरामध्ये २ उड्डाण पूल मंजूर करण्यात आले आहेत, त्याच्या भूसंपादनाची जबाबदारी महानगरपालिकेची असून निधी अभावी ते भूसंपादन करु शकत नाही. सोलापूर शहरात कंत्राटदाराला टीडीआर द्यावयाचा म्हटले तरी त्यास किंमत नाही. याकरिता उक्त उड्डाण पूलाच्या भूसंपादनासाठी राज्य सरकारने निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, अनेक नगरपालिका व महानगरपालिकांची जकात बंद झाली आहे. त्यामुळे राज्य सरकारकडून त्यांना निधी मिळणे अपेक्षित आहे. मागील २ वर्षांपासून सोलापूर महानगरपालिकेला खूप तुटपुंजा निधी मिळाला आहे.

अध्यक्ष महोदय, उजणी ते सोलापूर या नवीन पाईप लाईनसाठी एनटीपीसीने २५० कोटी रुपये निधी दिला असून उर्वरित निधी राज्य सरकारने दिला तर सोलापूर शहरातील नागरिकांना शुद्ध पाणी मिळू शकेल. उक्त कामासाठी निधी देण्यात येईल, अशी मला अपेक्षा आहे.

अध्यक्ष महोदय, सहकार विभागांतर्गत असलेल्या विविध कार्यकारी संस्था कोअर बँकींगद्वारे जिल्हा मध्यवर्ती बँकेशी जोडण्याचा सरकारचा संकल्प आहे. ही खूप चांगली संकल्पना राबविण्यात येणार असल्याने मी महाविकास आघाडी सरकारचे मनापासून अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, सहकार मंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. सहकाराशिवाय गाव, जिल्हा, राज्य व देश समृद्ध होत नाही. सहकारच देशाला, राज्याला व गावांना तारु शकणार आहे. त्यातील महत्त्वाची संस्था म्हणजे विविध कार्यकारी संस्था आहेत. या सरकारचा कोअर बँकींगचा निर्णय चांगला आहे.

श्री.सुभाष देशमुख....

अध्यक्ष महोदय, यासंदर्भात मी एक विनंती करु इच्छित आहे. विविध कार्यकारी संस्थेचा सभासद हा नियमानुसार त्या गावातील १० गुंठे जमीनधारक असला पाहिजे. परंतु राज्यातील सर्व सभासद हे स्थानिक शेतकरी सभासद नसून बाहेर गावातील सभासद आहेत, त्यांच्या नावावर त्या गावात शेती नाही, असे सभासद आहेत. माझी आग्रही विनंती आहे. आपण या प्रकरणी विशेष लक्ष घालावे. उक्त संस्थेचा सभासद हा त्या गावातील १० गुंठे जमीनधारक असावा ही बाब बंधनकारक केली पाहिजे. तसेच त्यांना सभासद वर्गणी न भरता सभासद करुन घेण्याच्या सूचना देण्यात याव्यात. आजही विविध कार्यकारी संस्थांचे सभासद संबंधित गावातील नाहीत. विविध कार्यकारी सोसायटीमधूनच जिल्हा मध्यवर्ती बँक, कृषि उत्पन्न बाजार समिती, खरेदी विक्री संघ यांच्या प्रतिनिधींची निवड करता येते. ही मूळ व्यवस्था ठीक नसेल तर पुढील सर्व व्यवस्था चुकीची होते. आपल्या मनामध्ये सहकाराविषय खरोखर तळमळ असेल तर विविध कार्यकारी संस्थांमध्ये सुधारणा कराल व त्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय,विविध कार्यकारी संस्थांच्या निवडणुकीची प्रक्रिया मागील ६ महिन्यांपासून सुरु आहे. त्यासाठी मतदार यादीची नोंदणी सुरु असताना ए.आर. यांना विनंती केली होती की, आपण मतदार यादी करताना ती तपासून घ्यावी. नवीन सभासद होत असेल तर तो त्या गावातील खातेदार आहे काय, हे तपासून घ्यावे. ज्या गावामध्ये दोन सोसायट्या असतील तर त्यामधील एकाच सोसायटीचा सभासद होता येते. परंतु दोन्ही सोसायट्यांमध्ये काही लोक सभासद आहेत. अशा खातेदारांचे सभासदत्व रद्द केले पाहिजे. मी याबाबत वारंवार आमच्या भागातील ए.आर. यांना सांगितले आहे. परंतु ते म्हणतात की, आम्हाला आदेश आहेत की जसे आहे तसे करुन घ्या. सदरहू आदेश कोणाचे आहेत, मला माहिती नाही.

यानंतर श्री.तेलंग...

श्री.सुभाष देशमुख.....

परंतु आपण नियमानुसार कार्यवाही करावी, अशी माझी आग्रहाची विनंती आहे. एक नमुना म्हणून का होईना, माझ्या मतदारसंघातील मागील ६ महिन्यातील विविध कार्यकारी सोसायटीच्या सर्व सभासदांची नोंदणी तपासून घेण्यात यावी, अशी माझी विनंती आहे. यामध्ये चुकीची कार्यवाही केली जात असेल तर संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे अनुदान देण्याची या अर्थसंकल्पामध्ये घोषणा केली आहे. उक्त घोषणेनुसार तत्काळ पात्र शेतकऱ्यांना अनुदानाचे वाटप करण्यात यावे.

अध्यक्ष महोदय, कृषी उत्पन्न बाजार समित्यांसाठी शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या माध्यमातून हमीभावाने शेतकऱ्यांचा माल खरेदी केला जातो. परंतु या प्रक्रियेस फार उशीर होत आहे. शेतकऱ्यांच्या मालाचे उत्पादन होणारा कालावधी व हमीभावाने खरेदी करण्याचा कालावधी यामधील कालवधी जास्त असतो. कापणी झाल्याबरोबर शेतकरी तो माल कवडीमोल भावाने विकतो. कारण त्यांना बँकेचे, सावकारांचे कर्ज फडायचे असते. या सर्व बाबींचा फायदा घेऊन व्यापारी लोक अतिशय कमी दराने शेतकऱ्यांचा माल खरेदी करतात. जेव्हा खरेदी केंद्र सुरु झाल्यानंतर तोच माल हमीभावाने शासनाला विकला जातो. त्यामुळे शेतमाल तारण योजना बाजार समितीने राबवावी, असे शासनाने आदेश दिले होते. ती योजना केवळ ६ टक्के व्याजदराने केली होती. परंतु ही योजना मागील दोन वर्षांपासून बंद आहे. त्यामुळे सदर योजना तत्काळ पुन्हा सुरु करावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांना कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये मतदानाचा अधिकार दिला होता, तो अधिकार शासनाने का काढून घेतला हे मला माहिती नाही. सदर अधिकार कमी करताना शासनाने काही कारणे सांगितलेली आहेत. काही कृषी उत्पन्न बाजार समित्या आर्थिकदृट्या कमकुवत आहेत, त्यामुळे त्यांना निवडणुकीचा खर्च परवडत नाही. मला असे वाटते की, निवडणुकीसाठी या राज्यातील अनेक

श्री.सुभाष देशमुख.....

जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती व पंचायत समित्या कमकुवत आहेत. निवडणुकीचा खर्च परवडत नाही म्हणून निवडणुका घेत नसतील तर ही गंभीर बाब आहे. या शासनाने मतदानाचा अधिकार काढून शेतकऱ्यांवर का अन्याय करीत आहे, हे मला समजत नाही. कृषी बाजार समित्यांच्या निवडणुकीमध्ये शेतकऱ्यांना मतदान करण्याचा पुन्हा अधिकार देण्यात यावा, अशी माझी विनंती आहे. कारण शेतकऱ्यांचाच माल कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विकला जातो. त्यामुळे याबाबत शासनाने विचार करावा, अशी मी पुनश्च एकदा विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, वस्त्रोद्योग विभागाला देण्यात येणारे विजेचे अनुदान शासनाने बंद केलेले आहे. सदर अनुदान पुन्हा देण्यात यावे, अशी मी विनंती करतो. राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर गारमेंट व्यवसाय केला जातो. त्यामुळे या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती देखील होत आहे. या व्यवसायास प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे. कोरोनामुळे मागील दोन वर्षांपासून गारमेंट विक्री बंद आहे. तसेच गारमेंट प्रदर्शनासाठी देखील जागा उपलब्ध नाही. त्यामुळे शासनाने याकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, सोलापूर हद्दीमध्ये वाढ होऊन ३० वर्षे पूर्ण झालेली आहेत. त्या भागामध्ये जिल्हा परिषदेच्या शाळा कार्यरत होत्या. सदर शाळा हद्दवाढ भागामध्ये आलेल्या आहेत. सदर शाळा सोलापूर महानगरपालिकेच्या ताब्यामध्ये देण्यात याव्यात, अशी मी जिल्हा नियोजन समितीमध्ये देखील मागणी केली आहे. याबाबत जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देखील विनंती केलेली आहे. कारण हद्दवाढ झालेल्या भागातील शाळांची देखभाल व दुरुस्ती महानगरपालिका करीत नाही आणि सदर शाळा आता जिल्हा परिषद हद्दीमध्ये नसल्यामुळे जिल्हा परिषद देखभाल व दुरुस्ती करीत नाही. शिक्षण, जिल्हा परिषद व महसूल विभागाने एकत्र बसून सदर शाळा महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात याव्यात, अशी मी विनंती करतो.

श्री.सुभाष देशमुख.....

अध्यक्ष महोदय, राज्याच्या ग्रामीण भागातील अनेक ठिकाणी क्रीडा संकुलनाचे काम चांगले सुरु आहे. परंतु काही ठिकाणी सदर कामे अर्धवट करण्यात आलेली आहेत. त्यामुळे सदर कामे पूर्ण करावीत, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, सोलापूर जिल्ह्यातील मोळेगाव येथे कत्तलखाना आहे. पशुसंवर्धन म्हणजे पशुंचे पालन-पोषण करणे. परंतु पशुसंवर्धन विभागातील काही अधिकारी सदर जनावर कापण्यायोग्य आहे, असे प्रमाणपत्र देत आहेत. त्यामुळे शासनाने याबाबत विचार करण्याची आवश्यकता आहे. सोलापूर जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभागातील अधिकारी पशुंचे संवर्धन करण्याऐवजी पशु कापण्यास परवानगी देत आहेत. एक जनावर कापण्यास परवानगी देण्यासाठी अमूक दर ठरलेला आहे. पैसे घेऊन जनावरांची कत्तल करण्याची परवानगी दिली जात आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

असुधारित प्रत

श्री. सुभाष देशमुख....

अध्यक्ष महोदय, राज्यातील खेळाडू यांना शासकीय सेवेमध्ये अधिकाधिक प्राधान्य दिले पाहिजे, अशी माझी मागणी आहे. तसेच संस्थांमध्येही त्याना प्राधान्य दिले जावे. त्यांच्यामुळे राज्याचा नावलौकिक वाढत असतो. राज्यातील शिक्षकांचे नोकरी लागल्यानंतर १० वर्षाच्या आत त्यांचे दुर्दैवाने निधन झाले तर त्यांना १० लाख रुपये शासनाकडून दिले जातात. परंतु मागील अनेक वर्षापासून अशा मृत्युमूखी पडलेल्या शिक्षकांना १० लाख रुपये मिळाले नाहीत. अनेकांचे कुटुंब या लाभापासून वंचित आहेत. मला वाटते की, याबाबत चौकशी करुन त्यांचे लाभ त्यांना देण्यात यावेत. सन २००५ नंतर शासकीय नोकरीत लागलेल्या कर्मचारी, शिक्षकांच्या पेन्शनबाबतचाही मुद्दा प्रलंबित आहे.

अध्यक्ष महोदय, पर्यटनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होत असते. राज्यातील कोकणामध्ये पर्यटन मोठ्या प्रमाणात होते. मला वाटते संपूर्ण राज्यात पर्यटन वाढले पाहिजे. जेणेकरुन या माध्यमातून अधिकाधिक रोजगार वाढेल. यासाठी माननीय पर्यटन मंत्र्यांनी प्रयत्न करावेत, अशी मी विनंती करतो. माझ्या भागामध्ये कुंडल येथे तीर्थक्षेत्र आहे. तेथेही पर्यटन होऊ शकते.

अध्यक्ष महोदय, मी माननीय सांस्कृतिक कार्य मंत्र्याना विनंती करणार आहे. आता अनेक शहरांची हद्दवाढ होत आहे. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी सांस्कृतिक सभागृह असते. परंतु या वाढलेल्या भागामध्येही सांस्कृतिक सभागृह बांधले तर तेथील लोकांना याचा उपयोग होईल. सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर येथे लाखो भाविक विठ्ठलाच्या दर्शनाकरिता येत असतात. सोलापूर जिल्ह्यात श्री. स्वामी समर्थांचे मंदिर आहे. तसेच तेथे सोलापूरचे ग्रामदैवत सिद्धरामेश्वर आहे. तुळजापूरही या जिल्ह्यात आहे. या सर्व गोष्टींचा विचार केला तर सोलापूर जिल्हा धार्मिक पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करावा, अशी मी विनंती करतो. यासाठी निधीही उपलब्ध करुन द्यावा.

अध्यक्ष महोदय, मागील दोन वर्षापासून राज्यात मुबलक प्रमाणात पाऊस पडत आहे. परंतु शेतीचे उत्पादन वाढलेले नाही. शेतकऱ्यांच्या उत्पादनामध्ये घट

श्री. सुभाष देशमुख....

कोणत्या कारणांमुळे होत आहे, याचा विचार माननीय कृषि मंत्र्यांनी करावा, अशी मी विनंती करतो. वीज तोडणी, बोगस बियाणे, वेळेवर खतांचा पुरवठा न होणे, शेतकऱ्यांना माल तारणाचे वेळेवर पैसे न मिळणे, शेतीसाठी वेळेत कर्ज न मिळणे या सर्व गोष्टींमुळे शेतीतील उत्पादनावर परिणाम होत आहे.

अध्यक्ष महोदय, 'राज्यात एक गाव, एक पीक' ही योजना सुरु करावी. हे केल्यानंतर त्या गावामध्ये क्लस्टर तयार करावे. पिकाच्या उत्पादनापासून प्रक्रिया उद्योग निर्माण करुन विक्रीची व्यवस्था करावी. अशा प्रकारे गावांची निवड करुन एक गाव, एक पीक घेतले तर ते गाव त्या पिकाच्या नावे ओळखले जाईल. तसेच तेथे क्लस्टर उभारले तर प्रक्रिया उद्योगही त्या गावात येतील. या माध्यमातून रोजगार निर्मितीही मोठ्या प्रमाणात वाढेल. धान्य खरेदही कमी प्रमाणात झाली आहे. तसेच बांबू लागवडीकडे मंत्री महोदयांनी लक्ष द्यावे.

अध्यक्ष महोदय, हायब्रीड ॲन्युईटीमध्ये म्हैसाळ-लाखपुरी-आसरा या कामाची निविदा काढून जवळपास १० महिन्यांचा कालावधी होत आहे. निविदाधारकांनी निविदा दाखल केल्या आहेत. या कामासाठी चार वेळेस निविदा उघडण्यासाठी वेळ दिला होता. परंतु त्या उघडल्या नाहीत. यात कोणती अडचण आहे, याची मला माहिती नाही. १० महिने होऊनही त्या कामाचे कार्यादेश देण्यात आलेले नाहीत. निविदा सबमिट झाल्यापासून निविदा उघडण्यासाठी १० महिन्याचा कालावधी का लागला ? याची तात्काळ चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मी मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, आपण मला पुरवणी मागण्यांवर बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो.

धन्यवाद !

श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यावर बोलण्यासाठी मी उभी आहे.

अध्यक्ष महोदय, मी सर्वप्रथम कृषि विभागासंदर्भात बोलणार आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक म्हणून शेतकऱ्यांकडे पाहिले जाते. भारत हा कृषि प्रधान देश आहे. महाराष्ट्र हे देशातील प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते. राज्यातील शेतकरी नाविन्यपूर्ण प्रयोग करीत असतात. याद्वारे त्यांनी देशात आपली आगळीवेगळी ओळख निर्माण केली आहे. शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. तो जगला तरच जगाची अर्थव्यवस्था सुरळीत चालणार आहे. आज शेतकरी निसर्गाच्या अस्मानी संकटात आणि वाढलेल्या बि-बियाणांच्या किंमतीमुळे संकटात आहे.

यानंतर श्री. चौधरी....

असुधारित प्रत

श्रीमती प्रतिभा धानोरकर.....

उदाहरणार्थ, पूर्वी डी.ए.पी. या खताचा दर पूर्वी १२०० रुपये प्रति बॅग एवढा होता त्यामध्ये वाढ होऊन आता १७०० ते १८०० रुपये प्रति बॅग एवढा झाला आहे. सुमारे दीड पट भाववाढ झाल्याचे यातून आपल्याला दिसत आहे. परंतु एका आर्थिक वर्षात शेतकऱ्याच्या उत्पन्नामध्ये मागील वर्षाच्या तुलनेत कधीही दीड पटीने वाढ झाल्याचे आपल्याला दिसले नाही. तसेच केंद्र सरकारमार्फत घोषित केल्या जाणाऱ्या एम.एस.पी. मध्ये देखील कधीही दीड पट वाढ झालेली नाही. सन २०२०-२१ मध्ये कापसाची एम.एस.पी. ५ हजार ५१५ रुपये होती. सन २०२१-२२ मध्ये ती ५ हजार ७२६ रुपये झाली. यावरुन असे लक्षात येते की, सदर वर्षामध्ये एम.एस.पी. मध्ये अगदी नगण्य वाढ झालेली आहे. पर्यायाने शेतकऱ्यांच्या उत्पन्नात घट झाल्याचे आपल्याला पाहायला मिळते. खतांच्या वाढत्या किमती, निसर्गाचे अस्मानी संकट यामुळे शेतकरी खचत चालला आहे. आपले सरकार हे शेतकऱ्यांचे सरकार म्हणून ओळखले जाते. आज आपण शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी प्रयत्न करीत आहोत. परंतु यामध्ये आणखी वाढ केली तर राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून ओळखला जाणारा शेतकरी उद्या उंच भरारी घेऊन अर्थव्यवस्थेस बळकटी प्रदान केल्याशिवाय राहणार नाही. माझी आपणास विनंती आहे की, आपल्या सरकारच्या माध्यमातून राज्यातील शेतकऱ्यांना मुबलक खत पुरवठा व्हावा व मुलबक प्रमाणात बी-बियाणे उपलब्ध व्हावीत यासाठी पाठपुरावा करावा. तसेच खते व बी-बियाण्यांची भाववाढ न होता त्यामध्ये आणखी घट कशी होईल यासाठी प्रयत्न करावा. असे झाल्यास शेतकऱ्यांना निश्चितपणे मदत होईल. उपरोक्त बाबींच्या संदर्भात आपण केंद्र सरकारकडे शिफारस करावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी युती सरकारच्या काळात छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना जाहीर करण्यात आली होती. नंतर आघाडी सरकारने महात्मा ज्योतीराव फुले कर्जमुक्ती योजना जाहीर केली. परंतु छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेतील लाभार्थ्यांना अद्याप देखील महात्मा ज्योतीराव फुले कर्जमुक्ती योजनेमध्ये सामावून घेण्यात आलेले नाही.

श्रीमती प्रतिभा धानोरकर.....

माझ्या मतदारसंघातील असे सुमारे २ हजार लाभार्थी अद्यापही कर्जमाफीपासून वंचित आहेत. त्यामुळे माझी शासनास आग्रहाची विनंती आहे की, सदर शेतकऱ्यांचा प्रश्न मार्गी लागेल यादृष्टीने निर्णय घेऊन त्यांना महात्मा ज्योतीराव फुले कर्जमुक्ती योजनेमध्ये सामावून घ्यावे.

अध्यक्ष महोदय, पशुसंवर्धन विभागावर मी बोलत आहे. या विभागातील अनेक अधिकारी / कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत. त्यामुळे लोकांची कामे होऊ शकत नाहीत. माझी विनंती आहे की, या विभागातील रिक्त पदे तात्काळ भरावित. तसेच अनेक पशुवैद्यकीय रुग्णालयांची विद्युत देयके प्रलंबित आहेत. त्यांना पशुसंवर्धन विभागाने निधी उपलब्ध करुन द्यावा, ही विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मी शालेय शिक्षण विभागावर बोलत आहे. चंद्रपूर हा जिल्हा आदिवासी बहुल जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्हयामध्ये मागील दोन वर्षांपासून शिक्षकांची अनेक पदे रिक्त आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने विज्ञान, गणित व इंग्रजी या विषय शिक्षकांचा समावेश आहे. सदर विषयांच्या शिक्षकांची पदे तात्काळ भरणे फार गरजेचे आहे. कारण मागील दोन वर्षांमध्ये विद्यार्थ्यांचे मोठया प्रमाणात शैक्षणिक नुकसान झाले आहे. नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी सदर रिक्त पदे भरली नाहीत तर विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर त्याचा परिणाम होईल.

अध्यक्ष महोदय, दुसरा मुद्दा असा आहे की, इंग्रजी माध्यमाच्या अनेक खासगी शाळा शिक्षकांना किमान वेतन व अर्जित रजा देत नाहीत. याकडे सरकारने लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच शेडयुल-सी रद्द करुन खासगी शाळांमधील शिक्षकांना न्याय देणे अत्यंत गरजेचे आहे. खासगी शाळातील शिक्षकांना आज रोजी केवळ दोन-तीन हजार रुपये मानधन दिले जाते. किमान वेतन देण्याचा नियम असतानाही त्यांना पुरेसे मानधन दिले जात नाही याबाबत देखील विचार होण्याची गरज आहे. माननीय शिक्षण मंत्र्यांना माझी विनंती आहे की, अनेक शाळा अनुदान मिळण्यासाठी पात्र आहेत. परंतु त्रुट्यांमुळे त्यांचे प्रस्ताव प्रलंबित आहेत.

श्रीमती प्रतिभा धानोरकर.....

माझी आपणास विनंती आहे की, अशा शाळांचा विचार करुन अनेक वर्षांपासून कार्यरत शिक्षकांना न्याय द्यावा.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्रीमती प्रतिभा धानोरकर..

अध्यक्ष महोदय, आज क्रीडा विभागावर बोलत असताना क्रीडा विभागांतर्गत आमच्या आदिवासी भागातील अनेक खेळाडू ऑलिम्पिकमध्ये सहभागी होण्यासाठी जातात. त्यासाठी भद्रावती येथे ॲथेलॅटिक प्रशिक्षण केंद्राची मागणी मी मंत्री महोदयांना करीत आहे.

अध्यक्ष महोदय, वित्त विभागाच्या बाबतीत बोलत असताना मी माननीय उपमुख्यमंत्र्यांना वारंवार पत्र दिले आहे की, सर्व शासन सेवेतील कर्मचाऱ्यांच्या संघटना जुनी पेन्शन योजना लागू व्हावी यासाठी आग्रही आहेत. तरी या मागणीचा शासनाने सहानुभूतीपूर्वक विचार करुन जुनी पेन्शन योजना शिक्षकांना लागू करावी, अशी मी मागणी करीत आहे.

अध्यक्ष महोदय, सहकार व पणन विभागावर बोलत असताना चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांची बँक म्हणून ओळखली जाणारी जिल्हा मध्यवर्ती बँक ही सध्या भ्रष्टाचाराच्या विळख्यात गुंतलेली आहे. या बँकेच्या संचालक मंडळाचा कार्यकाल सन २०१२ ते २०१७ पर्यंत होता. त्यानंतर सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार तेथे प्रशासक नेमण्याचे आदेश देण्यात आले. परंतु अद्यापही या जिल्हा बँकेवर प्रशासक नेमण्यात आला नाही. त्यामुळे शंका निर्माण होत आहे. तसेच येथील १६५ कर्मचाऱ्यांच्या पदभरतीसाठी मंत्री महोदयांनी मान्यता दिली आहे. या बँकेतील जनरल मॅनेजर यांनी धोकाधाडी केल्यामुळे त्यांच्या कलम ४२० अन्वये २ गुन्हे दाखल आहेत. असे असताना त्या व्यक्तीला मुख्य कार्यकारी अधिकारी या महत्त्वाच्या पदाची जबाबदारी दिली. अशा अधिकाऱ्याला बडतर्फ करुन त्याचा चार्ज काढून घेण्यात यावा. सन २०२१ मध्ये सहकार नियमांचे उल्लंघन करुन या अधिकाऱ्याची वरिष्ठ पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, या प्रकरणी एक उच्चस्तरीय समिती गठीत करुन या बँकेची चौकशी करावी व सदर बँकेवर प्रशासक नेमण्यात यावा. तसेच त्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडील चार्ज काढून घेण्यात यावा.

श्रीमती प्रतिभा धानोरकर..

अध्यक्ष महोदय, चंद्रपूर व यवतमाळ हे जिल्हे पांढऱ्या सोन्याचे जिल्हे म्हणून ओळखले जातात. चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा हा तालुका चंद्रपूर व यवतमाळ या दोन जिल्ह्यांना जोडणारा आहे. या दोन्ही जिल्ह्यात कापसाचे पीक मोठ्या प्रमाणात होत असल्याने वरोरा येथे एखाद्या टेक्सटाईल पार्कची निर्मिती करण्यात यावी, अशी मी मंत्री महोदयांना मागणी करीत आहे.

अध्यक्ष महोदय, माझा मतदार संघ हा पर्यटनाचा मुख्य भाग म्हणून ओळखला जातो. जगातील सर्व पर्यटकांना आकर्षित करणारा ताडोबा हा व्याघ्र प्रकल्प माझ्या मतदार संघात आहे. कुष्ठरोग्यांची सेवा करणारे आनंदवन, भद्रावती येथे असलेले भद्रनागाचे मंदिर, बुध्द लेण्या व जैन मंदिर हे पर्यटकांना आकर्षित करीत असतात. म्हणून माझी पर्यटन मंत्र्यांना आग्रहाची विनंती आहे की, या सर्व पर्यटनासाठी विशेष बस सेवा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसेच ताडोबा प्रकल्पामध्ये असलेल्या सफाऱ्यांमध्ये काही वाढ करता येत असेल तर ती व्यवस्था करण्यात यावी.

अध्यक्ष महोदय, मी वन मंत्र्यांना विनंती करते की, बफर झोनमधील सफारी संख्या वाढवावी. जेणेकरुन जिल्ह्यातील सर्व पर्यटकांना या ताडोबा व्याघ्र प्रकल्पाचा लाभ घेता येईल. चंद्रपूर जिल्हा हा आदिवासी असून तेथील आदिवासी मूळ निवासी आहेत. त्यामुळे तेथील संस्कृतीचे जतन करणे ही काळाची गरज आहे. त्याकरिता माननीय सांस्कृतिक मंत्र्यांना विनंती करते की, चंद्रपूर जिल्ह्याच्या सांस्कृतिक विभागातर्फे जागतिक पातळीवर आदिवासी संस्कृतीचा अभ्यास व जतन करणारे केंद्र तसेच त्यांच्या नृत्यकलेचा विकास करण्यासाठी नृत्यकला केंद्राची स्थापना करावी.

अध्यक्ष महोदय, अनुदानाच्या वरील सर्व विभागांच्या मागण्यांवर बोलत असताना आशा करते की, या मागण्यांची गांभीर्यपूर्वक दक्षता घेऊन त्यांचा विचार करण्यात येईल. या ठिकाणी मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी माननीय अध्यक्षांचे आभार मानते. धन्यवाद.

श्री. अजय चौधरी (शिवडी) : अध्यक्ष महोदय, मी सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांच्या समर्थनार्थ या ठिकाणी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी वित्त, सार्वजनिक बांधकाम आणि पर्यटन या विभागावर बोलू इच्छितो. मी माननीय वित्तमंत्र्यांना खासकरुन धन्यवाद देतो. कारण माझ्या मतदार संघातील शिवडी किल्ला आणि पशु महाविद्यालय येथील इमारतींच्या दुरुस्तीकरिता त्यांनी अर्थसंकल्पामध्ये निधी उपलब्ध करुन दिला.

अध्यक्ष महोदय, माननीय उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री आताच सभागृहातून बाहेर गेले आहेत. परंतु आमचे पालकमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. मी त्यांचे लक्ष वेधू इच्छितो.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. अजय चौधरी...

आपल्या सर्वांनाच माहीत आहे की, आज छत्रपती शिवाजी महाराज यांची तिथीप्रमाणे जयंती आहे आणि पूर्ण महाराष्ट्रामध्ये ती साजरी केली जात आहे. परंतु हिंदवी स्वराज्यावर अफजखानरुपी मोघलांचे आक्रमण आले होते ते थोपविण्याचे काम ज्या प्रतापगडाने केले, त्या प्रतापगडाच्या संवर्धनासाठी, बळकटीकरणासाठी अर्थसंकल्पामध्ये कुठेही निधी दिलेला नाही. आपल्या माध्यमातून मी एक खास बाब सांगू इच्छितो की, छत्रपती शिवाजी महाराज यांनी जो भीम पराक्रम केला त्या गडाचे खरे नाव ढोरप्या डोंगर होते. परंतु छत्रपती शिवाजी महाराज यांनी पराक्रम करुन मोघलांचे आक्रमण थांबविले त्यामुळे याला प्रतापगड असे नाव देण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्थापन केलेले एकमेव भवानी माता मंदीर या गडावर आहे. ते महाराष्ट्रामध्ये कुठेही नाही. अशा परिस्थितीत नवरात्रात तसेच इतर वेळी देखील लाखो पर्यटक या गडावर येत असतात. परंतु त्यांना पार्किंग, प्रसाधन गृह किंवा हॉटेल अशा कोणत्याही प्रकारच्या नागरी सुविधा दिल्या जात नाहीत. अशा परिस्थितीत या गडाचे रक्षण करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. कारण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या महाभीम प्रतापाने पावण झालेला हा गड आहे. आपल्या माध्यमातून माझी सरकारला आणि माननीय वित्त मंत्री श्री. अजित पवार यांना या गडासाठी मोठया प्रकारे निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. जेणेकरुन लाखो शिवभक्तांचा आनंद गगनात मावेनासा होईल.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागावर बोलताना आपल्या माध्यमातून सांगू इच्छितो की, महाराष्ट्र सरकारने वरळी, ना.म.जोशी आणि नायगाव येथे बीडीडी चाळीच्या पुनर्विकासाची योजना हाती घेतलेली आहे. परंतु माझ्या मतदारसंघात जी शिवडी बीडीडी चाळ आहे ती केंद्र शासनाच्या जमिनीवर असल्यामुळे आतापर्यंत कोणत्याही प्रकारे त्यांच्या पुनर्विकासाची योजना राबविली जात नाही. मी आणि आमचे खासदार माननीय श्री. अरविंद सावंत अनेक वेळा केंद्रीय मंत्र्यांना भेटलो परंतु केंद्र सरकार ती जागा महाराष्ट्र सरकारला हस्तांतरित करीत नाही. त्यामुळे त्यांच्या पुनर्विकासाची योजना आणली आहे. पंरतु त्यांचा पुनर्विकास आज

श्री. अजय चौधरी...

किंवा उद्या होईल या अपेक्षेने सरकार त्या इमारतींवर खर्च करु इच्छित नाही. आज त्या इमारती १०० वर्षापूर्वीच्या आहेत. त्यांच्या गच्ची गळत आहेत. लोकांना हालअपेष्टा सहन कराव्या लागतात. माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांना माझी विंनती आहे की, काहीही करुन त्यांनी या इमारतींच्या बांधकामास निधी उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. हा निधी उपलब्ध करुन दिला गेला तर तेथील लोकांचे हाल सहन करण्यापलिकडे जातील. त्यांचा पुनर्विकास होईल तेव्हा होईल परंतु तेथील लोकांना राहण्यासारखी जागा तरी उपलब्ध करुन द्यावी, अशी माझी विनंती आहे

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील काळाचौकी पोलीस स्टेशन, ना.म.जोशी पोलीस स्टेशन, शिवडी पोलीस स्टेशन आणि भोईवाडा पोलीस स्टेशन या सर्वांच्या इमारती ब्रिटीशकालीन आहेत. त्यांची अत्यंत दुर्दशा झालेली आहे. पोलीस स्टेशनमध्ये जाताना जनतेमध्ये एक आदरयुक्त भिती असावी. परंतु त्या सर्व इमारती पडीत बंगल्यासारख्या झालेल्या आहेत. सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांना माझी विनंती आहे की, त्यांनी या पोलीस स्टेशनच्या इमारतीच्या दुरुस्तीसाठी आपण मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध करुन देणे अत्यंत आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, मी पर्यटन विभागाच्या बाबत बोलत असताना सांगू इच्छितो की, मुंबईमध्ये अनेक ठिकाणी पाहायला न मिळणाऱ्या ५ व्या ते ६ व्या शतकातील बारादेवी नावाची मुर्ती सापडलेली आहे. ही मुर्ती सन १९३१ मध्ये रस्ता बनविताना सापडली. ही प्राचीन मुर्ती असून ५ व्या किंवा ६ व्या शतकाच्या उत्तरार्धात असल्याचे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने प्रमाणित केलेले आहे. ही प्राचीन मुर्ती भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने सन १९८५ मध्ये राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित केलेली आहे. आंतरराष्ट्रीय पुरातत्व संस्थेने देखील परेल येथील प्राचीन मुर्तीस ऐतिहासिक वास्तुचा दर्जा देऊन आंतरराष्ट्रीय वारसा म्हणून संरक्षित केले आहे. सदर प्राचीन शिवमुर्ती असलेल्या परिसराचा पर्यटनाच्या दृष्टीने विकास करुन त्याला दर्जा देणे अत्यंत आवश्यक आहे. या मुर्तीची प्रतिकृती व्हिक्टोरिया टर्मिनल येथील संग्रहालयामध्ये ठेवण्यात आलेली आहे. हे पाहण्यासाठी आंतरराष्ट्रीय पर्यटक येत

श्री. अजय चौधरी...

असतात. परंतु त्याची मूळ मुर्ती माझ्या मतदारसंघात परेल येथे आहे. पर्यटन विभागाला माझी विनंती आहे की, या पूर्ण परिसराचा पर्यटन केंद्र म्हणून विकास करणे अत्यंत आवश्यक आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर...

असुधारित प्रत

श्री.अजय चौधरी ....

या मुर्तीची सुरक्षितता व सुशोभिकरण करणे आवश्यक आहे. मुंबईतील काही ठराविक किल्ल्यांपैकी शिवडी येथील किल्ला हा समुद्र किनाऱ्या जवळ आहे. या किल्ल्याची आता दुर्दशा झालेली आहे. येथील समुद्र किनाऱ्यावर दर वर्षी फ्लेमिंगो पक्षी मोठया संख्येने येतात. त्यांना बघण्याकरिता अनेक पर्यटक या किल्ल्यावर येतात. मात्र येथे येणाऱ्या पर्यटकांना कोणत्याही सुविधा नाहीत. शिवडी परिसरात लाखो पर्यटक येतात. मात्र जर या किल्ल्याचे काम केले तर भविष्यात बारा महिने या किल्ल्यावर पर्यटक येत राहतील. यामुळे मुंबईतील पर्यटनाला मोठया प्रमाणात चालना मिळेल. माझी पर्यटन मंत्री यांनाविनंती आहे. आपण याकडे अतिशय गांभीर्याने बघावे. या परिसराचा, किल्ल्याचा विकास करणे आवश्यक आहे. वेळेचे भान ठेवून मी सांगू इच्छितो. मी मांडलेल्या मुद्यांवर शासनातील विविध विभागाचे मंत्री सकारात्मक विचार करतील व निधीचा विनियोग केला जाईल असा विश्वास व्यक्त करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

असुधारित प्रत

श्री. रवि राणा (बडनेरा) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माझा मतदारसंघ व अमरावती जिल्ह्यातील काही मागण्यांच्या संबंधी मी येथे चर्चा करणार आहे. सर्वप्रथम मी या ठिकाणी कृषी विभागावर बोलू इच्छितो. माननीय कृषी मंत्री यांचे लक्ष वेधू इच्छितो. विदर्भात, अमरावती जिल्ह्यामध्ये शेतकरी मोठया प्रमाणात आत्महत्या करतात. त्यांची स्थिती वाईट आहे. जिल्ह्यात कृषी अधिकारी निम्म्यापेक्षा कमी आहेत. तालुका कृषी अधिकारी नाहीत. अनेकदा संबंधित अधिकारी तालुक्यात नसतात. ज्या तालुक्यात अधिकारी राहिले राहिजेत, ते तेथे राहत नाहीत. कठीण परिस्थितीत शेतकऱ्यांचे पंचनामे करायचे आहेत, शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनेचा लाभ द्यायचा आहे, या करिता जिल्ह्यात अधिकारी नसतील तर त्यांना कसा न्याय दिला जाणार आहे ? ही फार मोठी समस्या आहे. मी माननीय कृषी मंत्री यांना विनंती करतो. अमरावती जिल्ह्यात जी पदे रिक्त आहेत, ती ताबडतोब भरली पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, अमरावतीमध्ये भातकुली तालुका हा मोठा असून येथे अद्याप कृषी कार्यालय नाही. कृषी कार्यालय भाड्याच्या इमारतीत असल्याने लोकांची गैरसोय होते. इमारतीच्या बांधकामासाठी जागा उपलब्ध करुन दिली आहे. याकरिता निधी मिळाला तर कृषी कार्यालय उभारणे शक्य होईल. अंजनगाव बारी अमरावती तालुक्यातील मोठे गाव आहे. या गावास जोडणारी अनेक गावे असल्याने तालुक्याचे कृषी कार्यालय येथे असले पाहिजे. अमरावती जिल्ह्यात चुरणी हे चिखलदरा तालुक्यातील मोठे गाव आहे. येथे कृषी कार्यालय असले पाहिजे. अमरावती जिल्ह्यातील शेतकरी तालुक्याच्या ठिकाणी जातात. त्यांना शेतकरी निवारा नसतो. शेतकऱ्यांचे कृषी भवन असले तर रात्री त्यांची थांबण्याची सोय होईल. त्यांना उन्हात झाडाखाली बसावे लागते. कृषी भवनमुळे शेतकऱ्यांची निवाऱ्याची सोय होईल. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी शेतकरी निवारा जर तयार केला तर शेतकऱ्यांना मोठा आधार होईल.

श्री. रवि राणा.....

अध्यक्ष महोदय, मागील वर्षी अमरावती जिल्ह्यात सोयाबीन, कापूस, तूर, मूग याचे महाबीज या कंपनीकडून मोठया प्रमाणात नकली बियाणे व नकली खते यांचे वाटप झाले. महाबीज कंपनीचे कार्यालय अकोला येथे आहे. तेथे जर ८० टक्के बियाणे बनावट दिले जात असेल तर या शेतकऱ्यांची काय स्थिती होईल ? या संबंधी वारंवार तक्रार केल्यानंतरही कृषी विभागाच्या माध्यमातून कोणत्याही अधिकाऱ्यावर कडक कारवाई केली जात नाही. तसेच ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले, त्यांना नुकसान भरपाई अद्याप मिळालेली नाही.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.रवि राणा …

अध्यक्ष महोदय, कृषी विभागाच्या मागण्यांवर बोलताना मला हे सांगावयाचे आहे की, खाजगी कंपन्यांना चालना देण्यासाठी, वेगवेगळ्या राज्यातील खाजगी कंपन्यांना महाराष्ट्रामध्ये, विदर्भामध्ये आणून बी-बियाणे व खते शेतकऱ्यांना विकावयाची असतील व शासनाच्या महाबिजसारख्या विद्यापीठाला मागे ठेवून आपण या शेतकऱ्यांवर अन्याय करीत असू तर ते चुकीचे आहे. महाबिजच्या माध्यमातून जी चुकीची बियाणे, चुकीची खते या शेतकऱ्यांना पुरविली जातात, त्यावर कडक कारवाई केली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या मागण्यांवर बोलताना मी माननीय शिक्षण मंत्री महोदयांचे याकडे लक्ष वेधतो की, अमरावती जिल्ह्यामध्ये ज्या जिल्हापरिषदेच्या शाळा आहेत त्यांची अतिशय बिकट परिस्थिती झालेली आहे. तेथील इमारती व्यवस्थित नाहीत. त्या पडक्या आहेत. तेथे मुलांना बसण्याकरिता डेस्क, बेंच नाहीत. जिल्ह्यामध्ये आदिवासी बहुल भाग मोठ्या प्रमाणात असल्याने तेथे शिक्षणाला जास्त प्राधान्य देऊन खऱ्या अर्थाने त्या गरीब लोकांना सक्षम करण्यासाठी, त्या शेतकऱ्यांच्या, आदिवासींच्या मुलांना सक्षम करण्यासाठी अमरावती जिल्ह्यातील प्रत्येक शाळेला निधी दिला पाहिजे. तेथे जिल्हा परिषदेच्या शाळांची चांगली दुरुस्ती केली पाहिजे. तेथे डेस्क, बेंच दिले पाहिजेत. तेथे शौचालय असले पाहिजे, याबाबत मी विनंती करीत आहे.

अध्यक्ष महोदय, क्रीडा विभागाच्या मागण्यांवर बोलताना मला हे सांगावयाचे आहे की, अमरावती जिल्ह्यामध्ये तालुक्या-तालुक्यामध्ये क्रीडा विभागासाठी जो निधी माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने दिला, त्या माध्यमातून जी कामे झाली त्यानंतर या दोन वर्षांमध्ये त्याबाबत तालुक्यामध्ये काही काम न झाल्याने अनेक ठिकाणी मुलांना खेळण्यासाठी गैरसोय होत आहे.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्यांवर बोलताना मला हे सांगावयाचे आहे की, आता अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या मतदारसंघातील व्यथा या ठिकाणी मांडल्या आहेत. ही खरी परिस्थिती आहे की,

श्री.रवि राणा …

सार्वजनिक बांधकाम विभागातील जे अधिकारी आहेत, त्यांना आमदारांचे पत्र, आमदारांची तक्रार, आमदारांनी सांगितलेली कामे, यामध्ये काही रुची राहिलेली नाही. अधिकारी संगनमत करुन कॉंट्रॅक्टरसोबत पूर्णपणे बॅटिंग करतात त्यामुळे आज अमरावती सारख्या जिल्ह्यामध्ये सुध्दा ... अमरावती जिल्हा हा मध्य प्रदेशच्या बॉर्डरवर आहे.

अध्यक्ष महोदय, मध्य प्रदेश बॉर्डरवरुन जाताना या दोन वर्षात आमच्या असे लक्षात आले की, मध्य प्रदेश आपल्यापेक्षा जास्त पुढे गेलेला आहे. महाराष्ट्रातील अमरावती जिल्हा त्या मध्य प्रदेशच्या बॉर्डरवर असताना तेथे ६-६ महिने रस्ते टिकत नाहीत. वर्षभराच्या आत रस्ते खराब होतात. त्यामुळे व्हिजिलन्सच्या माध्यमातून अमरावती जिल्ह्यातील अनेक रस्त्यांचे व्हिजिलन्स झाले पाहिजे. ज्या कॉंट्रॅक्टरची बिले चुकीच्या पध्दतीने काढली जातात, त्याची देखील चौकशी झाली पाहिजे. जे अधिकारी मनमानी करतात, ज्यांच्या तक्रारी दिल्या जातात, तक्रारी दिल्यानंतर त्यांची चौकशी सुरु झाल्यानंतर ती बंद होते. त्यांना प्रमोशन दिले जाते. त्यांना चांगल्या प्रकारची पोस्टींग दिली जाते. त्यावर देखील अंकुश ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्यांवर बोलताना मी मंत्री महोदयांचे याकडे लक्ष वेधतो.

अध्यक्ष महोदय, अमरावती जिल्ह्यामध्ये यवतमाळ, बडनेरा व अमरावती परतवाडा व धारणी हा रस्ता अत्यंत खराब झालेला आहे. यवतमाळहून अमरावती शहराकडे येणारा मुख्य रस्ता जो आहे त्या रस्त्यापासून यवतमाळपासून ते धारणीपर्यंतचा रस्ता करणे अत्यंत आवश्यक आहे, त्याकरिता मंत्री महोदयांनी निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, सहकार विभागाच्या मागण्यांवर बोलताना मी वस्त्रोद्योग मंत्री महोदयांना विनंती करणार आहे. बडनेरा मतदारसंघात गोपाल नगर सूत गिरणी व विजय मिल आहे. तेथे मोठ्या प्रमाणात कामगार आहेत. या दोन्ही मिल सुरु करणे अत्यंत आवश्यक आहे. ती शहराच्या मध्य ठिकाणची जागा असल्याने काही

श्री.रवि राणा ...

लोकांची त्यावर नजर आहे. माझी वस्त्रोद्योग मंत्री महोदयांना विनंती आहे की, कोणाची नजर तेथे पडू देऊ नका. तुमची नजर तेथे ठेवा व ते उद्योग सुरु करा. त्या बेरोजगार, कामगारांना रोजगार द्यावा, अशी माझी आपल्या माध्यमातून विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, पर्यटन विभागाच्या मागण्यांवर बोलताना मला हे सांगावयाचे आहे की, चिखलदरा हे अमरावती जिल्ह्यातील सर्वात मोठे नंदनवन आहे. मोठे पर्यटनस्थळ आहे. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री असताना त्यांनी तेथे ५०० कोटी रुपयांचा आराखडा मंजूर केला. तो आराखडा पुढे नेण्याकरिता पर्यटन विभागाच्या माध्यमातून मी माननीय पर्यटन मंत्री श्री.आदित्य ठाकरे यांना विनंती करतो. त्याकरिता निधी दिला पाहिजे. चिखलदरा येथे जर पर्यटन डेव्हलप झाले तर, त्या ठिकाणी लोकांना रोजगार मिळेल व लोकांना मोठ्या प्रमाणात चांगली सुविधा मिळेल.

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.रवि राणा...

मोठ्या प्रमाणात पर्यटन स्थळे पाहण्यासाठी पर्यटक येतील.

अध्यक्ष महोदय, मी अमरावती जिल्ह्याच्या भविष्यासाठी व हितासाठी ज्या-ज्या विभागाच्या मंत्री महोदयांकडे निधी मागणी केली आहे त्यांनी तो द्यावा, अशी माझी विनंती आहे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद !

असुधारित प्रत

श्री.अभिमन्यू पवार (औसा) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, या सरकारच्या काळामध्ये समाजातील कोणताही घटक खूष नाही, सर्व घटकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. तसेच आता विद्यार्थ्यांवरही मोठ्या प्रमाणात अन्याय होत आहे.

अध्यक्ष महोदय, मी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या मागण्यांवर बोलणार आहे. हे सरकार कोणतीही परीक्षा व्यवस्थित घेत नाही, त्यामध्ये गोंधळ घालून ठेवला जातो. म्हाडा व आरोग्य विभागातील पद भरती परीक्षेतील गोंधळ आपण पाहिला आहे. शालेय शिक्षण विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वेगवेगळ्या परिपत्रकांनी विद्यार्थ्यांच्या मनात संभ्रम निर्माण केला आहे. आर्थिक दुर्लबल घटकांमधील विद्यार्थ्यांच्या संदर्भात परीक्षा मंडळाने दिनांक १९ जानेवारी रोजी परिपत्रकाद्वारे सांगितले की, एनएमएसची दिनांक १० एप्रिल रोजी परीक्षा घेण्यात येईल. पुन्हा दुसऱ्या दिवशी परिपत्रक काढून सांगण्यात आले की, उक्त परीक्षा काही प्रशासकीय कारणांमुळे पुढे ढकलण्यात येत आहेत. त्या किती दिवस पुढे ढकलण्यात आल्या, हे मला माहिती नाही. उक्त परीक्षा देशातील इतर राज्यांमध्ये माहे मार्चमध्ये होतात. आपल्याही राज्यात आतापर्यंत माहे मार्च किंवा माहे एप्रिलमध्ये घेण्यात आलेल्या आहेत. अशा पद्धतीने उक्त परीक्षा पुढे ढकलल्याने सरकारच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे.

अध्यक्ष महोदय, आणखी एक परिपत्रक श्री.एस.एच.आतार यांनी काढले आहे. त्यामध्ये नमूद केले आहे की, सदरहू शाळेतील परीक्षार्थींना ऑनलाईन माहितीपत्रक भरण्याकरिता दिनांक १५ जानेवारी ते ३१ जानेवारी, २०२२ या कालावधीत मुदतवाढ देण्यात आली होती. तथापि, काही प्रशासकीय कारणास्तव सदरहू मुदतवाढीमध्ये अंशत: बदल करण्यात येत असून ती ५ दिवस कमी करुन दिनांक २५ जानेवारी, २०२२ अशी केली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे.

श्री.अभिमन्यू पवार...

अध्यक्ष महोदय, १० वीच्या परीक्षेबाबत एक परिपत्रक काढण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१ यांच्यामार्फत सन २०२१-२०२२ करिता राज्यस्तर राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा दिनांक १६ जानेवारी, २०२२ रोजी घेण्यात येणार होती. तथापि, ती काही कारणास्तव पुढे ढकलण्यात येत आहे. सदरहू परिक्षा किती दिवस पुढे ढकलण्यात आली आहे, ती घेण्यात येणार आहे की नाही ? यामुळे विद्यार्थ्यांची ससेहोलपट होत आहे. शालेय शिक्षण मंत्री महोदयांना विनंती आहे की, उक्त परीक्षा तत्काळ घेण्यात याव्यात. जेणेकरुन विद्यार्थ्यांना ४८ हजार रुपये शिष्यवृत्ती मिळते ती मिळू शकेल.

अध्यक्ष महोदय, क्रीडा विभाग - माननीय उप मुख्यमंत्री यांनी मागील वर्षी घोषणा केली होती की, क्रीडा संदर्भात सर्व तालुक्यांना ५ कोटी रुपये देण्यात येणार आहेत. त्यांनी उक्त निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. त्यांनी औरंगाबाद व पुणे येथील क्रीडा विद्यापीठास समान न्याय देण्याचे ठरविले होते. तो अद्याप देण्यात आला नसल्यने तो देण्यात यावा व निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, पर्यटन विभाग – माझ्या मतदारसंघामध्ये खरोसा येथे खूप पुरातन काळातील लेणी आहे, ती जग प्रसिद्ध असल्याने अनेक पर्यटक ती पाहण्यासाठी येतात. तिचा विकास करण्यात यावा, अशी माझी पर्यटन मंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, औसा शहरामध्ये गोपाळपूर हे स्थान आहे. तेथे ३५० वर्षापासूनचा इतिहास असणारे नाथ संस्थान आहे. आम्ही त्यास प्रति पंढरपूर समजतो. त्यामुळे तेथे एकादशी, आषाढी आणि माघवारीलाही भाविकांची प्रचंड गर्दी होते. या नाथ संस्थानाचा पर्यटन विभागाच्या माध्यमातून विकास करण्यात यावा, अशी माझी मागणी आहे.

श्री.अभिमन्यू पवार...

अध्यक्ष महोदय, उस्मानाबाद जिल्ह्यात निम्न तेरणा प्रकल्प आहे. तेथे पैठणच्या धर्तीवर मोठे पर्यटन स्थळ विकसीत होऊ शकते.

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

श्री.अभिमन्यू पवार.....

याबाबत काल बैठकीमध्ये सन्माननीय सदस्या श्रीमती नमिता मुंदडा यांनी देखील मागणी केलेली आहे. मंत्री महोदयांनी सकारात्मक प्रतिसाद दिलेला आहे. परंतु राज्याच्या पर्यटन विभागाकडून सदर कामासाठी भरीव निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील देवताळा या गावामध्ये शिवकालीन दत्त व जगदंबा मातेचे मंदिर आहे. तुळजापूरची देवी आणि देवताळा येथील जगदंबा देवी बहिणी-बहिणी समजल्या जातात. त्यामुळे तूळजापूरच्या धर्तीवर देवताळा येथील मंदिराचा विकास करण्यात यावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, रेशम उद्योग हा शेतीला चालना देऊन प्रगत करणारा उद्योग आहे. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचाविण्यासाठी वस्त्रोद्योग विभागाने या रेशम उद्योगाकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे. या उद्योगाला फक्त ३ लाख ३२ हजार रुपयांचे अनुदान दिले जाते. परंतु आता लोखंडाचे दर वाढल्यामुळे या अनुदानामध्ये वाढ करुन ते ५ लाख रुपये करावे, अशी मी विनंती करतो. जेणेकरुन शेड चांगल्याप्रकारे उभारता येईल आणि तुती लावगवडीसाठी चांगला निधी उपलब्ध होईल. अनुदानामध्ये वाढ केली तर शेतकऱ्यांना न्याय मिळेल, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, तुती हे कमी पाण्यामध्ये अतिशय चांगले उत्पादन देणारे एक पीक आहे. त्यामुळे रेशम उद्योगाकडे शासनाने सकारात्मक दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. या विभागाकडे मनुष्यबळ कमी आहे. प्रत्येक जिल्ह्यामध्ये या विभागाचे एक-दोन अधिकारी/कर्मचारी उपलब्ध आहेत. एक-दोन अधिकाऱ्यांच्या माध्यमातून रेशम उद्योगाला न्याय देऊ शकत नाही. त्यामुळे हा विभाग कृषी विभागामध्ये विलीन करुन कृषी विभागाच्या माध्यमातून रेशम उद्योगाचा विकास करण्याबाबत मी मागील दोन वर्षापूर्वी रेशम संचालनालयाकडे एक प्रस्ताव सादर केलेला आहे. उक्त प्रस्तावास लवकरात लवकर मंजुरी द्यावी, अशी मी विनंती करतो.

तालिका सभाध्यक्ष : अजून ६० सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी द्यावयाची आहे. त्यामुळे आपण थोडक्यात भाषण करावे, अशी मी सूचना करीत आहे.

श्री.अभिमन्यू पवार : अध्यक्ष महोदय, सन १९६७ मध्ये नांदेड येथील मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती स्थापन झालेली आहे. मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र हे या समितीचे कार्यक्षेत्र आहे. तिरंगा झेंडा तयार करणारी ही संस्था आहे. दिल्ली येथील लाल किल्ल्यावर फडकविण्यात येणारा झेंडा हा या संस्थेच्या माध्यमातून तयार केला जात होता. परंतु आता या संस्थेमध्ये खादीच्या उत्पादनामध्ये व त्यांच्या विक्रीमध्ये मोठ्या प्रमाणावर अनागोंदी कारभार सुरु झालेला आहे. त्यामुळे या संस्थेवर कारवाई करण्याची शिफारस धर्मादाय आयुक्त यांनी केलेली आहे. परंतु उक्त शिफारशीनुसार अद्याप कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही. नांदेड येथील या संस्थेची मालमत्ता बेकायदेशीरपणे विकासकाला देण्यात आलेली आहे. त्यामुळे या सर्व व्यवहाराची चौकशी करण्यात यावी व दोषीवर कडक कारवाई करण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, शासनाचा शेतकऱ्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक असणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन मोठ-मोठे आश्वासन दिल्यामुळे शेतकरी खूश होत नाहीत. राज्यातील ५० टक्के शेतकऱ्यांना पीकविमा मिळालेला नाही. अतिवृष्टी अनुदान वाटपामध्ये देखील गोंधळ करण्यात आलेला आहे. या सरकारच्या माध्यमातून शेतकऱ्यांवर जाणीवपूर्वक अन्याय केला जात आहे.

अध्यक्ष महोदय, मागील दोन वर्षापासून माझ्या मतदारसंघामध्ये अतिवृष्टी होत आहे. औसा, तूळजापूर व निलंगा या तीन तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाली होती. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांची शेती वाहून गेली होती. त्यामुळे कोल्हापूर व सांगली येथे जेसे पॅकेज देण्यात आले होते, तसेच पॅकेज या तीन तालुक्यांना देण्यात यावे, अशी माझ्यासह

श्री.अभिमन्यू पवार.....

सन्माननीय सदस्य श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, सन्माननीय सदस्य श्री.राणाजगजितसिंह पाटील यांनी मागणी केली होती. परंतु उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

अध्यक्ष महोदय, अतिवृष्टीमध्ये नदी काठच्या जमिनी वाहून गेल्यानंतर शासनाकडून संबंधित शेतकऱ्याला प्रतिहेक्टरी ३७ हजार ५०० रुपये अनुदान दिले जाते. हे अनुदान जास्तीत जास्त दोन हेक्टरपर्यंतच दिले जाते. परंतु अनुदानाचे वाटप करीत असताना अल्पभूधारक आणि बहुभूधारक यांच्यामध्ये भेदभाव केला जातो. नदी काठावरील अल्पभूधारक किंवा बहुभूधारकांची जेवढी जमीन वाहून गेली त्या सर्व जमिनीचा मोबदला शासनाने दिला पाहिजे. तसेच ३७ हजार ५०० रुपये हा जुना दर आहे. त्यामुळे आता यामध्ये वाढ करुन प्रतिहेक्टरी एक लाख रुपये अनुदान देण्यात यावे, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी हे शासन काय उपाययोजना करीत आहे, एक लाख रुपये दिल्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबणार आहेत काय ? आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे. तसेच आत्महत्याग्रस्त कुटुंबातील एका सदस्याला शासकीय, निमशासकीय किंवा तत्सम संस्थेमध्ये नोकरी देणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

श्री.अभिमन्यू पवार ....

शेतीपूरक व्यवसाय करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन दिले जाणार आहे काय ? यासाठी धोरण बदलण्यात येणार आहे काय ? हा विषय यानिमित्ताने चर्चेला आला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, मराठा आंदोलनादरम्यान काही आंदोलनकर्ते हुतात्मा झाले होते. तसेच आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबांना, वारसांना घरकूल, सिंचन विहिरी, गोठा, महामंडळाचे कर्ज याकरिता आर्थिक आधार दिला पाहिजे. या लोकांना शेती करण्यासाठी पतपुरवठा केला पाहिजे. इतकेच नव्हेतर त्यांना जनावारांचे गोठे, अनुदानित विहिरी, शेतीसाठी अनुदान दिले पाहिजे, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

धन्यवाद !

असुधारित प्रत

श्री. शेखर निकम (चिपळूण) अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावरील पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी सर्वप्रथम कृषि विभागासंदर्भात बोलणार आहे. माननीय श्री. शरद पवार यांनी कोकणाकरिता रोजगार हमी योजनेंतर्गत फळपीक लागवड योजना तयार केलेली आहे. त्यानंतर या भागामध्ये दुसरी मोठी योजना आली नाही. मी या निमित्ताने मागणी करतो की, केरळ, मेघालय राज्य सरकार जॅकफ्रुट मिशन सुरु करीत आहे. त्याचप्रकारे कोकणामध्येही हे मिशन राबवावे. लांजा येथे मिथिलेश देसाई नावाच्या तरुणाने फणसाच्या सात जाती निर्माण केल्या आहेत. तो तरुण आज फणसाच्या झाडांची पानेदेखील निर्यात करीत असतो. त्यामुळे अशी योजना या भागामध्ये राबवावी.

अध्यक्ष महोदय, कोकणातील शेतकऱ्यांसाठी छोटछोटी फळ प्रक्रिया युनिट घरगुती पद्धतीने निर्माण केली जातात. यांना चालना देण्याचे काम राज्य सरकारने करावे. सन्माननीय सदस्य श्री. योगेशदादा कदम यांनी सांगितले की, कोकणामध्ये बांबू लागवडीस प्राधान्य दिले पाहिजे. कोकणामध्ये डोंगराळ भागातील चढ-उतार येथे भिंती बांधण्याचे काम करण्यात येणार आहे. डोंगरमाथ्यावर जर बांबू लागवड अधिक चांगल्या प्रकारे केली तर डोंगर घसरुन खाली पडण्याचे प्रमाण कमी होईल. कोकणातील भौगोलिक परिस्थितीचा विचार करता तेथील पानलोट क्षेत्राच्या कामांसाठी वेगळे निकष व मापदंड कोकणासाठी असावेत. जेणेकरुन या योजना तेथे प्रभावीपणे राबविता येतील.

अध्यक्ष महोदय, मी माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांचे आभार मानतो. मी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचा माजी विद्यार्थी आहे. या विद्यापिठाच्या सुवर्ण महोत्सावानिमित्त ५० कोटी रुपये देण्याचे मंजूर केले आहे. मी सन १९९० मध्ये एम.एससी. चे शिक्षण घेतले आहे. त्यावेळी असलेले तेथील बाके, इमारत आणि विद्यापिठातील फरशी अजूनही तशीच आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंटकरिता ५० कोटी रुपयांचा निधी दिला आहे. त्याप्रमाणेच येथेही इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंटकरिता ५० कोटी रुपयांचा निधी सुवर्ण

श्री. शेखर निकम ....

महोत्सवी वर्षात दिला तर तेथे अधिक चालना मिळेल. कारण माननीय श्री. शरद पवार यांनी तेथे १०० मुलींचे वसतीगृह मंजूर केले होते. त्यानंतर कोकण कृषि विद्यापिठात मोठे काम राज्य शासनाच्या माध्यमातून झाले नाही.

अध्यक्ष महोदय, मी पशुसंवर्धन विभागावरही माझे विचार मांडणार आहे. माझ्या मतदारसंघात कळबस्ते हे चिपळूण शहराजवळ गाव आहे. येथे पशुसंवर्धन विभागाची महामार्गाशेजारी ६ एकर जागा आहे. येथे लिक्विड नायट्रोज, गॅस प्लँट, फ्रोजन सिमेंट लॅब, तपासणी केंद्र, प्रयोगशाळा, शेळी-मेंढी कुक्कुटपालन, दुग्धोत्पादनाकरिता ट्रेनिंग सेंटर तयार केले तर या जागेचा उपयोग योग्य प्रकारे होऊ शकतो. पशु वैद्यकीय दवाखान्यातील कर्मचाऱ्यांचा प्रश्न सर्वच ठिकाणी आहे. शासनामार्फत कोकणात दूध संकलन केले जाते. दुधाचे पैसे शासनाच्या डेअरीकडून तीन-तीन महिन्यांपर्यंत वितरित केले जात नाहीत. त्यामुळे दूध आणि बर्फाचे पैसे मिळत नसल्यामुळे बाजुच्या जिल्ह्यातील खाजगी प्लँटकडून या जिल्ह्यातील दूध विकत घेतले जात आहे. मी दुग्धविकास मंत्री महोदयांना विंनती करतो की, हे पैसे दर महिन्याला देण्याची व्यवस्था करावी.

यानंतर श्री. चौधरी...

असुधारित प्रत

श्री.शेखर निकम.....

माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांचे मी मनापासून आभार व्यक्त करतो. कारण आमचे चिपळूण हे शहर पुरामुळे पुर्णपणे उध्वस्त झाल्यानंतर माननीय उप मुख्यमंत्र्यांनी पहिल्या टप्प्यात गाळ काढण्यासाठी १० कोटी रुपये मंजूर केले. त्यामुळे आज अख्ख्या महाराष्ट्रातील यंत्रणा तेथे अतिशय चांगल्या प्रकारे काम करीत आहे. परंतु या निमित्ताने माझी माननीय उप मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की आमचा दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्याचा निधी देखील लवकरात लवकर वितरित करावा. जेणेकरुन, आम्हाला पुरापासून संरक्षण मिळू शकेल. तसेच मंजूर करण्यात आलेल्या ३ हजार २०० कोटी रुपयांमधून डोंगरी भागात संरक्षक भिंती बांधण्याच्या कामाचा प्रस्ताव लवकरात लवकर मंजूर करावा, ही विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, चिपळूण, संगमेश्वर तालुक्यातील पंचायत समिती व तहसिल कार्यालये अद्ययावत करण्याबाबत देखील सरकारने विचार करावा.

अध्यक्ष महोदय, मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्यांवर बोलत आहे. पुरामुळे रत्नागिरी जिल्हयातील सर्वच रस्ते पुर्णपणे उध्वस्त झाले आहेत. हे रस्ते जिल्हा परिषदेंतर्गत येत असल्यामुळे निधीचा मोठा तुटवडा आहे. त्यामुळे माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांना या निमित्ताने माझी विनंती आहे की, हे सर्व रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करुन घ्यावेत व त्यासाठीच्या निकषांमधून आम्हा कोकणवासियांना सूट द्यावी. ज्याप्रमाणे काही सन्माननीय सदस्यांचे व्ही.आर. अर्थसंकल्पामध्ये मंजूर केले आहेत त्याचप्रमाणे आमचे देखील व्ही.आर. मंजूर करावेत, ही सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मागील अर्थसंकल्पामध्ये कुंडी आणि नेरद घाटामार्गे पाटण-कोल्हापूरला जोडणाऱ्या रस्त्यासाठी ५ कोटी रुपयांची तरतूद केली होती. परंतु पुढे त्याबाबत काहीही कार्यवाही झाली नाही. त्यामुळे याबाबत लवकरात लवकर कार्यवाही करावी, ही विनंती आहे.

श्री.शेखर निकम.....

अध्यक्ष महोदय, मी सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागावर बोलत आहे. काजू हे पीक आमच्या रत्नागिरी जिल्हयातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे आहे. आमच्या जिल्हयामध्ये मोठया प्रमाणाम काजू लागवड केली जाते. काजू उत्पादन व प्रक्रिया धोरणासंदर्भातील केसरकर समितीच्या अहवालाची तंतोतंत अंमलबजावणी करावी, अशी या निमित्ताने माझी मागणी आहे. तसे केल्यास आमच्या शेतकरी बांधवांना मोठया प्रमाणात फायदा होऊ शकेल.

अध्यक्ष महोदय, काजू प्रक्रिया उद्योगासाठी ज्या सोसायटया स्थापन करण्यात आल्या आहेत त्यांना गेल्या पाच-सहा वर्षांपासून भागभांडवलाच्या रुपाने निधी मंजूर करण्यात आलेला नाही. पूर्वी बाहेरुन आलेल्या युनिटस् ला मान्यता मिळालेली आहे. परंतु कोकणातील मार्लेश्वर फळ प्रक्रिया युनिट, राधा-गोविंद फळ प्रक्रिया युनिट यांना अद्याप मान्यता मिळालेली नाही. या सर्वांचे प्रस्ताव तातडीने मंजूर करुन मिळावेत, ही विनंती आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठया प्रमाणात फायदा होईल. तसेच राज्यातील बेरोजगार व स्वयंरोजगार संस्थांचे कार्यक्षेत्र महाराष्ट्रापर्यंत सीमित असावे.

अध्यक्ष महोदय, मी शालेय शिक्षण विभागाच्या मागण्यांवर बोलत आहे. कोकणातील शाळा या घर-दार विकून चालवाव्या लागतात, अशी परिस्थिती आहे. सन २००२ पासूनच्या शाळा देखील अनुदानापासून अद्याप वंचित आहेत. या शाळांमध्ये शिकविणारे शिक्षक अतिशय कठीण परिस्थितीतून जात आहेत. एका बाजूला मुंबई, पुण्यासारख्या शहरामध्ये दोन-दोन तीन-तीन लाख रुपये फीस देऊन मुले आंतरराष्ट्रीय शाळांमध्ये शिकत आहेत तर दुसऱ्या बाजूला आमच्या भागातील शाळांमध्ये गणिताचे शिक्षक नाहीत, इंग्रजीचे शिक्षक नाहीत अशी परिस्थिती आहे. जे शिक्षक उपलब्ध आहेत ते देखील विना अनुदानित तत्त्वावरील शाळांमध्ये काम करीत आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून इन्स्पेक्शनमागून इन्स्पेक्शन होत आहेत परंतु निर्णय मात्र होत नाही.

श्री.शेखर निकम.....

त्यामुळे माननीय शिक्षण मंत्र्यांना विनंती आहे की, या शाळांच्या याद्या लवकरात लवकर जाहीर कराव्यात. या शाळांचा २० टक्के अनुदानित शाळांमध्ये समावेश न करता १०० टक्के अनुदान द्यावे, ही विनंती.

अध्यक्ष महोदय, ज्याप्रमाणे विना अनुदानित शाळांमधील शिक्षकांची अनुदानित शाळांमध्ये बदली करण्यास मान्यता आहे त्याप्रमाणे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बदलीस देखील मान्यता देण्याबाबतचा शासन निर्णय तातडीने निर्गमित करावा, ही विनंती आहे. रत्नागिरी जिल्हयातील सर्वच तालुक्यांमध्ये शिक्षणाधिकारी कार्यरत नसून प्रभारी अधिकाऱ्यांमार्फतच काम पाहिले जात आहे. त्यामुळे याबाबत देखील कार्यवाही करावी. माझी या निमित्ताने सूचना आहे की, माध्यमिक शाळांसाठी कृषी शिक्षक नेमले तर शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांना कृषी शिक्षणाची आवड निर्माण होऊ शकेल. तसेच क्रीडा व कला शिक्षकांची देखील भरती केली जावी, ही नम्र विनंती आहे.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. शेखर निकम...

अध्यक्ष महोदय, क्रीडा विभागाच्या बाबतीत बोलायचे झाले तर पूर्वीच्या वेळी तालुका क्रीडा संकुलासाठी आपण १ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. परंतु नंतरच्या काळात शासनाचे ५ कोटी निधी मंजुरीचे धोरण निश्चित झाले. म्हणून माझी विनंती आहे की, जे जुने तालुका क्रीडा संकूल मंजूर केले त्याला आपण ५ कोटींचा निधी मंजूर करावा. हे तालुका क्रीडा संकूल लवकरात लवकर सुरू होणे गरजेचे आहे. आज बऱ्याच तालुका क्रीडा संकुलामध्ये मोकळी गुरे बांधली जातात आणि तेथील अवस्था अतिशय वाईट असते.

अध्यक्ष महोदय, पर्यटन व सांस्कृतिक विभागाच्या बाबतीत बोलायचे झाले तर माझी अशी मागणी आहे की, समुद्र असणाऱ्या ठिकाणी ज्याप्रकारे आपण मोठ्या प्रमाणात पर्यटन विकास करता. परंतु माझा मतदार संघ मोठमोठ्या डोंगर-दऱ्यांनी भरलेला आहे. त्यामुळे या मतदार संघामध्ये मार्लेश्वर, टिकलेश्वर, कर्लेश्वर तसेच छत्रपती संभाजी राजांनी जेथे वास्तव्य केले ते कसबा गाव आहे आणि श्रृंगारपूर हे देखील गाव आहे. तसेच येथे गोवळकोट किल्ला, महिपतगड किल्ला, महिमाजी किल्ला, भवनगड, भैरवगड असे किल्ले आहेत. त्यामुळे हे किल्ले विकसित करुन समुद्राबरोबरच डोंगराकडे सुध्दा शासनाने लक्ष द्यावे, अशी मी पर्यटन मंत्र्यांना विनंती करतो व माझे दोन शब्द संपवितो.

श्री. संजय केळकर (ठाणे) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ या वर्षाच्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सहकार विभागांतर्गत गृहनिर्माण संस्थांच्या बाबतीत मी अधिक बोलणार आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये सहकारी गृहनिर्माण संस्था सुमारे सव्वा लाखांच्या वर आहेत. सन २०१८ मध्ये या गृहनिर्माण संस्थांसाठी कलम १५४ (बी) असे एक स्वतंत्र प्रकरण मंजूर झाले होते. कायद्यानुसार त्याची नियमावली अद्याप तयार झाली नाही. आज त्या घटनेला ४ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्याचे उपविधी तयार नाहीत आणि तेथे अधिकारी वेठीस धरण्याचे काम करीत आहेत. म्हणून माझी विनंती आहे की, याबाबतची नियमावली लवकरात लवकर तयार व्हावी.

अध्यक्ष महोदय, ई वर्गातील गृहनिर्माण संस्थांसाठी जे निवडणूक निर्णय अधिकारी असतात त्यांचे अद्याप मानधन निश्चित झालेले नाही. याबाबतची नियमावली नसल्यामुळे भरमसाठ आकारणी केली जाते. त्यामुळे ती नियमावली लवकरात लवकर तयार होणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, खरं म्हणजे ६ महिन्यांपूर्वी ९७ वी घटना दुरुस्ती सर्वोच्च न्यायालयाने रद्द केली आहे. त्यामुळे याबाबतचे निवडणूक प्राधिकरण सुध्दा रद्द झाले पाहिजे. कारण ९७ वी घटना दुरुस्तीअंतर्गत हे निवडणूक प्राधिकरण होते. म्हणून माझी विनंती आहे की, हे प्राधिकरण बरखास्त करावे.

अध्यक्ष महोदय, गृहनिर्माण संस्थांच्या ज्या सांघिक संस्था आहेत मग त्या जिल्हा पातळीवर असोत की राज्य पातळीवरील असोत. त्यांना अधिसूचित करणे गरजेचे आहे. ते काम देखील लवकरात लवकर करावे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, डीम्ड कन्व्हेन्सच्या बाबतीत पूर्वी २२ प्रकारची कागदपत्रे सादर करावी लागत होती. परंतु मागच्या सरकारच्या काळात ती ८ प्रकारावर आणण्याचे काम केले गेले. तरी देखील डीम्ड कन्व्हेअन्सची कामे पाहिजे त्या गतीने पूर्ण होत नाहीत. तसेच डीम्ड कन्व्हेअन्स करताना गृहनिर्माण संस्थांतर्गत रस्ते असतील, मैदाने, क्लब हाऊस, सार्वजनिक सुविधांच्या ज्या बाबी आहेत त्या

श्री. संजय केळकर...

संबंधित संस्थांना किंवा फेडरेशनला दिल्या पाहिजेत. मात्र तशा त्या दिल्या जात नाहीत आणि त्या गृहनिर्माण संस्थांना त्याचा उपयोग होत नाही. तसेच अकृषक आकारणी एकदा भरल्यानंतर ती पुन्हा भरण्याची गरज पडू नये. तो अकृषक कर प्रत्येक वेळी वसूल करता कामा नये.

अध्यक्ष महोदय, क्रीडा विभागाच्या बाबतीत बोलायचे झाले तर गेल्या २ वर्षापासून छत्रपती पुरस्कार अद्याप जाहीर झालेले नाहीत. खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी हे पुरस्कार दिले जातात. त्यामुळे ते तातडीने जाहीर व्हावेत. दुसरी बाब म्हणजे एमएस-सीआयटीच्या वसुलीच्या बाबतीत तत्कालीन मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी आमच्या सरकारच्या काळात स्थगिती दिली होती. परंतु आता जे निवृत्त होत आहेत त्यांच्याकडून अशी वसुली केली जाते. त्यामुळे ती त्वरीत थांबवावी अशी मी विनंती करतो.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. संजय केळकर...

अध्यक्ष महोदय, केंद्र प्रमुखांची पदे भरण्यासाठी वारंवार विनंती केली जाते कारण त्यांची ६० टक्के पदे रिक्त आहेत. त्यामुळे स्पर्धा परिक्षेच्या माध्यमातून ही भरती झाली पाहिजे. तसेच सेवा ज्येष्ठतेमधून ५० टक्के भरती झाली पाहिजे. मधल्या काळात ऑनलाईन पद्धतीने होणारी बदली प्रक्रिया बंद होती ती तातडीने सुरु झाली पाहिजे. कोविडमध्ये प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षकांनी देखील थेट डॉक्टर आणि नर्सेसच्या अंतर्गत जाऊन काम केलेले आहे. परंतु आज एकाही शिक्षकाला जाहीर करण्यात आलेले ५० लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान मिळालेले नाही. वरिष्ठ आणि निवडश्रेणी प्रशिक्षणासाठी का शुल्क आकारले जाते ? कारण आज त्यांच्याकडून २ हजार रुपये शुल्क आकारले जाते, ते आपण रद्द करावे.

अध्यक्ष महोदय कॅशलेश विमा योजना सुरु करण्याचे मागच्या तीन वर्षापासून सांगितले जात आहे. परंतु ती योजना अजूनही सुरु झालेली नाही. मेडिकलच्या बिलामध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे. त्यामुळे ती योजना सुरु होण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, शिक्षणावर ६ टक्के खर्च होणे अपेक्षित आहे. परंतु मागच्या दोन वर्षात कोणत्याही बजेटमध्ये शिक्षणावरील खर्च ६ टक्के झालेला नाही. त्यामुळे तो खर्च वाढवला पाहिजे. आजही असंख्य शाळांमध्ये वीज नाही. महाराष्ट्रात १४ हजार शाळांमध्ये वीज नाही. तसेच मुलींसाठी शौचालये नाहीत. शालेय शिक्षण हा आमच्या भावी पिढीचा पाया आहे. त्यामुळे त्यावर अधिकाधिक खर्च झाला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, वित्त विभागावर बोलत असताना माननीय वित्त मंत्री श्री. अजित पवार सभागृहामध्ये उपस्थित आहेत. गृह निर्माण संस्थेच्या अंतर्गत अनेक कामे असतात. जून्या किंवा मोठया गृहानिर्माण संस्थेच्या अंतर्गत आमदार निधीतून आपण जर मंजूरी दिली तर तेथील नागरिकांच्या उपयुक्त बाबी करण्यात येऊ शकतात. त्याची आपण मान्यता द्यावी, अशी मी आपल्याला विनंती करतो. हा विषय नियोजन विभागाचा भाग असला तरीही माननीय श्री. अजित पवार हे राज्याचे उप मुख्यमंत्री आहेत. त्यामुळे मी हा विषय आपल्याला सांगत आहे.

श्री. संजय केळकर...

अध्यक्ष महोदय, वस्तु व सेवा कर विभागामध्ये जे कंत्राटी कामगार काम करतात त्यांचा मोबदला वाढविण्याची गरज आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये ठाण्यासारख्या मुख्य ठिकाणी म्हणजे तेथील १८ आणि पालघर जिल्ह्यातील ६ आमदार आहेत अशा २४ आमदारांचे विश्रामगृह बघितले तर आज अनेक वर्षापासून आम्ही त्याच्या संदर्भात मागणी करीत आहोत. परंतु अद्ययावत त्या ठिकाणी विश्रामगृहाची उभारणी झालेली नाही. ती उभारणी तातडीने करणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, पोलीस वसाहतीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून होत असले तरी देखील त्यामध्ये पोलीस हाऊसिंग पण येते. सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांना माझी विनंती आहे की, आपण हे काम पोलीस हाऊसिंगकडेच द्यावे. कारण सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून खूप निकृष्ट दर्जाचे काम केले जाते. पोलीसांसाठी टॉवर आहेत. यासाठी मागच्या सरकारला विनंती करुन आम्ही ७.५ कोटी रुपये आणले होते. परंतु तिथे खूप निकृष्ट दर्जाचे काम सुरु आहे. या कामासंबंधी मी स्वत: दोनदा भेटी दिल्या आहेत. माझी या निमित्ताने मागणी आहे की, या सर्व कामाची चौकशी झाली पाहिजे. कारण आमचे पोलीस कुटुंबीय तिथे राहतात. अशा प्रकारचे निकृष्ट दर्जाचे काम तिथे होता कामा नये.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून अनेक ठिकाणी दुरुस्ती आणि पुनर्विकास होत असतो. ठाण्यामध्ये रेशनिंग तसेच इतर छोटी छोटी कार्यालये आहेत. ती खूप पडीक झालेली आहेत. एका बाजूला ठाणे जिल्ह्याची लोकसंख्या वाढत आहे परंतु तिथे पुनर्विकास होत नाही. तीन महापालिकेतील लोकासंसाठी एकच तहसिल कार्यालय आहे. त्याचा पुनर्विकास होणे देखील गरजेचे आहे. तो झाला पाहिजे अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, पर्यटनर आणि सांस्कृतिक विभागाच्या बाबतीत बोलत असतना मी सांगू इच्छितो की, पुरातत्व विभागामध्ये आवश्यक असलेल्या पदांची प्रलंबीत असलेली भरती ताबडतोब करावी. ती कधी सुरु करणार आहात ? या ठिकाणी असंरक्षित गडकिल्ले मोठया प्रमाणावर आहेत. ते संरक्षित करण्याची गरज

श्री. संजय केळकर...

आहे. कारण ही सर्व आमची प्रेरणास्थान आहेत. हा आमचा ऐतिहासिक ठेवा आहे. तयाचे जतन करणे आमचे काम आहे. त्या ठिकाणी दुर्ग रक्षकांची नेमणूक करणे गरजेचे आहेत. आमचे जे दुर्ग किंवा गडकिल्ले आहेत तिथे निरनिराळया प्रकारचे पर्यटक तिथे जातात त्यामुळे त्यांची विटंबना होत असते. त्यामुळे तिथे स्थानिक ठिकाणचे दुर्ग रक्षक नेमणे गरजेचे आहे. त्या त्या ठिकाणी बायो स्वच्छतागृह उभे करणे आवश्यक आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर...

असुधारित प्रत

श्री. संजय केळकर.....

माझ्या मतदारसंघात कोकणेश्वर मंदिर हे अतिशय पुराणकालीन मंदिर आहे. ते आमचे ग्राम दैवत आहे. त्यासाठी भरीव निधीची तरतूद करावी. ठाण्यामधील जेल हा पूर्वी एक किल्ला होता. तेथे स्वातंत्र्य लढयातील क्रांतीकारकांना फाशी दिलेली आहे. तेथे स्मारक करण्याची योजना आहे. डीपीडीसीच्या माध्यमातून जरी निधी दिला जात असला तरी पर्यटन विभागाने देखील या करिता मदत करावी.

अध्यक्ष महोदय, सांस्कृतिक विभागाच्या संबंधी बोलू इच्छितो. राज्यात नवीन कलाकार निर्माण करायचे असतील तर हौशी नाट्यसंस्थांना सोयी दिल्या पाहिजेत. त्यांना सध्या रिहर्सल करण्यासाठी जागा नाही. जेथे थिएटर आहेत तेथे कमी दराने रिहर्सलकरिता जागा दिली पाहिजे, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, कृषी विभागातील एकच मुद्दा आहे. आज कोकणातील अनेक सदस्यांनी मुद्दे मांडले. येथील आंबा उत्पादक, बागायतदार संकटात आहे. साडे पाच लाख बागायतदार संकटात आहेत. गेली ५-६ वर्षे अवकाळी पाऊस होत आहे. थंडीमुळे मोहोर गळून पडतो. यामुळे आंबा उत्पादक बागायतदारांना मोठे नुकसान झेलावे लागते. या वर्षी २५ टक्के आंबा हाती लागणार आहे. माझी विनंती आहे की, वाहतुकीमध्ये किंवा नियमात चूक झाली तर मोठया प्रमाणात दंड आकारणी केली जाते, ती माफ करावी. आंबा बागायतदारांना भरीव मदत करावी अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, महापालिका क्षेत्रातील अनेक संस्थांमधील शिक्षकांना सातव्या वेतन आयोगानुसार वेतन दिला पाहिजे. मात्र त्यानुसार वेतन दिला जात नाही. कृषी क्षेत्राबाबत माझा एक मुद्दा आहे. पूर्वी शेतकी बाजार सुरु केले होते. या माध्यमातून शेतकरी व ग्राहक यांची सांगड घातली जात होती. पणन खात्याच्या माध्यमातून त्याला खीळ बसली आहे. शेतकी बाजार मोठया प्रमाणात सुरु झाले पाहिजेत. शेतकऱ्यांना एमएमआरमध्ये मोठे मार्केट आहे. त्यांना हे मार्केट उपलब्ध करुन दिले पाहिजे व पणन विभागाने प्रोत्साहन दिले पाहिजे. सामाजिक संस्थेच्या

श्री. संजय केळकर.....

माध्यमातून देखील शेतकी बाजार आयोजित केले जातात. या करिता प्रोत्साहन देणे, निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. मी या ठिकाणी ज्या मागण्या केल्या आहेत त्या संबंधीत मंत्री महोदयांनी मान्य कराव्यात, अशी विनंती करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

असुधारित प्रत

श्री. रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) : अध्यक्ष महोदय, सन २०२२ -२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, कृषी,पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास , सार्वजनिक बांधकाम व पर्यटन या संबंधी मी बोलणार आहे. माझ्या मतदारसंघात आरे कॉलनी आहे. येथे ३, १६२ एकर जागा आहे. मुंबई शहराला चांगले, शुद्ध दूध मिळावे म्हणून १९४९ साली आरे नावाच्या एका पारसी व्यक्तीला इंग्रजांनी दान केलेली जागा शासनाने ताब्यात घेतली. ३,१६२ एकर मधील जवळजवळ १,१६५ एकर जागा दुग्ध व्यवसायाकरिता व उर्वरित १,९९६ एकर जागा शासनाने मंजूर केलेल्या लोकांना दिली. मुंबईला शुद्ध दूध देण्यासाठी तबेल्यांकरिता ३२ ठिकाणी जागा दिली. पूर्वी टोन्ड दूध, होल दूध आरेच्या केंद्रावर मिळत होते. आता आरेमधील तबेलेधारक यांना जास्तीचा दर दिला जात नाही. यामुळे त्यांनी शासनाला दूध देणे बंद केले आहे.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.रविंद्र वायकर ...

ते शासनाला दुध देत नसतील तर शासनाच्या सर्व सुविधा कारण तबेल्याच्या माध्यमातून त्यांना बंगल्याची जागा मिळते, त्यांना आतमध्ये पाणी फुकट मिळते, बाकीच्या सोयी मिळतात. त्यांच्या नोकरवर्गाला राहण्याकरिता देखील त्या ठिकाणी जागा मिळते. ते शासनाला दुध देणार नसतील व त्यांचे तबेले तेथे असतील तर दापचरीच्या ठिकाणी ...मागच्या वेळेस शासनाने निर्णय घेतला होता. दापचरीच्या येथे त्या लोकांनी आपल्या येथे असलेली जनावरे त्या ठिकाणी शिफ्ट करावीत. ते धोरण शासन अंमलात आणणार आहे काय, याचे उत्तर देखील देणे प्रामुख्याने महत्वाचे आहे. आरे डेअरी जर पूर्ववत करणार असतील व हे तबेले चालणार असतील तर आरे डेअरी देखील पूर्ववत करण्यासाठी कोणतीही हरकत नाही. परंतु, ते करताना या दोन गोष्टींचा विचार करणे देखील महत्वाचे आहे.

अध्यक्ष महोदय, आरेमध्ये जवळजवळ १०० एकरची जागा ही पक्षी अभयारण्यासाठी सन २०१३ मध्ये प्रस्तावित केली होती. दि. ९ मे, १९८० रोजी शासनाने एक निर्णय घेतला होता. या निर्णयामध्ये सर्व्हे क्रमांक १८५, १८६, १८७, १८८, १८९ मधील १०० एकर जागा महसूल व वन विभागास हस्तांतरित करायची, असे स्पष्ट आदेश दिले होते. त्या अनुषंगाने बोरिवली विभागाच्या ... (अडथळा)... ते तबेल्यांसाठी हे मी वनाबाबत बोलत आहे. गेले पाहिजे म्हणूनच त्यांना आता याचा निर्णय घेणे गरजेचे आहे. तथापि, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरिवली विभागाच्या ... आरे गाव दुग्ध वसाहत येथे २०० एकर क्षेत्रामध्ये वन विभागामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्राणी संग्रहालय प्रस्तावित करण्यात आले होते. जो निर्णय दि.२४.७.२०१३ रोजी घेण्यात आला होता, त्याचे काय झाले, त्या बाबतीत देखील मंत्री महोदयांनी सांगावे. ही जी १०० एकर जागा मिळालेली आहे. त्या माध्यमातून आपण जो प्राणी संग्रहालयाचा निर्णय घेतला होता, त्याबाबत देखील आपण निर्णय घ्यावा व त्याबाबत माहिती दिली तर बरे होईल.

अध्यक्ष महोदय, या आरे कॉलनीमध्ये.... मी प्रामुख्याने शासनाचे आभार मानेन की, मुख्य रस्ता ७.८ कि.मी. चा तो मुंबई महानगरपालिकेला... १८८८ च्या

श्री.रविंद्र वायकर ...

कलम ३०६ अन्वये ताब्यात घेतला. त्या ठिकाणी जवळजवळ ६६ कोटी रुपये खर्च करुन तो मुख्य रस्ता आपण सिमेंटीकरण करीत आहोत. परंतु, आतमध्ये २७ आदिवासी पाडे आहेत. त्या २७ आदिवासी पाड्यांमध्ये ४५ कि.मी.चे रस्ते आहेत. ते ४५ कि.मी. चे रस्ते शासनाने आतापर्यंत कोणत्याही निधीतून... एक तर पदुमच्या बाबतीत त्यांना जो निधी दिलेला आहे, तो सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून अत्यंत अल्पसा येतो. त्यामुळे त्यातून काही होत नाही. तेथे सार्वजनिक बांधकाम विभागाचे २२ अधिकारी असेच बसून आहेत. निधी मिळत नसेल व २२ अधिकारी तेथे बसलेले असतील तर ते काय कामाचे? अनेक वर्षे तेथे निधी मिळत नाही. त्यांना कुठे तरी दुसरीकडे वर्ग करावे.

अध्यक्ष महोदय, माझी मागणी आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाचे २२ अधिकारी पदुमच्या माध्यमातून तेथे बसलेले आहेत. तेथे निधीची व्यवस्था नाही. आतील रस्ते देखील होत नाहीत. मग २२ जण तेथे बसून उपयोग काय? याकरिता पदुमच्या बाबतीत माझी एक विनंती आहे. पदुमची मालकी त्या रस्त्यांची असेल तर, आपल्या माध्यमातून मागणी आहे की, ते मुंबई महानगरपालिकेकडे वर्ग करावेत. केअरटेकर म्हणून मुंबई महानगरपालिकेकडे ते द्यावेत व मुंबई महानगरपालिकेने ते रस्ते बनवावेत, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, या आरे कॉलनीमध्ये अनधिकृत बांधकाम अत्यंत मोठ्या प्रमाणात होत आहे. सभागृहात मी अनेकवेळा याबाबतीत आवाज उठवला होता. अनधिकृत बांधकामे होतात त्याबाबतीत सी.ई.ओ. आरे यांनी देखील त्यांना पत्र दिले आहे की, पोलीस मिळत नाहीत. त्यांच्याकडे व्यवस्था नाही. माणसे नाहीत, मनुष्यबळ नाही, साहित्य नाही. माझी मागणी आहे की, मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून आरेच्या परिसरामध्ये जे अनधिकृत बांधकाम होते ते अनधिकृत बांधकाम मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून तत्काळ निष्कासित करण्यात यावे, त्याकरिता देखील त्यांना पोलीस बळ देण्यात यावे व मुंबई महानगरपालिकेकडे याचे वर्गीकरण करावे.

श्री.रविंद्र वायकर ...

अध्यक्ष महोदय, पर्यटन विभागाच्या मागण्यांवर बोलताना मला हे सांगावयाचे आहे की, माझ्या विभागामध्ये आरेला लागून एक चित्रनगरी आहे. या चित्रनगरीमध्ये म्हणजे दादासाहेब फाळके चित्रनगरीमध्ये मोठ्या प्रमाणात चित्रीकरण होतात.

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.रविंद्र वायकर...

अमेरिकेतील चित्रनगरीत तंत्रज्ञानाच्या आधारे युनिव्हर्सल स्टुडिओ बांधण्यात आला आहे. त्याप्रमाणेच रामोजी फिल्मसीटी उभारण्यात आली आहे. याच पद्धतीने चित्रनगरीचा विकास करण्यात यावा. याकरिता मास्टर प्लॅन अनेक वेळा तयार करण्यात आला असून त्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, ती करण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये आरे कॉलनी व जोगेश्वरी येथे गुंफा आहेत. त्यांचा विकास करण्यासंदर्भात न्यायालयामध्ये याचिका क्र. २४४५/२००४ दाखल करण्यात आली होती. त्यामध्ये गुंफेचे सौंदर्यीकरण, मजबुतीकरण करण्यात यावे व त्याच्या आजूबाजूला असलेली झोपडपट्टी काढण्यात यावी, अशा पद्धतीचा निर्णय देण्यात आला आहे. त्यानंतर तेथील झोपडपट्टी उठविण्यात आली. परंतु त्या गुंफेचे सौंदर्यीकरण व मजबुतीकरण अद्याप झाले नाही, ते करण्यासाठी लक्ष घालण्यात यावे, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम विभाग – माझ्या मतदारसंघामध्ये ३ भुयारी मार्गांचे काम मंजूर असून त्यामधील २ कामे सुरु आहेत व एक काम सुरु करणे बाकी आहे. पंपहाऊस व गांधी नगर येथील भुयारी मार्ग अद्यापही तसाच आहे, या कामांना गती देण्यात यावी. मेट्रोजवळ ज्या पद्धतीने ८ भुयारी मार्ग तयार केले आहेत त्याच पद्धतीने जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोडवर ५ व ७ क्रमांक मेट्रो येथे स्टेशन उभारण्यात येत असल्याने तेथे भुयारी मार्ग तयार करणे अत्यंत गरजेचे आहे. ओबेरॉय मॉल ते पंप हाऊस हा सर्व्हीस रोड होणे अत्यंत गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, सहकार विभाग – डीम कन्व्हेयन्स गतीमान पद्धतीने करण्यात यावेत, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मला बोलण्यासाठी संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. धन्यवाद !

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी तीन तास वेळ देण्यात आला होता. याबाबत माननीय विधानसभा उपाध्यक्ष यांचे समवेत मी व सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी चर्चा केली. सभागृहापुढे दुसरे काही कामकाज नसल्याने सदरहू चर्चा ६ तास केली तरी चालेल. या चर्चेत दोन्हीही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देण्यात यावी, अशी विनंती आहे.

असुधारित प्रत

श्री.लहु कानडे (श्रीरामपूर) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, वित्त विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, सहकार, पणन व सत्रोद्योग विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग या विभागांच्या अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी, त्यांना पाठिंबा देण्यासाठी व समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय वित्त मंत्री यांनी अर्थसंकल्प मांडताना विकासाची पंचसूत्री असा उल्लेख करीत पहिले सूत्र कृषि विकासाचे सांगितले आहे. त्यांनी कृषि विभागासाठी अत्यंत चांगल्या तरतूदी अर्थसंकल्पात केल्या आहेत. महाविकास आघाडी सरकारने कृषि विभागाच्या माध्यमातून अनेक चांगले निर्णय शेतकऱ्यांसाठी घेतले आहेत. त्याबद्दल त्यांचे कौतूक व अभिनंदन केले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, कोविड कालावधीत अवकाळी पावसामुळे व नैसर्गिक आपत्तीमुळे मोठ्या प्रमाणात शेतकरी कोलमडून पडले होते. अवकाळी पावसाच्या माध्यमातून निसर्गाने शेतकऱ्यांना सर्वात मोठी चपराक दिली होती. त्यावेळी सरकारने महात्मा फुले विकास योजनेच्या माध्यमातून सरसकट अनुदान देऊन शेतकऱ्यांना वेळोवेळी मदत केली.

यानंतर श्री.तेलंग....

श्री.लहु कानडे.....

त्यामुळे हा बळीराज पुन्हा एकदा उभा राहिलेला आहे. यासाठी कृषी मंत्री महोदयांनी अनेक योजनांची अंमलबजावणी केलेली आहे. त्यामुळे मी कृषी मंत्री महोदयांना देखील धन्यवाद देतो.

अध्यक्ष महोदय, कृषी मंत्री महोदयांनी संत सावतामाळी महाराजांच्या नावे रयत बाजाराची योजना मांडलेली आहे. या योजनेच्या मध्यमातून ३५ हजार स्थळांचे निश्चिती करण करण्यात आलेले आहे. पाण्याशिवाय शेती शक्य नाही, हे लक्षात घेऊन कमीत कमी पाण्यामध्ये पिके घेता यावीत म्हणून शासनाने ठिबक सिंचन योजना अंमलात आणली. या योजनेमध्ये अल्प आणि अत्यल्पभूधारकांना ५५ टक्के अनुदान दिले जात होते. या अनुदानास राज्य शासनाच्या २५ टक्के पूरक अनुदानाची जोड दिली. इतर शेतकऱ्यांना ४५ टक्के अनुदान दिले जात होते. त्याला राज्य सरकाच्या ३० टक्के पूरक अनुदानाची जोड दिली आणि अनुक्रमे ८० व ७५ टक्के एवढ्या मोठ्या प्रमाणावर अनुदान उपलब्ध करुन दिलेले आहे. यासाठी अर्थसंकल्पामध्ये देखील मोठी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे मागेल त्याला ठिबक अशी व्यवस्था निर्माण झालेली आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यातील ३५ हजारांपेक्षा अधिक शेतकरी अस्तित्त्वात नसलेल्या भूविकास बँकेच्या कर्जाने आजही पीडित आहेत. माझ्या श्रीरामपूर तालुक्यातील एक शेतकरी माझ्याकडे येऊन सांगितले की, मी अनेक वर्षांपूर्वी ट्रॅक्टरसाठी बँकेकडून कर्ज घेतले होते. त्यानंतर तीन-चार वर्षे नियमित कर्जफेड केली. परंतु दुर्दैवाने इतर अडचणीमुळे पुढील कर्ज फेडू शकलो नाही. त्यामुळे त्या शेतकऱ्यांचे ट्रॅक्टर बँकेने जप्त केले. त्या ट्रॅक्टरचा लिलाव करण्यात आला. त्या कर्जासाठी तारण म्हणून दिलेली जमीन देखील बँकेने जप्त केली. तरी देखील कर्ज फिटले नाही. त्यामुळे संबंधित शेतकऱ्याला ३ लाख ७५ हजार रुपयांची नोटीस पाठविण्यात आलेली आहे. तसेच त्या शेतकऱ्यांची उर्वरित जमीन जप्त करण्याची धमकी दिली. त्या भूविकास बँकेचे कर्जमाफ करण्यासाठी या अर्थसंकल्पामध्ये

श्री.लहु कानडे.....

मोठ्या प्रमाणावर तरतूद केलेली आहे. त्यामुळे ३४ हजार ७८८ कर्जदारांसाठी ९६५ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. त्यामुळे मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, पीकविम्याचे हप्ते भरुन देखील शेतकऱ्यांना पीक विमा मिळत नाही, अशी सर्व शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेत. माननीय श्री.अजित पवार यांनी सांगितले की, पीक विमा योजनेमध्ये काही सुधारणा झाली नाही तर राज्य सरकार त्यासंदर्भात स्वत: काही वेगळे निर्णय घेईल व शेतकऱ्यांना पीक विम्याची ग्वाही देईल. राज्यातील सर्व शेतकऱ्यांना योग्य पद्धतीने पीक विमा प्राप्त होईल, यासाठी तरतूद करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आलेले आहे. मी यानिमित्ताने कृषी मंत्री महोदयांच्या निदर्शनास एक गोष्ट आणून देऊ इच्छितो. वर्तमानपत्रामध्ये किंवा दूरदर्शनवर ऊस पिकांना आग लागल्याचे पाहतो. दीड वर्षे स्वत:च्या मुलाप्रमाणे जोपासलेला ऊस जळताना त्या शेतकऱ्याची काय अवस्था होत असेल याबाबत आपण विचार देखील करु शकत नाही.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

असुधारित प्रत

श्री. लहु कानडे.....

दुर्दैवाने ऊस जळालेल्या शेतकऱ्यांना ऊर्जा विभाग मदत करीत नाही. त्या शेतकऱ्यांना कोणतेही विमा संरक्षण मिळत नाही. यावर्षी मोठ्या प्रमाणात ऊस क्षेत्र वाढलेले आहे. साखर कारखान्यांकडूनही जळालेले ऊस लवकर उचलून नेले जात नाहीत. शेतकऱ्यांच्या हाती केवळ त्यांच्या दैवाला दोष देणे शिल्लक राहते. मी शासनाला यामार्फत विनंती करणार आहे. हे संकट कशा प्रकारे येत आहे, हे आपणास माहित आहे. अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना शासनाने मदत केली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, शालेय शिक्षण विभाग अतिशय चांगल्या प्रकारे काम करीत आहे. कोरोना काळात शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे काम केले आहे. या विभागाकडून 'Thanks to Teacher' हे अभियान राबविले. शिक्षकांचे कौतूक केले आहे. याबाबत मी विभागाचे आभार मानतो. शिक्षण विभागाचा टीईटी घोटाळा आपल्या समोर आला आहे. यातून हडकंप माजला आहे. मागील सरकारच्या काळत सुरु झालेला हा घोटाळा या विभागाने सर्व प्रयत्न करुन समोर आणला आहे. यात सामील असलेल्या अधिकाऱ्यांना, कंत्राटदार संस्थांच्या प्रमुखांना तुरुंगात पाठविले आहे. मला वाटते की, या प्रकरणाची अधिक सखोल चौकशी झाली पाहिजे. शिक्षक आणि त्यांच्या अध्यापनाबाबत समाजामध्ये गैरसमज पसरत गेला तर ते पुढील पिढीसाठी योग्य होणार नाही,असे मला या विभागाला नम्रपणे सुचवावयाचे आहे.

अध्यक्ष महोदय, जेव्हा आपण आंतरराष्ट्रीय शिक्षण धोरण, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा विचार करतो तेव्हा खऱ्या अर्थाने चांगल्या योजना, अत्याधुनिक स्वरुपाचे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी या विभागाकडून प्रयत्न केले जात आहेत. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण व्हावा, याकरिता विभागाकडून प्रयत्न करण्यात येत आहेत. उद्याचा भारतीय नागरीक विवेक बाळगणारा असेल आणि तो विवेकाची हत्या करणारा नसेल, असे प्रयत्न शिक्षण विभागाकडून केले जात आहेत.

श्री. लहु कानडे.....

अध्यक्ष महोदय, आजही जवळपास ५७ ते ५८ टक्के शासकीय शाळांमध्ये इंटरनेटची व्यवस्था नाही. सर्व शाळांना संगणक दिलेले आहेत. परंतु २५ टक्क्यांपेक्षाही अधिक संगणक बंद आहेत किंवा ते उपयोगात नाहीत. शिक्षणातील डिजिटायझेशनचा फायदा विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना होत आहे, हे आता सिद्ध झाले आहे. सर्व ग्रामपंचायतींना संग्रामच्या माध्यमातून गावागावांना इंटरनेट सुविधा दिली आहे. तशाच प्रकारे खेडेगावातील शाळांना इंटरनेट सुविधा देणे शक्य आहे. ही सुविधा द्यावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, मी वस्त्रोद्योग विभागासंदर्भात माझे मत मांडणार आहे. माझ्या मतदारसंघातील श्रीरामपूर येथे शासकीय सुतगिरणी होती. ती सुतगिरणी नंतरच्या काळात सहकाराच्या माध्यमातून चालविली गेली. अशीच एक सुतगिरणी राहुरी सहकारी साखर कारखाना येथेही होती. दुर्दैवाने या दोन्ही सुतगिरण्या बंद पडलेल्या आहेत. याद्वारे चार ते पाच हजार लोकांना रोजगार मिळत असत. परंतु या गिरण्या बंद पडल्यामुळे ते लोक बेरोजगार झाले आहेत. श्रीरामपूर येथील सुतगिरणीची संस्थेने विकत घेतलेली खाजगी जागाही विकण्यात आली आहे.

(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. कालिदास कोळंबकर)

यानंतर श्री. चौधरी...

श्री.लहु कानडे.....

शासनाने या गिरणीसाठी वन विभागाची ३७ एकर जमीन संपादित केली होती. त्या जमिनीवर देखील काही लोकांचा डोळा आहे. माझी आपल्यामार्फत माननीय वस्त्रोद्योग मंत्री यांना विनंती आहे की, सुतगिरणीची सदर जागा अबाधित राहिली पाहिजे. कारण नव्याने एम.एस.सी. ॲग्री, बी.एस.सी. ॲग्री केलेले, फार्मर्स प्रोडयुसर कंपन्या स्थापन करुन त्यामार्फत शेतमालांवर प्रक्रिया करणारे तरुण शेतकरी जिल्हयात व माझ्या मतदारसंघामध्ये मोठया प्रमाणात आहेत. ते तरुण ही सुतगिरणी पुन्हा सुरु करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. परंतु यामध्ये असलेली मोठी अडचण मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. नव्याने सुतगिरणी सुरु करायची असेल तर संबंधित तालुका कॉटन ग्रोइंग तालुका म्हणून जाहीर करण्याची अट घालण्यात आलेली आहे. माझ्या मतदारसंघातील ऊसाचे क्षेत्र कमी होऊन सुमारे ९ ते १० हजार हेक्टर कापसाचे क्षेत्र वाढले आहे. परंतु सर्व निकषांमध्ये बसून देखील आम्ही पाठविलेले प्रस्ताव दुर्दैवाने अद्यापही मंजूर होत नाहीत. श्रीरामपूर तालुका हा कॉटन ग्रोइंग तालुका म्हणून जाहीर करण्यासाठी कोणत्याही प्रकारची अडचण नाही, तो सर्व निकषांमध्ये बसत आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, सदर प्रस्तावास लवकरात लवकर मान्यता मिळावी व पूर्वीच्याच शासकीय जागेचा वापर करुन बेरोजगार झालेल्या कामगारांना पुन्हा रोजगार मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या सुशिक्षित युवा शेतकऱ्यांना मदत करावी.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्यांवर मी बोलत आहे. मंत्री महोदयांनी कोरोना काळात देखील या विभागामार्फत मोठया प्रमाणात कामे केली आहेत. राज्यभर सर्वत्र रस्त्यांची कामे सुरु असल्याचे चित्र दिसत आहे. मंत्री महोदयांनी अथक प्रयत्न करुन या कामांसाठी निधी उपलब्ध करुन दिला आहे. या निमित्ताने माझी एकच विनंती आहे. माझ्या तालुक्यातून तीन नद्या वाहतात. या नद्यांवर आवश्यक ठिकाणी पूल नसल्यामुळे दळणवळणामध्ये अडचणी निर्माण झाल्या आहेत. आम्ही लाख ते मालुंजे या प्रवरा नदीवरील पुलासाठीचा प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला आहे.

श्री.लहु कानडे.....

माझी या निमित्ताने विनंती आहे की, केवळ पूल नसल्या कारणाने आसपासच्या दहा ते वीस गावांना सुमारे वीस ते पंचवीस किलोमीटर वळसा घालून प्रवास करावा लागतो. त्यामुळे या छोटया-छोटया पुलांच्या बांधकामास शासनाने मंजुरी दिल्यास दळणवळण सुलभ करण्याचे आपले उद्दिष्ट अधिक वेगाने पूर्ण होऊ शकेल.

अध्यक्ष महोदय, एक लेखक व कवि म्हणून मला एका गोष्टीचा जरुर उल्लेख करायचा आहे. नवी मुंबई येथे १०० कोटी रुपये किमतीचे मराठी भवन व २५ कोटी रुपये संशोधन केंद्रासाठी देऊन पहिल्यांदाच मराठी भाषेची कुस उजवण्याचे काम या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आले आहे. १२५ कोटी रुपयांची भरभक्कम तरतूद माननीय अर्थमंत्र्यांनी केल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा प्रस्ताव आजही केंद्र सरकारकडे प्रलंबित आहे. यासंदर्भात राज्य सरकारचा केंद्र सरकारशी संवाद सुरु आहे. परंतु सदर प्रस्तावास मान्यता देण्यासाठी आपण सर्वांनीच अधिकाधिक प्रयत्न केले पाहिजेत, असे मला वाटते. मला अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

श्री.सचिन कल्याण-शेट्टी (अक्कलकोट) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, शेतीच्या संदर्भात भूमिका घेताना सरकार सातत्याने शेतकऱ्यांना फळबाग लागवडीसाठी प्रोत्साहन देते. सन १९९० च्या फळबाग लागवड योजनेनंतर सोलापूर जिल्हयामध्ये फळबाग लागवडीमध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली. सद्यस्थितीत सोलापूर जिल्हयामध्ये डाळिंब, आंबा, आवळा, सिताफळ, पेरु, द्राक्षे, इत्यादी फळपिकांखाली सुमारे एक लाख हेक्टर क्षेत्र आहे.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. सचिन कल्याणशेट्टी...

हे क्षेत्र वाढण्याचे मुख्य कारण म्हणजे शेततळ्यांची सोलापूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात निर्मिती झाली आहे. मागील २ वर्षापासून शासनाने नवीन शेततळ्यांच्या मंजुरीसाठी बंदी आणली होती. कालच्या अर्थसंकल्पीय भाषणात माननीय उपमुख्यमंत्री व वित्तमंत्री यांनी ही २ वर्षातील बंदी उडविली आणि शेततळ्यांच्या बाबतीत जी अनुदानाची ५० हजार रुपये ही रक्कम ७५ हजार रुपये केली. मी आपल्या माध्यमातून शासनाला सूचवू इच्छितो की, आपण जरी ही रक्कम ५० हजारावरुन ७५ हजार रुपये केली असली तरी या शेततळ्यासाठी साधारणपणे २ लाख रुपये इतका खर्च येतो. त्यामुळे ही अनुदानाची रक्कम ७५ हजार रुपयांऐवजी १ लाख करण्यात यावी, अशी माझी विनंती आहे. या व्यतिरिक्त सामुहिक शेततळे सुध्दा आमच्या सोलापूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात यशस्वी झाले आहेत. या सामुहिक शेततळ्यांवरील बंदी शासनाने अद्यापही उठविली नाही. पश्चिम महाराष्ट्रात अद्याप कुठेही सामुहिक शेततळ्यांना उपक्रम सुरू नाही. त्यामुळे या सामुहिक शेततळ्यांवरील बंदी शासनाने उठवावी, अशी माझी अर्थमंत्री यांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेते हे मुख्यमंत्री असताना त्या सरकारच्या काळात महात्मा गांधी राष्ट्रीय फळबाग लागवड योजनेमध्ये जे शेतकरी समाविष्ट होऊ शकत नव्हते किंवा त्या निकषात बसत नव्हते त्यांच्यासाठी स्वर्गीय भाऊसाहेब फुंडकर ही योजना अंमलात आणली होती. दुर्दैवाने मागील २ वर्षापासून ती योजना बंद आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये साधारण १७७६ हेक्टर इतकी फळबाग लागवड त्या योजनेंतर्गत झाली आहे. मला मंत्री महोदयांना विनंती करायची आहे की, ती बंदी देखील उठविण्यात यावी, जेणेकरुन फळबाग लागवडीचे उद्दिष्ट पूर्ण होईल आणि फळबाग लागवड मोठ्या प्रमाणात होईल.

अध्यक्ष महोदय, वित्त विभागाच्या बाबतीत बोलायचे झाले तर एक अत्यंत महत्त्वाचा आहे. ज्यावेळी आम्ही विरोधकांनी अशी मागणी केली होती की, दारुवरील कर कमी केला जात असेल तर पेट्रोल आणि डिझेलवरील कर का कमी केला जात नाही. त्यावर उत्तर देताना माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की,

श्री. सचिन कल्याणशेट्टी...

ज्या ठिकाणी युनियन टेरिटरीज आहेत तेथून नागरिक आपल्या राज्यात दारु आणतात. पर्यायाने आपल्या राज्याचा दारुवरील महसूल बुडतो. हे लॉजिक त्यावेळी माननीय अर्थमंत्र्यांनी सांगितले होते. परंतु मी या सरकारला विचारु इच्छितो की, आपण जे लॉजिक दारुच्या बाबतीत वापरले तेच लॉजिक पेट्रोल आणि डिझेलच्या बाबतीत का वापरत नाहीत.

अध्यक्ष महोदय, मी सीमावर्ती भागात राहतो. कर्नाटकाच्या काठावर राहतो. पलिकडे कर्नाटक राज्यात डिझेल आणि पेट्रोल १०, १२ ते १३ रुपयांनी स्वस्त आहे. त्यामुळे आपल्या राज्यातील नागरिक पलिकडे कर्नाटक राज्यात जाऊन डिझेल आणि पेट्रोल भरुन आणतात. अशा वेळी आपल्या शासनाचा महसूल बुडत नाही काय, हा माझा प्रश्न आहे. त्यामुळे शासनाने दारुच्या बाबतीत जे निकष किंवा नियम लावले आहेत तेच नियम पेट्रोल आणि डिझेलच्या बाबतीत लावावेत, अशी माझी विनंती आहे. आपण चेकपोस्ट लावून दारुची तपासणी करु शकतो. पण पेट्रोल आणि डिझेलच्या बाबतीत आपण चौकशी करु शकत नाही. म्हणून माझी सरकार आणि वित्तमंत्र्यांना विनंती आहे की, जेव्हा सत्ताधारी पक्ष आवाज उठवायचे की, केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील टॅक्स कमी करा. पण ज्यावेळी केंद्र शासनाने हा कर कमी केला आणि देशातील इतर राज्यांनी सुध्दा त्यांचा व्हॅट कमी केला. मात्र महाराष्ट्र शासनाने व्हॅटमध्ये एकही रुपया कमी केला नाही. पेट्रोल आणि डिझेलच्या बाबतीत व्हॅट कमी केला तर सर्वसामान्य जनतेला दिलासा मिळेल, अशी अपेक्षा मी सरकारकडून बाळगतो.

अध्यक्ष महोदय, आता शेतकऱ्यांचा रासायनिक शेतीकडे फार मोठा कल वाढला आहे आणि आता आपल्याला ही रासायनिक शेती थांबवू सेंद्रिय शेतीमध्ये वाढ करायची असेल तर गोधन किंवा पशुधनामध्ये जास्तीत जास्त वाढ केली पाहिजे. जी भाकड जनावरे शेतकरी सांभाळू शकत नाहीत. कारण त्यांच्यापासून येणारे उत्पन्न बंद झाल्यानंतर ती जनावरे कत्तलखान्याकडे जातात. शेतकऱ्यांचा नाईलाज होतो. दुभती जनावरे दूध देण्याचे बंद झाल्यानंतर त्यांना सांभाळणे जिकीरीचे होते. त्यामुळे

श्री. सचिन कल्याणशेट्टी...

शासनाने यासाठी भाकड जनावरे संगोपन केंद्र उभे केले पाहिजे. जेणेकरुन ती भाकड जनावरे सांभाळली जातील. त्यातून त्यांचे गोमूत्र आणि शेण यामधून सेंद्रिय शेतीला शासनाला प्रोत्साहन देता येईल. म्हणून माननीय कृषी मंत्री आणि माननीय वित्त मंत्री यांनी माझ्या या मागणीचा विचार करावा व त्यासाठी सकारात्मकता दर्शवावी, ही विनंती. धन्यवाद.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री अबू आजमी (मानखुर्द-शिवाजीनगर) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ की अर्थसंकल्प में की अनुदानों की मांगों पर बोलने के लिए खड़ा हुआ हूं.

अध्यक्ष महोदय, मैं पर्यटन विभाग, शालेय शिक्षण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, कृषि विभाग एवं वित्त विभाग पर अपने विचार व्यक्त करना चाहूंगा.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम विभाग के लिए २८,६०४ करोड़ ७३ लाख ८ हजार रुपये का बजट दिया है. इस्माईल युसुफ कॉलेज हमारे लिए बहुत जज्बाती मुद्दा है. इस्माईल युसुफ कॉलेज सरकार के कब्जे में है. अंग्रेजी हुकूमत में सर युसुफ ने ये कॉलेज बनवाया था. हमने कई बार इस बारे में इस सदन में बात की है. जोगेश्वरी के वेस्टर्न हाईवे पर ये कॉलेज है. उसकी बाऊंड्री पर म्युरल बनाया गया है. सार्वजनिक बांधकाम विभाग ने बहुत अच्छा खासा पैसा खर्च किया होगा, उसमें बहुत लागत हुई होगी. लेकिन इस म्युरल में कहीं भी यह हाईलाईट नहीं किया गया, कॉलेज का जिक्र या उसका नाम उसमें है ही नहीं. कॉलेज बनाने वाले सर युसुफ का और कॉलेज का कही भी कोई जिक्र नहीं है. जब कि सन १९२० में एक अकेले शख्स ने अपने पास से एक बड़ा कॉलेज इसलिए बनाया था, कॉलेज बनाने का मकसद यह था कि जो मायनॉरिटी और मुसलमानों में उच्च शिक्षा की कमी है, वह उच्च शिक्षा किसी तरह से उनको दी जाए, इसके लिए वहां होस्टल बनाया, मस्जिद बनायी. लेकिन जहां पर म्युरल बना है, वहां पर कहीं भी इन चीजों का जिक्र नहीं है. यह कॉलेज केवल मुसलमानों के लिए ही नहीं है. सब के लिए दरवाजा खुला हुआ है. आज भी मुसलमानों में उच्च शिक्षा की कमी है, क्योंकि कॉलेजेस की बहुत कमी है. इतने बड़े म्युरल में कहीं भी इस बात का जिक्र नहीं है कि कितने बच्चों ने पढ़ाई की. कॉलेज की दीवार पर कुछ न कुछ लिखना चाहिए. एक चीज यह दिख रही है कि अमिताभ बच्चन की बड़ी बड़ी फोटो, सिर पर कुछ बोझ लेकर जा रहे है ऐसी कुली वाली फोटो दिखती है. कॉलेज की दीवार पर ये चीजें नहीं, बल्कि कॉलेज बनाने वाले, इस कॉलेज में पढ़े हुए बच्चे आगे कहां गए, क्या कर रहे है, ताकि लोगों के मन में ये बात आए कि इस कॉलेज में पढ़ने से इतने बच्चे अच्छे और आगे गए. इस तरह की जानकारी का जिक्र होना चाहिए था.

श्री अबू आजमी.....

अध्यक्ष महोदय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग के लिए ६६ हजार ५६६ करोड़ रुपये का बजट पेश किया गया है. एसएससी और एचएससी की परीक्षा में इस बार कई खराबियां देखने को मिली. परीक्षा केंद्रों पर शिक्षकों ने नकल करवाने में मदद की. एक मैं राज्य में गया था. मैं उस राज्य का नाम नहीं लेता हूं. मैंने मॅनेजर से पूछा कि स्कूल का खर्चा कैसे चलता है ? तो उन्होंने बताया कि हमारा ज्यादा खर्चा इससे निकलता है कि बच्चों को नकल करवाते है, उससे पैसे आते है, उससे काम होता है. ये बात स्कूल का मॅनेजर कह रहा है. मेरे महाराष्ट्र में तो ऐसा नहीं होता है. महाराष्ट्र में शिक्षा की अपनी एक बहुत बड़ी अहमियत है. लेकिन अब की बार परीक्षा केंद्र वहीं पर दिए गए थे जहां पर बच्चे पढ़ते थे. शिक्षक ने नकल करवाने में मदद की, तो मैं समझता हूं कि इससे शिक्षा का स्तर गिर जाएगा. इसलिए इसकी जांच होनी चाहिए. हमारे महाराष्ट्र में नकल करने के लिए बढ़ावा देने का काम बिल्कुल नहीं होना चाहिए. इस पर रोक लगनी चाहिए.

अध्यक्ष महोदय, अगर शिक्षा स्तर खत्म होगा तो फिर इससे क्या फायदा होगा ? इस बार यह बात बड़े पैमाने पर नजर आयी. पिछले साल स्कूल की फीस में १५ प्रतिशत रियायत सरकार की तरफ से दिलायी थी. पूरे महाराष्ट्र में ८० प्रतिशत स्कूलों ने इस पर अमल नहीं किया. लोग परेशान है. रोज फोन आते है कि स्कूल की फीस भरने के लिए पैसे नहीं है. सदन में एक फिल्म का टैक्स माफ करने के लिए बात होती है. कई राज्यों में फिल्म पर टैक्स माफ कर दिया गया. लेकिन स्कूल की फीस माफ नहीं होती है. विपक्ष के लोगों को अगर फिल्म पर का टैक्स माफ करवाना है, तो इस सदन में ये आवाज उठानी चाहिए कि गरीब बच्चों की फीस माफ होनी चाहिए. मैं आपसे निवेदन करना चाहता हूं कि पिछले और इस साल का मिलाकर यानी दो साल की गरीब बच्चों की ३० प्रतिशत फीस माफ कीजिए. स्कूल की फीस को लेकर आज बच्चे बहुत परेशान है, हमारे कार्यालय में बच्चों की बहुत भीड़ लगी रहती है.

श्री अबू आजमी.....

अध्यक्ष महोदय, नाईट स्कूल की ओर मैं आपका ध्यान दिलाना चाहता हूं. महाराष्ट्र में पहला नाईट स्कूल शायद महात्मा ज्योतिबा फुले जी ने सन १८८५ में पुणे में खोला था. लेकिन अब इसका रिवाज बिल्कुल खत्म होते जा रहा है. नाईट स्कूल इसलिए था कि जो बच्चे एसएससी, एचएससी की पढ़ाई नहीं कर पाए, कहीं पर नौकरी में लग गए, तो दिन में काम करके रात में वह अपनी शिक्षा पूरी करके डिग्री लेते थे. कई लोग पढ़े-लिखे नहीं थे. वे रात में स्कूल में आकर पढ़ाई करते थे. मुंबई में पढ़ाई के लिए एक बहुत अच्छा नेटवर्क था. मेरा निवेदन है कि इस ओर ध्यान दिया जाए. जो मजदूर और गरीब लोग है, जिनके माँ-बाप के पास कुछ भी नहीं है, बूढ़े है, एक ही बच्चा है और वह भी दिन के समय में कमाई करता है, तो कम से कम रात में वह स्कूल में जाकर पढ़ाई कर सके, कोई डिग्री ले सके. इससे मजदूर तबके के लिए बहुत फायदे की बात होगी.

अध्यक्ष महोदय, राज्य के सभी स्कूल के स्टाफ की वॅकन्सीज आज बंद है. अभी तक वॅकन्सीज भरी नहीं गई है. इसे जल्द से जल्द भरने की कोशिश की जानी चाहिए. जो शिक्षक सेवानिवृत्त हो चुके है, उनकी पेंशन और पी.एफ. पिछले आठ-दस महीनों से नहीं मिला है. पिछले दो सालों में अच्छे अच्छे लोगों की हालत खराब हो गई है. पिछले आठ-दस महीनों से इनको पेंशन और पी.एफ.नहीं मिला है, वह जल्द से जल्द देने की कोशिश की जानी चाहिए.

...यानंतर श्री नितनवरे

श्री अबू आजमी.....

अध्यक्ष महोदय, ३० से ४० प्रतिशत अनुदानित स्कूलों के कर्मचारियों को सेवा संरक्षण नहीं मिलता है. मेरी मांग है कि इनको सेवा संरक्षण दिया जाना चाहिए. ३० से ४० प्रतिशत अनुदानित स्कूलों की परमिशन के लिए, सभी त्रुटी पूरी करके शिक्षण विभाग में वेंटींग पर फाईल पड़ी है. जिन स्कूलों की त्रुटियां पूरी हुई है, उन स्कूलों को जल्द से जल्द परमिशन दी जानी चाहिए. इसी तरह से जिन स्कूलों का सर्व्हे हो चुका है और जिन्हें पात्र किया गया है, उन स्कूलों को अभी तक अनुदान नहीं मिला है, ऐसे पात्र स्कूलों को अनुदान दिया जाना चाहिए.

अध्यक्ष महोदय, सांस्कृतिक कार्य विभाग के बारे में मेरा कहना यह है कि हिंदी अकादमी और गुजराती अकादमी के बारे में पिछले साल के मुकाबले इस साल पैसा कम कर दिया गया है. हिंदी अकादमी के लिए पिछले साल एक करोड़ रुपये थे, अब इस साल ९५ लाख रुपये कर दिया गया. सिंधी अकादमी के लिए पिछले साल ७५ लाख रुपये थे, उसके लिए इस साल ४५ लाख रुपये कर दिया गया. गुजराती अकादमी के लिए पिछले साल ७५ लाख रुपये थे, तो इस साल ४५ लाख रुपये कर दिए गए है. उर्दू अकादमी कल्चरल विभाग में होनी चाहिए. सिंधी अकादमी, गुजराती अकादमी और अन्य सभी अकादमी कल्चरल विभाग में है. उर्दु अकादमी को मायनॉरिटी विभाग में क्यों लेकर गए, इसका क्या मतलब है ? क्या उर्दू मुसलमानों की है, मायनॉरिटी की है ?

अध्यक्ष महोदय, मैंने पहले भी कहा था कि गांधी जी की हत्या का एफआईआर पूरा उर्दू में लिखा गया था. उर्दू इस मुल्क की जुबान है. उर्दू इसी मुल्क में पैदा हुई है. सभी उर्दू को अपनाते है, लेकिन उसको दर्जा नहीं मिल रहा है. मेरा निवेदन है कि उर्दू अकादमी भी कल्चरल विभाग में होना चाहिए, मगर उसको मायनॉरिटी विभाग में रखा गया है. आर्ट और कल्चरल विभाग के लिए ३५८ करोड़ रुपये है. कई योजनाएं है. कला अकादमी का बजट है. उर्दू अकादमी कल्चरल विभाग में रहेगी तो इससे फायदा होगा.

श्री अबू आजमी.....

अध्यक्ष महोदय, पी.एल. देशपांडे कला अकादमी बहुत अच्छा काम कर रही है. मुंबई में एक प्रोफेसर श्री कादर खान जी थे. वे बहुत अच्छे ड्रामा रायटर और बहुत अच्छा ड्रामा करने वालों में से थ उन्होंने कई फिल्में लिखी है. सरकार से मेरी मांग है कि "कादर खान मेमोरियल हिंदुस्तानी ड्रामा अकादमी" होना चाहिए. क्योंकि वे महाराष्ट्र में उर्दू और हिंदी ड्रामा करते है. उनके नाम से "कादर खान मेमोरियल हिंदुस्तानी ड्रामा अकादमी" बनायी जाएगी तो इससे बहुत फायदा होगा. वह काम किया जाना चाहिए.

अध्यक्ष महोदय, आपकी अनुमति से मैं एक पॉईंट ऑफ इन्फोर्मेशन रखना चाहता है. अब मार्च महीना आ गया. उसके बाद अप्रैल, मई और जून का महीना आएगा. बारिश शुरु होने में दो महीने बाकी है. महानगरपालिका में सभी नगरसेवकों की टर्म खत्म हो चुकी है. मुंबई के सभी नाले कचरे से भरे है. हमारे इलाके में बहुत सारा कचरा नाले में भरा हुआ है. बारिश होगी तो पूरी मुंबई डूब जाएगी. इस ओर किसी का ध्यान नहीं है. नगरसेवकों की टर्म खत्म हो गई है. उन्हें पता है कि नई बाऊंड्री बन रही है, नया रिजर्वेशन आ रहा है. इसलिए इस ओर उनको उतना ध्यान नहीं देना है कि मेरा मतदार क्षेत्र रहेगा या नहीं. इसलिए इस ओर यदि ध्यान नहीं दिया गया तो मुंबई फिर पानी में डूब जाएगी. मेरा निवेदन है कि नालों की सफाई जल्द से जल्द की जानी चाहिए और उसकी अच्छी तरह से देखभाल की जानी चाहिए. ऐसा नहीं होना चाहिए कि लोग पैसे लेकर भाग जाते है और काम नहीं होता है.

अध्यक्ष महोदय, कार्पोरेशन में बहुत ज्यादा करप्शन बढ़ते जा रहा है. उस पर कहीं न कहीं रोक लगनी चाहिए और नालों की सफाई तुरंत और बरसात आने के पहले सब काम खत्म होने चाहिए, ऐसी मेरी मांग है, वरना बारिश में मुंबई डूब जाएगी. इस ओर ध्यान दिया जाना चाहिए. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं. धन्यवाद.

....यानंतर श्रीमती गिरप

श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२-२०२३ च्या अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्याकरिता उभा आहे.

अध्यक्ष महोदय, शासन निर्णयानुसार जून ते सप्टेंबर, २०१८ या कालावधीत तालुक्याच्या पर्जन्यमानाच्या ७५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झालेल्या १५१ महसूल मंडळांमध्ये दुष्काळ... यानुसार माझ्या मतदारसंघातील गंगाखेड तालुक्यातील गंगाखेड, माखपुरी, माखणी व राणीसारगाव तसेच पुर्णा तालुक्यातील लिमला या महसूल मंडळांचा समावेश करण्यात आला.

अध्यक्ष महोदय, आजतागायत सन २०१८ च्या हंगामातील दुष्काळबाधित शेतकऱ्यांना ४१ कोटी २५ लक्ष रुपयांचे अनुदान वितरित झालेले नाही. आपल्या माध्यमातून मला सरकारला हे विचारावयाचे आहे की, हा निधी शेतकऱ्यांना कधी मिळणार?

अध्यक्ष महोदय, खरीप हंगाम, २०२० मध्ये पिंपळदरी, तालुका गंगाखेड व शेळगाव, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी ... महसूल मंडळाचा सोयाबीन पिकाचा मंजूर असलेला पीक विमा गंगाखेड तालुक्यातील पालन तालुक्याला तूर पिकाचा मंजूर पीक विमा, सुमारे ५० कोटी २६ लक्ष, २३ हजार, ८०४ रुपये शेतकऱ्यांना आजपर्यंत मिळालेला नाही.

अध्यक्ष महोदय, रिलायन्स पीक विमा कंपनी शेतकऱ्यांना विम्याची रक्कम देण्यास टाळाटाळ करीत आहे. याबाबतीत मंत्री महोदय तसेच महाराष्ट्र राज्याचे माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांना यापूर्वी अनेकदा अवगत केले आहे. या मागणीकरिता गंगाखेड तहसील कार्यालयासमोर शेतकरी गेल्या २८ दिवसांपासून आमरण साखळी उपोषण करीत आहेत. तरी, आमच्या बळीराजाला न्याय कधी मिळणार, २०१८ चे अनुदान व खरीप हंगाम, २०२० चा पीक विमा कधी मिळणार? तो शेतकऱ्यांच्या खात्यावर लवकरात लवकर जमा करावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या मागण्यांवर देखील मला बोलावयाचे आहे. माझ्या गंगाखेड मतदारसंघातील मौजे धारासूर येथे अकराव्या

श्री.रत्नाकर गुट्टे ....

शतकातील हेमांडपंथी मंदिर चालुक्य काळात बांधलेले आहे. त्या मंदिरावर अत्यंत सुंदर नक्षीकाम केलेले आहे. ते मंदिर सद्य:स्थितीत पडण्याच्या अवस्थेत आहे. महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराण वास्तुशास्त्रविषयक स्थळे व .....अधिनियम, १९६०, सन १९६१ च्या महाराष्ट्र अधिनियमाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र .... याद्वारे फक्त प्राचीन ऐतिहासिक स्मारक असल्याचे मंत्रालय विस्तार भवन, मुंबई, ३२ व ..... दि. २७ फेब्रुवारी, १९९८ याप्रमाणे मौजे धारासूर, ता. गंगाखेड येथील गुप्तेश्वर मंदिरास स्मारक म्हणून जाहीर केले आहे.

अध्यक्ष महोदय, या बाबतीत सन २०१६ पासून तत्कालीन मुख्यमंत्री, पर्यटन मंत्री व पुरातन विभाग यांच्याकडे वेळोवेळी पत्र व्यवहार व पाठपुरावा केला असता, अवर सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र यांनी संचालक पुरातत्व वस्तुसंग्रहालय संचालनालय, मुंबई यांना सदर मंदिराची दुरावस्था झाली आहे का, याबाबतीत पाहणी करुन जिर्णोद्धारासाठी निधीची आवश्यकता आहे का, या बाबतचा अहवाल मागितला असता, सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग, नांदेड, महाराष्ट्र शासन यांनी मौजे धारासूर, ता. गंगाखेड येथील गुप्तेश्वर मंदिर हे अत्यंत दयनीय अवस्थेत असून त्याची मोठ्या प्रमाणात पडझड झालेली आहे. भविष्यात या मंदिराची अधिक पडझड होऊन या मंदिरामुळे आजूबाजूच्या नागरिकांना हानी होऊ नये याकरिता कृपया तातडीने सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात या मंदिराकरिता २१ कोटीचे जे पुरातन कालीन .... एस्टीमेट केलेले आहे ते पैसे ताबडतोब लवकरात लवकर देण्यात यावेत, ही विनंती.

अध्यक्ष महोदय, धान्य व अधिकोष सहकारी संस्था यांची नोंदणी खोट्या कागदपत्रांच्या आधारे झालेली आहे. ज्या कामांसाठी या संस्था नोंदणी झाल्या त्यासाठी या संस्थेचे कामकाज होत नाही. फक्त जिल्हा मध्यवर्ती बँक व मार्केट कमिटी यांच्या निवडणुकीत सहभागी होऊन संचालकांना निवडून आणण्यासाठी या संस्था

श्री.रत्नाकर गुट्टे ....

नोंदणी झालेल्या आहेत. यामुळे विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे प्रतिनिधित्व वंचित राहत आहे.

अध्यक्ष महोदय, आम्ही या संदर्भात सहनिबंधकांकडे कलम २१ ए अंतर्गत सदरील संस्थेची नोंदणी रद्द करण्याबाबत तक्रार देऊनही अद्याप काहीही कारवाई झालेली नाही. याबाबत आपणास माझी विनंती आहे की, शासनाने धान्य व अधिकोष सहकारी संस्था रद्द कराव्यात. आम्ही याबाबत सहकार आयुक्तांकडे एक ते दीड वर्षापूर्वी तक्रार केली आहे. परंतु, अद्याप काहीही कारवाई झालेली नाही. तरी, शासनाने या संस्था रद्द कराव्यात, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्यांवर थोडेसे बोलावयाचे आहे. माझ्या मतदारसंघात यावर्षी जो पाऊस झाला त्यात रस्ते वाहून गेले, पूल वाहून गेले. वाहून गेलेल्याचे नोट कॅम्पचे फोटो व विभागाने केलेले एस्टीमेट हे सर्व मी माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे माननीय मंत्री सर्व चिफ इंजिनिअर, एस.ई या सर्वांना दिलेले आहे.

नंतर श्री.शिंदे ....

असुधारित प्रत

श्री.रत्नाकर गुट्टे...

विभागाने २०० कोटी रुपयांचे अंदाजपत्रक तयार केले आहे. एवढे नुकसान झाल्याने विभागाने मागणी करुनही माझ्या मतदारसंघासाठी १० कोटी रुपये एवढा देखील निधी उपलब्ध करुन देण्यात आला नाही, हे मला खेदाने सांगावेसे वाटते. माझा मतदारसंघ नांदेडच्या सीमेवर आहे. तेथे खूप पाऊस झाला, ही बाब मला मान्य आहे. त्यासोबत माझ्या मतदारसंघामध्येही खूप पाऊस झाला आहे. तरी देखील नांदेड करिता १,८०० कोटी रुपये निधी देण्यात आला आहे. त्यांना २ हजार कोटी रुपये निधी दिला तरी हरकत नाही. परंतु माझ्या मतदारसंघालाही न्याय देण्यात यावा, अशी माझी विनंती आहे. माझ्या मतदारसंघासाठी १,८०० कोटी रुपयांच्या १० टक्के तरी निधी द्यावयास पाहिजे होता, तो देण्यात आला नाही. हा आमच्या भागातील शेतकऱ्यांवर करण्यात आलेला अन्याय आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये जांभूळ बेट पर्यटन स्थळ आहे. तेथील फळा व पालमच्या बाजूला एक पूल व रोड आहे. त्याच्या कामाची सुमारे ६ ते ६.५ कोटी रुपये अंदाजपत्रक असलेली प्रस्ताव मान्यतेसाठी व निधीसाठी मंत्रालयाच्या विभागाकडे २ वर्षापासून पडून आहे, त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही. फळा हे संत मोतीराम महाराज यांचे जन्मस्थळ आहे. तेथे दर एकादशीच्या दिवशी लाखो भाविक येतात. सदरहू ठिकाणचा पूल तयार करण्यात येत नाही, रस्त्याचे काम करण्यात येत नाही, त्यामुळे भाविकांना खूप त्रास होत आहे. सदरहू पूल पूर्ण वाहून गेला आहे. त्यामुळे आता त्या ठिकाणी भाविकांना उन्हाळ्यातही जाता येत नाही. याकरिता सदरहू कामास निधी देऊन तातडीने काम सुरु करावे अशी नम्र विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मला आपण बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. धन्यवाद !

डॉ.राहुल पाटील (परभणी) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री महोदय, उप मुख्यमंत्री व कृषि मंत्री महोदय यांचे मी प्रथम अभिनंदन करतो. स्व.वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाला सुमारे ५० कोटी रुपये विशेष अनुदान देऊन विद्यापीठाचा चांगल्या प्रकारे विकास करण्यासाठी मोलाचे सहकार्य शासनाने केले आहे.

अध्यक्ष महोदय,कृषि व पशुसंवर्धन विभागाचा स्वतंत्र अर्थसंकल्प पुढील वर्षापासून मांडण्यास सुरुवात केली तर राज्यातील शेतकऱ्यांना न्याय देण्याचे काम या सरकारच्या हातून झाल्या शिवाय राहणार नाही.

अध्यक्ष महोदय, माझ्या मागील टर्मपासून व मागील दीड वर्षापासून शालेय शिक्षणामध्ये कृषि विषय अनिवार्य करण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यासंदर्भात मागील वर्षी माननीय कृषि मंत्री व माननीय शिक्षण मंत्री यांनी निर्णय जाहीर केला आहे. आपले राज्य देशातील पहिले राज्य असेल ज्या राज्याच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षणामध्ये कृषि हा विषय अनिवार्य राहील. सदरहू प्रकरणीच्या घोषणेची अद्याप अंमलबजावणी सुरु करण्यात आली नाही, ती पुढील शैक्षणिक वर्षापासून करण्यात यावी, अशी माझी आग्रही मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, आपण एखाद्या रस्त्याच्या कामासाठी ४-५ कोटी रुपये निधी उपलब्ध करुन दिल्यास त्याचा मोठ्या प्रमाणात गवगवा करण्यात येतो. परंतु विद्यापीठाला संशोधन व तंत्रज्ञान विकासासाठी निधी उपलब्ध करुन दिला तर त्याबाबत काही समाजातील विभागाकडून टीका करण्यात येते. आपण जीवंत तंत्रज्ञान विकसीत करीत आहोत. आपल्या पुढील पिढीमध्ये शास्त्रज्ञ निर्माण केले तरच आपला देश टिकेल. याकरिता भविष्य काळात विद्यापीठाला संशोधन व तंत्रज्ञान विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी माझी मागणी आहे.

डॉ.राहुल पाटील...

अध्यक्ष महोदय, केंद्र शासनाने किसान ड्रोन योजना आणली आहे. शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करुन द्यावयचे असेल तर कृषि विद्यापीठांना अधिकाधिक निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, स्व.वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील ५० टक्के पदे रिक्त आहेत. आपला देश कृषि प्रधान देश आहे.

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

डॉ.राहुल पाटील.....

अशा वेळी एखाद्या विद्यापीठातील ५० टक्के पदे रिक्त राहत असतील तर कृषी विषयक संशोधन कसे होईल, कृषी क्षेत्रामध्ये संशोधन झाले नाही तर राज्यातील शेतकऱ्यांना विकसित तंत्रज्ञान कसे प्राप्त होईल. परभणी कृषी विद्यापीठाने राज्याला बि.टी. कॉटन दिलेले आहे. तसेच क्रांती भेंडीचे संशोधन देखील याच विद्यापीठाने केलेले आहे. त्यामुळे जास्तीत जास्त प्रयोगशाळा व त्यामध्ये उपकरणे उपलब्ध करुन देण्यासाठी भरीव निधीची तरतूद करणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर खाजगी कृषी महाविद्यालये स्थापन करण्यात आलेली आहेत. परंतु या महाविद्यालयामध्ये पदव्युत्तरचे शिक्षण घेण्यास मान्यता देण्यात ओलेली नाही. त्यामुळे शासनाने एमएससीचा प्रोग्राम शासनाने मंजूर करावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, राज्यामध्ये पशुधन जवळपास ४ कोटी इतके आहे. परंतु दरवर्षी फक्त ५०४ पशुवैद्यकीय डिग्री होल्डर पास होत आहेत. यापैकी काही पशुवैद्यकीय अधिकारी अमोल डेअरीमध्ये नोकरी करतात. काही पशुवैद्यकीय अधिकारी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची तयारी करतात तर काही अधिकारी केंद्रीय लोकसेवा आयोगाची तयारी करण्यासाठी जातात. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या पशुधनांची सेवा करण्याठी अत्यंत कमी डॉक्टर्स उपलब्ध होत आहेत. राज्यामध्ये पुरवठा आणि मागणी यामध्ये मोठ्या प्रमाणावर तफावत निर्माण झोलेली आहे. प्रत्येक जिल्ह्यामध्ये वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याचे शासनाने धोरण आखले आहे. तशाच पद्धतीने प्रत्येक जिल्ह्यामध्ये पशुवैद्यकीय महाविद्यालय उभारले पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, नागपूर येथील महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठामध्ये मोठ्या प्रमाणावर जागा रिक्त आहेत. एमएससी, पीएचडी झालेले विद्यार्थी जास्त प्रमाणामध्ये उपलब्ध नाही. संशोधन करण्यासाठी उक्त विद्यापीठामध्ये जास्तीत जास्त जागा भरण्यात याव्यात, अशी मी विनंती करतो.

डॉ.राहुल पाटील.....

अध्यक्ष महोदय, आता मोठ्या प्रमाणावर तंत्रज्ञान विकसित झालेले आहे. पूर्वी आरटीफिशिअल इनसिमीनेशन होते आता IVF झालेले आहे. एम्ब्रीयो ट्रान्स्प्लांट सुध्दा नागपूर येथे सुरु झालेले आहे. कारवड पाहिले की गोर पाहिले हे आता आपण ठरवू शकतो. शेतकऱ्यांना मदत किंवा जोडधंदा म्हणून प्रत्येक जिल्ह्यामध्ये एम्ब्रीयो ट्रान्स्प्लांट टेक्नॉलॉजी व IVF सेंटर निर्माण करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे यासाठी शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, राज्यातील वर्ग-१ व वर्ग-२ मधील पशुवैद्यकीय हॉस्पिटलमध्ये अधिकारी/कर्मचारी उपलब्ध नाहीत. ज्या हॉस्पिटमध्ये अधिकारी/कर्मचारीच उपलब्ध नसतील तर आपणास पशुधनाची सेवा कशी करता येईल, हा एक मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे.

अध्यक्ष महोदय, शेळीच्या दुधाला व शेळीच्या दुधापासून तयार केलेल्या चिजला जागतिक स्तरावर मागणी आहे. त्यामुळे दुष्काळी किंवा मराठवाड्यातील काही भागामध्ये शेळीचे दूध गोळा करुन त्यापासून चीज तयार करता येईल काय, याचा विचार करणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, मागील दोन वर्षांपासून पशुविम्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे येणाऱ्या काळामध्ये पशुविम्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. माणसांना पॅरामेडिकलची सुविधा आहे, तशीच जनावरांसाठी देखील पॅरामेडिकल बोर्ड तयार करणे आवश्यक आहे, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, या राज्यामध्ये जवळपास १ लाख १० हजार शाळा आहेत. परंतु यापैकी ७७ टक्के शाळा शिक्षक हक्क कायद्याची अंमलबजावणी करीत नाहीत. यापैकी काही शाळांना मैदान नाही तर काही शाळांना मुख्याध्यापकांना बसण्यासाठी कार्यालय नाही.

डॉ.राहुल पाटील.....

काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांना बसण्यासाठी डेस्क नाहीत. त्यामुळे राज्याच्या एकूण बजेटच्या ६ टक्के निधी शिक्षण विभागावर खर्च करण्यात यावा, अशी निती आयोगाने शिफारस केलेली आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

असुधारित प्रत

डॉ. राहुल पाटील.....

परंतु यात आजपर्यंत आपणास केवळ २ टक्के खर्च करणे शक्य झाले आहे. माननीय श्री. विनोद तावडे हे शिक्षण मंत्री होते तेव्हा आम्ही एक मागणी केली होती. मराठवाड्यात १००-१०० वर्षापूर्वीच्या निजामकालीन शाळा आहेत. त्या डिसमेंटल झालेल्या आहेत. आम्ही त्या शाळांचे स्ट्रक्चरल ऑडीट केले होते. त्यावेळेस त्या शाळा डिसमेंटल कराव्यात, अशा प्रकारचा शेरा संबंधित अभियंता यांनी दिला होता. माननीय श्री. विनोद तावडे हे शिक्षण मंत्री असताना याकरिता विशेष निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मी सातत्याने मागणी करीत होतो. परंतु तेव्हा त्यांनी हा निधी उपलब्ध करुन दिला नाही. ज्यावेळेस महाविकास आघाडी सरकार स्थापन झाले तेव्हा माननीय मुख्यमंत्री श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी निजामकालीन शाळांकरिता २०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. आज प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा डिसमेंटल करुन तेथे नव्याने शाळांचे बांधकाम करण्यात येत आहे.

अध्यक्ष महोदय, आपणास शिक्षण क्षेत्राला अधिकाधिक वाव द्यावा लागणार आहे. रोड आणि इतर इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट होईल. परंतु जोपर्यंत मनुष्याचा विकास होणार नाही, तोपर्यंत हे डेव्हलपमेंट मृत अवस्थेत राहील. भविष्यात शाळांची मदत करावी लागणार आहे.

अध्यक्ष महोदय, आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा विद्यापीठ माननीय क्रीडा मंत्री श्री. सुनील केदार यांनी राज्यात स्थापन केले आहे. याबाबत मी त्यांचे अभिनंदन करतो. राज्यात हे क्रीडा विद्यापीठ निर्माण झाले आहे. या विद्यापीठाचे उप केंद्र परभणी शहरात करण्यात यावे. याचे कारण असे की, परभणी कृषि विद्यापिठाने संकुलाकरिता २० एकर जमीन शासनाकडे दिली आहे. हे क्रीडा उप केंद्र मराठवाड्यात निर्माण करावे. मराठवाड्यात रेल्वे जंक्शन, राष्ट्रीय महामार्ग आहेत. तसेच येथे उत्तम प्रतीची जमीन आहे. त्यामुळे तेथे क्रीडा विद्यापिठाचे उप केंद्र निर्माण व्हावे, अशी मी मागणी करतो. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्पर्धांमध्ये साऊथ एशिअन्स गेम्सचाही समावेश करावा. परभणी येथील ज्योती गवते या नावाच्या युवतीने पुणे

डॉ. राहुल पाटील.....

मॅरेथॉन, साऊथ एशिअन गेम्समध्ये गोल्ड मेडल मिळविलेले आहे. या युवतीला वर्ग – ४ मधील पदावर नोकरी देण्यात येणार आहे. या युवतीने राज्याचे आणि देशाचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर नेले आहे. अशा या खेळाडुंना वर्ग – १ किंवा वर्ग – २ मधील पदांवर नोकरी मिळाली पाहिजे. ही मागणी मी सातत्याने क्रीडा विभागाकडे केली आहे. या विषयाबाबत दोन वेळेस बैठका घेण्यात आल्या आहेत. परंतु त्याबाबत कोणताही निर्णय झाला नाही. जे तरुण, तरुणी आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे आणि राज्याचा नावलौकिक करीत आहेत, अशा खेळाडुंना, विद्यार्थ्यांना शासकीय सेवेत वर्ग – १ किंवा वर्ग – २ मधील पदावर सामावून घेतले पाहिजे. अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, आज परभणी शहरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे सायन्स सेंटर उभारले जात आहे. याबाबत मी माननीय पर्यटन मंत्री श्री. आदित्य ठाकरे यांचे अभिनंदन करतो. परभणी शहरामध्ये सायन्स पार्क निर्माण केला जात आहे. याकरिता पर्यटन मंत्री महोदयांनी ११ कोटी रुपये मंजूर केले आहेत. ॲस्ट्रॉर्निकल सोसायटी ऑफ परभणी आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ यांच्या सामंजस्य कराराद्वारे सायन्स पार्कची निर्मिती होत आहे. अधुनिक औद्योगिक क्रांती – ४ मध्ये जवळपास १३ घटकांचा समावेश करण्यात आला आहे. यात रोबोटिक टेक्नॉलॉजी, आर्टिफिशअली इंटेलिजन्स, कोडींग, डी-कोडींग या सर्व गोष्टींचा समावेश या सायन्स पार्कमध्ये करण्यात आला आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे सायन्स पार्क परभणी शहरात तयार होत आहे. याचा फायदा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना होणार आहे. येथे शास्त्रज्ञ निर्माण व्हावेत, विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण व्हावी. यादृष्टीने या सायन्य पार्कची निर्मिती परभणी जिल्ह्यात करण्यात येत आहे.

यानंतर श्री. चौधरी...

डॉ.राहुल पाटील.....

मला सांगण्यास अभिमान वाटतो की, विज्ञान दिनाच्या दिवशी परभणी येथील कृषी विद्यापिठातून उपग्रह प्रक्षेपण देखील करण्यात आले. थोडक्यात काय तर ग्रामीण भागातील विद्यार्थी मागे राहिले नसून शहरी भागातील विद्यार्थ्यांशी स्पर्धा करण्याइतपत ऊर्जा आणि ताकद त्यांच्यामध्ये निर्माण झाली आहे.

अध्यक्ष महोदय, मी पर्यटन विभागाच्या मागण्यांवर बोलत आहे. मराठवाडयामध्ये औंढा नागनाथ, परळी वैद्यनाथ व घृष्णेवर अशी तीन ज्योतिर्लिंगे आहेत. तसेच साई बाबांचे जन्मस्थळ देखील परभणी जिल्हयामध्ये आहे. त्याच्या विकासासाठी १०० कोटी रुपये निधी देण्याची घोषणा माननीय अर्थमंत्र्यांनी केली आहे. हा १०० कोटी रुपये निधी मिळून धार्मिक स्थळांचा विकास झाल्यास पर्यटनास चांगला वाव मिळाल्याशिवाय राहणार नाही.

अध्यक्ष महोदय, मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्यांवर बोलत आहे. परभणी येथील जिल्हा न्यायालयाच्या इमारतीसाठी निधी उपलब्ध करुन द्यावा. न्यायालयाची जुनी इमारत मोडकळीस आलेली आहे. आसपासच्या चार-पाच छोटया इमारती भाडयाने घेऊन त्या ठिकाणाहून न्यायालयाचे कामकाज चालत आहे. यामुळे वकिलांसह सामान्य जनतेला मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, जिल्हा न्यायालयाच्या इमारतीसाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन द्यावा. तसेच आमच्या जिल्हयाच्या प्रशासकीय इमारतीचे काम सुरु असून त्यासाठी देखील जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी या निमित्ताने विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, नाबार्डमधून संबर - हाट्टा हा पूल मंजूर करुन दिल्यास मराठवाडा आणि विदर्भाला जोडणारा ब्रिज त्या माध्यमातून तयार होईल. माझ्या मतदारसंघातून राष्ट्रीय महामार्ग जातो. त्यावर अनेक अपघात होऊन आजपर्यंत ८५ लोकांचा मृत्यू झाला आहे. चार वर्षे उलटून देखील या महामार्गाचे काम सुरुच आहे. त्यामुळे सदर कंत्राटदाराला काळया यादीमध्ये टाकणार का, असा माझा प्रश्न आहे.

डॉ.राहुल पाटील.....

तसेच या महामार्गासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देऊन काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, केंद्र शासनाकडे आपली २५ हजार कोटी रुपये जी.एस.टी. ची थकबाकी आहे. ही रक्कम आणण्यासाठी माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली सर्वपक्षीय सदस्यांच्या शिष्टमंडळाने केंद्र सरकारकडे गेले पाहिजे, असेही या निमित्ताने सांगू इच्छितो. कोरोना महामारीमुळे राज्याचे उत्पन्न घटलेले आहे. त्यामुळे केंद्र शासनाने विविध योजनांमध्ये राज्यास सहकार्य केले पाहिजे, असे मला वाटते. मला अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेमध्ये सहभागी होण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानून माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

असुधारित प्रत

डॉ.किरण लहामटे (अकोले) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, कृषी विभागाच्या मागण्यांवर मी बोलत आहे. माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी अर्थसंकल्पामध्ये शेततळयांसाठीचे अनुदान वाढविले आहे, सिंचन क्षमतेसाठीचे अनुदान वाढविले आहे. ही योजना सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहचेल अशी मी माननीय कृषी मंत्र्यांकडून अपेक्षा व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, शेतकरी वाचवायचा असेल तर भविष्यकाळात शेतमालाला हमीभाव योजना आणणे अत्यंत आवश्यक आहे. कारण सद्यस्थितीत अवकाळी पाऊस आणि पर्यावरणातील बदलांमुळे शेतकरी हताश झाला आहे. आज परिस्थिती अशी आहे की ऊसाला तुरे येऊन देखील ऊस तोडणी होत नाही. शेतकऱ्यांसमोर अशा अनेक समस्या आहेत. दरम्यानच्या कोरोना काळात शेतमालाची मोठया प्रमाणात वाताहत झाली. त्यामुळे माननीय कृषी मंत्र्यांसह सर्व मंत्री महोदयांना विनंती आहे की, भविष्यकाळात शेतमालासाठी हमीभाव योजना आणावी.

अध्यक्ष महोदय, पशुसंवर्धन विभागाच्या मागण्यांवर मी बोलत आहे. आपण नवनवीन संकरीत वाण आणून दुग्धव्यवसाय वाढविण्याचा प्रयत्न करीत आहोत. असे करीत असताना आपण देसी व डांगी वाण जपण्याचा देखील प्रयत्न केला पाहिजे. अकोले, इगतपुरी आणि जुन्नर तालुक्यामध्ये डांगी जनावरे आहेत. परंतु त्यांच्या संवर्धनासाठी शासनाकडून विशेष प्रयत्न केले जात नाहीत. माझी विनंती आहे की, डांगी वाण जपण्यासाठी पशुसंवर्धन विभागाकडून नवीन योजना आणली पाहिजे.

यानंतर श्री.धुमाळे.....

डॉ. किरण लहामटे...

दुधाच्या बाबतीत बोलायचे झाले तर ज्या खाजगी संस्था आहेत त्या सरकारी दुध डेअरीपेक्षा किंवा संघांपेक्षा दुधाला चांगले दर देतात. त्यामुळे सरकारने या शेती पुरक व्यवसाय करणाऱ्या आमच्या दुध उत्पादक शेतकऱ्यांच्या दुधाला साजेसे दर दिले पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, मत्स्य व्यवसायाच्या बाबतीत बोलायचे झाले तर जुन्या काळामध्ये ज्यांनी मत्स्य व्यवसाय संस्था स्थापन केल्या आहेत त्यांना एका धरणावर एकच संस्था मासेमारी करण्याची परवानगी आहे. त्याचा शासन निर्णय आहे. पण तो आता बदलणे गरजेचे आहे. कारण या व्यवसायात नवीन कोणी येऊ इच्छित असेल व मासेमारी संस्था निर्माण करु इच्छित असेल तर त्या धरणाच्या क्षेत्रानुसार २, ४ किंवा ५ मासेमारी संस्था स्थापन करु शकले पाहिजेत असे धोरण शासनाने राबविणे अपेक्षित आहेत किंवा तसा शासन निर्णय निर्गमित होणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या बाबतीत बोलायचे झाले तर शालेय शिक्षणांतर्गत जिल्हा परिषद शाळांचा विचार केला तर इंग्रजी माध्यमाच्या शाळांशी जेव्हा आपण स्पर्धा करतो तेव्हा या शाळांना काही ठिकाणी इमारती नाहीत. काही ठिकाणी बसायला जागा नाही. हे उदाहरण मी माझ्या तालुक्यापुरते सांगत नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात अशी स्थिती आहे. ज्या ठिकाणी जिल्हा परिषदेच्या शाळांसाठी चांगल्या इमारती नसतील किंवा विद्यार्थ्यांना बसण्याची जागा नसेल तर त्या ठिकाणी चांगल्या इमारती आणि बसायला जागा उपलब्ध करुन दिली पाहिजे. त्याचबरोबर आपल्याला जर शाळा डिजिटल करायच्या असतील तर आणि आपण जर २१ व्या शतकामध्ये काम करतो असे म्हणत असाल तर या शाळा परिपूर्ण झाल्या पाहिजेत आणि तेथे गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले पाहिजे. शिक्षकांनी कोरोनाच्या काळातही शिक्षणाचे ज्ञानदानाचे काम खूप चांगल्या परीने केले आहे. शासनाकडून माफक अपेक्षा आहे की, या शाळांना विद्युत कनेक्शन मोफत दिले पाहिजे आणि त्यांना वीज बिल आकारणी करु नये. निदान शासकीय शाळांसाठी तरी हे धोरण शासनाने राबवावे. कारण त्या शाळांना उत्पनाचा

डॉ. किरण लहामटे...

स्त्रोत नाही. त्या शासकीय शाळा आहेत. त्यामुळे त्या वीजेचे बिल कोठून भरणार ? आपण एका बाजूला या शाळांचे वीज कनेक्शन कट करतो आणि दुसऱ्या बाजूला त्यांनी जगातील शाळांबरोबर स्पर्धा केली पाहिजे, अशी अपेक्षा करतो. त्यामुळे याबाबत शैक्षणिक धोरण राबवावे. दुसरे म्हणजे बरेचवेळा शिक्षक हे आंदोलनामध्ये अडकले असतात. विना अनुदानित शाळांच्या बाबतीत बोलायचे झाले तर अनुदानासाठी शिक्षकांचा कायम आंदोलनाचा पवित्रा असतो. जर शिक्षकच समाधानी नसेल आणि तोच कायम ट्रेसमध्ये असेल तर विद्यार्थ्यांना तो शिक्षण कसे देणार. यासाठी या शाळांना अनुदान दिले पाहिजे. मघाशी सन्माननीय सदस्यांनी मागणी केली की, २० टक्के, ३० टक्के असे करीत बसण्यापेक्षा जर काही शाळा परिपूर्ण असेल आणि गुणवत्तापूर्ण असेल व निकषामध्ये बसत असेल तर १०० टक्के अनुदानासाठी त्यांना पात्र ठरविण्यात यावे. अनुदानित शाळांच्या वाढीव तुकड्या आणि त्यांचे शिक्षक यासंबंधी शासनाने धोरण निश्चित करावे. कारण आज आपण देश महासत्ता होण्याचे आपण स्वप्न बघत असू आणि आपला महाराष्ट्र प्रगतीशील आहे असे म्हटले जात असेल तर मला असे वाटते की, सर्वात जास्त निधी हा शिक्षणावर खर्च होणे गरजेचे आहे. पण आपल्याकडे तसे होताना दिसत नाही. आपल्याकडे शिक्षणवर सर्वात कमी खर्च होतो आणि इतर बाबतीत आपण लक्ष देत आहोत. या निमित्ताने माझी विनंती आहे की, शिक्षणाचा दर्जा उंचाविण्यासाठी आपण या विभागाकडे विशेष लक्ष द्यावे.

अध्यक्ष महोदय, वित्त विभागाच्या बाबतीत बोलायचे झाले तर सर्वात महत्त्वाचे म्हणजे ज्या काही समस्या येतात, उदाहरणार्थ आदिवासींच्या बाबतीत २०१७ पूर्वी आपल्या राज्याचे बजेट पाहिले तर त्यांच्याकरिता राखीव ९ टक्के निधीमधून पगाराचा खर्च होत नव्हता. त्यापूर्वी तो जनरल बजेटमधून म्हणजे ज्याप्रमाणे इतर कर्मचाऱ्यांचा पगार होत होता त्यातून होत असे. २०१७ नंतर आदिवासी विकास विभागासाठी जे ९ टक्के स्वतंत्र बजेट असते त्यामधून हा खर्च होऊ लागला आहे. पण आदिवासींच्या विकासासाठी जो निधी खर्ची पडायला

डॉ. किरण लहामटे...

पाहिजे तितका तो पडत नाही. यासंबंधी अनेक सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले की, आजही आदिवासी भागात मूलभूत सुविधा मिळत नाहीत. तेथे रस्ते झालेले नाहीत, पिण्याच्या पाण्याच्या समस्या आहेत. म्हणून मला वाटते की, आदिवासींचे जे स्वतंत्र बजेट आहे ते पूर्णत्वाने राबविले गेले पाहिजे. ९.३३ टक्के इतके आता त्या विभागासाठी बजेट आहे. मागे आदरणीय श्री. शरदचंद्र पवार यांनी हे बजेट निर्माण केले. त्यानंतर फक्त ३-४ वेळा हे परिपूर्ण बजेट आदिवासी बांधवाकरिता वापरले गेले.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

डॉ. किरण लहामटे....

आतापर्यंत कोणत्याही शासनाच्या काळात हे बजेट पूर्णपणे वापरले गेले नाही. माननीय वित्त मंत्री श्री. अजित पवार यांच्याकडून माझी अपेक्षा आहे की, भविष्यकाळात तरी या आदिवासी बांधवांना न्याय दिला जावा. त्याचबरोबर बऱ्याच शासकीय कर्मचाऱ्यांना शाश्वत वृद्धापकाळाची काठी असणारी जूनी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी सर्वजण करीत आहेत. परंतु माननीय वित्त मंत्री श्री. अजित पवार यांनी या बजेटमध्ये काहीतरी सुतोवाच केला की, शिक्षकांसाठी जूनी पेन्शन योजना देण्याबाबतचा विचार आणि अभ्यास केला जात आहे. यासाठी मी सर्व सरकारी नोकरदारांच्या वतीने विनंती करतो की, त्यांच्यासाठी जूनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी वित्त विभागाने विचार करावा.

अध्यक्ष महोदय, क्रीडा विभागावर बोलत असताना मी सांगू इच्छितो की, या विभागाच्या माध्यमातून प्रत्येक तालुक्यामध्ये क्रीडा संकुल दिले जात आहे. त्याचबरोबर माझ्या अकोले तालुक्यामध्ये एक मोठे क्रीडा संकुल दिले जावे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाबतीत बोलायचे झाले तर रस्त्यांची देखभाल दुरुस्ती ही दोन वर्षासाठी असते. ती पाच वर्षासाठी झाली पाहिजे, अशी माझी विनंती आहे. कारण रस्ते बनविताना ठेकेदार ते क्वॉलिटीचे बनवत नाहीत. ६ महिन्यामध्ये त्या रत्स्यांना खड्डे पडत आहेत. रस्त्याच्या वरुन फक्त डांबराची डागडुजी केली जाते परंतु साइडपट्यांची डागडुजी केली जात नाही. साईडपट्यांची डागडुजी झाली नाही तर पहिल्या काळात मैलकोल असायचे त्यामुळे ते माती टाकण्याचे काम करीत होते. आता सर्व मैलकोल रिटायर झालेले आहेत. त्यामुळे साईडपट्या भरल्या गेल्या नाही तर रस्ते ३ ते ४ वर्षात खराब होत आहेत. या निमित्ताने माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांना माझी विनंती आहे की, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेची दुरुस्ती ५ वर्षाची असते तसेच साईडपट्यांसह सर्व रस्त्यांची देखभाल दुरुस्ती करण्यासाठी मेटेंनन्सचा काळ २ वर्षाचा न ठेवता ५ वर्ष करावा.

डॉ. किरण लहामटे....

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील प्रश्नांकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो, दोलारखिंड हा मुंबईला जोडणारा जवळचा रस्ता आहे. तो रस्ता आमच्या तालुक्यासाठी खूप महत्त्वाचा आहे. परंतु तिथे अभयारण्य आणि महाराष्ट्रातील प्रमुख प्राणी शेकरु हे मोठया प्रमाणावर आढळतात. त्यामुळे तो रस्ता निर्माण होण्यासाठी अडचणी निर्माण होत आहेत. यासाठी माझी अशी विंनती आहे की, भविष्यकाळात बोगद्याच्या माध्यमातून किंवा दोलारखिंड फोडून हा रस्ता पूर्णत्वाला जावा आणि माझ्या आदिवासी मतदारसंघाला न्याय मिळावा. त्याचबरोबर घाटणदेवीच्या सर्व्हेसाठी शहापूर आणि अकोले तसेच नगर जिल्ह्याला जोडणारा हा रस्ता आहे. तसेच हा रस्ता मुंबईचे अंतर कमी करणारा आहे. माननीय श्री. अजित पवार यांनी मागच्या वेळेला खास बाब म्हणून त्यावर ४ कोटी ७ लक्ष रुपये सर्व्हेक्षणासाठी दिले होते. भविष्यकाळात ते सर्व्हेक्षण पूर्ण झाल्यानंतर त्या रस्त्याच्या कामासाठी तरतूद व्हावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मूळा, प्रवरा आणि आधळा नदी या अकोले तालुक्यातील तसेच नगर जिल्हयची तहान भागविणाऱ्या मुख्य नद्या अकोले तालुक्यातून वाहत आहेत. त्या नद्यांवर बऱ्याच ठिकाणी पूल नसल्यामुळै गावकऱ्यांची अडचण होती. चाच पिंपळदरीचा जो पूल आहे तो प्राधान्यक्रमाणे पूर्ण होणे गरजेचे आहे. त्याच बरोबर पैठण शैलज येथील पूल मुळा नदीवर होणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, पर्यटन विभागाबाबाबत बोलताना मला एवढेच सांगायचे आहे की, माझा अकोले तालुका म्हणजे जगातील दुसरे काश्मिर आहे. एवढा निसर्गाने नटलेला हा अकोले तालुका आहे. परंतु तिथे दळणवळणाची साधने नाहीत. दोन वर्षाच्या काळात त्या ठिकाणी जो निधी उपलब्ध झाला आहे त्यातून रस्त्याची कामे होत आहेत. पर्यटनाचा आत्मा हा रस्ता आहे. आता रस्त्यांची कामे पूर्णत्वास जात आहेत. परंतु तिथे महाराष्ट्रातील सर्वांत उंच शिखर कळसूबाई आहे.तेथील सर्व पर्यटनाचा स्कोप वाढण्यासाठी त्या शिखरावर रोप वे व्हावा ही तेथील स्थानिकांची तसेच माझी देखील मागणी आहे. त्याचबरोबर तिथे विश्रामगड जो पट्टाकिल्ला

डॉ. किरण लहामटे....

म्हणजे महाराष्ट्रामध्ये जे भाग्यवान किल्ले आहेत त्यांना शिवरायांचा पदस्पर्श झाला, वास्तव्य लाभले त्यातील हा एक आहे. बऱ्हाणपूरच्या लढाईनंतर छत्रपती शिवाजी महाराज २२ दिवस या विश्रामगडावर विश्रांतीसाठी होते. त्यामुळे त्यांच्या पदस्पर्शाने ती पावनभूमी तयार झालेली आहे. माननीय पर्यटन मंत्र्यांना माझी विनंती आहे की, तिथे शिवसृष्टी उभारुन पर्यटनाला वाव भेटेल असा विकास झाला झाला तर चांगले होईल.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

श्री. किरण लहामटे...

भंडारदरा येथील परिसरात काजवा महोत्सव साजरा केला जातो. येथील गार्डनचा विकास केला तर पर्यटन क्षेत्राला चालना मिळेल. या परिसरात बाळेश्वर प्रमाणे अनेक किल्ले गड आहेत, त्यांच्या विकासासाठी शासनाने लक्ष द्यावे.

अध्यक्ष महोदय, सांस्कृतिक विभागासंबंधी मी बोलू इच्छितो. आमच्या येथील आदिवासी बांधव वेगवेगळे नृत्य करतात, ही त्यांची संस्कृती आहे. ती जपण्याकरिता शासनाकडून प्रयत्न केला पाहिजे. या सर्व विषयांच्या मागण्यांवर मी चर्चा केली असून त्यांना पाठिंबा देतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

असुधारित प्रत

ॲड. आशिष शेलार (वाद्रे पश्चिम) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३च्या अर्थसंकल्पावरील अनुदानांच्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी या ठिकाणी थोडक्यात ४-५ विषय मांडणार आहे. त्यावर मंत्री महोदय उत्तर देतील अशी अपेक्षा आहे. दि. ३ जानेवारी, २०२२ रोजी माननीय सहकार मंत्री यांना मी एक पत्र दिले होते,आता ते माझ्या हातात आहे. सहकार मंत्री महोदयांनी प्रधान सचिव, सहकार यांना सचिव निवडणूक प्राधिकरण यांचा अहवाल मागवण्यात यावा, असे दि. ५ मार्च रोजी लिहले आहे. माझी मागणी आहे. मुंबई शहरात ५० हजार पेक्षा अधिक गृह निर्माण संस्था आहेत. त्यांच्या नियमित निवडणुका घेण्यास परवानगी दिलेली आहे. मात्र ज्या लहान गृह निर्माण संस्था आहेत, ज्यांची संख्या २५० पेक्षा कमी आहे. त्यांना निवडणूक प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या ३५० निवडणूक अधिकाऱ्यांकडे जाऊन त्यांच्या परवानगीने निवडणूक अधिकारी नियुक्त करुन निवडणुका घ्याव्या लागत आहेत. निवडणुकीचा खर्च गृह निर्माण संस्थांवर आला आहे. माझ्या मतदारसंघातील एका ४० सदस्यांच्या संस्थेला २१ हजार रुपये खर्च आला. सह निवडणूक अधिकारी, मतमोजणी अधिकारी वाहतूक खर्च इ. वेगळे. यामुळे निवडणुकांवरील खर्च मुंबईतील मध्यमवर्गीयांवर टाकण्यात आला आहे. प्रत्येक सदस्यांच्या मागे किमान हजार ते दोन हजार रु. खर्च येणार आहे. हा खर्च अनाठायी आहे. खऱ्या अर्थाने मी जेव्हा पत्र लिहले तेव्हा जे उत्तर आले तेच उत्तर आज तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीत माननीय विरोधी पक्ष नेते यांनी प्रश्न उपस्थित केला, त्यावेळी दिले. या संबंधी असे उत्तर देण्यात आले की, तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित कार्यालयाकडून चौकशी करुन अहवाल मागवण्यात येत आहे. ३ महिन्यांपूर्वी लिहले तरी अहवाल मागवला जात आहे. आजच्या प्रश्नावर देखील अहवाल मागवला जात आहे. या संबंधी तातडीने निर्णय घेणे अपेक्षित आहे. २५० पेक्षा कमी सदस्य संख्या असलेल्या गृह निर्माण संस्थांना या जाचातून मुक्त करावे. त्यांना निवडणूक प्राधिकरणाकडे जावे लागते, तेथे २०-२५

ॲड. आशिष शेलार....

हजार रुपये भरावे लागतात, लाईनमध्ये उभे राहावे लागते. यामुळे जुन्या पद्धतीने निवडणूक झाली तर त्यांना सोयीचे होईल, या संबंधी मंत्री महोदयांकडून उत्तराच्या भाषणामध्ये आम्हाला अपेक्षा आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या हातात मत्स्य व्यवसाय विकास विभागाच्या संबंधी कागदपत्रे आहेत. या ठिकाणी संबंधित मंत्री महोदय नाहीत. माननीय मंत्री प्रा. वर्षा गायकवाड येथे आहेत. आपल्या मतदारसंघाचा देखील विषय आहे. सदनामध्ये आपली एकत्रित जबाबदारी आहे. मुंबईतील मत्स्य व्यवसाय करणारे कोळीवाडे व गावठाण या संबंधी संपूर्ण माहिती माझ्याकडे आहे. दि. ७ डिसेंबर २०२१ रोजी महानगरपालिकेने जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, मुंबई ओल्ड कस्टम हाऊस यांना मुंबई शहर कोळीवाडे व गावठाणाच्या सीमांकनाबाबत उत्तर दिले आहेत. यामध्ये शिवडी, सायन, कुलाबा, मांडवी व प्रिन्सेस डॉक, धारावी, वरळी, माहिम इ. ७ कोळीवाड्यांच्या संबंधी मुंबई महापालिका मत्स्यव्यवसाय करणाऱ्यांच्या घरांकरिता सीमांकन आवश्यक आहे. सीमांकन झाले नाही तर डीसीआरमध्ये नवीन चॅप्टर समाविष्ट करुनही उपयोग होणार नाही. नवीन चॅप्टर समाविष्ट केले तर कोळी, आगरी बंधूंना तसेच ईस्ट इंडियन यांना स्वत:च्या घराचा पुनर्विकास व रिपेअर करता येणार नाही.

यानंतर श्रीमती गिरप...

ॲड.आशिष शेलार ....

त्यामुळे जोपर्यंत सीमांकनाची चावी उघडत नाही, तोपर्यंत हे सर्व फायदे बंद होणार आहेत. यासाठी आम्ही सन २०१८ मध्ये प्रयत्न केला. त्यावेळेस महसूल खात्याने नोंद सुरु केली. परंतु, आता या आधी शिवडी ते माहिमपर्यंत... याबाबतीत विकास नियोजनामध्ये महापालिकेचे अभिप्राय काय आहेत तर, आराखड्यामध्ये नमूद केलेल्या समजुतीच्या टिपमध्ये गडद हिरवा रंग हा फिशरी विभागाच्या प्रतिनिधींनी व शिवडी कोळीवाड्याच्या प्रतिनिधींनी सदर कोळीवाड्याचे सीमांकन दर्शविण्याकरिता वापरला आहे. सदर गडद हिरव्या रंगाने दर्शविण्यात आलेली सीमांकने सुस्पष्ट नाहीत. तसेच, सदर सीमांकनास महसूल विभागाची मान्यता आहे किंवा कसे याबाबतची सुस्पष्टता नकाशात आढळून येत नाही.

अध्यक्ष महोदय, सर्वांना हेच उत्तर आहे. महसूल विभागाचा अभिप्राय महानगरपालिका असे म्हणते की, आम्हाला दिलेला नाही. त्यामुळे मत्स्य व्यवसाय करणाऱ्या कोळी बांधवांना त्यांच्या भागाचे सीमांकन करता येत नाही. त्यामुळे यातील काही भागात माननीय प्रा.वर्षा गायकवाड आपल्याला माहीत आहे की, सायन व धारावीच्या भागात तर कोळीवाड्याला स्लम डिक्लेअर केला. त्यामुळे महसूल खात्याचे अभिप्राय येईपर्यंत मत्स्य व्यवसाय विकास विभागाने देखील महसूल खाते व महानगरपालिकेला गावठाण कोळीवाड्यांच्या सीमांकनाचा विषय पूर्ण करा, या पध्दतीचे पत्र लिहिणे अपेक्षित आहे व त्याचे उत्तर आम्हाला अपेक्षित आहे.

अध्यक्ष महोदय, माझा तिसरा मुद्दा खऱ्या अर्थाने हा विषय नगरविकास विभागाकडे देखील येऊ शकतो किंवा आहेच परंतु, हा विषय कोळीवाड्याशी संबंधित असल्यामुळे मत्स्य व्यवसाय करणाऱ्या आमच्या बंधूना देखील त्याचा फटका बसतो. त्यामुळे मी हा विषय या ठिकाणी मांडत आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय श्री.आदित्य ठाकरे सभागृहात उपस्थित आहेत. त्यांच्या मतदारसंघातील हा विषय आहे. त्यामुळे ते देखील सकारात्मक विचार करतील, अशी माझी अपेक्षा आहे. माझ्या हातात "Report on spacing of

ॲड.आशिष शेलार ....

pillers on proposed extention of sea bride infront of Cleveland Bunder, Worli" आहे. तुम्हाला देखील माहीत आहे की, त्या क्लेव्हलँड बंदर वरळीतील जे आमचे कोळी बांधव आहेत ते आपल्या बोटी घेऊन समुद्रात जातात. मासेमारी करतात. त्या सर्वांचे असे म्हणणे आहे की, आमचे कोळी बांधवांचे जवळजवळ ८०० परिवार ,३०५५ लोक व जवळजवळ १९० बोटी वरळीतील क्लेव्हलँड बंदरावरुन समुद्रात जातात. मासेमारी करुन परत येतात.

अध्यक्ष महोदय, आपण कोस्टल रोड बांधत आहोत चांगली गोष्ट आहे. परंतु, त्या कोस्टल रोडला ज्यावेळेस वरळीपासून बांद्र्याला कनेक्ट करु त्यावेळेस जे पिलर्स आपण करणार आहोत, त्या दोन पिलर्समधील अंतराबाबत त्यांची अशी मागणी आहे की, ते १६० मीटर असले पाहिजेत. सरकारचे असे म्हणणे आहे की, ६० मीटर... ६० मीटर तुम्ही ठेवत आहात. त्यांना १६० मीटर हवे आहे. सरकार असे म्हणते की, तुमचा अहवाल द्या. हा अहवाल आहे. या अहवालातील फक्त कन्क्लुजन मी वाचतो, "The vessels need a minimum span of 160 meters looking at the storm surge recorded on Mumbai coast for safe passage." हा सेफ पॅसेज करण्यासाठी त्या ठिकाणी १६० मीटर एवढे अंतर पाहिजे.

अध्यक्ष महोदय, हे मोजण्याकरिता त्यांनी जे पॅरामीटर्स घेतले आहेत ते ..... "In order to obtain storm waves numerical modelling run by National Institute of Oceonography (NIO) submitted by MCGM in 2017 is used in this study." याचा अर्थ महानगरपालिकेने सन २०१७ मध्ये NIO ला जे काम दिले, त्याचा स्टडी रिपोर्ट घेऊन कोळी बांधव असे म्हणत आहेत. ज्यांनी हा रिपोर्ट दिला ते त्या ठिकाणचे एक्सपर्ट सायंटिस्ट डॉ. सुरेंद्र ठाकूर-देसाई कोस्टल जिओमॉर्फालॉजी यांनी सुध्दा अहवाल दिला आहे. मंत्री महोदयांना त्याची कॉपी देखील देण्यात आली आहे. आमची विनंती आहे की, त्या कोळी बांधवांना जगण्याचे साधन केवळ मासेमारीचे आहे. १६० मीटरचा पॅसेज त्यांना द्या. त्या १६० मीटरमध्ये त्यांचे सर्व प्रश्न सुटतील. आपण त्यांना मदत करु, अशी माझी

ॲड.आशिष शेलार ....

विनंती आहे. मत्स्य व्यवसाय विकास विभागाने मंत्री महोदयांसमवेत बोलून उत्तर द्यावे, अशी आमची विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या हातात दांडा कोळी मासेमारी व्यावसायिक सहकारी संस्था यांचे पत्र आहे. माझ्या मतदारसंघात असलेल्या दांडा कोळी मासेमारी व्यावसायिक सहकारी संस्थेचे असे म्हणणे आहे की, त्यांच्या विभागातील सर्व्हे नंबर ४२३ ए, सीटीएस नंबर ११०५ हा भूखंड ॲग्रिकल्चर म्हणजे शेतीकरिता दाखविला. स्वातंत्र्यापूर्वीच्या काळापासून वर्षानुवर्षे मासे सुकविण्याकरिता ती जागा वापरली जाते. त्यांच्या हातात दि. ९ फेब्रुवारी, २०२२ ची पब्लिक नोटिस आहे. ज्यामध्ये या सीटीएस ११०५ पैकी ३४२२ स्क्वेअर मीटरला मोकळ्या जागेच्या भागात जेथे मासळी सुकविली जाते, त्या मोकळ्या जागेवर स्लम डिक्लेअर केलेली आहे.

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

ॲड.आशिष शेलार...

ज्या मोकळ्या जागेवर मासळी सुकवली जाते तेथे एसआरए योजना कशी राबविता येईल ? गृह निर्माण मंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित आहेत. त्यांनाही यासंदर्भात पत्र दिले आहे. खार दांडा येथील मासे सुकविण्याच्या मोकळ्या जागेत जसानी रिॲलिटी प्रा.लि.विकासक यांचेकरिता दिनांक ९ फेब्रुवारी, २०२२ रोजी स्लम जाहीर करण्याचे काम करण्यात आले आहे. या विषयाकडे मंत्री महोदयांनी लक्ष द्यावे. माननीय मत्स्यव्यवसाय मंत्री महोदयांनीही या विषयाकडे लक्ष द्यावे, त्यांनाही यासंदर्भात पत्र देण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, खार दांडा कोळी मासेमारी व्यावसायिक सहकारी संस्था यांचे दुसरे एक पत्र आहे. खार दांडा जुहू खाडी लगत जुहू कोळीवाडा येथील जागेच्या संदर्भात आहे. सन्माननीय सदस्य श्री.अमित साटम यांचा मतदारसंघाची सीमा ज्या ठिकाणी संपते त्या नाल्यापासून माझ्या मतदारसंघास सुरुवात होते. त्यामध्ये महानगरपालिकेचे एक पंपिंग स्टेशन आहे. ते तयार करताना बाजूच्या जागेत भराव टाकण्यात आला आहे. तेथे नवीन बांधकाम करु नये. जुहू किंवा खार दांडा येथील कोळी बांधवांची वर्षानुवर्षांची जागा आहे. तेथे ते नौका शाकारणे, जाळी सुकविणे, बोट मेन्टनन्स यार्ड, ड्रॉईंग फीश यार्ड व मोळे खेळाचे मैदान याकरिता ती जागा आवश्यक असून उक्त प्रयोजनासाठी ती उपलब्ध करुन देण्यात यावी. याकरिता दांडा कोळी मासेमारी व्यावसायिक सहकारी संस्था यांच्या विनंती अर्जानुसार त्यांना उक्त प्रयोजनासाठी जागा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मनपा मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना अद्याप ७ वा वेतन आयोग लागू करण्यात आला नाही. तो सन २०१६ पासून लागू होणे अपेक्षित होते. याप्रयोजनाकरिता महानगरपालिकेने ५० टक्के व ५० टक्के राज्य सरकारने निधी उपलब्ध करुन देण्याकरिता प्रस्ताव

ॲड.आशिष शेलार...

महानगरपालिकेने सादर केला आहे. त्यास अद्याप सरकारने संमती दिली नाही. हे सर्व कर्मचारी मराठी आहेत. त्यांना ७ वा वेतन आयोग लागू करण्यासाठी शिक्षण मंत्री महोदया यांनी सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम व क्रीडा विभाग – या दोन्ही विभागाच्या संदर्भात माझ्या काही मागण्या आहेत. आझाद मैदान, क्रॉस मैदान येथे खेळाच्या पिचेस् तयार करण्यात आल्या आहेत. या ठिकाणी मुंबई क्रिकेट असोशिएशन व वेगवेगळे क्लब खेळाच्या ॲक्टीव्हीटी करीत असतात. या सर्व पिचेस् ची लीज संपलेली आहे. त्यासंदर्भातील प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्रलंबित आहे. एमसीएमध्ये ३०० पेक्षा अधिक नवीन खेळाडू निर्माण करणारी फॅक्ट्री आहे. त्यांच्याकरिताच्या पिचेस् ची लीज संपलेली आहे, त्याच्या संदर्भात माहिती घेऊन सकारात्मक विचार करण्यात यावा, ही विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल व क्रीडा - या विभागाच्या विषयाशी संबंधी आणखी एक विषय आहे. वानखेडे स्टेडियमच्या तिकिटांचा करार राज्य सरकारमधील विविध विभागांशी झाला आहे. क्रीडा खात्याच्या मागण्यांवर चर्चा करीत असताना मी विनंती करणार आहे. माननीय पर्यावरण मंत्री यांनी या विषयाच्या संदर्भात एक बैठक घेतली आहे. आता दिनांक २५ व २६ मार्च, २०२२ पासून आयपीएल स्पर्धा सुरु होत आहे. आपण स्टेडिअममधील आसन क्षमतेच्या २५ टक्के प्रेक्षक आसनावरुन उक्त स्पर्धा पाहण्याची परवानगी दिली आहे. सदरहू स्टेडिअममधील आसन क्षमता ३२ ते ३३ हजार इतकी असून २५ टक्के परवानगीनुसार ८ हजार पेक्षा अधिक प्रेक्षक उक्त स्टेडीअमवर सामने पाहू शकणार नाहीत. ३०० ते ३५० क्लब आहेत. सदरहू सामन्यांचा मुंबई क्रिकेट असोशिएशनला एक नंबर कोटा राज्य सरकारला द्यावा लागतो. यामुळे सामान्य मुंबईकरांना टी.व्ही.व्यतिरिक्त स्टेडीअमवर सामने पाहण्याची संधी मिळणार नाही. बीसीसीआयचे काहीही म्हणणे असले तरी बीसीसीआय यांनी पत्ररुपाने विनंती केली असून

ॲड.आशिष शेलार...

त्यासंदर्भात सरकार निर्णय घेऊ शकते. आयपीएलच्या मॅचेसकरिता ब्रेबॉन, वानखेडे, डी.वाय आणि पुणे येथील स्टेडिअमकरिता २५ टक्क्यांऐवजी ५० टक्के प्रेक्षक आसन क्षमतेच्या वापराची परवानगी देण्यात यावी.

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

ॲड.आशिष शेलार.....

यासाठी आपण पुढकार घ्यावा व आजच्या विषयाचा संदर्भ घेऊन याबाबतचा निर्णय घोषित करण्यास कोणतीही अडचण नाही.

अध्यक्ष महोदय, बांद्रा येथे बांद्रा किल्ला आहे. उक्त किल्ल्याचे व आजूबाजूच्या परिसराचे सुशोभिकरण व रोषणाई करण्याचा प्रस्ताव दोन वर्षापूर्वी मी मुंबई महानगरपालिकेला दिला होता. परंतु तो प्रस्ताव महानगरपालिकेने व्यपगत केलेला आहे. वरळी येथील किल्ल्याचे सुशोभिकरण करण्यात आले, ही चांगली बाब आहे. परंतु बांद्रा येथील किल्ला देखील पर्यटनासाठी तेवढाच महत्त्वाचा आहे. आपण अर्थसंकल्पामध्ये हेरिटेज वॉक चे आश्वासन दिलेले आहे. त्यामुळे बांद्रा किल्ल्याचे देखील सुशोभिकरण करण्याबाबतची घोषणा पर्यटन विभागाने करावी, अशी विनंती करतो आणि मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद..

असुधारित प्रत

श्री.प्रकाश सोळंके (माजलगाव) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील विविध विभागाच्या अनुदानाच्या मागण्यावर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महादेय, प्रथम की कृषी विभागावर बोलू इच्छितो. या अर्थसंकल्पामध्ये कापूस आणि सोयाबीनसाठी १ हजार कोटी रुपयांचा कृती कार्यक्रम मान्य केलेला आहे. त्यामुळे याचा निश्चितपणे फायदा कापूस आणि सोयाबीन वाढीसाठी होईल, असा मला विश्वास आहे.

अध्यक्ष महोदय, मागील अनेक वर्षांपासून महाराष्ट्रामध्ये कापसाच्या बि.टी.-२ बियाणांचा वापर केला जात आहे. त्या बियाणांवर दिवसेंदिवस किडीचे प्रमाण वाढत आहे. अमेरिका किंवा चीन या देशांमध्ये बि.टी.-७ या सुधारित बियाणांचा वापर केला जात आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना देखील बि.टी-७ बियाणे उपलब्ध करुन देण्याबाबत प्रयत्न करावा, अशी मी विनंती करतो. या बियाणांमुळे कापसाचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन वाढणार आहे.

अध्यक्ष महोदय, कोकणासाठी बांबू पीक महत्त्वाचे आहे, तसे मराठवाड्यासाठी देखील महत्त्वाचे आहे. बांबू लागवडीसाठी प्रोत्साहन योजना सुरु करुन अनुदान देण्यात यावेत. त्यामुळे लहान शेतकऱ्यांना त्याचा फायदा होईल, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, वन्यप्राण्यामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. त्यामुळे सोलर कुंपनासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद केलेली आहे. राज्यातील प्रत्येक शेतकऱ्यांच्या शेतीला कुंपण झाले पाहिजे, या दृष्टिकोनातून निश्चितपणे निर्णय घ्यावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, माननीय श्री.आदित्य ठाकरे यांनी पर्यटन विभागाचा कारभार हातामध्ये घेतल्यानंतर पर्यटन विभागामध्ये अतिशय चांगले काम होत आहे. माझ्या मतदारसंघामध्ये एक हजार ते बाराशे वर्षापूर्वीचे प्राचीन मंदिरे आहेत. त्या ठिकाणी पर्यटकांची मोठी गर्दी होते.

श्री.प्रकाश सोळंके.....

परंतु सद्य:स्थितीत सदर मंदिरांची अवस्था अतिशय वाईट झाली आहे. त्यामुळे पर्यटन विभागाच्या माध्यमातून या मंदिराची दुरुस्ती केली व तेथे आवश्यक सुविधा उपलब्ध करुन दिल्या तर पर्यटक संख्येमध्ये मोठ्या प्रमाणावर भर पडणार आहे. त्यामुळे यासाठीचा एक प्रस्ताव पर्यटन विभागाकडे सादर केलेला आहे. उक्त प्रस्तावास लवकरात लवकर मंजुरी देऊन आवश्यक निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, माजलगाव प्रकल्पाचे बुडीत क्षेत्र जवळपास ७ हजार हेक्टर इतके आहे. त्यामुळे पर्यटन विभागाच्या माध्यमातून या धरणामध्ये वॉटर स्पोर्ट व ॲक्वॅरिअम करता येईल काय, याचा विचार करणे आवश्यक आहे. माजलगाव व हरणवाडी येथील धरणाच्या माध्यमातून पर्यटनास चालना देऊ शकतो, असा मला विश्वास आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

असुधारित प्रत

प्रकाश सोळंके....

अध्यक्ष महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी शालेय शिक्षण विभागासंदर्भात प्रश्न उपस्थित केले आहेत. शाळेतील वर्गखोल्या, स्वच्छतागृह, वीज, पाणी व इतर भौतिक सुविधांची माहिती याठिकाणी देण्यात आली आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळा, मराठवाड्यातील निजामकालीन शाळांकरिता अधिकचा निधी द्यावा व प्रत्येक शाळेला भौतिक सुविधा उपलब्ध करुन दिल्या तर शिक्षणाचा दर्जा निश्चितपणे वाढेल. मी माननीय शिक्षणमंत्र्यांचे आणखी एका गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छितो. माझ्या जिल्ह्यात आठ तालुके आहेत. या सर्व तालुक्यातील गट शिक्षण अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. यामुळे या जिल्ह्यातील शाळांवर गट शिक्षण अधिकाऱ्यांच्या माध्यमातून राहत नाही. यापासून हा जिल्हा वंचित आहे. या गट शिक्षण अधिकाऱ्यांची ११ ठिकाणी नियुक्ती करावी, अशी मी विनंती करतो. इंग्रजी माध्यमांच्या शाळांना शासनाच्या माध्यमातून अनुदान दिले जात नाही. या शाळांमध्ये राईट टु एज्युकेशनच्या माध्यमातून सक्तीने विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा कायदा आहे. विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी या शाळांनादेण्यात येणारे अनुदान मागील पाच वर्षापासून प्रत्येक शाळेचे अनुदान प्रलंबित आहे. दरवर्षी या शाळांना हे अनुदान मिळावे. जेणेकरुन गरिब विद्यार्थ्यांना याचा फायदा होईल.

अध्यक्ष महोदय, माननीय वित्तमंत्री यांनी अभय योजना सुरु केली आहे. जीएसटी कराच्या दाव्यांचा जवळपास ३.५ लाख व्यापाऱ्यांना फायदा झाला आहे. खरेदी-विक्री व्यवहारामध्ये एखाद्या परचेसरने व्हॅट ॲसेसमेंटमधील परतावा विक्रेत्यांनी कर न भरल्यामुळे वर्षानुवर्षे थांबविला जातो. मी वित्तमंत्री महोदयांना विनंती करतो की, त्यांनी याकडेही लक्ष द्यावे. हा कराचा परतावा मिळण्यासाठी योजना तयार करावी.

अध्यक्ष महोदय, सहकार विभागाबाबत मी मत मांडणार आहे. साखर कारखान्यांना इथेनॉल तयार करण्याशिवाय पर्याय नाही. केंद्र सरकारने याकरिता योजना तयार केली आहे. केंद्र सरकारकडून या प्रकल्पांना ६ टक्के इंटरेस्ट सबव्हेंशन देत आहे. परंतु राज्य सरकारमार्फत कोणतीही मदत केली जात नाही. बिहार राज्य

प्रकाश सोळंके....

इथेनॉल निर्मितीकरिता अनेक योजना तयार करीत आहे. परंतु महाराष्ट्र राज्य इथेनॉल उत्पादनाकरिता एकही रुपयाची मदत करीत नाही, ही अतिशय दुर्दैवाची गोष्ट आहे. म्हणून मला विनंती करावयाची आहे की, केंद्र सरकार ज्याप्रमाणे ६ टक्के इंटरेस्ट सबव्हेंशन देत आहे, त्याचप्रमाणे राज्य सरकारने किमान ३ टक्के इंटरेस्ट सबव्हेंशन स्कीम इथेनॉल प्रकल्पास चालना देण्याकरिता राबवावी.

अध्यक्ष महोदय, उद्योग विभागाची स्कीम ऑफ इन्सेन्टीव्हमधून सहकार क्षेत्राला वगळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एखाद्या सहाकरी साखर कारखान्याने इथेनॉल निर्मितीकरिता प्रकल्प उभा करण्याचे ठरविले तर त्या कारखान्यास हे इन्सेंटीव्ह नाकारले जात आहेत. परंतु खाजगी क्षेत्रातील उद्योजकांना हे इन्सेंटीव्ह दिले जात आहेत.

यानंतर श्री. चौधरी.....

असुधारित प्रत

श्री.प्रकाश सोळंके.....

अशा प्रकारची उलटी गंगा सहकार क्षेत्रामध्ये वाहण्यास सुरुवात झाली आहे व ही बाब अतिशय दुर्दैवी आहे. माननीय सहकार मंत्र्यांना विनंती आहे की, स्किम ऑफ इन्सेन्टिव्हमध्ये सहकार क्षेत्राचा समावेश झाला पाहिजे अशी भूमिका आपण मंत्रिमंडळासमोर मांडावी.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्यांवर मी बोलत आहे. हरित लवादाने नुकताच एक निर्णय दिला असून माननीय मंत्री श्री.अशोक चव्हाण यांचे लक्ष मी त्याकडे वेधू इच्छितो. पूर्वी रस्ते किंवा बांधकामासाठी लागणाऱ्या मुरुमासाठी तहसिलदार परवाना देत होते परंतु हरित लवादाने त्यावर बंदी आणली आहे. त्यामुळे रस्ता व इतर बांधकामाची कामे पूर्णपणे थांबतील की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे... (अडथळा...) बरोबर आहे, हा निर्णय महसूल विभागाशी संबंधित आहे. परंतु या निर्णयामुळे आपल्या विभागातील रस्त्यांची कामे बंद होणार असतील तर आपण देखील यामध्ये लक्ष घालावे अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये भात पिंपळगाव – तळोडा – कातरवण – सुरुडी दरम्यान हॅम अंतर्गत काम करण्यात आले आहे. हॅम अंतर्गत काम हाती घेताना त्या रस्त्याची सुरुवात आणि शेवट ही राज्य किंवा राष्ट्रीय महामार्गाला जोडणारी असली पाहिजे. परंतु या रस्त्याचे काम मात्र अर्ध्यातच संपविण्यात आले आहे. या मार्गावरुन पुढे गेल्यास खामगाव-पंढरपूर हा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक-५४८ (सी) आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, या रस्त्याचे आणखी १५ किलोमीटर लांबीचे काम पूर्ण करावे. जेणेकरुन सदर रस्ता राष्ट्रीय महामार्गाशी जोडला जाऊन तेथील नागरिकांना न्याय मिळेल.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये हॅम अंतर्गत पॅकेज क्रमांक एयू-१२३ पाडळसिंगी – पिंपळनेर – वडवणी – धारुर – आडस – लोखंडी सावरगाव हा रस्ता सन २०१८ मध्ये मंजूर झाला आहे. परंतु अद्यापही या रस्त्याच्या कामाची निविदा काढण्यास परवानगी देण्यात आलेली नाही. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांनी यासंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला आहे.

श्री.प्रकाश सोळंके.....

सदर प्रस्तावास लवकरात लवकर मान्यता द्यावी, अशी मी या निमित्ताने विनंती करतो व मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानून माझे भाषण संपवितो. धन्यवाद. जय हिंद. जय महाराष्ट्र.

असुधारित प्रत

श्री.राजेश पवार (नायगांव) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माझा पहिला मुद्दा पर्यटन विभागाशी संबंधित आहे. माननीय पर्यटन मंत्री श्री.आदित्य ठाकरे हे या ठिकाणी उपस्थित आहेत. आज छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती आहे. मी या निमित्ताने अत्यंत महत्त्वाचा मुद्दा उपस्थित करीत आहे. शुरविर जिवाजी महाले यांचे स्मारक किंवा पुतळा प्रतापगडावर उभारला जावा अशी फार जुनी मागणी आहे. सन २००५ मध्ये यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाचा ठराव झाला होता. परंतु अद्यापही काही कार्यवाही होऊ शकलेली नाही. त्यामुळे याबाबत तात्काळ निर्णय घ्यावा. मराठीमध्ये अशी म्हण आहे की, "होता जिवा म्हणून वाचला शिवा."

अध्यक्ष महोदय, माझ्या नायगांव मतदारसंघामध्ये अनेक सुप्रसिध्द धार्मिक स्थळे आहेत. त्यामध्ये राहेराहे, घुंगरा राहे, गगनबीड, नागठणा, सातेगाव, संगम, केदार वडगाव, नरसी येथील बालाजी मंदिर, बोळसा येथील मंदिर आणि येवती येथील मठाचा समावेश आहे. या तिर्थस्थळांची दर्जावाढ करुन त्यांच्या विकासासाठी निधी द्यावा, अशी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्यांवर बोलत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री माननीय श्री.अशोक चव्हाण यांचे मी सर्वप्रथम आभार व्यक्त करतो. कारण त्यांनी माझ्या मतदारसंघामध्ये बऱ्यापैकी निधी उपलब्ध करुन दिला आहे. परंतु माझा विषय मांडण्यासाठी मी प्रसिध्द संगीतकार खय्याम यांनी संगीतबध्द केलेल्या गझलच्या दोन ओळी ऐकवू इच्छितो.

यानंतर श्री.धुमाळे.....

श्री राजेश पवार.....

अध्यक्ष महोदय, मी माझा विषय मांडण्यासाठी प्रसिध्द संगीतकार श्री खय्याम यांनी संगीतबध्द केलेल्या गजलच्या ओळी आपल्याला ऐकवू इच्छितो.

"कभी किसी को मुकम्मल जहां नहीं मिलता,

जहां उम्मीद हो उसकी वहां नहीं मिलता."

मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आपण या ठिकाणी निधी दिला आहे. परंतु माझ्या मतदार संघामध्ये अजूनही तातडीचे असे बरेच रस्ते आहेत की, ज्यांना निधी मिळणे आवश्यक आहे.

असुधारित प्रत

कामकाजाच्या कार्यपध्दतीबाबत

श्री. नाना पटोले : अध्यक्ष महोदय, मला कामकाजाच्या कार्यपध्दतीबाबत विचारणा करायची आहे. आपण सर्व पक्षांसाठी वेळ ठरवून देतो. यासाठी कालमर्यादा निश्चित केली असली पाहिजे.

तालिका सभाध्यक्ष (श्री. कालिदास कोळंबकर) : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माननीय उपमुख्यमंत्री यांनी ६ वाजेपर्यंत वेळ ठरवून दिली आहे.

श्री. नाना पटोले : अध्यक्ष महोदय, रात्रभर कामकाज चालविले तरी त्याबद्दल आमची अडचण नाही. परंतु आमची विनंती अशी आहे की, काँग्रेस पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना बोलायची संधी द्यायची नाही काय ? आपल्याकडे असा काही ठराव झाला आहे काय ?

तालिका सभाध्यक्ष : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माझ्याकडे असा भेदभाव नाही. मी सर्व सन्माननीय सदस्यांना संधी देतो.

श्री. नाना पटोले : अध्यक्ष महोदय, कारण आमचे आतापर्यंत दोनच सन्माननीय सदस्य बोलले आहेत. आपण तो चार्ट तपासून पहावा. आमच्यावर अन्याय होऊ नये, अशी आमची अपेक्षा आहे.

तालिका सभाध्यक्ष : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, हे जाणुनबुजून होत नाही.

श्री. राजेश पवार : मी आपल्या माध्यमातून माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना विनंती करु इच्छितो की, माझ्या मतदार संघातील नायगांव तालुक्यातील शेळगाव छत्री ते सुजलेगाव ते औराळा-कोठाळा दुगाव रस्ता, कहाळा - पाटोदा - बरबडा ते अंतरगाव रस्ताकुंटूर ते सालेगाव ते डोंगरगाव रस्ता, ताकबीड ते पळसगाव ते देगाव रस्ता, घुंगराळा ते बळेगाव रस्ता तसेच उमरी तालुक्यातील शिंधी हुंडा बोळसा भायेगाव रस्ता, कोल्हा ढोलउमरी कार्ला पळसगाव रस्ता, गोदावरी नदीवरील

श्री. राजेश पवार...

भयेगाव - बरबडा गावावरील मोठ्या पुलाचे बांधकाम, तळेगाव - नागठाणा - बोळसा रस्ता, कौडगाव - हातणी - बोरजुनी - करकाळा - गोळेगांव - वाघलवाडा रस्ता, कळगाव ते गोरठा रस्ता तसेच धर्माबाद तालुक्यातील धर्माबाद ते बन्नाळी रस्ता, सिरजखोड - बामणी - मनुर संगम रस्ता, करखेली - धानोरा - सायखेड ते जारीकोट ते दिग्रस रस्ता या रस्त्यांच्या डांबरीकरणासाठी मंजूर होणाऱ्या पुरवणी मागण्यांमध्ये समावेश करावा, अशी मी आपल्याला नम्र विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, मी सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे ते आमच्या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात निधी आणत असल्यामुळे आभार व्यक्त करतो. परंतु आपल्या नांदेड जिल्ह्यामध्ये सर्वाधिक कामे के.टी.कन्स्ट्रक्शन ही कंपनी करीत आहे. त्यांच्याकडे अधिकचे कामे असल्यामुळे कामांचा दर्जा राखला जात नाही आणि बऱ्याच कामांना उशीर सुध्दा होतो. त्यामध्ये कोंडलवाडी धर्माबाद रस्ता जवळपास २ वर्षापासून संथगतीने सुरू आहे. तसेच नांदेड हैद्राबाद हा महामार्ग या कंपनीकडून केला जात आहे. मात्र तेथे बी.सी.चा जे लेअर नियमितपणे करावे लागते ते सदर कंपनी करीत नाही. त्या रस्त्याची देखभाल सुध्दा ते करीत नाहीत. त्यामुळे यावर कारवाई होणे अत्यंत गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, नायगांव हे शहर वाढत चालले आहे आणि ते महामार्गाच्या दोन्ही बाजूला विभागले गेले आहे. त्यामुळे नायगांव नर्शीसाठी या बाय-पास रस्त्यासाठी निधीचे प्रयोजन करावे आणि तोपर्यंत महामार्गाच्या एका बाजूवरुन दुसऱ्या बाजूने जाण्यासाठी पादचारी पूल नागरिकांसाठी करावा, जेणेकरुन अपघात कमी होतील. तसेच बऱ्याचशा पुलांची कामे देखील होणे गरजेचे आहे. नाबार्ड २७ योजनेमधून माझ्या मतदार संघातील एकाही पुलाचा समावेश झाला नाही. परंतु नाबार्ड २८ मध्ये तरी किमान गोळेगांव बेंद्री रस्त्यावरील पूल, सुजलेगाव राजगडनगर पूल, उमरी तालुक्यातील बेलदरी रस्त्यावरील पूल, सिरजखोड गावाजवळील गोदावरी नदीवरील पूल, राहेरी येथील पूल ही सर्व कामे पूर्णपणे नव्याने करण्याची गरज आहे. याकरिता आपल्या माध्यमातून केंद्रीय मंत्री माननीय श्री. नितीन गडकरी

श्री. राजेश पवार...

यांना आपण दोघांनी एकत्रितपणे जाऊन त्यांना विनंती करता येईल. तसेच धर्माबाद तालुक्यातील बनाळी रस्त्यावरील पूल सुध्दा तितकाच महत्त्वाचा आहे. मुगांव येथील पूल, सालेगांव येथील पूल यासाठी देखील निधीचे प्रयोजन करावे.

अध्यक्ष महोदय, या निमित्ताने मी आणखी एक बाब आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, केंद्रीय मंत्री माननीय श्री. नितीन गडकरी राज्यातील विविध रस्त्यांसाठी जवळपास २१०० कोटींचा निधी दिलेला आहे. त्यामध्ये आपल्या भोकर मतदार संघामध्ये २०६ कोटी रुपयांचा निधी दिला त्याबद्दल मी त्यांचे आपल्या व माझ्या वतीने आभार व्यक्त करतो. याबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, मोठ्या रस्त्यांबाबत आपल्याला केंद्रीय मंत्री माननीय श्री. नितीन गडकरी यांची मदत घेता येईल. परंतु आता मी ज्या रस्त्यांचा उल्लेख केला त्या रस्त्यांसाठी आपण येणाऱ्या काळात निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मी सार्वजनिक बांधकाम मंत्री महोदयांना विनंती करतो.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. राजेश पवार....

अध्यक्ष महोदय, कृषी विभागाबाबत मी एक मुद्दा मांडणार आहे. माझा मतदारसंघ हा पूर्णत: ग्रामीण असल्यामुळे तेथील प्रश्न अत्यंत महत्त्वाचे आणि ज्वलंत आहेत. शेतीचे तांत्रिकरण मोठ्या प्रमाणात होत आहे. शेतामध्ये काम करण्यासाठी मजूर मिळत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना ट्रॅक्टर घेण्यासाठी देण्यात येणारे अनुदान अत्यंत अत्यल्प आहे. माननीय कृषी मंत्र्यांना माझी विनंती आहे की, शेतकऱ्यांना ट्रॅक्टर देण्यासाठी किमान ५० टक्के द्यावे किंवा त्याबाबत विचार करावा. शेतीचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात होते तेव्हा हमी भाव खरेदीचा नियम आहे. परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही कारण अधिकारी किंवा बाजार समित्या त्याकडे लक्ष देत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना नाईलाजास्तव आपला माल विकावा लागतो. सरकार सुद्धा लवकर हमीभाव केंद्र स्थापन करीत नाहीत. ग्रामीण भागात एका तालुक्यात कमीत कमी १० ते १५ गोडाऊनची निर्मिती करावी. जेणेकरुन शेतमाल तारण योजनेचा लाभ शेतकऱ्यांना घेता येईल. त्याचप्रमाणे जेव्हा सरकार हमी भावाने खरेदी करते तेव्हा बऱ्याचदा १० दिवस खरेदी केंद्र बंद पडतात. कारण त्यांना माल ठेवण्यासाठी गोडाऊन नसते त्यामुळे गोडाऊन निर्मिती व्हावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय वित्त मंत्री श्री. अजित पवार यांनी पीक विम्याविषयी मत मांडले आहे की, पीक विम्यासाठी शासनाला नवीन कंपनी स्थापन करता येईल काय असा शासन विचार करीत आहे. हे करीत असताना मोठया प्रमाणात पीक यविमा योजनेमध्ये बदल करणे गरजेचे आहे. ज्यामध्ये उंबरठा उत्पन्न किंवा ज्या पद्धतीने शेतकऱ्यांचा सर्व्हे केला जातो. या सर्व बाबींची येणाऱ्या हंगामात दुरुस्ती करावी आणि अशा काळामध्ये निसर्गाच्या लहरीपणामुळे काही गॅरंटी नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना पीक विम्याचा मोठा सहारा मिळतो. त्यामुळे पीक विम्याचे धोरण मोठया प्रमाणात बदलणे गरजेचे आहे. जेणेकरुन शेतकऱ्यांना न्याय मिळेल. दुसरी एक बाब ही कृषी आणि सहकार विभागाशी निगडीत आहे. ती म्हणजे अनेक शेतकरी अत्यल्प महणजे २ एकर शेती असणारे असल्याकारणाने पीक कर्जाची मागणी मोठया

श्री. राजेश पवार....

प्रमाणात असते. आपण जर बघितले तर आपल्या लक्षात येईल की, पीक कर्जाचे वितरण होत असताना त्यातील ५० टक्के कर्ज १० ते १२ टक्के कमिशन घेऊन दलालामार्फत दिले जाते. जे प्रामाणिक शेतकरी असतात ते जेव्हा बँकेचा पाठपुरावा करतात त्यांना सांगण्यात येते की, त्यांची फाईल नांदेडला गेली. मग ती फाईल नांदेडवरुन कमीत कमी ५ ते ६ महिने येत नाही. अमेरिकेहून १५ दिवसात फाईल आली असती परंतु जिल्ह्याच्या ठिकाणावरुन येत नाही, अशी अवस्था आहे. त्यामुळे सहकार विभागाने याबाबत त्यांच्या डीडीआर कार्यालयाला सक्त ताकीद द्यावी. कारण की, फिल्ड ऑफिसर आणि मॅनेजर शेतकऱ्यांशी खूप आडमुठीपणाची भाषा करतात. तिथे गेल्यानंतर पिण्यासाठी पाणी नसते, बसण्यासाठी जागा नसते किंवा शौचालयाची व्यवस्था नसते. जिथे बोर्ड लावलेले असते ते एवढे छोटे कागद लावतात की दोन दिवसात ते फाटून जातात. त्यामुळे शेतकऱ्यांना माहिती देण्यासाठी तिथे कोणीही उपलब्ध नसते. दोन ते चार महिने तिथे चकरा मारतात. बऱ्याच ठिकाणी असे झालेले आहे की, उमरी येथे बँक ऑफ बडोदाची एक शाखा आहे तिथे कर्ज न देता शेतकऱ्यांची जमीन मॉडगेज केलेली आहे. आता त्याला ८ महिने झालेले आहे परंतु अद्याप त्यांनी ते मॉडगेज हटविलेले नाही. याबाबती सुद्धा कारवाई करण्यात यावी.

अध्यक्ष महोदय, आज विहिरींना एमआरजीएसमार्फत अनुदान दिले जाते. माननीय कृषी मंत्र्यांना माझी विनंती आहे की, "मागेल त्याला विहिर" यासाठी आपण अनुदान द्यावे किंवा यासाठी विचार करावा. त्याचप्रमाणे आता सेंद्रीय शेती करणे ही काळाची गरज आहे. कारण आता ग्रामीण भागात तसेच सर्व जगातच कॅन्सरचे प्रमाण वाढलेले आहे. त्यासाठी आज ग्रामीण भागात सेंद्रीय शेतीचा प्रयोग करण्यासाठी कोणाला सांगितले तर ते त्या गरीब शेतकऱ्यांना परवडत नाही. परंतु सेंद्रीय शेतीतून उत्पादित झालेल्या मालाला खूप चांगला आणि पटीने भाव मिळतो हे आपल्याला माहीत आहे. त्यामुळे सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी म्हणजे किमान मराठवाडा आणि विदर्भातील शेतकऱ्यांना तरी आपण भरघोस असे अनुदान द्यावे, अशी माझी

श्री. राजेश पवार....

विनंती आहे. त्याचप्रमाणे नांदेड जिल्ह्यातील काही जणांची २७ टक्के तर काही जणांची १०० टक्के पीक विम्याची रक्कम अशी १३० कोटी रुपये पीक विमा कंपनीकडून देणे अजून बाकी आहे. या बाबतीत मी आपल्याशी चर्चा देखील केली आहे. पीक विमा कंपनी एका आठवड्यामध्ये ही रक्कम देणार होती परंतु अद्यापही दिलेली नाही. त्याबद्दल आपण कारवाई करा.

अध्यक्ष महोदय, आता पुढची पिढी कृषी क्षेत्रापासून खूप लांब जात आहे. कारण शेती परवडत नाही म्हणून यामध्ये नवीन तंत्रज्ञान यावे, पुढच्या पिढीला प्रोत्साहित करावे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे यासाठी आपण माझ्या मतदारसंघाात उमरी, धर्माबाद आणि नायगाव येथे आणखी एका कृषी महाविद्यालयाला मान्यता द्यावी, अशी मी आपल्याला विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, सहकार विभागाचे काही महत्त्वाचे विषय आहेत. सध्या ग्रामीण भागात राष्ट्रीयकृत बँकांच्या शाखा खूप कमी आहेत. त्याचप्रमाणे इतर बँकांच्या शाखा देखील कमीच आहेत. एका बँकेच्या शाखेमध्ये साडे पाच ते सहा हजार शेतकरी खातेधारक आहेत.

(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. दीपक चव्हाण)

यानंतर श्रीमती करंदीकर....

श्री. राजेश पवार....

यामुळे शेतकऱ्यांना ही बँक कशी सेवा देऊ शकेल, याचा आपण विचार करावा. बँकेमध्ये जवळजवळ ५० टक्के कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्यामुळे शेतकयांना सेवा मिळत नाही. या बाबत आपण केंद्र शासनाला विनंती करावी. तसेच ग्रामीण भागातील बँकांच्या शाखा तिप्पट झाल्या पाहिजेत, या करिता पावले उचलावीत अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांना वेळेवर पीक कर्ज मिळत नाही.ि शासनाने विविध महामंडळे स्थापन केलेली आहेत. या महामंडळांमध्ये अनेक तरुण मुले विविध प्रोजेक्ट करिता अर्ज करतात.मात्र बँक त्यांना कर्ज देत नाही. महिला सक्षमीकरणासाठी बचत गटांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र बचत गटांचे खाते देखील उघडले जात नाही. या संबंधी अधिकाऱ्यांना लक्ष देण्यास सांगावे.

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांचे अनुदान जिल्हा मध्यवर्ती बँकेत जमा हेाते. मात्र वर्षानुवर्षे नांदेड जिल मध्यवर्ती बँक हे अनुदान वाटू शकत नाही. राजकीय संबंधांमुळे ओळखीच्या व्यक्तीला प्राधान्य दिले जाते. तसेच २०० फुटाच्या अतिशय तुटपुंज्या जागेत बँक चालवली जाते. तेथे जवळजवळ ५० टक्के कर्मचारी वर्ग कार्यरत आहे. बहुतांश कर्मचारी राजकीय नेत्यांशी संबंधित असल्यामुळे शेतकऱ्यांशी आडमुठेपणाने वागणूक दिली जाते. यापैकी अनेक कर्मचाऱ्यांना संगणक येत नाही. जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना आपण सरळ करावे किंवा शेतकऱ्यांचे अनुदान इतर राष्ट्रीयकृत बँकेत जमा करावे, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग संबंधी बोलू इच्छितो. ८० टक्के सदस्यांनी या ठिकाणी जिल्हा परिषद शाळेच्या वर्गा संबंधी मुद्दा मांडला. जिल्हा परिषदेच्या ८० टक्के शाळा वाईट अवस्थेत आहेत. खेळाचे मैदान नाही. ग्रामीण भागातील मुलांना कोणत्याही सुविधा मिळत नाहीत. त्यांना मैदानी खेळ खेळता येत नाहीत. प्रत्येक गावात गायरान जमिनीवर का होईना मात्र खेळाचे मैदान

श्री. राजेश पवार....

तयार करावे. तसेच शाळांच्या दुरुस्तीकरिता कालबध्द कार्यक्रम तयार करावा. शाळेकरिता बहुमजली इमारत बांधावी जेणेकरुन मैदानाकरिता जागा उपलब्ध होईल. तालुका स्तरावर तरुण मुलांकरिता जिम तयार करावी. माझ्या मतदारसंघात कुस्तीचा खेळ प्रसिध्द आहे. तरुणांना कुस्तीच्या तालमी करण्यासाठी निधी द्यावा. तसेच राज्यात मोठया प्रमाणात राज्य स्तरीय कुस्त्यांची स्पर्धा घेण्यात यावी.

अध्यक्ष महोदय, वित्त विभागाशी संबंधित माझा मुद्दा आहे. अनुकंपा धर्तीवर भरतीचा विषय प्रलंबित आहे. राज्य शासनाने या बाबत धोरण आखलेले आहे. मात्र यामुळे लाभार्थ्यांना आपल्यावर अन्याय होत आहे अशी भावना तयार झाली आहे. या बाबत शासनाने विचार करावा, अशी मी विनंती करतो . नोव्हेंबर, २००५ नंतर ज्या शासकीय कर्मचाऱ्यांची भरती झाली, त्यामध्ये शिक्षक, ग्राम विकास विभागाचे कर्मचारी असतील, त्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी माननीय गृह निर्माण मंत्री होते. माझ्या मतदारसंघातील धर्माबाद व नायगाव येथे गोरगरिबांकरिता घरे बांधण्यात यावीत. जावई नगर हा एक भाग आहे. येथे अनेक वर्षांपासून सरकारी जमिनीवर गोरगरिब राहतात. त्यांच्या डोक्यावर टांगती तलवार आहे की, आम्हाला केव्हा येथून हटवले जाणार आहे. यामुळे नायगाव व धर्माबाद येथे म्हाडाची योजना राबवण्यात यावी अशी मी विनंती करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

श्री. विक्रमसिंह सावंत (जत) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सर्व प्रथम माझ्या मतदारसंघाच्या संबंधी औचित्याचा मुद्दा मी मांडत आहे. जत मतदारसंघातील जत तहसीलदार व अपर तहसीलदार यांच्या माध्यमातून दि. २३ मार्च रोजी शेतकऱ्यांच्या शेतीचे लिलाव केला जाणार आहे. या करिता चुकीची प्रोसीजर झालेली आहे. त्यांनी नोटीस एक दिली.ही नोटीस दिल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांनी संबंधित विभागाशी चर्चा केल्यानंतर त्यांना योग्य पद्धतीने मार्गदर्शन न केल्यामुळे, आज २३ तारखेला शेतकऱ्यांच्या शेतीचे लिलाव होणार आहेत, ते तातडीने थांबवण्यात यावेत. या संबंधी योग्य ती चौकशी करुन आदेश द्यावा व पुन्हा योग्य ती प्रोसीजर करण्यात यावी.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.विक्रमसिंह सावंत ...

अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करीत असताना मी प्रामुख्याने कृषी विभागाचे याकडे लक्ष वेधू इच्छितो. माझ्या जत या विधानसभा मतदारसंघातील एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत माडग्या, सोन्याळ, लकडेवाडी, वझपेठ या गावांचा समावेश करण्यात आला होता. सन २०१४-२०१५ मध्ये या एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमामध्ये ही ४ गावे समाविष्ट करण्यात आली होती. परंतु, संबंधित क्लस्टर डॉ बाबासाहेब आंबेडकर शिक्षण शेती संशोधन संस्था सोरोची यांना देण्यात आले होते, त्यांनी आजअखेर एकाही गावात एकही काम केलेले नाही. त्यामुळे या चारही गावांचा आयडब्ल्यूएमपी अंतर्गतच्या योजनेत समावेश करण्यात यावा.

अध्यक्ष महोदय, शेत तळी अस्तरीकरणाचा एक विषय आहे. फलोत्पादन अभियानांतर्गतच्या योजनेत जत तालुक्यात शेती तळी त्याच बरोबर अस्तरीकरण ही शेतकऱ्यांकरिता महत्वाची योजना आहे. कोरोना काळात संबंधित शेतकऱ्यांनी कर्ज काढून शेत तळ्यांसाठी स्वखर्चाने प्लॅस्टिक कागद बसविला. परंतु, जुनी प्रकरणे असल्यामुळे आज या शेतकऱ्यांना अनुदान मिळत नाही. कोरोना काळामुळे मागील वर्षी सर्व प्रकरणांना या योजनेत पात्र ठरविण्यात यावे.

अध्यक्ष महोदय, जत तालुका हा भौगोलिकदृष्ट्या सर्वात मोठा आहे. त्यामुळे पीक विमा ज्यावेळेस झाला त्यावेळेस सन २०१८-२०१९ चे पीक विमे मिळाले नाहीत. कारण त्या ठिकाणी हवामान केंद्र फारच कमी आहेत. महसुली मंडळाची आखणी देखील कृषी विभागपूरक नाही. सध्या जिल्ह्यात केवळ ८ हवामान केंद्रे बसविलेली आहेत. वास्तविक तालुक्याचा विचार केला तर महसूल मंडळाप्रमाणे कृषी पीक रचनेनुसार तेथे १२ ते १५ केंद्र असणे गरजेचे होते. तहसीलदार यांच्या कमिटीने तसा प्रस्ताव देखील संबंधित विभागाला पाठविला होता, तरी त्याप्रमाणे हवामान केंद्र मंजूर व्हावीत, अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, जत हा १०० टक्के अवर्षणग्रस्त तालुका आहे. शेत तळ्यांच्या संदर्भात डीएसआरच्या नॉर्म्सनुसार शेत तळ्याला ५० हजार रुपयांचे

श्री.विक्रमसिंह सावंत ...

अनुदान देण्यात येते. परंतु, त्यासाठी येणारा खर्च हा एक ते सव्वालाख रुपये आहे. याचा विचार करुन याला सव्वालाख रुपयांची वाढीव मान्यता देण्यात यावी, अशी मी आपल्यामार्फत विनंती करीत आहे.

अध्यक्ष महोदय, जत तालुक्यातील जत, आटपाडी, सांगोला, कवठे महांकाळ या तालुक्यात प्रामुख्याने डाळिंबाचे पीक घेतले जाते. हे डाळिंबाचे पीक घेत असताना या डाळिंब पिकावर मर रोग व खोड किड मोठ्या प्रमाणावर येऊन या डाळिंब पिकाचे आज मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. आज ज्या शेतकऱ्यांनी या बागा जगविल्या त्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे या पिकाला वाचविण्यासाठी, संशोधन करण्याची नितांत आवश्यकता आहे. त्या दृष्टिकोनातून यावर योग्य ती कार्यवाही होऊन, योग्य ते संशोधन होऊन त्या पध्दतीने कार्यवाही व्हावी, एवढीच मी या निमित्ताने विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, सहकार विभागाच्या मागण्यांवर बोलत असताना मला हे सांगावयाचे आहे की, जत तालुका भौगोलिकदृष्ट्या मोठा तालुका आहे. या तालुक्यात तुरीचे पीक साधारणत: ९०८३ हेक्टर इतके आहे. सहकार मंत्री महोदयांकडे मी वारंवार पाठपुरावा केलेला आहे की, जत तालुक्यात तूर विक्री केंद्र व्हावे, मी त्याबाबत विनंती करतो.

नंतर श्री.शिंदे ...

श्री.विक्रमसिंह सावंत...

अध्यक्ष महोदय, जत तालुक्यातील शेतकऱ्यांचे दूध उत्पादन हे त्यांचे तारक आहे. दूध उत्पादन करीत असताना जनावरांच्या संगोपनाचा खर्च अधिक आहे. हा भाग दुष्काळी असून या तालुक्यातील दुधाला इतर तालुक्यांच्या तुलनेत कमी दर देण्यात येतो. याकडे मी सहकार मंत्री यांचे लक्ष वेधू इच्छित आहे.

अध्यक्ष महोदय, जत तालुक्यामधील ८०० हेक्टर क्षेत्रातील ऊसाचे अद्याप गाळप झालेले नाही. साखर कारखान्यांनी ऊस गाळप केला आहे परंतु त्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना केवळ २,२०० ते २,३०० रुपये इतका दिला आहे. तो इतर तालुक्यांच्या किंवा एफआरपीच्या दरानुसार देण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, शालेय शिक्षण विभाग – जत तालुक्यामध्ये सुमारे ४३६ शाळा आहेत. त्यामध्ये कन्नड माध्यमाच्या १३२, मराठी माध्यमाच्या २९६ व उर्दू माध्यमाच्या ८ शाळा आहेत. माझा मतदारसंघातील जत तालुका हा कर्नाटक राज्याशी निगडीत आहे. त्यामुळे उक्त तालुक्यातील काही मुहे कन्नड माध्यमाचे शिक्षण घेतात. सदरहू शाळेतील ९२ शिक्षकांची पदे रिक्त आहेत व माहे मार्च-एप्रिल रिक्त पदांच्या संख्येत वाढ होऊन ती १५० ते १७५ इतकी होऊ शकते. तसेच मराठी व उर्दू माध्यमाच्या शाळेतील शिक्षकांच्या रिक्त पदांचा अनुशेष दूर करण्यात यावा.

अध्यक्ष महोदय, जत तालुका १०० टक्के अवर्षणग्रस्त तालुका आहे. जत तालुक्यातील १२ गावे शाळा खोल्या विरहीत आहेत. तसेच तालुक्यात एकूण ४२ नवीन वर्ग खोल्यांची आवश्यकता आहे. ८७ वर्ग खोल्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच मोडकळीस आलेल्या ३०९ वर्ग खोल्या आहेत. यासाठी शिक्षण विभागाने भरीव निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी माझी आग्रही मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, पर्यटन विभाग – जत तालुका हा दुष्काळी आहे. या तालुक्यामध्ये उड्डापूर देवस्थान येथे तालम्मा देवीचे स्थान आहे. या पर्यटन स्थळी आंध्र प्रदेश, कर्नाटक व महाराष्ट्र या तीन राज्यातील भाविक दर्शनासाठी येतात. या

श्री.विक्रमसिंह सावंत...

ठिकाणी मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता भरीव निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. तसेच उम्राणी, खलाटी, करजगी, उमदी, सोनलगी, बालगा आणि बनाळे या ठिकाणच्या पर्यटन क्षेत्राच्या विकास कामांसाठी भरीव निधी उपलब्ध करुन दिल्यास आमच्या तालुक्यातील युवकांना रोजगार प्राप्त होऊन या दुष्काळी तालुक्यास न्याय मिळू शकेल.

अध्यक्ष महोदय, मला आपण बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. धन्यवाद !

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

ॲड.आशिष ज◌ैस्वाल (रामटेक) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पामध्ये रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये मोठ्या प्रमाणावर निधीची तरतूद केली जाते. सद्य:स्थितीत राज्यामध्ये २००१ ते २०१९ रस्ते विकास आराखडा सुरू आहे. सन १९६१ ते २००१ व २००१ ते २०२१ या कालावधीसाठी रस्ते विकासाची उद्दिष्ट निश्चित करण्यात आलेली आहेत. सद्य:स्थितीत रस्ते विकासाची लांबी वाढलेली आहे. सन २००१ ते २०२१ च्या आराखड्यानुसार महाराष्ट्रातील राष्ट्रीय महामार्गाची लांबी ४,५०९ किलोमीटर इतकी आहे. तसेच राज्य महामार्गाची लांबी ५५,६५४ किलोमीटर इतकी आहे. परंतु आपण एकंदर विचार केला तर राज्य महामार्गापेक्षा M.D.R. ची लांबी जास्त आहे आणि M.D.R. पेक्षा O.D.R. ची लांबी जास्त आहे. तसेच O.D.R. पेक्षा V.R. ची लांबी १० पट जास्त आहे. महाराष्ट्राचा एकंदरीत विचार केला तर रस्ते विकास योजनेमध्ये रस्त्यांना O.D.R. व V.R. क्रमांक देण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून केले जाते. परंतु त्या रस्त्यांच्या विकासासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग निधी उपलब्ध करून देत नाही. सदर रस्ते ग्राम विकास विभागाच्या माध्यमातून केले जातात. आपणा सर्वांना माहिती आहे की, जिल्हा परिषदेच्या माध्यमातून समाज भवन व इतर कामासाठी जास्त वेळ लागत असल्यामुळे मुख्यमंत्री सडक योजना आणि प्रधानमंत्री सडक योजनेसाठी वेगळी रिंग करावी लागली.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या रस्त्यावर दर दोन-तीन वर्षांनी पुन्हा डांबरीकरण करावे लागत आहे. ही बाब आपणा सर्वांना माहिती आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या रस्त्यावर मागील पंचवीस वर्षांमध्ये किती खर्च करण्यात आला, याचा हिशोब केला तर आपण शासनाच्या निधीचा चांगला वापर करीत आहोत की गैरवापर करीत आहोत हे आपल्या लक्षात येईल. डिफेक्ट लायबिलिटी पिरियडमध्ये तो रस्ता चांगला राहिला पाहिजे. रस्त्यावर खड्डा पडल्यानंतर कोणताही अभियंता

ॲड.आशिष जैस्वाल....

संबंधित कंत्राटदाराला तो खड्डा दुरुस्त करण्यासाठी सांगत नाही. त्यामुळे अशा रस्त्यावर वारंवार अपघात होतात. डिफेक्ट लायबिलिटी पिरियड संपेपर्यंत सदर रस्ता पूर्णपणे खराब होतो. त्यामुळे लोकप्रतिनिधी आणि शासनाची प्रतिमा खराब होते.

अध्यक्ष महोदय, खड्डे बुजविण्यासंदर्भात शासनाने जी कार्यपद्धती निश्चित केली होती, त्यामध्ये फिरते खड्डे बुजविणाऱ्या पथकाची तरतूद करण्यात आली होती. या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना विचारू इच्छितो की, सदर रस्ता खराब झाल्यानंतर तो रस्ता प्रोग्राममध्ये मंजूर करणे, निविदा काढणे, तीन निविदा प्राप्त न झाल्यास संबंधित कंत्राटदाराने सेक्युरिटी डिपॉझिट भरावी. सेक्युरिटी डिपॉझिट भरल्यानंतर उक्त कामाचे कार्यारंभ आदेश देणे, रस्त्याचे काम करणे या सर्व प्रक्रियेच्या कालावधीमध्ये सदर रस्त्यावर अपघात होऊन निरपराध लोकांचा बळी जातो. या सर्व घटनेस कोण जबाबदार आहे? त्यामुळे वर्षानुवर्ष सुरू असलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. सन २०२२-२३च्या अर्थसंकल्पामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागासाठी १५ हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. माझ्या मतदारसंघातील प्रत्येक रस्त्याचे काम ३५ ते ४० टक्के बिलो देण्यात आलेले आहे. सदर बिलोची रक्कम पुन्हा शासनाकडे परत जाते. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की या संदर्भात पुन्हा एकदा विचार करणे आवश्यक आहे. कारण ज्या जिल्ह्यांमध्ये कंत्राटदार रिंग करतात त्या जिल्ह्यांमध्ये D.S.R. च्या किमतीमध्ये निविदा काढली जाते. ज्या जिल्ह्यांमध्ये खुल्या स्पर्धा होतात त्या जिल्ह्यामध्ये ३५ ते ४० टक्के बिलो निविदा काढल्या जातात. ज्या जिल्ह्यांमध्ये डी.एस.आर. मध्ये काम केले जाते त्या कामांमध्ये सरकारचे किती नुकसान होते व त्या नुकसान झालेल्या पैशातून किती लांबीचा रस्ता करू शकलो असतो, याचा विचार करणे अत्यंत आवश्यक झाले आहे.

तालिका सभाध्यक्ष : सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, अजून ५०-५५ सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. जरी चर्चेची वेळ वाढवली असली

तालिका सभाध्यक्ष.....

तरी सायंकाळी ६.४५ वाजेपर्यंत उत्तरासह चर्चा समाप्त करावयाची आहे. त्यामुळे सर्व सन्माननीय सदस्यांनी वेळेचे बंधन पाळून दोन-तीन मिनिटांमध्ये आपल्या सूचना मांडाव्यात. असे केले तरच सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी प्राप्त होईल. अन्यथा सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी प्राप्त होणार नाही.

ॲड.आशिष जैस्वाल : अध्यक्ष महोदय, मी माझ्या मतदारसंघातील प्रश्न मांडत नसून राज्याच्या धोरणावर चर्चा करीत आहे. रस्त्यांचे काम केल्यानंतर त्या रस्त्यावर खड्डे पडले तर २४ ते ४८ तासांच्या आत ते खड्डे दुरुस्त केले पाहिजे, असे संबंधित कंत्राटदाराच्या D.L.P. मध्ये नमूद करणे आवश्यक आहे.

यानंतर श्री कुलकर्णी.....

असुधारित प्रत

ॲड. आशिष जैस्वाल...

रस्ता तयार केल्यानंतर पाच वर्षापेक्षा कमी कालावधीसाठी डीएलपी असू नये. राज्य सरकारकडून ओपन टेंडर काढले जाते. ज्याच्याकडे क्षमता नाही, असेही लोक टेंडर भरत असतात. जे काम ज्या कंत्राटदाराला दिले जाणार आहे तो सक्षम असला पाहिजे. प्रत्येक जिल्ह्यात, तालुक्यात काही कंत्राटदार हे अतिशय चांगले काम करीत असतात. रस्त्यावर खड्डे पडल्यानंतर त्याचे बिलिंग प्रती स्क्वेअर फुट किंवा प्रती स्क्वेअर मीटरने केले जाते. मी विनंती करतो की, प्रत्येक जिल्ह्यामध्ये तालुकानिहाय दर निश्चित केले पाहिजेत. कंत्राटदाराकडून एल – १ रेट करुन करार करुन घेतला की, प्रती स्क्वेअर मीटरप्रमाणे दर अंतिम केले आणि रस्त्यावर पडलेले खड्डे बुजविण्याचा करार तालुकानिहाय केला तर एल – १ रेटमध्ये पॅचेस दुरुस्त करुन घेण्याचे काम लवकर केले तर खड्डे लवकरात लवकर दुरुस्त केले जातील. यातून शासनाची बदनामी होणार नाही. रस्ते एका दिवसात खराब होत नाहीत. जोपर्यंत कार्यक्रम मंजूर होतो तोपर्यंत रस्ता पूर्णपणे खराब होत असतो. म्हणून मी विनंती करतो की, याकरिता शासनाने नवीन कार्यपद्धती निश्चित करावी. भविष्यात सार्वजनिक बांधकाम विभागाचे रस्ते चांगल्या दर्जाचे कसे राहतील यासाठी प्रयत्न करावेत. तसेच ओडीआरची लांबी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करावी. ग्रामीण भागातील रस्त्यांची अतिशय दुरवस्था आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्याकरिता मोठ्या प्रमाणात निधी मिळतो. परंतु ग्रामीण रस्त्यांकडे कोणी लक्ष देत नाही. ग्रामीण रस्त्यांची लांबी मोठी आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेकरिता कोणतीही तरतूद नाही. मी विनंती करतो की, भविष्यात रस्त्यांचे अपग्रेडेशन करण्यात यावे. सीआरएफमधून राज्यमार्ग आणि एमडीआरकरिता मोठ्या प्रमाणात निधी मिळत असतो. अधिकाधिक रस्ते अपग्रेड केले आणि ओडीआर रस्त्याला एमडीआर आणि राज्य महामार्ग केले तर मोठ्या प्रमाणात केंद्र सरकारचा निधी याकरिता मिळेल. केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी हे महाराष्ट्रातील आहेत. ते मोठ्या प्रमाणात निधी देत आहेत. राज्य महामार्ग आणि एमडीआरकरिता निधी दिल्यामुळे व्हीआर आणि ओडीआरकरिता निधी दिला जात नाही. याबाबत शासनाने विचार करावा, अशी मी विनंती करतो.

डॉ. तुषार राठोड (मुखेड) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, या विषयाच्या अनुषंगाने मी माझ्या मतदारसंघातील एक मागणी प्रामख्याने मांडणार आहे. दिनांक ११ मार्च, २०२२ रोजी अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे. माननीय अर्थमंत्र्यांनी सांगितले की, अशियाई विकास बँक यांच्या अर्थसहाय्यातून राज्यात ९९० कि.मी. लांबीच्या रस्त्याच्या मजबुतीकरणाचे काम करण्यात येत आहे. यासाठी जवळपास ५ हजार ७०० कोटी रुपये खर्च केले जात आहेत. आगामी वर्षासाठी जवळपास ७६५ कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे मजबुतीकरण करण्याचा मानस व्यक्त केला आहे. याबद्दल मी माननीय वित्त मंत्र्यांचे स्वागत करतो. माझ्या मतदारसंघात बाराळी-बिल्लाळी-जाहूर ते खानापूर हा राज्यमार्ग आहे. हा रस्ता दोन राष्ट्रीय महामार्गांना जोडतो. या २७ कि.मी. लांबीच्या रस्त्याची अतिशय दुरवस्था आहे. जवळपास २५ ते ३० हजार लोकसंख्या या रस्त्याच्या शेजारी राहते. या रस्त्याचा प्रस्ताव आशियाई विकास बँकेच्या अर्थसहाय्यातून होण्यासाठी राज्य शासनाकडे मागील तीन वर्षापासून प्रलंबित आहे. या रस्त्याचा प्रस्ताव प्रलंबित असल्यामुळे शासनाचा इतर निधी याठिकाणी खर्च करता येत नाही. मी माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांना विनंती करतो की, २७ कि.मी. लांबीच्या डीपीआरला मान्यता द्यावी व तो लवकरात लवकर पूर्ण करावा. माझ्या मतदारसंघातील अहमदपूर-कुरुळा-नागलगाव-घोरज हा राज्य महामार्ग आहे. डीपीआर क्रमांक २७ हा देखील मागील दोन वर्षापासून राज्य शासनाकडे प्रलंबित आहे. या रस्त्याची ३० कि.मी. लांबी डीपीआरमध्ये समाविष्ट करुन यालाही मंजुरी द्यावी, अशी मी माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांना विनंती करतो.

यानंतर श्री. चौधरी...

डॉ.तुषार राठोड.....

त्यांनी आपल्या उत्तरामध्ये या बाबींचा समावेश करावा अशीही मी विनंती करतो. माझा मुखेड हा मतदारसंघ नांदेड जिल्हयातील आहे. माननीय अर्थमंत्र्यांनी उल्लेख केला की, दिनांक १७ सप्टेंबर २०२२ रोजी आपण मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करीत आहोत. त्यासाठी त्यांनी ७५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे व त्याबद्दल मी त्यांचे स्वागत करतो.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील कंधार तालुक्यातील कल्हाळी या गावी दिनांक १७ सप्टेंबर, १९४८ पूर्वी निजामाने स्वारी केली होती. त्या गावचे भूमिपुत्र आप्पाराव नाईक यांच्यावर हा हल्ला करण्यात आला होता. "या देशाला स्वातंत्र्य मिळालेले आहे व त्यामुळे आम्ही तुमचे अधिपत्य स्विकारणार नाही," असे बोलून त्यांनी निजामाचे अधिपत्य झुकारले होते. त्यामुळे निजामाने स्वारी केली होती. त्यामध्ये ३५ लोकांचा जीव गेला होता. हे ३५ जण युध्दामध्ये हुतात्मे झाले. परंतु या हुतात्म्यांची आहुती काळाच्या ओघामध्ये लोक विसरायला लागले आहेत. त्यांच्या शौर्याच्या गाथा ऐकून त्या भागातील एक पिढी मोठी झाली परंतु आता मात्र लोकांना हळुहळु विसर पडत चालला आहे. प्रशासनाचे देखील या भागाकडे अत्यंत दुर्लक्ष आहे. त्यामुळे माननीय सांस्कृतिक कार्य मंत्र्यांना माझी या निमित्ताने विनंती आहे की, मराठवाडा मुक्तीसंग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून या गावामध्ये हुतात्मा स्मारक उभारण्यासाठी निधी द्यावा. मला अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आभार व्यक्त करुन माझे दोन शब्द संपवितो.

श्री.दीपक केसरकर (सावंतवाडी) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, वेळे अभावी मी केवळ महत्त्वाचे मुद्दे मांडणार आहे. अनेक विभागांच्या अनुदानाच्या मागण्यांवर आज चर्चा सुरु आहे. त्यामुळे किमान मुद्दे मांडण्यापुरता तरी वेळ मला द्यावा, अशी मी सर्वप्रथम विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, मी कृषी विभागाच्या मागण्यांवर बोलत आहे. माननीय कृषी मंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, मोठया प्रमाणात आंब्यांचा मोहर जळालेला आहे. परंतु आपल्या विभागाच्या नियमानुसार केवळ ब्रॅण्डेड वाणांनाच मान्यता दिली जाते. त्यामुळे माझी विनंती आहे की, होणाऱ्या संशोधनाची ताबडतोब अंमलबजावणी केली तरच मोहर वाचविता येईल. यासाठी काही सेंद्रिय स्प्रे देखील निघालेले आहेत. त्याबाबत देखील विचार व्हावा. तसेच वेदर स्टेशनची संख्या वाढविण्याची व त्यांचे रिकॉन्फिग्युरेशन केले पाहिजे. कारण यामुळे अनेक आंबा व्यापाऱ्यांना नुकसान भरपाई मिळू शकत नाही.

अध्यक्ष महोदय, आंबा आणि काजू बोर्ड स्थापन करण्यात आले आहे. काजूचा टर्नओव्हर सुमारे ६ हजार ५०० कोटी रुपये तर आंब्याचा टर्नओव्हर ३ हजार कोटी रुपये आहे. परंतु आजपर्यंत या बोर्डासाठी एकही रुपये खर्च करण्यात आलेला नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील एवढे मोठे पीक सर्व सोयींपासून वंचित राहिलेले आहे. माझी विनंती आहे की, आपण यासंदर्भात ताबडतोब बैठक घ्यावी.

अध्यक्ष महोदय, चक्रीवादळामध्ये मधली झाडे उन्मळून पडली तरी त्यांची पुन:लागवड करण्याची तरतूद करण्यात आली आहे. परंतु चक्रीवादळामध्ये डॅमेज होणाऱ्या झाडांचे वय ५० ते १०० वर्षे असते. त्यामुळे अशा प्रत्येक झाडाची किंमत ठरविली पाहिजे. अन्यथा, कोकणातील शेतकऱ्यांना काहीही नुकसान भरपाई मिळत नाही. काजू धोरण दिले असले तरीही त्याची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. ती तातडीने करावी, ही या निमित्ताने विनंती आहे.

श्री.दीपक केसरकर.....

अध्यक्ष महोदय, काजुची बोंडे फेकून दिली जातात. चांदा ते बांदा योजनेतून काजुच्या बोंडांच्या संशोधनासाठी आणि त्यापासून फेसाळलेले पेय बनविण्यासाठी पैसे दिले आहेत. परंतु माझी विनंती आहे की, यासाठी स्वतंत्र तरतूद करावी.

अध्यक्ष महोदय, भाताच्या बोनसबद्दल विचार झाला होता. परंतु मी सांगू इच्छितो की, बाहेरुन आणलेला भात कोकणामध्ये विकला जात नाही. त्यामुळे कोकणाच्या संदर्भात वेगळा विचार करणे शक्य आहे किंवा कसे याबाबत माननीय अर्थमंत्री श्री.अजित पवार यांच्याशी चर्चा करावी.

अध्यक्ष महोदय, नारळाची झाडे खूप वाढतात व त्यामुळे नारळ काढण्यात आणि निरा तयार करण्यात अडचण येते. नारळाच्या चांगल्या ड्वार्फ व्हरायटीज आलेल्या आहेत परंतु त्या फक्त पालघर येथील केंद्रावर मिळतात. पालघर हे सिंधुदुर्गापासून खूप जास्त अंतरावर असल्याने ही झाडे आम्हाला उपलब्धच होत नाहीत. त्यामुळे यासंदर्भात वेगळा कार्यक्रम राबवावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, फ्लॉअरिंग सिझनमध्ये काजुला पाणी दिले तर सुमारे दीड पट उत्पादन वाढते. असे असतानाही त्याच्या ठिबक सिंचनाचे धोरण अद्याप ठरलेले नाही. तेवढे जरी केले तरीही सुमारे तीन हजार कोटी रुपयांनी राज्याचे उत्पन्न वाढू शकेल. त्यामुळे याबाबत देखील विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री आता सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. परंतु आपल्या माध्यमातून मी त्यांना सांगू इच्छितो की, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्हयांमध्ये सर्वाधिक साकव आहेत. आमची मुले शाळेत जाताना नद्या, नाले पार करुन जातात. हे साकव सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तयार करुन जिल्हा परिषदेला हस्तांतरित केले जातात. परंतु त्यांच्या दुरुस्तीसाठी मात्र कुठलीही तरतूद नाही. मागील सरकारच्या काळात यासाठी वेगळे लेखाशिर्ष निर्माण करण्यात आले होते.

श्री.दीपक केसरकर.....

माझी विनंती आहे की, साकवाच्या दुरुस्तीसाठी तातडीने निधी उपलब्ध करुन द्यावा. अन्यथा, पावसाळा सुरु झाल्यानंतर विद्यार्थ्यांचे जीव धोक्यात येतील.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. दीपक केसरकर...

अध्यक्ष महोदय, मी फक्त मुद्दे वाचतो. ते डेव्हलप करीत नाही. आमच्या जिल्हा परिषदेमध्ये ८ तालुक्यांना मिळून फक्त २ उप अभियंते आहेत. त्यांच्यातील एकाला कार्यकारी अभियंता पदाचा कार्यभार दिला आहे. ज्युनिअर इंजिनिअर्स नाहीत. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सुध्दा ते नाहीत आणि त्यामुळे कामाचा दर्जा सुधारला जाऊ शकत नाही. आमचा जिल्हा एकमेव आहे की, ज्या जिल्ह्यात हायब्रीड अन्युअटीचे काम झालेले नाही. ५५० कोटी रुपयांचे आमचे रस्ते होते. पण त्यापैकी एकही रुपया आम्हाला मिळालेला नाही. एकमेव जिल्हा पर्यटन जिल्हा झालेला आहे आणि या जिल्ह्यातील रस्ते अत्यंत खराब झाले होती. एस.आर.खाली जेव्हा कामे केली तेव्हा हायब्रीड अन्युअटी रद्द करावी असे म्हटले जाते. म्हणजे एका रस्त्याला दीडशे कोटी असतील तर त्याला २० कोटी देऊन भागणार नाही. आमचा पर्यटन जिल्हा आहे. त्यामुळे याबाबत विचार झाला पाहिजे. ही सर्व टेंडर्स स्वीकारुन त्यांच्या निविदा काढाव्यात, अशी मी आपल्याला विनंती करतो. तसेच समुद्र किनाऱ्याला जोडणारे जे रस्ते आहेत ते तातडीने हाती घ्यावेत. सागरी महामार्गाची सुरूवात सिंधुदुर्ग जिल्ह्यापासून करावी. कारण आपला राष्ट्रीय महामार्ग जो चौपदरीकरणाचे काम सुरू आहे त्या महामार्गाचे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील १०० टक्के काम पूर्ण झाले आहे. हा जिल्हा गोव्यापासून जवळ आहे आणि म्हणून गोव्यातील पर्यटक जर आमच्या समुद्र किनाऱ्यावर येणार असतील तर हे काम सिंधुदुर्ग जिल्ह्यापासून सुरू झाले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी पर्यटन विभागाच्या राज्यमंत्री महोदया या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांना मला एवढेच सांगायचे आहे की, हा एकमेव पर्यटन जिल्हा आहे आणि त्यामुळे या ठिकाणी वेगळा नगररचना कायदा लागू होतो. या ठिकाणी कारखान्यांना परवानगी नाही आणि त्यामुळे कारखान्यांमध्ये नोकऱ्या नाहीत. पर्यटनासाठी वेगळा निधी नाही. अशा परिस्थितीत आमच्या जिल्ह्यातील बहूतांश लोक नोकरीसाठी गोव्याला जातात. म्हणून याबाबत ताबडतोब विचार करुन पर्यटनासाठी योग्य ती तरतूद व्हावी.

श्री. दीपक केसरकर...

अध्यक्ष महोदय, आमच्याकडील समुद्रामध्ये जैव विविधता आहे आणि त्याकरिता एक पानबुडीचा निधी दिला होता. गेल्या ४ वर्षापासून हा निधी पर्यटन विकास महामंडळाकडून पडून आहेत. "चांदा ते बांदा" या योजनेखाली ५० ते १०० कोटी रुपये इतका निधी एमटीडीसीने लॅप्स केला आहे. निदान आम्हाला हा निधी तरी परत मिळाला तरी आमचा फिशिंग व्हीलेजसारखा चांगला प्रकल्प राबविला जाऊ शकेल. या सर्वांचे पैसे दिल्यानंतरचा हा निधी लॅप्स झालेला आहे. भूसंपादनाचे पैसे सुध्दा लॅप्स झाले आहेत.

अध्यक्ष महोदय, आमच्याकडे नगररचना विषयक वेगळा कायदा केला. परंतु पर्यटनासाठी ९-९ मिटरचे रस्ते करुन चालणार नाही. कारण समुद्र किनाऱ्यावर हे पर्यटन चालते. त्यासाठी वेगळे मायक्रो प्लॅनिंग करावे लागेल आणि त्यासाठी निर्णय आपण नगरविकास विभागासमवेत चर्चा करुन घ्यावा. अत्यंत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आपण इको-सेंसीटीव्ह झोन जाहीर केले आहे. जेथे पश्चिम घाट नाही तेथे सुध्दा हा इको-सेंसीटीव्ह झोन जाहीर केला आहे. त्याला २ लाख चौरस फूटांची अट घातली आहे. निदान पर्यटन उद्योगाला तरी यामधून वगळण्यात यावे आणि पश्चिम घाटाच्याबाहेरील जो परिसर आहे त्यामध्ये इको-सेंसीटीव्ह झोन लागू करु नये. त्यामध्ये कोणत्या गोष्टी करायच्या आणि कोणत्या करायच्या नाहीत हे एकदा नियंत्रित करावे. आमच्या जिल्ह्यासाठी विशेष कायदा आहे आणि ही बाब विचारात घेऊन हे इको-सेंसीटीव्ह झोन वगळावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, आपल्या पर्यटन धोरणामध्ये असे नमूद आहे की, गोवा राज्यातून जे लोक आपल्या जिल्ह्यात येतील त्यांना आरटीओ टॅक्स लागणार नाही. परंतु त्याबाबतचा जीआर अजूनही निघालेला नाही. म्हणून आपण ताबडतोब त्या विभागाशी चर्चा करावी. या ठिकाणी सांस्कृतिक कार्य मंत्री उपस्थित आहेत. मी त्यांना विनंती केली होती की आमच्याकडे असे काही गडकिल्ले आहेत की ज्यांचा कधीही छत्रपती शिवाजी महाराज किंवा इतिहासाचा संबंध आला नव्हता. आमच्या स्थानिक संस्थानांचे २ किल्ले राज्य पुरातत्व विभागाचे अधिसूचित केलेले आहेत.

श्री. दीपक केसरकर...

त्यांच्या डी-नोटिफायची कार्यवाही पूर्ण झाली होती. आपण जर हे किल्ले डी-नोटिफाय केले तर त्या ठिकाणी चांगले पर्यटन होऊ शकेल. त्यापैकी एक किल्ला समुद्र किनाऱ्यावर आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटन त्या ठिकाणी होऊ शकेल. ज्याचे नाव यशवंत गड आहे आणि दुसरा भरतगड नावाचा किल्ला खाडीच्या किनाऱ्यावर आहे. या दोन्ही ठिकाणी उत्कृष्ट पर्यटन होऊ शकेल. म्हणून आपण या दोन्ही किल्ल्यांच्या डी-नोटिफायची कार्यवाही करावी किंवा पर्यटनाच्या दृष्टीने त्याची विशेष परवानगी देऊन त्याची रि-बिल्ड करुन हे पर्यटनाचे काम करावे.

अध्यक्ष महोदय, आमच्या सावंतवाडीत एकदा मोठा पूर आला होता. त्यामुळे आमचे म्युझिअमचे साहित्य कोल्हापूरच्या संग्रहालयात आहे. आमच्या सावंतवाडी नगरपालिकेने म्युझिअम बांधले आहे. त्यांच्याकडे हे साहित्य सुपूर्द करण्यासाठी कार्यवाही करावी, अशी मी आपल्याला विनंती करतो. आपण मला बोलण्यासाठी संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो व माझे दोन शब्द संपवितो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

ॲड.अशोक पवार (शिरुर) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी आणि पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. माननीय कृषी मंत्री श्री. दादाजी भुसे सभागृहात उपस्थित आहेत. मी त्यांना विनंती करतो की, पुण्यामध्ये कृषी महाविद्यालय आहे. हे महाविद्यालय कृषी संशोधन आणि विद्यार्थी-विद्यार्थींना शिकविण्यासाठी आहे. परंतु त्यातील ३३ एकर जमीन मेट्रोसाठी,साखर संकुल, आयसीएसआरसाठी गेली आहे. त्याचबरोबर आता पीएमपीएल त्याच्या मागे आहे. माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री आणि माननीय कृषी मंत्री यांना माझी विनंती आहे की, कृषी महाविद्यालयाची जागा कोणत्याही परिस्थितीत कोणत्या दुसऱ्या कामासाठी देऊ नये. ती फक्त शेतीसाठी आणि शेती निगडित विषयासाठी ठेवली पाहिजे, अशी माझी विनंती आहे. आपण पाहतो की, ऊसामध्ये प्रोसेसचा सर्व शेवटपर्यंत कारभार होतो. तसाच कृषीच्या बाबतीत काही विषय घेऊन काम झाले पाहिजेत. उदाहरणार्थ टोमॅटो एक पीक घेतले तर त्याचे प्रोसेसिंग, मार्केटिंग हे सर्व कसे योग्य पद्धतीने केले जाईल हे कृषी विभागाने बघितले पाहिजे. आज आपण डाळिंबासारख्या पिकाचे महत्त्व पाहतो की, डाळिंबाचे दाणे मोठ्या प्रमाणात एक्सपोर्ट केले जातात. त्यामुळे शासनाने या विषयावर काही अभ्यास केला पाहिजे. कारण भारत देशात आपण तीन सिझनमध्ये डाळिंब पीक घेतो. जगामध्ये डाळिंबाचे फक्त एकच सिझन असते. त्यामुळे या डाळिंबाच्या दाण्यावर प्रक्रिया करुन ते परदेशात पाठवून निश्चितपणे शेतकऱ्याचे भले केले जाईल.

अध्यक्ष महोदय, दुध व्यवसायाचा विचार केला तर कृषी महाविद्यालयामध्ये देशी गायी किंवा देशी ब्रीडस आहेत. मग त्यात साहीवाल, गीर, थारपाकर रेड सिंधी या गायींवर संशोधन सुरु आहेत. माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यावर सातत्याने लक्ष ठेवून आहेत. याचा फायदा निश्चितपणे चांगला होऊ शकतो. आपल्याला माहिती आहे की, आपल्या लोकल ब्रीडस् आपल्याला सांभाळता आल्या पाहिजेत आणि त्याची निश्चितपणे वाढ करणे गरजेचे आहे. माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री या नात्याने आमच्या मतदारसंघातील स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या समाधीस्थळाला २५० कोटी रुपये दिले

ॲड.अशोक पवार....

आहेत. याबाबत मी मनापासून तालुक्याच्या तसेच जनतेच्या वतीने त्यांचे अभिनंदन करुन त्यांना धन्यवाद देतो. छत्रपतींचे काम हे आज अद्वितीय झालेले आहे. त्यामुळे त्यासाठी निधी दिल्याबद्दल मी सरकारचे मनापासून धन्यवाद देतो. त्याचबरोबर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विषयावर आमच्यासारख्या असंख्य आमदारांना व्हीआर आणि ओडीआर माध्यमातून निधी दिला पाहिजे. खरे म्हणजे कायदे आपल्यासाठी असतात, कायद्यासाठी माणसे नसतात. मग आपण सर्वजण कायदे बनविणारे सभागृहात बसतो त्या कायद्यात काही त्रुटी असतील तर बदलल्या पाहिजे. व्हीआर आणि ओडीआर रस्त्यांसाठी शासनाने निधी दिला पिाहजे. आज अनेकवेळाला आपण अभ्यास करतो की, सभागृहातील सन्माननीय सदस्यांना ज्यावेळी कामे मंजूर होतात त्यावेळेला ते काम आपण जिल्हा परिषदेकडे देत नाही. कारण आपला सर्व ओढा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असतो. मग जिल्हा परिषद चांगले काम करीत नाही, याची कोणी पाहणी करणार आहे काय ?सरकार म्हणून आपण याकडे लक्ष देणार की नाही. सार्वजनिक बांधकाम विभाग असताना सीएमजीएसवाय किंवा पीएमजीएसवाय हे दोन विभाग का वेगळे करावे लागले. यासाठी काय कारण आहे ? पीएमआरडीकडे रस्ते देण्यात येतात परंतु तरी त्याच्या गुणवत्तेची आपल्या सर्वांना चिंता असते. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे ही सर्व कामे दिली तर चांगले होईल. त्या पद्धतीचे एक चांगले काम तो विभाग करीत असेल तर... सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये काही दोष असू शकतात. परंतु सर्वच दोषी असू शकत नाही. त्यामुळे सरकारने अभ्यास करुन त्यावर निर्णय करावा.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्यासाठी वेळ दिला त्याबद्दल आपले धन्यवाद !

श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर (जिंतूर) : अध्यक्ष महोदय, एवढया दिवसांपासून मला बोलण्याची संधी मिळाली यासाठी ही दुसरीच वेळ आहे. यामुळे आपण मला बोलण्यासाठी थोडा जास्तीचा वेळ द्यावा, ही विनंती आही.

अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभी आहे. शालेय शिक्षण विभागावर बोलत असातना मी सांगू इच्छिते की, कोरोनामुळे मागच्या दोन वर्षापासून शाळा बंद होत्या. त्यामुळे जे पालक आपल्या पाल्यांना ॲन्ड्रॉईड फोन देऊ शकत होते अशा मुलांचे, शहरी भागातील मुलांचे कसेबसे शिक्षण सुरु होते. परंतु ज्या पालकांना ॲन्ड्रॉईड फोन घेणे शक्य नव्हते अशा मुलांचे नुकसान झालेले आहे. जवळपास ६० टक्क विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान या दोन वर्षात झालेले आहे. या सरकारच्या धोरणामुळे बससेवा बंद आहेत गावाकडून तालुक्यांच्या आणि जिल्ह्याच्या ठिकाणी.....

तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण) : सभागृहाची वेळ कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर...

असुधारित प्रत

श्रीमती मेघना साकोरे –बोर्डीकर....

विद्यार्थ्यांचे शाळा कॉलेजेसमध्ये जाणे बंद झाले आहे. एका सर्व्हेनुसार असे निदर्शनास आले आहे की, एसटी बंद असल्यामुळे २४ लाख विद्यार्थ्यांचे नुकसान झालेले आहे. आपल्या राज्याचे माननीय मुख्यमंत्री यांनी जाहीरनाम्यामध्ये वचन दिले होते की, शाळकरी विद्यार्थ्यांचे पाठीवरील ओझे कमी केले जाईल. मी शालेय शिक्षण मंत्री महोदया यांना विनंती करते. आपण या वर्षी पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना टॅब वितरित करावे व त्यामध्ये असे ॲप असावेत ज्यामुळे विद्यार्थ्यांचे ऑडीओ व्हिज्युअल कन्सेप्ट्स क्लिअर व्हावेत. आजही ग्रामीण भागात विषय शिक्षक कमी आहेत. गणित, इंग्रजी, विज्ञानचे शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांना शंका सोडवण्यात अडचणी येतात. यामुळे शालेय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना टॅब द्याव्यात अशी मागणी करते.

अध्यक्ष महोदय, माझ्या जिल्ह्यामध्ये शिक्षण विभागात अनेक रिक्त पदे आहेत. ती लवकरात लवकर भरावीत. मुख्यश्रेणी मुख्याध्यापकांची ४३६ पदे असून १२३ पदे आजही रिक्त आहेत. केंद्र प्रमुख ,सरळसेवा ३४ पदे मंजूर असून यातील १६ पदे रिक्त आहेत. केंद्र प्रमुख स्पर्धा परिक्षा २६ पदे असून सर्व २६ पदे आजही रिक्त आहेत. या सर्व रिक्त पदांची लवकर भरती व्हावी व रिक्त पदांवर शिक्षक यावेत अशी मी मागणी करते.

अध्यक्ष महोदय, क्रिडा विभागा संबंधी बोलू इच्छिते. परभणीची लेक ज्योती गवते या मुलीने खूप परिश्रम करुन, कठीण परिस्थितीत आपल्या जिल्ह्याचे नाव लौकिक देशात व देशाबाहेर केले असून परभणीतील क्रिडा प्रेमी यांनी तिला सहकार्य केले. आपल्याला विनंती करते की, ज्योती गवतेला शासकीय सेवेत उच्च पद देण्यात यावे.

अध्यक्ष महोदय, पशुसंवर्धन विभागासंबंधी सूचना करु इच्छिते. राज्य शासनामार्फत दुग्धव्यवसाय, शेळी पालन, कुक्कुट पालन व्यवसायाला चालना मिळण्याकरिता व शेती पूरक व्यवसायाला चालना मिळण्याकरिता शेतकऱ्यांना

श्रीमती मेघना साकोरे –बोर्डीकर....

आर्थिकदृष्टया सक्षम करण्यासाठी वेगवेगळया नाविन्यपूर्ण योजना अमलात आणल्या जातात. माझ्या जिंतूर तालुक्यातील उदाहरण देते. या योजनांकरिता ७ ते ८ हजार ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले आहेत. योजनेचे उद्दिष्ट ३० ते ४० लाभार्थ्यांचे आहे. एका तालुक्यात एवढी मागणी असेल तर हे उद्दिष्ट वाढवून मिळावे, अशी मागणी करते.

अध्यक्ष महोदय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग संबंधी बोलू इच्छिते. माझ्या मतदारसंघात श्रीक्षेत्र जगदंबा देवी, भोगाव येथे तीर्थक्षेत्र आहे. (अडथळा)

तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण) : आता वेळ कमी असून मंत्री महोदयांचे उत्तर होणार आहे.

श्रीमती मेघना साकोरे –बोर्डीकर : अध्यक्ष महोदय, शासनाच्या नाकर्तेपणामुळे एसटी कर्मचारी एवढया दिवसापासून उपोषणाला बसले आहेत. राज्यात १०० पेक्षा अधिक एसटी कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केली आहे. जिंतूर मतदारसंघातील जिंतूर आगारामधील एसटी चालक मुजफ्फर खान जफार खान पठाण, वय वर्ष ४१ यांनी आत्महत्या केली. त्यांची नोकरी हे उदरनिर्वाहाचे एकमेव साधन होते. त्यांच्या पश्चात वृध्द आईवडील, पत्नी व दोन मुले आहेत. त्यांचा सांभाळ करण्यासाठी कोणीही नाही. ज्या एसटी कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केली आहे त्यांच्या कुटुंबीयांना तातडीची मदत द्यावी, अशी मी मागणी करते व माझे दोन शब्द पूर्ण करते.

तालिका सभाध्यक्ष : आजच्या चर्चेकरिता मंत्री महोदयांच्या उत्तरासह पावणे सात पर्यंत वेळ होती. आता ३ तास वेळ वाढवली आहे. साडे सहा पर्यंत सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळेल व साडे सहा वाजता मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण सुरु होईल.

श्री. संजय जगताप (पुरंदर) : अध्यक्ष महोदय, सन २०२२ -२०२३ च्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, कृषी विभागाबाबत माझी मागणी आहे. माझ्या कार्यक्षेत्रात जाधववाडी दिवे, तालुका बीजगुणन केंद्र आहे. याचे वर्गीकरण फळ रोप वाटिकेत करावे असे निवेदन शासनाला दिलेले आहे. सिट्रस इस्टेटच्या धर्तीवर पुरंदर तालुक्यात सीताफळ, अंजिराची शेती आहे. येथे सिताफळ इस्टेटचा प्रकल्प व्हावा व त्यासाठी निधीची तरतूद करावी, अशी मागणी मी मंत्री महोदयांना करीत आहे.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.संजय जगताप …

त्यासाठी निधीची तरतूद करावी, अशा प्रकारची मागणी मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांकडे करीत आहे. त्याच बरोबर कृषी क्षेत्रामध्ये विविध मागण्या करित असताना पशु संवर्धन विभागाच्या मागण्यांवर बोलत असताना मला हे सांगावयाचे आहे की, माझ्या तालुक्यामध्ये १९ पशु वैद्यकीय दवाखाने आहेत. ८ पशु वैद्यकीय दवाखाने राज्य शासनाचे आहेत. परंतु, त्या ठिकाणी डॉक्टरांचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा आहे. ती पदे लवकरात लवकर भरली जावीत जेणेकरुन त्या ठिकाणच्या सर्वसामान्य शेतकऱ्यांना त्यांचे पशुधन वाचविण्याकरिता त्यांचा मोठ्या प्रमाणावर फायदा होईल. त्याचप्रमाणे पशु वैद्यकीय दवाखान्यातील औषधाकरिता खूप कमी प्रमाणात निधी असतो. त्याची मर्यादा वाढविण्यात यावी सर्वसामान्य शेतकऱ्यांना पशु धन वाचविण्यासाठीची औषधे परवडणारी नसतात. त्यामुळे त्यासाठी निधी मोठ्या प्रमाणावर वाढवून मिळावा, अशी विनंती मी आपल्या माध्यमातून करतो.

अध्यक्ष महोदय, माझ्या पुरंदर तालुक्यामध्ये रेशिम केंद्राकरिता देखील मी निधीची मागणी आपल्या माध्यमातून करीत आहे. क्रीडा विभागाच्या मागण्यांवर बोलत असताना मला हे सांगावयाचे आहे की, पुरंदर तालुक्यामध्ये तालुका क्रीडांगण आहे. त्या क्रीडांगणाकरिता आता मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध झाला आहे. परंतु, त्याच बरोबर हवेली तालुक्यामध्ये देखील आज क्रीडांगणांची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, आपल्या सर्वांना कल्पना आहे की, पुणे जिल्हा हा भारताचा डेट्रॉईट म्हणून ओळखला जातो. जवळपास १० पेक्षा जास्त ऑटोमोबाईल उत्पादन कंपन्या पुणे जिल्ह्यात आहेत. पुणे शहरालगत माझ्या भागामध्ये एक वेगळा क्रीडा प्रकार म्हणून dirt tracking करिता, तसेच मोटार सायकल रेसिंग व रेसिंग कोर्सचे एखादे क्रीडांगण त्या ठिकाणी उभे करता आले तर निश्चितपणे पुणे जिल्ह्याची व महाराष्ट्राची आंतरराष्ट्रीय स्तरावर एक आगळीवेगळी ओळख होईल व त्या क्रीडा प्रकाराबाबत चांगल्या प्रकारचा पुढाकार घेता येईल.

श्री.संजय जगताप …

अध्यक्ष महोदय, आपल्या माध्यमातून सहकार व पणनबाबत मला मुद्दामहून सांगावेसे वाटते की, आपल्या अर्थसंकल्पामध्ये विविध कार्यकारी सहकारी संस्थाकरिता आपण कोअर बँकिंगची सुविधा सुरु करीत आहोत. त्यांना सक्षम करण्याचे काम करीत आहोत. या विविध कार्यकारी संस्थांचे सचिव हे खऱ्या अर्थाने त्या संस्थेचा आत्मा असतात. सचिव चांगल्या आत्मियतेने काम करणारे असतील तर ती विविध कार्यकारी संस्था सक्षम होते. त्या सचिवांना त्या त्या बीसीसी बँकांच्या समवेत संलग्न करता आले, त्यांना अंतर्भूत करुन घेता आले तर निश्चितपणे त्या विविध कार्यकारी सहकारी संस्था सक्षम होण्यास जास्तीची मदत होईल.

अध्यक्ष महोदय, गृह रचना संस्था हा विषय देखील खूप गहन आहे. अनेक गृह रचना संस्था केवळ त्यांचे ऑडिट अपडेट होत नाही किंवा त्यांचे बुक किपिंग प्रॉपर होत नाही त्यामुळे अडचणीत येतात. त्यासाठी देखील सहकार खात्याच्या माध्यमातून जर एक चांगल्या प्रकारचे कोड सॉफ्टवेअर तयार करता आले तर निश्चितपणे गृह रचना संस्थाचे कामकाज चांगल्या प्रकारे चालू शकेल असे मला आपल्या माध्यमातून सुचवायचे आहे.

अध्यक्ष महोदय, शालेय शिक्षण विभागामध्ये सन २००५ पासून नियुक्त झालेले जे शिक्षक आहेत त्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशी विनंती आपल्या माध्यमातून माननीय शालेय शिक्षण मंत्री तसेच, राज्य सरकारला मला करायची आहे. काल-परवा माझ्या मतदारसंघात घडलेली एक गोष्ट मला मुद्दाम सांगावयाची आहे. पुरंदर मधील खानवडी शाळेचे माजी मुख्याध्यापक आदरणीय श्री.वाघमारे सर हे ६ महिन्यांपूर्वी सेवानिवृत्त झाले. त्यांना काल-परवा आम्ही सासवडच्या बाजारपेठेमध्ये भाजीपाला विकताना पाहिले. केवळ एक गोष्ट आहे की, सेवानिवृत्त झाल्यानंतर आपण त्यांना पेन्शन उपलब्ध करु शकत नाही. त्यामुळे एकच विनंती आहे की, ज्याप्रमाणे पंजाब, राजस्थान सरकारने जुनी पेन्शन योजना सर्वांसाठी लागू केली त्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाने देखील ती लागू करावी.

श्री.संजय जगताप …

अध्यक्ष महोदय, सांस्कृतिक कार्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. माझ्या भागात जेजुरी, वीर या क्षेत्रात महाराष्ट्राचे कुलदैवत खंडोबाराया आहे. तेथे वाघ्या, मुरळी तसेच मोठ्या प्रमाणावर गोंधळी, घडची, गुरव समाजाचे लोक राहतात.

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.संजय जगताप ...

त्यांच्यावर कोरोना काळात मोठ्या प्रमाणात उपासमारीची वेळ आली होती. त्यांच्याकरिता सांस्कृतिक कार्य मंत्री यांनी निधी उपलब्ध करुन दिला आहे. परंतु तो केवळ जिल्ह्यातील १०० व्यक्तींसाठी उपलब्ध करुन दिला आहे. पुणे जिल्ह्यासाठी उक्त निधी अधिक प्रमाणात उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम विभाग – मंत्री महोदयांनी माझ्या मतदारसंघासाठी भरीव निधी उपलब्ध करुन दिला आहे. माझी त्यांना विनंती आहे की, संत सोपान काका महाराज यांचा ७२५ वा समाधी सोहळा यावर्षी होणार आहे. ज्याप्रमाणे १५ वर्षापूर्वी राज्य शासनाने आळंदी ते पंढरपूर किंवा देहू ते पंढरपूर पालखी महामार्गाचा विकास केला. त्याप्रमाणे सोपान काका महाराज पालखी मार्गाकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून विशेष निधीची तरतूद करण्यात यावी, अशी माझी आग्रही मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय वित्त मंत्री यांनी नवी मुंबई येथे महाराष्ट्र भवन उभारण्याची घोषणा केली आहे. दिल्ली येथे ज्याप्रमाणे प्रत्येक राज्याचे भवन उभारण्यात आले आहे त्याधर्तीवर नवी मुंबई येथे प्रत्येक जिल्ह्याचे भवन उभारण्यात यावे व पुणे जिल्ह्याचे एक भवन उभारुन एक वेगळी ओळख निर्माण करावी, अशी माझी वित्त मंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, पर्यटन विभाग – ५ हजार वर्षांची ऐतिहासिक सांस्कृतिक परंपरा पुरंदर तालुक्याला लाभलेली आहे. या तालुक्यामध्ये वाल्मिक ऋषी यांचे मंदीर आहे, सात रांजण आहेत. या तालुक्यातील परिसर संत सोपान काकांची भूमी आहे. मुंबई येथे हेरिटेज वॉक प्रकल्प राबविण्यात आला आहे, बिबट्या सफारी सुरु करण्यात आली आहे. याच धर्तीवर पुरंदर तालुक्यामध्ये पर्यटन ट्रेक व सफारी या सुविधा सुरु करण्यात याव्यात, याकरिता मंत्री महोदय यांनी निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी माझी विनंती आहे.

श्री.संजय जगताप ...

अध्यक्ष महोदय, मस्तानी तलाव, स्वराज्याची पहिली लढाई, राज्यातील सर्वांत उंच किल्ला, देशात सर्वांत शेवटी बांधण्यात आलेला सोनवडी किल्ला पुरंदर तालुक्यामध्ये आहे. मी माझे भाषण वेळे अभावी पूर्ण करतो. धन्यवाद !

असुधारित प्रत

श्री.संजय गायकवाड (बुलडाणा) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ अर्थसंकल्पीय मागण्यांवर बोलण्यासाठी व त्यास पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, बुलडाणा हे शहर जिल्ह्याचे मुख्यालय आहे. या जिल्ह्यात कोणत्याही प्रकारचे उद्योग नाहीत. शेतकऱ्यांची मुले शहरात शिक्षण घेण्यासाठी येतात. त्यांना बीएसस्सी ॲग्रीकल्चर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्याकरिता ५ ते ७ लाख रुपये फीस द्यावी लागते. बुलडाणा येथे डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत सुमारे १५० एकर जमीन उपलब्ध आहे. उक्त जागेवर अनुदानित घटक कृषि महाविद्यालय स्थापन करण्यासाठी परिपूर्ण प्रस्ताव दीड वर्षापूर्वी शासनास सादर करण्यात आला आहे. त्यास अद्याप मान्यता दिली नाही, ती मंत्री महोदयांनी द्यावी, अशी माझी आग्रही मागणी आहे.

यानंतर श्री.तेलंग.

असुधारित प्रत

श्री संजय गायकवाड.....

अध्यक्ष महोदय, क्रीडा विभाग व शालेय शिक्षण विभागावर मी बोलणार आहे. बुलढाणा शहरामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू आर्चरीच्या माध्यमातून तयार होत आहेत. मागील पोलांड आणि एशियन चॅम्पियन शिपमध्ये जवळपास चार मेडल बुलढाणा जिल्ह्याला मिळालेले आहेत. आता जागतिक दर्जाच्या आर्चरी खेळामध्ये बारा खेळाडूंची टीम आहे. त्यापैकी पाच खेळाडू माझ्या बुलढाणा शहरातील आहेत. या टीममधील श्री. जवकर नावाच्या खेळाडू चॅम्पियनमध्ये रजक पदक मिळवलेले आहे. मागील पोलंड चॅम्पियनमध्ये श्री विपीन अपार यांनी गोल्ड मेडल मिळवलेले आहे. अशा प्रकारचे दर्जेदार खेळाडू माझ्या बुलढाणा शहरामध्ये तयार होत आहेत. परंतु उक्त खेळांचे महागडे साहित्य खरेदी करण्याची अनेक खेळाडूंच्या पालकाची परिस्थिती नाही. या खेळाडूमध्ये गुण आहेत परंतु त्यास वाव मिळत नाही.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील बंजारा समाज कबड्डी खेळामध्ये पुढारलेला आहे. कुस्ती, कबड्डी, रेसलिंगी आणि आर्चरी खेळाकरिता निवासी क्रीडा प्रबोधिनीची मागणी क्रीडा मंत्री महोदयाकडे केली. शासनाने बुलढाणा जिल्ह्यासाठी क्रीडा प्रबोधनी मंजूर केली तर या शहरांमध्ये ऑलिम्पिक स्तरावरील खेळाडू तयार होतील, असा मला पूर्ण विश्वास आहे.

अध्यक्ष महोदय, महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि खाजगी शाळेतील शिक्षणाच्या दर्जामध्ये मोठ्या प्रमाणावर तफावत आढळून येते. जर महानगरपालिका आणि जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये अशा प्रकारचे शिक्षण दिले तर ग्रामीण भागातील गरिबांची मुलं मोठे होणार नाहीत, त्यांना दर्जेदार शिक्षण मिळणार नाही. त्यामुळे त्यांना नोकरी देखील मिळणार नाही. ग्रामीण आणि शहरी अशी शिक्षणाची मोठी दरी निर्माण होत आहे. त्यामुळे नगर परिषदा, नगरपालिका, महानगरपालिका व जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये सीबीएससी पॅटर्न सुरू करणे आवश्यक आहे. तसेच काही शाळांमध्ये लहान मुलांसाठी नर्सरी आणि केजी-१ शाळा सुरू करणे अत्यंत आवश्यक आहे. असे जर केले तर ग्रामीण भागातील मुलं दर्जेदार शिक्षण घेऊन शहरी

श्री संजय गायकवाड.....

भागातील मुलाबरोबर येतील. त्यामुळे शिक्षणातील विषमता दूर होण्यास मदत होईल.

अध्यक्ष महोदय, बुलढाणा शहरामध्ये पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या बाजूला सार्वजनिक बांधकाम विभागाचे वापरात नसलेले शासकीय निवासस्थान आहे. तसेच उप अभियंता यांचा बंगला भारतीय स्टेट बँकेच्या चौकांमध्ये आहे. बुलढाणा शहरामध्ये एम.आय.डी.सी. नाही कोणत्याही प्रकारचा उद्योग नाही. त्यामुळे या दोन्ही जागेवर बीओटी तत्त्वावर दुकान संकुलन बांधण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे. उक्त प्रस्तावास शासनाने लवकरात लवकर मंजुरी द्यावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, बुलढाणा हे शहर डोंगराच्या काठावर वसलेले एक शहर आहे. या शहराकडे ये- जा करण्यासाठी राजुर घाटातून एकच रस्ता आहे. सदर रस्ता हा अतिशय अडचणीचा आहे. या रस्त्यावर अनेक लोकांचे अपघात होऊन प्राण गेलेले आहेत. या ७ किलोमीटर रस्त्याचे दुपदरीकरण केल्यानंतर वाहतुकीमधील मोठा अडथळा दूर होईल आणि त्या मार्गावरून लोकांना सुकर प्रवास करता येईल.

अध्यक्ष महोदय, बोथा घाटातील वाहतूक वाईल्ड लाईफमध्ये आहे. रात्री १०.०० ते सकाळी ६.०० पर्यंत बंद केली जाते. सदर रस्त्याचे रुंदीकरण करण्यासाठी वन विभाग परवानगी देत नाही. सदर १४ किलोमीटरचा आडवळणाचा रस्ता आहे. त्यामुळे उक्त रस्त्यावर ११ किलोमीटरचा उड्डाणपूल बांधण्याचे प्रस्तावित आहे. सदर उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाल्यानंतर तेथे कोणत्याही प्रकारचा वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही. त्यामुळे उक्त प्रस्तावास लवकरात लवकर मंजुरी द्यावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, बुलढाणा शहरामध्ये एकही बाह्यवळण रस्ता नाही. बुलढाणा ते देवघाट, देवघाट ते साखळी फाटा आणि साखळी फाटापासून भादोलापर्यंत बाह्य रस्त्याचे काम शासनाने मंजूर करावे, अशी मी विनंती करतो.

श्री संजय गायकवाड.....

अध्यक्ष महोदय, आज छत्रपती शिवाजी महाराजांची तिथीनुसार जयंती आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्माण केले, छत्रपती संभाजी महाराजांनी त्या स्वराज्याचे रक्षण केले आणि ज्या माँसाहेब जिजाऊ यांनी स्वराज्याचे स्वप्न पाहिले, अशा माँसाहेब जिजाऊ यांच्या नावाचा समावेश महापुरुषांच्या यादीमध्ये करण्यात आलेला नाही. माझ्याकडे ३२ महापुरुषांच्या नावाची यादी आहे. या यादीमध्ये धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे देखील नाव नाही. तसेच अहिल्याबाई होळकर यांचे देखील नाव नाही. त्यामुळे संबंधित मंत्री महोदयांना विनंती करतो की, वरील तिन्ही महापुरुषांची नावे ३२ महापुरुषांच्या यादीमध्ये समाविष्ट करावीत.

अध्यक्ष महोदय, बुलढाणा तालुक्यातील तारापूर कोलवड आणि मोताळा तालुक्यातील थड हे गाव गजानन महाराजांची जन्मभूमी आहे. या गावाला विदर्भाची पंढरी समजले जाते. येथील तीर्थक्षेत्रांच्या विकास कामासाठी पर्यटन विभागाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मी विनंती करतो. आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण संपवतो. धन्यवाद.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

श्री. दादाराव केचे (आर्वी) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, वर्धा जिल्ह्यातील आर्वी विधानसभा मतदारसंघामध्ये सन २०१९-२०, २०२०-२१ या खरीप हंगामामध्ये कापूस, सोयाबिन पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. तेथे गारपीट झाली होती. बोंडअळी, खोंडमाशी यामुळे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले होते. जिल्हाधिकारी, वर्धा यांच्यामार्फत १७८ कोटी रुपयांचा नुकसानभरपाईचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे. परंतु अद्यापपर्यंत एकही रुपया शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाला नाही. मी विनंती करतो की, सदरहू प्रस्तावास तात्काळ मंजुरी देण्यात यावी व प्रत्येक शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. दिनांक ०८/०१/२०२२ रोजी मोठ्या प्रमाणात अवकाळी पाऊस व गारपीट होऊन चना, गहू, संत्रा, केळी या पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले होते. याबाबत शेतकऱ्यांचे पंचनामे करण्यात आले आहेत. परंतु माझ्या मतदारसंघातील एकाही शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये नुकसानभरपाईची रक्कम मिळाली नाही. एका मतदारसंघाकडे अशा प्रकारे दुर्लक्ष केले जात आहे. शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे काम या सरकारने करावे अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, लोअर वर्धा येथे प्रकल्प आहे. या प्रकल्पावर मच्छीमार आहेत. परंतु तेथे गुंड प्रवृत्तीचे लोक बेकायदेशीरपणे मच्छीमारीचा व्यवसाय करीत आहेत. तेथील मच्छीमारीचा ठेका देऊन योग्य आणि नियमानुसार मच्छीमारीचा व्यवसाय झाला पाहिजे, अशी मी मागणी करतो. याबाबत शासनाने तात्काळ निर्णय घ्यावा. अन्यथा तेथे खून किंवा मारामारी होण्याची शक्यता आहे. पोलीस यंत्रणाही याकडे दूर्लक्ष करीत आहे. मच्छीमार करणाऱ्या संस्थाही दूर्लक्षित झाली आहे. तेथील कोळी समाजाची भावना लक्षात घेऊन तेथील माशांचा ठेकेदारी पद्धतीने लिलाव करावा. जेणेकरुन कोळी बांधवांच्या हातास काम मिळेल. त्यांना उदरनिर्वाह करण्याकरिता हातभार मिळेल.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाबाबत मी काही प्रश्न मांडणार आहे. आर्वी विधानसभा मतदारसंघात सार्वजनिक बांधकाम विभागाचे एकही

श्री. दादाराव केचे ....

रुपयाचे काम मागील दोन वर्षामध्ये झाले नाही. मौजा विरुळ-आंजी रस्ता, हेटीकुंडी-सिंधीविहिरी-माळेगाव ठेका-जामणी रस्ता, आष्टी-थार-बोटोणा-पार्डी रस्ता, बोरगाव टुमणी-साहुर-माणिकुवाडा-नारा रस्ता, बोरगाव-पंचाळा-झाडगाव-टुमणी या रस्त्यावरील पूल अतिशय महत्त्वाचे आहेत. या रस्त्यांकरिता तात्काळ निधी उपलब्ध करुन द्यावा. अशी मी यानिमित्ताने मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, वर्धा नदी किनाऱ्यावर कौनलेपुरे येथे तीर्थक्षेत्र आहे. तसेच दुऊरवाळा हे अतिशय दुर्लक्षित गाव आहे. वर्धा नदीच्या किनाऱ्यामुळे हे गाव दूर्लक्षित झाले आहे. तेथे रुक्मीणीचे माहेरघर आहे. तेथे नदीच्या किनाऱ्यावर संरक्षण भिंत बांधली तर तेथील गावाचे संरक्षण होईल व तेथील लोकांना येण्या-जाण्यासाठी रस्ता उपलब्ध होईल. या सर्व गोष्टींकडे शासनाने लक्ष द्यावे. जेणेकरुन रुक्मीणीचे माहेरघर असे ज्यास म्हटले जाते ते गाव भाविकांच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरेल. तेथे संरक्षण भिंत बांधून द्यावी.

अध्यक्ष महोदय, आष्टी-आर्वी-कारंजा हा एकच तालुका आहे. त्याठिकाणी कृषि उत्पन्न बाजार समिती एकत्र आहे. परंतु आता दोन्ही तालुके वेगवेगळे झाल्यामुळे आष्टी आणि कारंजा तालुक्याकरिता स्वतंत्र कृषि उत्पन्न बाजार समिती निर्माण करावी, याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर झाला आहे.

यानंतर श्री. चौधरी....

श्री.दादाराव केचे.....

...(अडथळा...) अध्यक्ष महोदय, माननीय सहकार मंत्री यांना विनंती आहे की, आष्टी आणि कारंजा या दोन्ही कृषी उत्पन्न बाजार समित्या वेगवेगळया कराव्यात. कारण दोन्ही तालुक्यांचा विस्तार व त्यातील गावांची संख्या मोठी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने हा निर्णय अभिप्रेत आहे. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. धन्यवाद.

असुधारित प्रत

श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी कृषी विभागाच्या मागण्यांवर बोलत आहे. माझ्या पालघर जिल्हयातील मोखाडासारख्या ग्रामीण भागामध्ये बऱ्यापैकी स्ट्रॉबेरीची लागवड सुरु झाली आहे. ज्याप्रमाणे सोयाबीन आणि कापसासाठी नवीन प्रक्रिया राबविली जाणार आहे त्यामध्ये भात, वरई आणि नागली या पिकांचा देखील समावेश करावा, अशी माझी या निमित्ताने विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, आमच्या पालघर जिल्हयातील जव्हार येथे कृषी महाविद्यालय निर्माण करावे, अशीही माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मी शालेय शिक्षण विभागाच्या मागण्यांवर बोलत आहे. पालघर जिल्हयामध्ये पेसा शिक्षकांच्या भरतीचा विषय प्रलंबित आहे. हा विषय शालेय शिक्षण विभागाने लवकरात लवकर मार्गी लावावा, अशी माझी विनंती आहे. माझ्या जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या अनेक शाळा पूर्णपणे मोडकळीस आल्या आहेत. या शाळांच्या इमारतींसाठी निधी उपलब्ध करुन द्यावा व शाळेचे बांधकाम करताना शौचालयाची देखील तरतूद करुन त्यासाठी आवश्यक तो निधी द्यावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मी क्रीडा विभागाच्या मागण्यांवर बोलत आहे. जव्हार येथे स्व.राजीव गांधी स्टेडियम आहे. सदर स्टेडियमचे अपग्रेडेशन करण्यासाठी अधिकचा निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी माझी मागणी आहे. तसेच विक्रमगड, मोखाडा, तलासरी आणि डहाणू या ठिकाणच्या आदिवासी खेळाडुंना प्रोत्साहन देण्यासाठी तेथे क्रीडांगण निर्मितीसाठी निधी उपलब्ध करुन द्यावा, ही विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील मोखाडा येथे पंचायत समितीच्या इमारतीस परवानगी देण्यात आली आहे. त्याप्रमाणेच जव्हार, वाडा आणि तलासरी येथे देखील नवीन इमारतींच्या निर्मितीसाठी निधी द्यावा,

श्री.सुनिल भुसारा.....

अशी मी माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांना विनंती करतो. तसेच जव्हार बस स्थानकासाठी देखील निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी माझी मागणी आहे. मोखाडा आणि विक्रमगडसाठी निधी दिल्याबद्दल मी सरकारचे आणि विशेषत: माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांचे अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, जव्हार येथील विद्युत केंद्राचा विषय बऱ्याच दिवसांपासून प्रलंबित आहे. त्यासाठी देखील निधी उपलब्ध करुन द्यावा अशी विनंती करुन माझे भाषण करतो. धन्यवाद.

असुधारित प्रत

श्री रईस शेख (भिवंडी पूर्व) : अध्यक्ष महोदय, आपने मुझे सन २०२२-२०२३ के अर्थसंकल्प में की अनुदानों की मांगों पर बोलने का अवसर प्रदान किया, उसके लिए मैं आपको धन्यवाद देता हूं.

अध्यक्ष महोदय, सबसे पहले मैं टेक्सटाईल के विषय पर अपनी बात रखना चाहता हूं. पावरलूम की जो सब्सिडी वित्त मंत्री सम्माननीय श्री अजित पवार जी ने रिस्टोर की थी..... (व्यवधान).... अध्यक्ष महोदय, मुझे संरक्षण दीजिए. मैं टेक्सटाईल के विषय पर बोल रहा हूं. वित्त मंत्री सम्माननीय श्री अजित पवार जी ने पावरलूम की सब्सिडी रिस्टोर की थी और सम्माननीय ऊर्जा मंत्री जी ने निवेदन किया था कि पावरलूम की सब्सिडी रिस्टोर होगी. लेकिन मैं बताना चाहता हूं कि केवल फरवरी माह की सब्सिडी आयी है.

अध्यक्ष महोदय, पावरलूम की जो सब्सिडी रिस्टोर की गई है और सम्माननीय ऊर्जा मंत्री जी ने यहाँ पर निवेदन किया था, तो केवल फरवरी माह की सब्सिडी रिस्टोर हुई है. जनवरी माह की सब्सिडी आज तक नहीं आयी है. सरकार से मेरा निवेदन है कि महाविकास आघाडी की सरकार आने के बाद हमने पावरलूम इंडस्ट्रीज को नया तो कुछ दिया नहीं है. लेकिन जो पुरानी सब्सिडी है उसको बार बार डिसकंटीन्यू किया जा रहा है और इस बिजनेस को डिस्टॅब्लाईज किया जा रहा है. मेरा निवेदन है कि सम्माननीय मंत्री महोदय इस बारे में एकदम स्पष्ट करें कि जनवरी और मार्च महीने की पावरलूम की सब्सिडी सबको दी जाएगी और मार्च महीने के बाद भी सब्सिडी कंटीन्यू की जाएगी.

अध्यक्ष महोदय, मैं शालेय शिक्षण विभाग के बारे में कहना चाहूंगा. हमारे भिवंडी शहर में २८ हजार बच्चे है और ४९ स्कूल्स है. लेकिन जितनी भी स्कूल्स है, उनकी हालत ऐसी है कि उनके पीआर कार्ड उनके नाम पर नहीं है. ....(व्यवधान).... समय के अभाव में इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं.

यानंतर श्री.धुमाळे....

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण) : सन्माननीय सदस्यांना नंतर संधी देण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी कृपया आपापल्या जागेवर बसावे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण आपले म्हणणे लेखी निवेदनाच्या स्वरुपात द्यावे, त्यावर निश्चितपणे कार्यवाही होईल. आता मी सर्वांना संधी देऊ शकत नाही. वेळेची मर्यादा आहे. सर्व सन्माननीय सदस्यांनी कृपया हे समजून घ्यावे.

डॉ. भारती लव्हेकर : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभी आहे.

अध्यक्ष महोदय, सर्व कोळीवाड्यांचे सिमांकन हे वेळेत पूर्ण व्हावे. तसेच त्याचा पुनर्विकास होण्याच्या दृष्टीने मुंबई महानगरपालिकेने २०३४ च्या डी.पी.मध्ये कोळीवाडे अधोरेखित करावेत, अशी मी मागणी करीत आहे. यासाठी स्वतंत्र नियमावली तयार करण्यात यावी, अशी माझी विनंती आहे. कारण कोळीवाड्यामध्ये साधे घर बांधायचे म्हटले किंवा तेथील दुरुस्ती करायचे म्हटले तरी त्रास होतो. महापालिकेचे अधिकारी तेथे लगेच हातोडा घेऊन येतात.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

श्री. शंभुराज देसाई (वित्त राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, यासंबंधी सकाळी माननीय उपमुख्यमंत्री यांनी वेळ वाढवून दिली आहे. अनेक सन्माननीय सदस्यांची भाषणे झाली आहेत आणि आता सन्माननीय सदस्या डॉ. भारती लव्हेकर बोलत आहत. काही सन्माननीय सदस्यांचे बोलायचे राहिले असेल तर त्यांनी लेखी स्वरुपात त्यांचे म्हणणे आमच्याकडे पाठविले तर निश्चितपणे त्या बाबतीत शासन सकारात्मक राहील. पण आता वेळ बघावी. त्यांनी लेखी मुद्दे द्यावेत, त्याचा निश्चितपणे विचार केला जाईल.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

तालिका सभाध्यक्ष : मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या मागण्यांवरील चर्चा ३ तास होती. उपमुख्यमंत्री महोदयांनी सर्वांशी चर्चा करुन आणखी ३ तास ती चर्चा वाढविली आहे. आता ६ तास चर्चा केली आहे. यापेक्षा आणखी काय केले पाहिजे. त्यामुळे आपण आपल्या पक्षाची नावे देताना ती मर्यादित असावीत. सर्वांना एकाच वेळी संधी मिळू शकत नाही. त्यामुळे पक्षाच्या नेत्यांना माझी विनंती आहे की, आपण आपल्या पक्षाची नावे देताना मर्यादित नावे द्यावीत, जेणेकरुन सर्वांना संधी मिळेल.

ऊर्जा मंत्री महोदयांना एक निवेदन करायचे आहे. त्यांनी ते करावे.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

असुधारित प्रत

पृ.शी. : रायगड किल्ल्यावरील जीर्ण झालेल्या विद्युत वाहिन्या बदलणे

मु.शी. : रायगड किल्ल्यावरील जीर्ण झालेल्या विद्युत वाहिन्या बदलणे यासंबंधी माननीय ऊर्जामंत्री यांचे निवेदन.

श्री. नितीन राऊत (ऊर्जा मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानसभा नियम ४७ हन्वये पुढील निवेदन करतो.

(**प्रेस :** येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण) : रात्री ७.०० वाजेपर्यत सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देण्यात येईल आणि त्यानंतर माननीय मंत्री उत्तर सुरु करतील. सर्व सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, आपण दोन-दोन मिनिटांमध्ये आपले मुद्दे मांडावेत. त्यामुळे जास्तीत जास्त लोकांना संधी देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

ॲड. अनिल परब : अध्यक्ष महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, आज सकाळीच या विषयावर चर्चा झालेली आहे. आज छत्रपती शिवाजी महाराजांचा मोठा दिवस आहे त्यामुळे बऱ्याच सन्माननीय सदस्यांना जायचे आहे म्हणून आपण ही चर्चा लवकरात लवकर संपवावी.

असुधारित प्रत

पृ. शी. :अनुदानाकरिता मागण्या

मु. शी.: सन२०२२-२०२३च्या अनुदानाकरिता मागण्या :

१) कृषी, पशुसंवर्धन , दुग्धव्यवसाय विकास व
मत्स्यव्यवसाय विभाग

२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

३) वित्त विभाग

४) सार्वजनिक बांधकाम विभाग

५) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

६) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

(चर्चा पुढे सुरु ...

डॉ. भारती लव्हेकर : अध्यक्ष महोदय, मागच्या ४ ते ५ वर्षापासून मच्छीमारांचा डिझेलचा परतावा प्रलंबित आहे. माझी...(अडथळा)...

अध्यक्ष महोदय, आता ही माझी दुसरी टर्म आहे परंतु अशा पद्धतीने भाषणामध्ये दोन दोन वेळा कोणीही बोलत आहे. ही काय पद्धत आहे ? आम्हाला बोलू द्यायचे नसेल तर बोलू देऊ नका. आपण ज्या लोकांतून निवडून येता तिथूनच आम्ही ही निवडून येतो. त्यामुळे आपण आमच्यावर अन्याय करु नका. मी बोलत असताना किती वेळा थांबायचे आहे ?

अध्यक्ष महोदय, मागच्या ४ ते ५ वर्षापासून मच्छीमारांचा डिझेलचा परतावा प्रलंबित आहे. माझ्या वर्सोवा मतदारसंघामध्ये दोन सोसायटयांचा मिळून गेल्या २७ महिन्यांचा १६२ कोटी रुपयांचा परतावा अजून मिळालेला नाही. माझी मागणी आहे की, मच्छीमार बांधवांचा जेवढा प्रलंबित परतावा आहे तो लवकरात लवकर देण्यात यावा आणि त्यासाठी निधीची तरतूद करण्यात यावी. एलईडी लाईटच्या मासेमारीमुळे मच्छीमार बांधवांचे आतोनात हाल होत आहेत. एलईडी लाईटद्वारे

डॉ. भारती लव्हेकर....

आकर्षित करुन मासेमारी करणाऱ्यांवर केंद्र आणि राज्याने बंदी घातलेली आहे. पंरतु त्याचा कहीही उपयोग होत नाही. त्यामुळे माझी मागणी आहे की, एलईडी लाईटच्या झोताद्वारे आकर्षित करुन मासेमारी करणाऱ्यांचे व्हीआरसी कौल आणि मासेमारी परवाना रद्द करण्यात यावा आणि अशा नौका जप्त करण्याची सुधारणा या कायद्यत करण्यात यावी, अशी माझी मागणी आहे. मुंबईमध्ये कोळी भवन उभारण्यात यावे, अशी मी मागणी करीत आहे. प्रत्येक सागरी जिल्ह्यात जिल्ह्याच्या ठिकाणी अद्ययावत मासळी बाजार बांधण्यात यावा अशी मी मागणी करते.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

डॉ. भारती लव्हेकर....

अध्यक्ष महोदय, मुंबईतील मासळी मार्केटची जागा विकासकाच्या घशात घालू नका. अनेक ठिकाणी विकास घुसत असून सरकार मधील लोक त्यांना मदत करीत आहेत. येथील भूमिपुत्रांना वाचवावे. त्यांच्या जागेवर एसआरए आणू नका. तसेच आक्रमण करुन त्यांना त्रास देऊ नका. सभागृहाच्या कामकाजाची वेळ वाढवून सन्माननीय सदस्यांना बोलण्याची अनुमती द्यावी, अशी मी मागणी करते व माझे दोन शब्द पूर्ण करते.

असुधारित प्रत

श्री. यशवंत माने (मोहोळ) : अध्यक्ष महोदय, सन २०२२- २०२३ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय वित्त मंत्री श्री. अजित पवार यांनी शेतकऱ्यांसाठी समाधानकारक उपाययोजना केल्या आहेत. अर्थसंकल्पात नियमित पीक कर्ज परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना महाविकास आघाडीने जाहीर केलेल्या प्रोत्साहन अनुदान जाहीर केले असून त्याचा लाभ २० लाख शेतकऱ्यांना होणार आहे. यासाठी शासनाने १० हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

तालिका सभाध्यक्ष : थोडक्यात मुद्दा मांडावा.

श्री. यशवंत माने : अध्यक्ष महोदय, भूविकास बँकेचे कर्ज आजोबांनी काढले असेल तर ते नातवाला फेडावे लागत होते. अशी अवस्था आपल्याकडे होत. आता हे कर्ज महाविकास आघाडी शासनाने माफ केल्यामुळे मी शासनाचे आभार मानतो. शेतकऱ्यांकरिता शेत तळ्याच्या अनुदानामध्ये वाढ केली असून आता ही रक्कम ७५ हजार रुपयांपर्यंत वाढवली आहे. या बद्दल मी शासनाचे व वित्त मंत्री यांचे आभार मानतो.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघात मोहोळ व पंढरपूर तालुक्यात एमको पेस्टीसाईड कंपनीचे Pyriban Dust औषध मारल्यामुळे द्राक्ष बागायतदारांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. हे बोगस औषध आहे की, चुकीचे पॅकेज झाले आहे हे आम्हाला माहीत नाही. किडे, मुंगी, अळी, किटक यांच्या पासून संरक्षण मिळण्याकरिता पिकावर फवारणी केली जाते. मात्र फवारणी केल्यानंतर द्राक्षाचे घड सुकणे, करपणे, द्राक्षाच्या वेलीचे शेंडे जळणे असे नुकसान झाले आहे. यामुळे मोहोळ व पंढरपूर तालुक्यातील द्राक्ष बागायतदारांचे नुकसान झालेले आहे. कृषी अधिकाऱ्यांकडून चौकशी करुन नुकसान भरपाई द्यावी अशी विनंती करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

श्री. राजेश एकडे (मलकापूर) : अध्यक्ष महोदय, सन २०२२- २०२३ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघात कापसाचे उत्पादन मोठया प्रमाणात होते. यामुळे मलकापूर येथे टेक्सटाईल पार्कची निर्मिती करण्यासाठी तरतूद करावी, ही विनंती. माझ्या मतदारसंघात वीर जगदेवराव सूत गिरणी असून त्यावर सध्या प्रशासकी नेमलेला आहे. ती बंद असून सुरु करण्याकरिता आर्थिक तरतूद करावी. बुलढाणा जिल्ह्यात आई जिजाऊचा जिल्हा आहे. संपूर्ण महाराष्ट्राच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. राजमाता जिजाऊंचा वारसा जनत करुन येणाऱ्या पिढीला मार्गदर्शक ठरेल या दृष्टीने जिजाऊसृष्टीने निर्माण बुलढाणा जिल्ह्यात सिंदखेड राजा येथे मराठा सेवा संघाने सुरु केले आहे. तरी शासनातर्फे या करिता भरीव निधीची तरतूद करावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांसारक्ष्या महापुरुषाला जन्म देणारे शहाजीराजे भोसले यांची समाधी कर्नाटक येथील होजीगीरी नावाच्या लहानशा खेड्यात आहे. या वीर पित्याच्या समाधीवर छप्पर देखील नाही. शिवरायांसारख्या महान घडवणाऱ्या पित्याच्या समाधीकडे आपले दुर्लक्ष होता कामा नये.

यानंतर श्रीमती गिरप...

श्री.राजेश एकडे ...

ही आपली जबाबदारी समजून त्या परिसरातील शहाजीमहाराजांच्या समाधीस्थळाची जोपासना महाराष्ट्र सरकारतर्फे करण्यात यावी, ही माझी विनंती आहे. धन्यवाद.

.....

असुधारित प्रत

श्री.प्रकाश आवाडे (इचलकरंजी) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील वस्त्रोद्योग, कृषी, शालेय शिक्षण, क्रीडा, वित्त, बांधकाम सहकार या विभागाच्या अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्याकरिता उभा आहे.

अध्यक्ष महोदय, आपले महाराष्ट्र हे वस्त्रोद्योगामध्ये भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. तसे पाहिले तर, कापड उत्पादनात ते पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे. आपल्या महाराष्ट्रात देशातील जवळजवळ ५२ टक्के कापड निर्माण होते. त्यातून विशेषत: यंत्रमागाद्वारे आज गावातील छोट्याछोट्या उद्योजकांनी निर्माण केलेल्या वस्त्रांचा पुरवठा या देशाला व जगाच्या पाठीवर होत असताना या वस्त्रोद्योगाकडे अक्षम्य अशा पध्दतीचे दुर्लक्ष या राज्य सरकारचे होत आहे.

अध्यक्ष महोदय, आता सन्माननीय सदस्य श्री.रईस शेख यांनी विजेचा मुद्दा उपस्थित केला. या वस्त्रोद्योगातील छोट्या घटकाच्या विजेच्या दराबाबत क्रुर चेष्टा या राज्य सरकारच्यावतीने सुरु आहे. मी मागच्या अधिवेशनात सांगितले होते की, वस्त्रोद्योगाला झटका देण्याचे काम हे सरकार करणार आहे. मी त्यावेळेस सांगितले होते की, २७ हॉर्सपॉवरच्या वरचा व २७ हॉर्सपॉवरच्या खालचा असे दोन वर्ग या मंडळींनी तयार केले आहेत.२७ हॉर्सपॉवरच्या वरच्या लोकांना प्रथम टारगेट करुन त्यांना फॉर्म भरुन द्या, तुमच्या युनिटच्या संबंधीची माहिती द्या, अशी मागणी केली गेली. त्यांचे अनुदान, त्यांना मिळणारी ग्रँट किंवा त्यांना जी सबसीडी मिळणार होती ती थांबविली गेली. आंदोलने झाली. वेगवेगळ्या ठिकाणच्या सर्व सन्माननीय सदस्य व उद्योजकांच्या मागणीनंतर माननीय वस्त्रोद्योग मंत्री इचलकरंजीला आले. त्यांनी हे होणार नाही. तुमची सबसीडी चालू ठेवू असे सांगितले. त्यानंतर बरोबर ४ दिवसांनी विज खात्याच्या एका अधिकाऱ्याने रात्री १२ वाजून ५ मिनिटांनी एक सर्क्युलर काढले की, वस्त्रोद्योगाच्या २७ हॉर्सपॉवरच्या वरच्या व २७ हॉर्सपॉवरच्या खालच्या सर्व सबसिड्या बंद झाल्या.

अध्यक्ष महोदय, हा वस्त्रोद्योग अतिशय गरीब माणूस चालवतो. त्याच्या सर्व सबसीड्या बंद झाल्यानंतर तीव्र उद्रेग निर्माण होतो हे लक्षात आल्यानंतर राज्य

सरकारने ते परत रिस्टोअर केले जाईल असे सांगितले. ज्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.रईस शेख यांनी केला. ते एक महिन्याचे रिस्टोअर झाले, त्याच्या मागच्या महिन्यांचे काय, त्याच्या मागची वाढून आलेली बिले आहेत त्यांचे काय, पोकळ थकबाकी म्हणून त्या ते त्या बिलावर येणार आहे त्याचे काय? ही सबसीडी तात्पुरती वाढवून दिलेली आहे. ती पर्मनंट नाही.

अध्यक्ष महोदय, जे निवेदन मंत्री महोदयांनी केले ते मी पाहिले, वाचले व ऐकले. त्यातून मला जो बोध झाला त्यानुसार ती पर्मनंट सबसीडी नाही. मला विनंतीपूर्वक विचारावयाचे आहे की, २७ हॉर्सपॉवरच्या वरच्या व २७ हॉर्सपॉवरच्या खालचा घटकांसाठी राज्य सरकार जी सबसीडी देणार आहे ती कायमस्वरुपी राहणार आहे की नाही?

अध्यक्ष महोदय, दुसरे अत्यंत महत्वाचे आहे, या राज्याचे उप मुख्यमंत्री जे हे राज्य चालवितात ते माननीय श्री.अजित पवार यांनी मागच्या बजेटच्या भाषणामध्ये या वस्त्रोद्योगातील २७ हॉर्सपॉवरच्या वरच्या घटकांना ७५ पैशांची त्यांची जी सबसीडी पूर्वी काढून घेतली होती ती परत देण्याचा निर्णय १ वर्षा पूर्वी याच ठिकाणी जाहीर केला. ती अजून मिळत नाही. माननीय श्री.अजित पवार यांनी बजेटच्या भाषणात जाहीर केलेल्या परंतु, न मिळणाऱ्या सबसीडीचे एकमेव उदाहरण कोणते असेल तर ते म्हणजे वस्त्रोद्योगाच्या या न मिळालेली ७५ पैशांच्या सबसीडीचे आहे.

अध्यक्ष महोदय, मला विनंतीपूर्वक सांगावयाचे आहे की, हा व्यवसाय राज्यातील घराघरात पोहोचलेला आहे. या व्यवसायाला जगवायचे असेल तर, माननीय श्री.अजित पवार यांनी जाहीर केलेली ७५ पैशांची अतिरिक्त सबसीडी द्यावी. २७ हॉर्सपॉवरच्या वरची व २७ हॉर्सपॉवरच्या खालची सबसीडी बंद करण्याचे जे नाटक सुरु आहे, ते करु नका. ती कायम ठेवा. त्याच बरोबर सहकार मंत्री महोदयांना विनंतीपूर्वक सांगावयाचे आहे की, तुम्ही कारखाना चालविता. येथे अनेक सन्माननीय सदस्य कारखाना चालविणारे आहेत.

नंतर श्री.शिंदे ...

श्री.प्रकाश आवाडे...

साखर कारखान्यातील एकाही अंगदला रजिस्ट्रेशन क्रमांक देण्यात आले नाहीत, याप्रकरणी अनेक वर्षापासून मागणी करण्यात येत आहे. लहान ट्रॅक्टरला आमच्या भागामध्ये अंगद म्हणतात. कृषि मंत्री यांना विनंती आहे की, ऊस वहन करणाऱ्या लहान ट्रॅक्टरच्या ट्रॉलीला रजिस्ट्रेशन क्रमांक देण्यात येत नाही. त्यामुळे एखादा अपघात झाला तर कोणत्या वाहन क्रमांकावर गुन्हा दाखल करावा, हे आरटीओ यांनाही समजत नाही. कारखान्यांनाही त्याची नोंद कशी घ्यावी, हे समजत नाही. अंगदला रजिस्ट्रेशन क्रमांक देण्याचा निर्णय घेण्यात यावा, अशी माझी सभागृहातील सर्व मंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, कोविड या आजारासोबत आपण २ वर्षे काढली आहेत. या कोविड काळात रुग्णालयामध्ये तातडीने भरती केलेल्या रोजंदारी तत्वावर काम केलेल्या कंत्राटी कामगारांचे ९-१० महिन्यांपासून वेतन अदा करण्यात आले नाही. जगात परत कोरोनाचे संकट घोंगावू लागले आहे. या राज्यात हे संकट परत आले तर हे कंत्राटी कामगार त्यांचे १०-१० महिन्यांचे वेतन न दिल्याने पुन्हा रुग्णांना वाचविण्यासाठी कामावर हजर होणार नाहीत. ते स्वत: कोरोनाग्रस्त झाले व त्यांनी राज्यातील जनतेला वाचविले आहे. त्यांचे वेतन आपण दिले नाही.

अध्यक्ष महोदय, मी वेळेअभावी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद !

श्री.रमेश कोरगावकर (भांडूप (पश्चिम)) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, शालेय शिक्षण विभाग – माननीय मंत्री श्री.आदित्य ठाकरे यांच्या प्रयत्नांमुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ११ शाळांमध्ये सीबीएसई शिक्षण पद्धती सुरु करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. माझा मतदारसंघ हा झोपडपट्टीत दाटीवाटीने वसलेला आहे. तेथील महानगरपालिकेच्या शाळेमध्ये सीबीएसई शिक्षण पद्धती सुरु करण्यात यावी, अशी माझी मागणी आहे. जेणेकरुन माझ्या मतदारसंघातील गरीब विद्यार्थ्यांना उच्च व दर्जेदार शिक्षण मिळू शकेल.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कलाकारांसाठी कोणत्याही प्रकारचे कला दालन नसल्याने त्यांना सराव करण्यास गैरसोय होत आहे. त्याकरिता ॲमिनिटी प्लॉट विकासकाकडून मिळू शकतात. ते घेऊन तेथे माझ्या मतदारसंघातील कलाकारांसाठी एक चांगले कला दालन उभारण्यात यावे, अशी माझी विनंती विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, पर्यटन विभाग – माझ्या मतदारसंघामध्ये देखना व सुशोभित असलेला पवई तलाव आहे. तेथे खूप मगरी असल्याने एका बाजूला क्रोकोडाईल पार्क तयार केला व मोठ्या तलावामध्ये बोटींग सुविधा उपलब्ध करुन दिली तर लोकांचे मनोरंजन होईल. या ठिकाणचे सौंदर्यीकरण केल्यास त्याचा फायदा विविध राज्यातील व आपल्या राज्यातील पर्यटकांना होईल. त्यासाठी उक्त तलावाचे सौंदर्यीकरण करण्यात यावे, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, आज छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आहे. माझ्या मतदारसंघामध्ये छत्रपती शिवाजी हा ऐतिहासिक तलाव आहे. तेथे येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढावी व विभागातील नागरिकांच्या मनोरंजनासाठी त्याचे सुशोभिकरण करण्यात यावे, अशी माझी विनंती आहे.

श्री.रमेश कोरगावकर...

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील एस वॉर्डच्या हद्दीत विकास नियोजन आराखडा, २०३४ अंतर्गत नगर भूमापन क्र.३७३/ए/३७, कांजूरगाव, क्षेत्रफळ ९,५०० चौरस मीटर हा भूखंड नियोजित क्रीडा संकुलासाठी आरक्षित करण्यात आला आहे. माझ्या मतदारसंघामध्ये स्पोर्टस् कॉम्प्लेक्स, स्वीमींग पूल नाही. सदरहू भागातील गोरगरीब जनतेसाठी व लहान मुलांसाठी एक स्पोर्ट कॉम्प्लेक्स पोहण्यासाठी व खेळण्यासाठी तयार करण्यात यावे. याकरिता डीपीमध्ये बदल करण्याकरिता नगरविकास विभागास प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. त्यास मंजूरी देण्यात यावी, अशी माझी आग्रही मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, श्रीमती गोदावरी धोंडू मैदान, सोनापूर येथील आरक्षित जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे फुटबॉल किंवा क्रिकेट मैदान तयार करण्यात यावे व प्रेक्षक गॅलरी उभारण्यात यावी, अशी माझी विनंती आहे. मी वेळे अभावी माझे भाषण पूर्ण करतो.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभारी आहे. धन्यवाद !

यानंतर श्री.तेलंग...

श्री राजू पारवे (उमरेड) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यावर बोलण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, गोसीखुर्द प्रकल्पासाठी जवळपास ८५३ कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याबद्दल मी महाविकास आघाडी सरकारचे आभार मानतो. गोसीखुर्द हा विषय मागील वीस वर्षापासून सुरू आहे. माझ्या मतदारसंघातील ५० गावे व भंडारा मतदारसंघातील ५० गावे गोसीखुर्द पुनर्वसन भागांमध्ये आहेत. मोठ्या प्रमाणावर निधीची तरतूद करून देखील गोसीखुर्द पुनर्वसित भागातील लोकांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. तसेच अद्याप तेथे रोजगाराची देखील व्यवस्था करण्यात आलेली नाही.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील थूटानबोरी गावामध्ये मागील वर्षापासून वीज नाही. विधानसभेमध्ये प्रश्न मांडल्यानंतर त्या अनुषंगाने शासनाने कार्यवाही करणे अपेक्षित असते. सदर गावाचे पुनर्वसन ६० किलोमीटर अंतरावर झालेले आहे. त्या गावाला जाण्यासाठी कोणत्याही प्रकारची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली नाही. त्या गावातील उर्वरित १५ हेक्टर जमीन शासनाने घ्यावी, त्यानंतर आम्ही गाव सोडण्यास तयार आहोत, अशी तेथील नागरिकांची मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, पुनर्वसित झालेल्या गावातील नागरिक काय कामे करीत आहेत, हे आपण पाहिले तर सर्व बाबी आपल्या लक्षात येतील. जेवढी गावे पुनर्वसित झालेली आहेत, त्या गावांना शासनाने सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशी मी विनंती करतो. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानून वेळेअभावी मी माझे भाषण संपवतो. धन्यवाद.

प्रा.डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन २०२२-२३ अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या बघण्यावर चर्चा करण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, बाभूळगाव तालुक्यामध्ये दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेले पीक गारपिटीमुळे बाधित झाले आहे. सदर पिकांच्या नुकसानीचा सर्व्हे करण्यात आलेला आहे. परंतु नुकसानभरपाई मात्र अद्याप देण्यात आलेली नाही. त्यामुळे मी कृषी मंत्री महोदयांना विनंती करतो की कळंब, बाभूळगाव व राळेगाव या तिन्ही तालुक्यातील नुकसान झालेल्या सर्व शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, बाभूळगाव तालुक्यामध्ये क्रीडा संकुलन नाही. त्यामुळे बाभूळगाव तालुक्यामध्ये क्रीडा संकुलन मंजूर करण्यात यावी अशी मी क्रीडा मंत्री महोदयांना विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, सन २०१० व २०१२ वर्षांमधील जे शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहिले आहेत, त्या संबंधित सर्व शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यात यावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपले आभार मानून वेळेअभावी मी माझे भाषण संपवतो. धन्यवाद.

श्रीमती नमिता मुंदडा (केज) : अध्यक्ष महोदय, बीड जिल्ह्यातील केज येथील स्व. गोपीनाथ मुंडे नाट्यगृहाची जागा नगरविकास विभागाकडे हस्तांतरित करण्यात आलेले आहे. उक्त कामास प्रशासकीय मंजुरी देखील मिळालेली आहे. सदर कामासाठी दोन कोटी रुपयांचा निधी देखील उपलब्ध करुन देण्यात आलेला. तरीदेखील त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे काम सुरू करण्यात आलेले नाही. त्यामुळे स्वर्गीय गोपीनाथ मुंडे नाट्यगृहाचे काम लवकरात लवकर सुरू करावे, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, दुय्यम निबंधक कार्यालय बांधण्यासाठी अंबाजोगाई येथे शासकीय जमीन उपलब्ध आहे. यासाठी शासनाने निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मी विनंती करते.

अध्यक्ष महोदय, अंबाजोगाई येथे तालुका क्रीडा संकुलाचे काम सुरू आहे. परंतु सदर काम अतिशय निकृष्ट दर्जाचे करण्यात आलेले आहे. मी देखील वास्तुविशारद आहे. सदर कामाची पाहणी केल्यानंतर मला लाज वाटेल, असे हॉरिबल काम केलेले आहे. तेथे रनिंग ट्रॅकमध्ये ड्रेनेजची सोय करण्यात आलेले नाही. जेव्हा पाऊस पडतो तेव्हा त्या ठिकाणी तलावाचे स्वरूप तयार होते. त्यामुळे पावसाळ्यामध्ये तिथे मुले काही करू शकत नाही. त्यामुळे संबंधित कंत्राटदाराला काळ्या यादीमध्ये टाकण्यात यावे व BOQ ची चौकशी करावी, अशी मी विनंती करते.

अध्यक्ष महोदय, आंबाजोगाई शहरामध्ये एक मोठे मंदिर आहे. त्या ठिकाणी पर्यटन करण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मी विनंती करते.

अध्यक्ष महोदय, केज तालुक्यातील धनेगांव येथे एक सुंदर धरण आहे. त्या धरणास अनेक पर्यटक भेट देतात. त्यामुळे पैठण येथील नाथ सागराच्या धर्तीवर धनेगाव येथील धरणाचा विकास करावा, अशी मी विनंती करते.

श्रीमती नमिता मुंदडा.....

अध्यक्ष महोदय, केज तालुक्यातील पिसेगाव येथे क्रीडा संकुलन उभारण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडून परवानगी घेतलेली आहे. त्यामुळे तेथे क्रीडा संकुल उभारण्यासाठी शासनाने ५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मी विनंती करते.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानून वेळेअभावी माझे भाषण संपवते. धन्यवाद.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

असुधारित प्रत

श्री. ज्ञानराज चौगुले (उमरगा) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावरील पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, खरीप हंगाम, २०२१ चा पीक विमा शेतकऱ्यांना मिळालेला नाही. याबाबत शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी आणि कृषि विभागाकडे अर्ज दिले आहेत. याविषयाबाबत माननीय कृषि मंत्र्यांनी तात्काळ कार्यवाही करावी, अशी मी मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाच्या ५६ शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी सोडविला आहे. त्याबाबत मी त्यांचे आभार व्यक्त करतो. त्या शिक्षकांचे माहे जून महिन्यानंतरचेही वेतन मिळाले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम मंत्री महोदयांनी व्हीडीआर, ओडीआर करिता निधी उपलब्ध करुन दिला आहे. त्याबाबत मी त्यांचे आभार मानतो. माझा तालुका कर्नाटक राज्याच्या सीमेवर आहे. कर्नाटक राज्याचे रस्ते आपल्या राज्याला जोडणारे रस्ते हे ९ मीटरचे असून आपल्या राज्यातील रस्ते ६ मीटर रुंदीचे आहेत. तेव्हा या रस्त्यांची रुंदी आणि दर्जा वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत. रस्ता बांधत असातना त्यावरुन २० टनाच्या वाहनांचा विचार केला जातो. परंतु प्रत्यक्षात त्या रस्त्यावरुन ४० ते ४५ टन वजनाची वाहने धावत आहेत. त्यामुळे रस्ता केल्यानंतर तो लगेच खराब होतो, अशी तक्रार वारंवार येत असते. यासाठी दर्जात्मक रस्ता तयार करीत असताना त्या रस्त्यांच्या निकषात बदल करावेत, अशी मी यानिमित्ताने मंत्री महोदयांना विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, वेळे अभावी मला माझे काही प्रश्न मांडता येणार नाहीत. मी ते प्रश्न लेखी स्वरुपात मंत्री महोदयांकडे देईन. ते प्रश्न मंत्री महोदयांनी सोडवावेत, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, मौजे समुद्रा येथे कारखान्याकरिता काही शेतकऱ्यांनी जमिनी दिल्या आहेत. ते शेतकरी आज उपोषणाला बसले आहेत. त्या शेतकऱ्यांच्या मुलांना

नोकरीदेण्याबाबतचा हा विषय आहे. त्यामुळे माननीय सहकार मंत्र्यांनी या शेतकऱ्यांचा प्रश्न निकाली काढावा, अशी मी त्यांना विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, माझ्या तालुक्याच्या बाजुला गाणगापूर पर्यटन स्थळ आहे आणि दुसरीकडे पंढरपूर आहे. माझ्या जिल्ह्यातील आंबाबाई मंदिर तुळजापूर येथे आहे. परंतु पर्यटनाचे एकही स्थळ माझ्या तालुक्यात नाही. माझ्या तालुक्यात बोरी धरणाच्या खालच्या बाजुस जागा उपलब्ध आहे. मी माननीय पर्यटन मंत्री महोदयांना विंनती करतो की, पैठणच्या धर्तीवर तेथे संगीत कारंजा, वॉटर गेम्स तयार करुन तेथे पर्यटन स्थळ विकसित करावे. जेणेकरुन माझ्या या मागासलेल्या जिल्ह्यास न्याय मिळेल. मी याबाबतची मागणी मंत्री महोदयांकडे करीत आहे. याचा विचार मंत्री महोदयांनी करावं. इतर विभागाच्या मागण्यांबाबत संबंधित मंत्री महोदयांकडे मी लेखी विनंती करीन. त्या सर्वांचा विचार व्हावा, ही विनंती.

धन्यवाद !

असुधारित प्रत

श्री. अशोक चव्हाण (सार्वजनिक बांधकाम मंत्री) : अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनुदानाच्या मागण्यांवर जवळपास ३८ सन्माननीय सदस्यांनी सहभाग नोंदविला आहे. यात सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रशांत बंब, योगेशदादा कदम, चेतन तुपे, सुभाष देशमुख, श्रीमती प्रतिभा धानोरक, सर्वश्री अजय चौधरी, रवि राणा, अभिमन्यू पवार, शेखर निकम, संजय केळकर, रविंद्र वायकर, लहू कानडे, सचिण कल्याणशेट्टी, अबु आजमी, रत्नाकर गुट्टे, डॉ. राहूल पाटील, डॉ. किरण लहामटे, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री प्रकाश सोळंके, राजेश पवार, विक्रमसिंह सावंत, ॲड. आशिष जैस्वाल, डॉ. तुषार राठोड, श्री. दीपक केसरकर, सर्वश्री अशोक पवार, श्रीमती मेघना दीपक साकोरे-बोर्डीकर, श्री. संजय जगताप, सर्वश्री संजय गायकवाड, दादाराव केचे, सुनिल भुसारा, रईस शेख, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्री. यशवंत माने, बळवंत वानखेडे, प्रकाश आव्हाडे, रमेश बोरगावकर, राजीव पारवे, प्रा.डॉ. अशोक उईके व इरतही अनेक सन्माननीय सदस्यांनी सकारात्मक सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाबाबत केल्या आहेत. अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या मतदारसंघाबाबत काही मागण्या उपस्थित केल्या आहेत. तसेच नव्याने धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत आणि सिस्टीम इम्प्रुव्हमेंटच्याबाबत अतिशय चांगल्या सूचना केल्या आहेत. मी विशेषत: सन्माननीय सदस्य ॲड. आशिष जैस्वाल यांचा उल्लेख करु इच्छितो. त्यांनी या विभागाचासखोल अभ्यास करुन नव्याने काही धोरणात्मक निर्णय घेण्याच्या सूचना केल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या २८ हजार ८७१.७३ कोटी, २४ हजार८७१.७३ कोटी आणि सार्वजनिक उपक्रम विभागाच्या ३७३३ अशा प्रकारे प्लॅन आणि नॉन प्लॅन एकूण मागण्या ह्या २८ हजार ६०४.७३ कोटी रुपयांच्या आहेत. या मागण्या मी सभागृहाच्या मंजुरीकरिता ठेवत आहे.

यानंतर श्री. चौधरी...

श्री.अशोकराव चव्हाण.....

या ठिकाणी अनेक मुद्दयांवर चर्चा करण्यात आली, काही आरोप-प्रत्यारोप देखील करण्यात आले. त्यासंदर्भातील शासनाची भूमिका मी आपल्यासमोर विशद करणार आहे.

अध्यक्ष महोदय, मी सुरुवातीलाच सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, दरवर्षीप्रमाणेच आपण भरपूर मागण्या करीत आहात. नवीन कामे हाती घ्यावीत अशा सर्वच सन्माननीय सदस्यांच्या मागण्या आहेत. परंतु जुन्या कामांवर अधिक तरतूद करुन ती कामे पूर्णत्वास नेण्याची नितांत गरज आहे हे मी या निमित्ताने सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो. अन्यथा, नवीन कामे केवळ कागदावरच राहतील. कामे मंजूर करुन १०-१२ टक्के रकमेची तरतूद करुन टेंडर काढले तरीही जोपर्यंत पूर्ण निधी मिळत नाही तोपर्यंत कामे पूर्ण होणार नाहीत. विभागाला मिळणारा प्लॅन व नॉन प्लॅन असा एकूण सुमारे २४ हजार कोटी रुपये निधी आहे. परंतु त्यापैकी प्लॅनचा निधी सुमारे १३ हजार कोटी रुपयांच्या आसपास आहे. या निधीमध्ये एवढी कामे घेऊन दोन वर्षांमध्ये पूर्ण होतील, अशी वस्तुस्थिती नाही. त्यामुळे सुरुवातीलाच मी सन्माननीय सदस्यांना विनंती करु इच्छितो की, मागील सरकारच्या काळात व महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर हाती घेण्यात आलेली कामे पूर्ण करण्याकरिता अर्थसंकल्पातून किंवा पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून अधिकचा निधी मिळविण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. मी पाहतो की, दररोज अनेक सन्माननीय सदस्य येऊन पत्राद्वारे विनंती करतात की, त्यांच्या मतदारसंघामध्ये नवीन कामे सुरु करावित. परंतु मला असे वाटते की, अगोदर जुनी कामे पुर्णत्वास नेली पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रशांत बंब यांनी अनेक मुद्दे मांडले. त्यांचा या विभागासंदर्भात खूप चांगला अभ्यास आहे. त्यांच्याकडे भरपूर लोकांची यंत्रणा आहे, त्यांचा यामधील अभ्यास मोठा आहे, अभ्यास केल्यानंतर ते अर्ज देऊन चौकशा लावतात, बऱ्याच ठिकाणी रस्ते खोदून पाहतात व त्याच्या व्हिडिओ क्लिप्स् देखील आम्हाला पाठवितात याची मला कल्पना आहे.

श्री.अशोकराव चव्हाण.....

त्यांना मला सांगायचे आहे की, चुकीच्या गोष्टी असतील तर त्याबाबत संबंधितांविरोधात निश्चितपणे कारवाई केली पाहिजे व याबाबत कोणाचेही दुमत नाही. परंतु आपण सरसकट आरोप करताना हा विचार केला पाहिजे की, सर्वच अधिकारी वाईट नसतात किंवा पूर्ण विभागच खराब नाही. कारण या विभागाचे काम वर्षानुवर्षे सुरु असून या विभागाने अनेक उत्तम अधिकारी आपल्याला दिलेले आहेत. महाराष्ट्र राज्याच्या प्रगतीत लोकप्रतिनिधी म्हणून जशी आपली भूमिका आहे त्याप्रमाणे अधिकारी म्हणून त्यांचा देखील हातभार लागलेला आहे. सरकार कोणाचेही असले तरीही त्या टीममध्ये चांगले काम करणार अनेक अधिकारी आपल्याकडे आहेत. आपण जर सर्वांच्याच मागे चौकशांचा ससेमिरा लावला तर कोणीही कामे करणार नाही. आज असे वातावरण आहे की कोणीही जोखीम घ्यायला तयार नाही, कोणीही कामे करायला तयार नाही. कारण चौकशी लागल्यानंतर त्याचा परिणाम पदोन्नतीवर होतो, व्यक्तिगत व कौटुंबिक आयुष्यावर देखील होतो. त्यामुळे खरोखरच काही गंभीर प्रकरण असेल तर चौकशी करायला हरकत नाही परंतु प्रत्येकच प्रकरणात चौकशी केली तर त्यातून काहीही निष्पन्न होणार नाही. शेवटी चार-पाच वर्षांनी एखाद्या प्रकरणात काहीही तथ्य नसल्याचे निष्पण्ण झाले तर संबंधित अधिकाऱ्याला विनाकारण मन:स्ताप सोसावा लागतो. त्यामुळे याबाबत गांभिर्याने विचार करण्याची गरज आहे अशी विनंती सन्माननीय सदस्य श्री.प्रशांत बंब यांना मी करु इच्छितो.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रशांत बंब यांनी मघाशी बोलण्याच्या ओघात बऱ्याच गोष्टींचा उल्लेख केला. माझ्याकडील माहितीनुसार त्यांनी आतापर्यंत आमच्या विभागाकडे ३० पेक्षा जास्त तक्रारी केलेल्या आहेत. त्या तक्रारींच्या अनुषंगाने विभागाने काहीही कार्यवाही केली नाही, असे नाही.

श्री.अशोकराव चव्हाण.....

माझ्याकडील घोषवाऱ्यानुसार ३० पैकी काही तक्रारींमध्ये संबंधितांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच पाच प्रकरणांमध्ये मुख्य अभियंता यांच्याकडून दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. अशोक चव्हाण...

त्याचबरोबर पुण्याचे मुख्य अभियंता श्री. सोळंके होते. आता ते सचिव आहेत. त्यांच्या अध्यक्षतेखाली एक एसआयटी नियुक्त केली आहे. त्या एसआयटीने चौकशी करुन त्यांचा अहवाल शासनाला दिला आहे. त्या अनुषंगाने पुढची कार्यवाही सुरू आहे. काही प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत आणि ती न्यायप्रविष्ठ असल्यामुळे त्या बाबतीत पुढील कार्यवाही करताना अडचणी येतात. काही प्रकरणात शिस्तभंगाची कारवाई सुरू करण्याचे प्रस्ताव सुध्दा मान्य झाले आहेत. काही ठिकाणी क्षेत्रीय अधिकाऱ्यांचे खुलासे मागविण्यात आले आहेत. काही प्रकरणात तथ्य आढळून न आल्याने काही प्रकरणे दप्तरी दाखल केली आहेत.

अध्यक्ष महोदय, मला मुद्दाम या ठिकाणी नमूद करायचे आहे की, सन्माननीय सदस्यांनी पाठविलेल्या कोणत्याही अर्जावर, पत्रावर दखल घेतली नाही, असे कधीही झाले नाही. पण मला असे वाटते की, आपण हे करण्यापेक्षा काही तरी सकारात्मक करावे. अमुक झाले पाहिजे, तमुक झाले पाहिजे, असे म्हटल्यापेक्षा आणि आपण रस्ते आता स्वत:च खोदायला लागलात तर आम्ही व्हीजिलन्सला सांगू की अमुक ठिकाणी जा आणि तेथील रस्त्याचे खोदकाम करुन तपासावे. त्यामध्ये काही तथ्य असले तर ते आम्हाला सांगा. तसे करायला हरकत नाही. व्हीजिलन्स किंवा आपले क्वॉलिटी कंट्रोल नावाचा आपला विभाग आहे. त्यांना सूचित करु की आपण त्या ठिकाणी जाऊन रस्ता खोदून तपासा. पण आपणच जर सर्व ठिकाणी रस्ते खोदायला लागलात तर मला वाटते ते उचित नाही. त्याचा परिणाम विभागाच्या कामावर निश्चितपणे होतो. कारण सत्यता तपासण्यासाठी आपले अधिकारी आहेत. त्यामुळे या बाबतीत आपण गांभीर्याने दक्षता घ्यावी, अशी मला आपल्याला विनंती करायची आहे.

अध्यक्ष महोदय, त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून काही लोकांची मागणी करण्यात आली होती आणि त्या ठिकाणी आपण काही विशिष्ट अधिकाऱ्यांना पाठविले होते. या बाबतीत मला हे सांगितले पाहिजे की, केंद्र शासनाने जो जलजीवन मिशन कार्यक्रम मंजूर केला आहे त्या

श्री. अशोक चव्हाण...

माध्यमातून साधारणपणे राज्यात ३५ हजार कोटी रुपयांची कामे सुरू आहेत किंवा प्रस्तावित आहेत. यासंबंधी मला एवढेच सांगायचे आहे की, या कार्यक्रमांतर्गत प्रत्येक गावाला, प्रत्येक घराला शुध्द पाणी पुरवठा झाला पाहिजे अशा प्रकारचा हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आहे. तो ग्रामीण भागामध्ये अतिशय फायदेशीर ठरणार असल्यामुळे या कामाला गती देण्यासंबंधी काही वरिष्ठ अधिकाऱ्यांची मागणी करण्यात आली होती. त्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये पदोन्नती झालेल्या १३ अधिकाऱ्यांपैकी जे वरिष्ठ अधिकारी होते त्यांना तेथे पाठविण्यात आले आहे. त्यामुळे अमुक अधिकाऱ्याला पाठविले किंवा अमुकला सोडले नाही, असे झाले नाही. त्यांनी एमजेपीला सिनियर अधिकारी द्यावेत, अशी मागणी केली होती म्हणून त्या ठिकाणी ते सिनियर अधिकारी दिलेले आहेत. मुद्दाम कोणाला पाठविले नाही, असे मानण्याचे काही कारण नाही.

अध्यक्ष महोदय, आपण आपल्या भाषणातून नांदेडला शंकर धोंडगे हे अधिकारी आहेत असा उल्लेख केला आहे. मला आपल्या सर्वांना मुद्दाम हे सांगायचे आहे की, श्री. शंकर अण्णा धोंडगे हे या सभागृहाचे सदस्य राहिलेले आहेत. आपण त्यांचा उल्लेख केला आहे. रेकॉर्डवर चुकीचे जाऊ नये म्हणून मी स्पष्ट करतो की, शंकर अण्णा धोंडगे नावाचा अधिकारी नांदेडमध्ये नाही. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी शंकर अण्णा धोंडगे यांच्या नावाचा उल्लेख केला म्हणून मला त्यांना सांगायचे आहे की, शंकर अण्णा धोंडगे हे या सभागृहाचे सदस्य राहिले आहेत. त्यांच्या नावाचा चुकीचा उल्लेख येऊ नये म्हणून मला त्यांच्या नावाच्या बाबतीत हा खुलासा करायचा आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रशांत बंब यांनी अधीक्षक अभियंता श्री. नाना पवार यांच्या नावाचा उल्लेख केला. मला हे मुद्दाम सांगायला हरकत नाही. कारण ज्यावेळी काही अधिकाऱ्यांच्या चौकशीचा प्रस्ताव माझ्याकडे आला... मागच्या सरकारच्या काळातील म्हणजे चंद्रकांत (दादा) पाटील हे या विभागाचे मंत्री असताना त्यांनी तो प्रस्ताव जसा मान्य केला मी देखील तो तसाच मान्य केला. कारण

श्री. अशोक चव्हाण...

सरकार बदलल्यानंतर ती फाईल पुन्हा "पुट अप" झाली आणि ती फाईल तशीच्या तशी माननीय मुख्यमंत्र्यांकडे त्यांच्या मान्यतेसाठी पाठवून दिली. कारण सिनियर अधिकाऱ्यांच्या चौकशी करायची असेल तर ती प्रकरणे त्यांच्याकडे जातात. तशी ती फाईल त्यांच्याकडे पाठवून दिली. ज्यावेळी ती फाईल परत आली तेव्हा श्री. नाना पवार यांचे नाव वगळून अन्य अधिकाऱ्यांची चौकशी करावी असा प्रस्ताव मंजूर होऊन आला. ते पाहिल्यानंतर मला शंका आली. एके ठिकाणी मुख्यमंत्र्यांची सही दिसते आणि हस्ताक्षर बाजूला लिहिलेले दिसते. मला ती शंका आल्यामुळे जेव्हा मी मुख्यमंत्र्यांना भेटलो तेव्हा मी त्यांना सांगितले की, आपले रेकॉर्ड तपासून पहावे. ते म्हणाले मी असे लिहिलेच नाही. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी ती फाईल परत मागविली. ते तपासले आणि लक्षात आले की, मुख्यमंत्र्यांच्या परवानगीशिवाय तिथे काही तरी नोंद झाली की अमुक या अधिकाऱ्याचे नाव सोडून इतरांच्या बाबतीत चौकशी करावी. मला हे सांगायला हरकत नाही की, माननीय मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर त्या प्रकरणात एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. अशोक चव्हाण...

माननीय मुख्यमंत्र्यांच्या सहीच्या नंतर तिथे कोणी नोंद घेतली असेल तर ती गंभीर बाब आहे. त्यानंतर त्याची चौकशी सुरु असून सध्या ते प्रकरण चौकशीवर आहे. यामध्ये जे काही निष्पन्न होईल त्यामध्ये कोणाचेही नाव असेल तर त्यावर कारवाई करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी काही अभियंत्यांना अतिरिक्त कार्यभार देण्याबाबत चार ते पाच अधिकाऱ्यांचा उल्लेख केला आहे. ते रेकॉर्डवर आहे. मला एवढेच सांगायचे आहे की, मागच्या सरकारच्या काळात बरेच प्रमोशन झाले नव्हते. विभागामध्ये प्रमोशनचे जे stagnation आले होते तर मधल्या काळात प्रमोशनच झाले नव्हते त्यामुळे बऱ्याच ठिकाणी अधिकारी उपलब्ध नव्हते. म्हणजे मुख्य अभियंत्यांच्या ५० टक्के जागा रिक्त होत्या, अधिक्षक अभियंत्यांच्या ४० टक्के जागा रिक्त होत्या. आमचे सरकार आल्यानंतर जवळपास ३१ कार्यकारी अभियंत्यांचे अधिक्षक अभियंता या जागेवर प्रमोशन करण्यात आले. तसेच १३ अधिक्षक अभियंत्यांचे मुख्य अभियंता आणि ४ मुख्य अभियंत्यापैकी सचिव स्तरावर पोस्टिंग करण्यात आली. याचा अर्थ वरिष्ठ दर्जांची पदे रिक्त असल्यामुळे बऱ्याच ठिकाणी अतिरिक्त कार्यभार द्यावा लागला. कारण प्रमोशनच झाले नव्हते. मधल्या काळात कोरोनामुळे माननीय मंत्र्यांचे काम सुद्धा डिस्टर्ब झाले होते, ही वस्तुस्थिती आहे. या सर्व बाबींच्या माध्यमातून आपल्याला वस्तुस्थिती कळली पाहिजे त्यामुळे मी याचा उल्लेख करीत आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी नांदेडमधील कामांचा उल्लेख केला आहे. मला आनंदच आहे की, आपले नांदेड शहरावर जास्त लक्ष आहे. परंतु माझी अपेक्षा आहे की, नांदेडच नाही तर आपण मराठवाडयावर सुद्धा लक्ष दिले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. प्रशांत बंब यांना मी सांगू इच्छितो की,मला काही राजकीय स्टेटमेंट करायचे नाही. परंतु मागच्या सरकारमध्ये मराठवाडयात काही कामे झालीच नाहीत. हे दुर्दैव आहे. त्यामुळे मागच्या सरकारच्या काळात झाले नाही म्हणून किमान

आज तरी औरंगाबाद, परभणी, जालना, नांदेड, लातूर , उस्मानाबाद किंवा बीड या ठिकाणी आम्ही निश्चितपणे काही ना काही कामांना गती देत आहोत. आपण अनुशेषाची भाषा वापरतो की, मराठवाडयामध्ये किंवा विदर्भामध्ये अनुशेष आहे. विदर्भामध्ये समृद्धी महामार्ग झाला आहे याचा आम्हाला आनंदच आहे. कारण पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र तसेच कोकण या ठिकाणी नेहमीच चांगली कामे होतात. माननीय मुख्यमंत्री सुद्धा कोकणात आणि मुंबईमध्ये लक्ष देतात. आमचे म्हणणे आहे की, मराठवाडयामध्ये काम सुरु आहेत तर त्याला गती दिली पाहिजे. त्याला समर्थन आणि साथ दिली पाहिजे. आपण नांदेड येथील गुरु-ता-गद्दी उल्लेख केला. माननीय माजी पंतप्रधान श्री. मनमोहन सिंग असताना त्यांनी गुरु-ता-गद्दी वेळी भरपूर पैसे दिले. आज त्या बाबीला जवळपास १२ ते १३ वर्षे झाली आहेत. कोणत्या रस्त्यांचे आयुष्य १२ ते १३ वर्षे आहे हे आपण मला सांगा.

अध्यक्ष महोदय, आज ट्राफिक एवढी वाढलेली आहे की, त्या ठिकाणचे रस्ते ५ ते ६ वर्षच जगतात. सन्माननीय सदस्यांचा निकष वेगळा असू शकतो हे ठीक आहे. १३ ते १४ वर्षे झाल्यानंतरही ते रस्ते सुस्थितीत आहेत, असे आपल्यला म्हणायचे आहे काय ? उगाच पैसे खर्च करण्याचा आमचा अजिबात हेतू नाही. आपण स्वत: जाऊन ते रस्ते बघा. मलाही वाटते की, जी कामे सुरु आहेत त्यासाठी परभणी, नांदेड येथेही पैसे दिले आहेत. गुरु-ता-गद्दी होऊन १२ ते १३ वर्षे झाली आहेत. एवढया वर्षानंतर चांगले काम होत असेल तर मला वाटते अशा कामांना आपण प्रोत्साहन दिले पाहिजे. औरंगाबादमध्ये काही कामे करण्यासाठी आपल्या अपेक्षा असतील तर आपण सांगा आम्ही ते देखील करु. मागे मी औरंगाबाद येथे जाऊन आलो. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री. संजय शिरसाट आणि तेथील माननीय खासदारही होते. तेथील बरीच कामे आपण मार्गी लावलेली आहेत. माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितिन गडकरी यांचे आपल्याला चांगले सहकार्य मिळते. हे मुद्दाम रेकॉर्डवर सांगितले पाहिजे की, मराठवाडयाच्या सर्व कामांसाठी आम्ही ज्या ज्या वेळी त्यांना पत्र व्यवहार करतो तेव्हा केंद्राकडून सुद्धा आपल्याला चांगले सहकार्य मिळते.

श्री. अशोक चव्हाण...

केंद्रामध्ये माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितिन गडकरी आहेत आणि राज्यामध्ये मी आहे तर आम्ही दोघांनी मिळून प्रयत्न केल्यानंतर महाराष्ट्र राज्यासाठी पैसे मिळत असतील तर त्याचा उपयोग करुन घेतला पाहिजे आणि आपल्या भागात जास्तीत जास्त कामे मंजूर करुन घेतली पाहिजे. त्यामुळे इथे काही चुकीचे घडत आहे या मताशी मी सहमत नाही. मला वाटते की या कामांना चांगली गती दिली तर यासाठी बराच चांगला निधी मिळेल. ही आमची भावना आहे.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाकडे अधिक बजेट दिलेले आहे असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. शहरातील कामे करीत असताना युटिलिटी शिफ्टींगचा विषय आहे. त्यामध्ये इलेक्ट्रिकल वायर्स काही गटार्स किंवा टेलिफोनच्या वायर्स अशा अनेक बाबी आहेत परंतु युटिलिटी शिफ्टींग हा त्यातील एक महत्त्वाचा घटक झाला आहे. विशेषत: शहरामध्ये कामे करायचे असतील तर आपल्याला या सर्व कामाला वाहतुक सिग्नलच्या केबल्स, मोबाईल कंपनीचे केबल्स, विद्युत वाहिनी, पाणी पुरवठयाच्या लाईन असतील तर या सर्वांसाठी पैसे द्यावेच लागतात. फक्त युटिलिटी शिफ्टींगमुळे होत नसते. कारण आज जर रस्ता टाकला तर पुन्हा खोदायची वेळ येते.

यानंतर श्रीमती करंदीकर...

श्री. अशोक चव्हाण ....

युटीलिटी शिफ्टींग करिता काही गोष्टी कराव्या लागतात. शासनाचा बदलीचा कायदा अस्तित्वात आहे. त्या कायद्यानुसार, बदल्या होतात. समितीच्या मान्यतेने प्रस्ताव येतो. केवळ हाच विभाग नाही तर शासनाच्या सर्व विभागातील बदल्यांची यादी अधिकृतपणे वेबसाईटवर उपलबध आहे. ती जाहीर केली जाते. आपण येथून माहिती घेऊ शकता. बदलीच्या कायद्यानुसार, नियमानुसार सर्व गोष्टी केल्या जातात. पदोन्नती करताना सेवा ज्येष्ठतेप्रमाणे, पात्रतेप्रमाणे पोस्टींग केल्या जातात. ज्या ठिकाणी सेवा ज्येष्ठता डावलून काही केले असेल तर आपण मला ते दाखवून द्यावे. विभागीय चौकशीमध्ये कोणाला सोडले असेल, असा काही विषय नाही. विभागीय चौकशी सुरु करण्याबाबत दोषारोप दाखल केल्या नंतर त्यांना आपले म्हणणे मांडण्याची संधी दिली जाते. त्यांचे उत्तर प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई जी वस्तुस्थिती असेल त्या नुसार करावी लागते. विभागीय चौकशी बंद केली असे प्रकार झालेले नाहीत. अनेक अधिकारी, कर्मचारी यांच्यावर कडक कारवाई देखील अनेक ठिकाणी झालेली आहे. त्यांचे म्हणणे पटले असेल तर ठीक आहे. नसेल तर त्यांच्यावर कारवाई झालेली आहे. असे स्पेसिफिक उदाहरण सांगितले तर मी लक्ष देईन. मात्र असे घडलेले नाही, हे मी नमूद करु इच्छितो.

अध्यक्ष महोदय, अनेक सदस्यांनी आपापल्या भागातील काही कामांचा उल्लेख केला आहे. या बाबत थोडकयात सांगू इच्छितो. विकासाच्या कामांबाबत काही मुद्दे आहेत. हॅम अंतर्गत ८ हजार ६४५ कि.मी लांबीच्या रस्त्यांची सुधारणा करण्याचे २७ हजार ९६ कोटी... २२० कामे १३८ पॅकेज सध्या प्रगतीपथावर आहेत. काही कामे झाली असून काही कामे प्रगतीपथावर आहेत.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी टोलबाबत सांगण्यात आले. टोलला नुकसान भरपाई देण्याची वेळ कशामुळे आली ? मागच्या सरकारने जो निर्णय घेतला तो राजकीय होता किंवा आंदोलनामुळे घ्यावा लागला, हे मला माहीत नाही. टोलवर

श्री. अशोक चव्हाण ....

आधारित रस्ते होते, ते मागील सरकारने रद्द केले. याचा परिणाम असा झाला की टोलच्या माध्यमातून जे पैसे उपलब्ध होणार होते, पॅकेजनुसार जे ठरले होते ती कामे अचानक बंद पडली. त्यांना नुकसान भरपाई देण्याचा निर्णय नाईलाजाने शासनाला घ्यावा लागला. जो गुंतवणूकदार आहे, concessionaire आहे, त्यांनी जर काम हाती घेतले, त्यांना टोलमधून पैसे मिळणार असतील .... मग नॅशनल हायवेला टोल चालतो. मागच्या सरकारच्या वेळेस टोल का बंद केले ? नॅशनल हायवेला आजही टोल सुरु आहे. केंद्र शासनात वेगळे व राज्यात वेगळे धोरण असे म्हणण्यापेक्षा सर्व ठिकाणी टोल मंजूर आहे. टोल मधून निधी मिळाला तर राज्याच्या अर्थसंकल्पात मदत होईल. तसे न करता टोल बंद करा असे म्हटले व टोल मधून पैसे वसूल करायचे नाही तर रस्त्यांची दुरुस्ती कशी होणार, नवीन कामे कशी होणार ? ही जी कामे घेण्यात आली आहेत ती टोलवर आधारित आहेत. या पूर्वी शासनाने टोल लागू केला होता. अचानक तो बंद केल्यामुळे, काही कामांना नुकसान भरपाई देण्याची गरज निर्माण झाली आहे.

अध्यक्ष महोदय, काही ठिकाणी असे सांगण्यात आले की, काही कामे ओव्हरलॅप झाली आहेत. पुन्हा त्या ठिकाणी हॅमचे काम करण्यात आले. असे फारसे विषय नाही. ४-५ कि.मी विषय होता. या बाबत मी चौकशी केली. जुन्या कामांचा Defect Liability Period संपलेला आहे. एखाद्या कामामध्ये जुन्या कामाचे ४ ते ५ कि.मी ओव्हरलॅप झाल्याचे दिसून आले. डीएलपी संपल्यामुळे तेथे कदाचित ओव्हरलॅप झाले असेल. यामध्ये काही गैर आहे असे दिसत नाही. यामध्ये भ्रष्टाचार झाला असा विषय समोर आलेला नाही. या संबंधी निश्चितच काही चुकीचे झाले आहे असे मला म्हणायचे नाही.

यानंतर श्रीमती गिरप...

श्री.अशोक चव्हाण ...

अध्यक्ष महोदय, फुलंब्री खुलताबाद राष्ट्रीय महामार्गाच्या कामाची चौकशी करण्यासंदर्भात उल्लेख केला गेला. मला हे सांगितले पाहिजे की, अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण विभाग, औरंगाबाद यांच्यामार्फत सदर कामाची चौकशी करण्याबाबतच्या सूचना ऑलरेडी देण्यात आलेल्या आहेत. तो अहवाल अंतिम टप्प्यामध्ये आहे. तो अहवाल आल्यानंतरच त्यामध्ये जे काही करायचे आहे ते निश्चित करावे लागणार आहे.

अध्यक्ष महोदय, हॅम रस्त्यांच्या दर्जाबाबत सांगितले गेले. मला हे मुद्दाम सांगितले पाहिजे की, प्रत्येक ठिकाणी एक स्वतंत्र इंजिनिअर नेमण्यात आलेले आहेत. त्या स्वतंत्र इंजिनिअरच्या माध्यमातून प्रकल्पाचे तपासणी अहवाल, त्यानुसार त्याला जी काही रक्कम देणे ठरते किंवा जी कारवाई अपेक्षित आहे ती केली जाते. त्या प्रत्येक कामावर एक स्वतंत्र इंजिनिअर आहेत. ते या कामावर देखरेख करतात. देखरेख करुन तेथे काही करण्याची गरज असेल, त्या ठिकाणी तक्रारी आल्या असतील तर निश्चित कारवाई केली जाते. हायब्रिड ॲन्युईटीच्या बाबतीत मला एवढेच सांगावयाचे आहे की, लायाबिलिटी खूप मोठी वाढत चालली आहे. आम्ही हायब्रिड ॲन्युईटीची कामे पुढे घ्यायची की नाही असा विषय आपल्या समोर आहेच. परंतु, मुद्दा एवढाच आहे की, राज्य शासनाचा हिस्सा ६० टक्के, ४० टक्के जो कन्सेसशनर आहे, तो त्यामध्ये पैसे घालतो. परंतु, व्याज मात्र १०-१० वर्षे देण्याचा जो बोजा आपल्यावर आलेला आहे, त्याला काही मर्यादा आहेत. ते लक्षात घेता हॅमची कामे नव्याने कामे घ्यायची किंवा काय करायचे, ज्या तरतुदी उपलब्ध होत आहेत, त्या तरतुदींच्या अनुषंगाने नवीन कामे हॅममध्ये घेणे शक्य आहे की नाही, याचा फेरविचार करण्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अजय चौधरी यांनी काही मुद्दे उपस्थित केले. एक तर शिवडी येथील जागा केंद्र सरकारच्या मालकीची असल्याने बी.डी.डी. चाळींचा पुनर्विकास ... (अडथळा)... ठीक आहे. त्यांनी उल्लेख केला म्हणून मी सांगत आहे. प्रत्येक मुद्दयावर येथे जे काही सांगितले गेले.... सदर इमारतीच्या पुनर्विकासाचा जो कार्यक्रम आहे तो गृहनिर्माण विभागाच्या माध्यमातून आहे. शिवडी मतदारसंघातील पोलीस स्टेशन इमारतीच्या दुरुस्तीची कामे चांगल्या दर्जाची झाली पाहिजेत असे त्यांचे म्हणणे आहे. ही विशेष दुरुस्तीची कामे प्रामुख्याने

श्री.अशोक चव्हाण ...

पोलीस हाऊसिंगच्या माध्यमातून केली जातात. ते करीत नसतील तर ती कामे काही प्रमाणात सार्वजनिक बांधकाम विभागाकडे दिली जातात. त्यामुळे त्यांना घ्यायची इच्छा असेल तर आमची काही तक्रार नाही. ते काम त्यांच्याकडे सोपविण्यास आमची काही तक्रार नाही.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शेखर निकम यांनी फोंडीघाट कोल्हापूर रस्ता, या संदर्भात निधीची तरतूद करण्याबाबतीत उल्लेख केला. सदर घाटाचे सर्व्हेक्षण करण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आलेली असून घाट रस्ता हा वन विभागाच्या हद्दीतून जात असल्याने वन विभागाची ना-हरकत प्राप्त झाल्यानंतर पुढची कारवाई करणे सोपे होणार आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी ठाणे जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील विश्रामगृहांची दुरुस्ती, ठाणे येथील रेशनिंग कार्यालय, ठाणे तहसीलदार कार्यालयाचा पुनर्विकास करणे, पोलीस वसाहतीची कामे याबाबतचा उल्लेख केला. मला हा विषय या ठिकाणी मांडलाच पाहिजे. चांगली विश्रामगृहे असलीच पाहिजेत त्याबाबत वादच नाही. परंतु, विश्रामगृहांचा वापर आपण किती करतो व आपल्या माघारी इतर कोण करतात, कारण विश्रामगृहांची अवस्था एवढी बिकट व वाईट झालेली आहे की, त्यांची देखभाल करणे जवळपास अशक्य झालेले आहे. आमदार, लोकप्रतिनिधी यांच्या हद्दीपर्यंत विश्रामगृहाचा मर्यादित वापर किंवा अधिकारी असतील त्यांचे मी समजू शकतो. परंतु, तेथे आता विश्रामगृहांची अवस्था एवढी बिकट झालेली आहे की, विश्रामगृहांची देखरेख होत नाही. त्याचा मिसयुस जास्त होत आहे.

अध्यक्ष महोदय, त्यामुळे विश्रामगृहे करायची कशाला, असा प्रश्न निर्माण होतो. ठीक आहे. मी समजू शकतो. त्यामुळे आम्ही बऱ्याच ठिकाणी खाजगीकरणाच्या माध्यमातून हे देण्याचे चालविले आहे. बऱ्याच ठिकाणी त्याला चांगले यश मिळालेले आहे. बऱ्याच जिल्ह्यांमध्ये विशेषत: जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी अशी विश्रामगृहे ही खाजगीकरणाच्या माध्यमातून देखभाल करण्याकरिता दिलेली आहेत. परंतु, ते सगळीकडेच शक्य होत नाही. कारण तालुक्याच्या लहान ठिकाणी देखभाल करण्याकरिता कोणी मिळेल का याबाबत सांगणे कठीण आहे. परंतु, विश्रामगृह करण्याच्या बाबतीत निश्चित फेरविचार करता

श्री.अशोक चव्हाण ...

आला पाहिजे असे मला वाटते. त्या ठिकाणी देखरेख करण्याच्या बाबतीत देखील काही वेगळ्या पध्दतीने विचार करण्याची गरज आहे, असे माझे मत आहे. कारण त्यांचा दुरुपयोग जास्त होत आहे.

अध्यक्ष महोदय, आमदार, खासदार, मंत्री, लोकप्रतिनिधी यांच्या हद्दीपर्यंत मी समजू शकतो. परंतु, विश्रामगृहांचा दुरुपयोग मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे त्यांची देखभाल करणे हे अतिशय अवघड झालेले आहे. पालघर जिल्ह्याचा उल्लेख मघाशी काही सन्माननीय सदस्यांनी केला. विशेषत: सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी उल्लेख केला की, नवीन जिल्हा झाल्यानंतर तेथे विश्रामगृह देण्यात आलेले नाही. ठीक आहे. पालघर जिल्ह्यामध्ये नव्याने एक विश्रामगृह देण्याच्या बाबतीतील निर्णय आपल्याला अपवाद म्हणून निश्चित करता येईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.लहू कानडे यांनी असे सांगितले की, त्यांच्या मतदारसंघात छोटे-छोटे पूल वगैरे घ्यायचे आहेत. मला सन्माननीय सदस्यांना एवढेच सांगावयाचे आहे की, नाबार्ड २८ मध्ये .... मघाशी सन्माननीय सदस्य श्री.राजेश पवार यांनी उल्लेख केला होता की, त्यांच्या भागात कदाचित नाबार्ड २७ मध्ये काही कामे आलेली नाहीत. मला असे वाटते की, त्यांच्या भाषणात आता यावेळेस जी कामे आली, त्यांचा उल्लेख झाला असता तर बरे झाले असते. परंतु, तुम्ही तो केला नाहीत. मी समजू शकतो की, मर्यादा आहेत.

नंतर श्री.शिंदे ...

श्री.अशोकराव चव्हाण...

मी कोणत्या पक्षाचा मतदारसंघ आहे याचा विचार करुन कामे मंजूर केली नाहीत. मराठवाड्याचा विचार केला, ही चांगली बाब आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री.लहू कानडे, राजेश पवार यांनी लहान पूलाच्या संदर्भात मुद्दे मांडले आहेत. त्यांचा नाबार्ड-२८ मध्ये नवीन प्रस्ताव घेताना मर्यादित स्वरुपात विचार करण्यात येईल. नाबार्डचा निधी ५०० ते ६०० कोटी रुपयांपेक्षा अधिक मिळत नाही. सदरहू योजनेंतर्गत काम केल्यानंतर त्याचे पैसे मिळतात. त्यासाठी अगोदर निधी खर्च करावा लागतो. अशा प्रकारची ज्या सन्माननीय सदस्यांनी मागणी केली त्यांच्या कामांना या माध्यमातून मदत करता येईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रत्नाकर गुट्टे यांनी मुद्दा मांडला आहे की, परभणी जिल्ह्यात पूरहानीमुळे नुकसान झाले आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, पूनहानी संदर्भात परभणी जिल्ह्यास २४ कोटी रुपये निधी उपलब्ध करुन दिला आहे. राज्यात अनेक ठिकाणी उक्त प्रकरणी निधी उपलब्ध करुन दिला आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.राहुल पाटील यांनी या चर्चेच्या माध्यमातून परभणी जिल्ह्यातील न्यायालयाच्या इमारत बांधकामासाठी निधीची मागणी केली आहे. या प्रकरणी विधि व न्याय विभागाने निधीची तरतूद केली पाहिजे. सदरहू काम करणारी एजन्सी ही सार्वजनिक बांधकाम विभाग आहे. सदरहू कामासाठी विधि व न्याय विभागाला विनंती करुन हे काम हाती घेता येईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष देशमुख यांनी हॅममधील पीएन १५३, सोलापूर जिल्ह्यातील सोलापूर शहर बाह्य वळण रस्त्याची सुधारणा करण्यासाठी ४ वेळा निविदा काढण्यात आली, अद्याप कार्यारंभ आदेश देण्यात आला नाही, असा आक्षेप चर्चेच्या वेळी घेतला आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, सदरहू कामासाठी ३ वेळा निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. उक्त प्रकरणी मे.नंगद्रा

श्री.अशोकराव चव्हाण...

इंजिनिअर्स ॲण्ड कन्स्ट्रक्शन इंडिया प्रा.लि. यांनी निविदा सादर केली होती. सदरहू निविदाकाराने financial closure / arrangement केली नसल्याने उक्त काम मार्गी लागले नाही. सदरहू काम रद्द करुन दिनांक ९ जुलै, २०२१ रोजी पुन्हा ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यास प्रतिसाद मिळण्यावर बऱ्याच बाबी अवलंबून आहेत. उक्त कामाची आता निविदा काढण्यात आली असून पुढील कार्यवाही करणे अपेक्षित आहे. १५० दिवसांचा कालावधी दिनांक १४ मे, २०२२ रोजी संपत आहे. त्यामुळे Letter of Appointment देण्यात आले नाही. उक्त प्रकरणी निविदा प्रक्रिया सुरु असून अंतिम निविदा कालावधी अद्याप शिल्लक आहे. सदरहू कामास अद्याप चालना मिळालेली नाही.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दीपक केसरकर यांनी चर्चेच्या वेळी मांडलेला साकव दुरुस्तीचा उपक्रम हाती घ्यावा, हा मुद्दा कोकणाच्या दृष्टीकोनातून अतिशय महत्त्वाचा आहे. मला याची जाणीव आहे. मध्यंतरीच्या काळात कोकणामध्ये अतिवृष्टी झाली होती. त्यावेळी अनेक साकव वाहून गेले व अनेक साकवांचे नुकसान झाले आहे. या विषयाच्या संदर्भात एक स्वतंत्र बैठक घेण्यात येईल. कोकणातील नादुरुस्त किंवा खराब झालेल्या साकवासाठी निधी देण्याकरिता मदत करण्याची भावना आहे. कोकणातील साकव हा फार जुना प्रकार आहे. त्यासाठी मदत केली पाहिजे. कोकणातील दळणवळणाची अवस्था लक्षात घेता, याबाबी करणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, मी अनेक सन्माननीय सदस्य यांच्या मुद्यांचा उल्लेख केला आहे. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी आझाद व ओव्हल मैदानाच्या रिन्युअलचा मुद्दा मांडला आहे. मी उक्त विषयाची माहिती घेतली आहे. विभागाकडे अशा लीजच्या संदर्भात माहिती नाही. सन्माननीय सदस्य यांचेकडे उक्त प्रकरणाची माहिती असेल तर त्यांनी ती मला द्यावी. सकृतदर्शनी माझ्या विभागाकडे लीज रिन्युअलच्या संदर्भात आज माहिती उपलब्ध नाही. मला विभागाकडून माहिती

श्री.अशोकराव चव्हाण...

घ्यावी लागेल. मला वाटते की, जमिनीच्या लीजचा विषय महसूल विभागाशी संबंधीत असू शकेल. याबाबत माहिती घेण्यात येईल. हा विषय सार्वजनिक बांधकाम विभागाचा असेल तर माहिती घेण्यात येईल. मुंबईतील मैदाने ही मुंबईची फुप्फुसे आहेत.

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

श्री.अशोकराव चव्हाण.....

राज्य व आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू या मुंबईतील मैदानातूनच निर्माण झालेले आहेत, याची मला जाणीव आहे. त्यामुळे या मैदानांच्या lease renewal च्या बाबत सरकार प्रयत्नशील राहील.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजेश पवार यांनी K.T. Construction या कंपनीची कामे संथगतीने सुरु असल्याचे सांगितले आहे. याकडे देखील निश्चितपणे लक्ष दिले जाईल. राज्यातील रस्त्यांची कामे देताना संबंधित कंत्राटदाराची bidding capacity कॅपेसिटी किती आहे, हे तपासूनच त्यांना कामाचे कंत्राट देणे आवश्यक आहे. राज्यातील रस्त्यांची कामे देताना एका कंत्राटदाराकडे किती कामे असावीत याबाबत एडीबीमध्ये निर्णय घेण्याचा प्रयत्न करीत आहोत. कारण एकाच कंत्राटदार सर्व कामांमध्ये पैशांची गुंतवणूक शकत नाही. त्यांना देखील आर्थिक मर्यादा आहेत. राष्ट्रीय महामार्गाचे काम करणारे कंत्राटदार राज्यातील रस्त्यांची कामे घेत आहेत. Open Bidding असल्यामुळे आपणास काहीही म्हणता येत नाही. परंतु अशा प्रकारच्या अटी समाविष्ट करण्याचा आम्ही विचार करीत आहेत. काही ठिकाणी अशा प्रकारच्या अटी देखील समाविष्ट केल्या आहेत. संबंधित कंत्राटदाराची bidding capacity किती आहे, त्यांच्या माध्यमातून किती ठिकाणी कामे सुरु आहेत, तो कंत्राटदार किती कामे करु शकतो व आता नवीन किती कामे घेऊ शकतो या सर्व बाबींचा विचार करुन तो कंत्राटदार qualify होतो की कसे याबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारचा प्रयत्न काही ठिकाणी केला जात आहे.

अध्यक्ष महोदय, रस्त्यांच्या कामाचा दर्जा चांगला असला पाहिजे, अशी तुमच्यासह माझी देखील भूमिका आहे. काही सन्माननीय सदस्यांनी सूचना केली आहे की, सर्व रस्त्यांच्या कामांसाठी DLP ५ वर्षांसाठी लागू करावा. परंतु स्पेसिफिकेशनवर सर्व बाबी अवलंबून आहेत. जिल्हा परिषद, एमडीआर आणि एडीबीमधील रस्त्यांच्या कामाचे स्पेसिफिकेशन वेग-वेगळे आहेत.

श्री.अशोकराव चव्हाण.....

प्रत्येक रस्त्याचे काम स्पेसिफिकेशनवर अवलंबून आहे. एडीबीच्या कामामध्ये स्पेसिफिकेशन जास्त आहेत. राष्ट्रीय महामार्गाच्या प्रति किलोमीटर कामाची किंमत जास्त आहे. त्यामुळे डीएलपी ५ वर्षे असणे स्वाभाविक आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून करण्यात आलेल्या रस्त्यावरुन जड वाहतूक अपेक्षित नाही. परंतु यावर कोणाचेही नियत्रंण नाही. कारण जिल्हा परिषदेने केलेल्या रस्त्यांवरुन देखील जड वाहतूक केली जात आहे. वाळू चोरी सर्रास सुरु आहे. वाळुची वाहतूक करणारे वाहने कोणत्याही रस्त्यावरुन घेऊन जातात. त्यामुळे जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आलेल्या रस्त्यांची डीएलपी २ वर्षे ठेवावी की ५ वर्षे करावी, याबाबत विचार करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर मायनिंगचे काम सुरु आहे, त्या ठिकाणच्या रस्त्यांच्या दर्जा चांगला असणे आवश्यक आहे. विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणावर मायनिंग केली जाते. राज्यामध्ये अनेक रस्त्यांवरुन मोठ्या प्रमाणावर वाळुची वाहतूक केली जात आहे. वाळुची कायदेशीर आणि बेकायदेशीर अशी दोन्ही प्रकारे वाहतूक केली जात आहे. जड वाहतुकीमुळे राज्यातील रस्त्यांची अतिशय दूरवस्था होत आहे. त्यामुळे हे रस्ते बी.टी. ऐवजी सिमेंटचे केले पाहिजे, अशी आमची भूमिका आहे. ज्या भागामध्ये मोठ्या प्रमाणावर मायनिंगचे काम केले जाते, त्या भागामध्ये प्राधान्याने सिमेंटचे रस्ते करण्यात यावेत, अशी माझी भूमिका आहे. वारंवार रस्ते दुरुस्त करण्याची वेळ येऊ नये, अशी शासनाची भूमिका आहे. त्या दृष्टिकोनातून हे शासन रस्त्यांची कामे करीत आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष जैस्वाल यांनी निविदा कार्यपद्धतीबाबत व खड्यांबाबत काही सूचना दिलेल्या आहेत. या संदर्भात निश्चितपणे बैठक घेण्यात येईल. रस्त्यांच्या कामामध्ये अधिक पारदर्शकता आणण्यासाठी आज बदललेल्या परिस्थितीमध्ये नवीन निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

श्री.अशोकराव चव्हाण.....

अध्यक्ष महोदय, राज्यामध्ये एडीबीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर कामे हाती घेण्यात आलेली आहेत. सदर कामांसाठी १ टक्क्यापेक्षा कमी व्याजदराने निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. एडीबीच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या पहिल्या टप्प्यातील ३१ कामांना मंजुरी देण्यात आलेली आहे. भाग -१, ९ पॅकेजमधील १३ कामे प्रगतीपथावर आहेत. भाग-२, १७ पॅकेजमधील १८ कामे निविदा स्तरावर आहे. फेज-२ व फेज-३ मधील कामांना वेळ आहे. परंतु फेज-१ मधील भाग-२, १७ पॅकेजमधील १८ कामे निविदा स्तरावर आहेत. राज्य मार्ग व प्रमुख जिल्हा मार्गापुरता हा विषय मर्यादित केलेला आहे. राज्याच्या अर्थसंकल्पीय मर्यादेमध्ये राज्याच्या सर्व गरजा पूर्ण करणे शक्य होत नाही. त्यामुळे एडीबीच्या माध्यमातून काही निधी उपलब्ध करुन जास्त वाहतूक असलेल्या रस्त्यांची कामे करण्याचा माझा प्रयत्न सुरु आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

असुधारित प्रत

श्री. अशोकराव चव्हाण.....

जेथे प्रामुख्याने अधिक वाहतूक कोंडी होते, जेथे वाहनांची संख्या अधिक आहे, अशा रस्त्यांवर अधिक चांगले कामे करण्याचा विभागाचा प्रयत्न आहे. कमी वेळेमध्ये अनेक विषय मांडावयाचे आहेत. तसेच इतरही मंत्री महोदयांना त्यांची मते आणि मागण्या मांडावयाच्या असल्यामुळे मी सभागृहाचा अधिक वेळ घेणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. रविंद्र वायकर यांनी जोगेश्वरी-विक्रोळी भुयारी मार्गाचा उल्लेख केला होता. त्याबाबत बैठक घेण्यात येईल. या भागाची अडचण दूर करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचा आज कोणीही उल्लेख केला नाही. हा उल्लेख केला जाईल, अशी मला अपेक्षा होती. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक व्हावे, अशी आमची इच्छा आहे. मागील सरकारच्या काळात माननीय पंतप्रधानांच्या हस्ते या स्मारकाचे भुमिपूजन झाले होते. सदरहू विषय माननीय न्यायालयात प्रलंबित आहे. पर्यावरणाच्या क्लिअरन्सकरिता काही लोकांनी माननीय सर्वोच्च न्यायालयात प्रकरण दाखल केले आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाने हा प्रश्न पुन्हा माननीय उच्च न्यायालयाकडे पाठविला आहे. याबाबतच्या सर्व त्रुटींची पूर्तता करुन त्या माननीय उच्च न्यायालयाकडे पाठविण्यात आल्या आहेत. परंतु माननीय उच्च न्यायालयाने याबाबत अद्यापपर्यंत सुनावणी घेतली नाही. ही बाब मेन्शन करण्याचा आम्ही सातत्याने प्रयत्न केला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचा प्रश्न मार्गी लागला पाहिजे. हे काम लवकरात लवकर मार्गी लागावे, अशी आमची इच्छा आहे. यासाठी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी तरतूद करण्यात आली आहे. मागील सरकारच्या काळात पर्यावरणाचा सदर विषय हाताळला असता तर हा विषय प्रलंबित राहिला नसता. माननीय पंतप्रधानांनी या स्मारकाचे भुमिपूजन केले आहे. त्यामुळे मी याचे महत्त्व समजू शकतो. हे काम लवकर झाले पाहिजे, अशी आमची भूमिका आहे. उच्च न्यायालयातील हे प्रकरण लवकर मार्गी लागावे, अशी आमची प्रामाणिक इच्छा आहे.

श्री. अशोकराव चव्हाण.....

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकम विभाग आणि सार्वजनिक उपक्रम (एमएसआरडीसी) विभागाचा मी उल्लेख करीत आह. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या एच – २ ते एच – ११, अशा दोन्ही विभागाच्या २८ हजार ६०४.७३ कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पीय तरतुदीला सभागृहाने मंजुरी द्यावी, अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत

श्री. बाळासाहेब पाटील (सहकार मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातील वित्त विभागाच्या मागणी क्रमांक जी – १ ते जी – १० मधील रुपये ४९ हजार ५० कोटी, ८९ लाख, ९८ हजार रुपयांच्या अर्थसंकल्पीय मागण्या मंजुरीसाठी एकत्रितपणे सभागृहापुढे मांडतो. सन्माननीय सदस्यांनी जे जे मुद्दे मांडले आहेत, त्यांची नोंद घेण्यात आली आहे.

अध्यक्ष महोदय, या मागण्यांवर अनेक सन्माननीय सदस्यांनी मते मांडली आहेत. सन्माननीय सदस्या श्रीमती प्रतिभा धानोरकर यांनी मुबलक पतपुरवठा व्हावा, अशी मागणी केली आहे. त्यांच्या जिल्ह्याचे १ हजार कोटी रुपयांचे उद्दिष्ट होते. त्यापैकी ७०७ कोटी रुपयांचे उद्दिष्ट आलेले असून ७१ टक्के वाटप करण्यात आले आहे. काही राष्ट्रीयकृत बँकांनी त्यांचे उद्दिष्ट पूर्ण केले नाही. त्यांना त्याबाबत सूचना देण्यात येतील. छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेमध्ये २ हजार वंचित लाभार्थी आहेत. त्यांना या योजनेचा लाभ मिळावा,अशी त्यांची मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, महाविकास आघाडी सरकार स्थापन झाल्यानंतर महात्मा ज्योतिबा फुले यांच्या नावाने कर्जमाफी योजना जाहीर केली. त्या योजनेची सर्व प्रक्रिया आता पूर्ण होत आहे. यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद केली आहे. त्यामुळे या योजनेतील लोकांना छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेचा लाभ देता येणार नाही.

यानंतर श्री. चौधरी....

श्री.बाळासाहेब पाटील.....

त्याचप्रमाणे चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती बँकेवर सन २०१२-१७ दरम्यान जे संचालक मंडळ होते तेच संचालक मंडळ अजून कार्यरत आहे. कारण त्या संचालक मंडळातील एक महिला प्रतिनिधी उच्च न्यायालयात गेल्या व त्यांनी एका तांत्रिक मुद्दयावर पाच वर्षे मुदतवाढ मिळवून घेतली. पाच वर्षे मुदतवाढ मिळाल्यामुळे त्यांना धोरणात्मक निर्णय घेता येत नाहीत. त्यांनी निवडणुकीला स्थगिती दिली आहे. न्यायालयात आपली बाजू मांडून लवकरात लवकर निवडणूक घेण्याचा शासनाचा मानस आहे. त्यामुळे बँकेला धोरणात्मक निर्णय घेता येणार नाहीत. बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर गुन्हा दाखल आहे. त्यांना बडतर्फ करावे, अशी मागणी आहे. परंतु सदर गुन्हा बँकेशी निगडित नाही.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी मागणी केली की, गृहनिर्माण संस्थांचे बाय-लॉज तयार करावेत. तसेच गृहनिर्माण संस्थांच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे मानधन ठरविण्यात यावे. ९७ वी घटनादुरुस्ती रद्द झाली असल्याने राज्य सहकार निवडणूक प्राधिकरण रद्द करावे, अशीही त्यांची मागणी आहे. परंतु सहकारी संस्थांच्या निवडणुका त्रयस्थ मार्गदर्शकाच्या निरीक्षणाखाली निष्पक्षपणे पार पडण्यासाठी स्वतंत्र यंत्रणेची आवश्यकता असल्यामुळे निवडणूक प्राधिकरण रद्द करणे उचित होणार नाही.

अध्यक्ष महोदय, शेतकरी बाजार सुरु करण्याबाबत देखील सन्माननीय सदस्यांनी मागणी केली. कृषी व पणन विभागामार्फत कोरोना काळात मुंबईमध्ये आपण काही बाजार सुरु केले होते ते आजही सुरु आहेत.

अध्यक्ष महोदय, दरम्यानच्या काळात शासनाने मानीव अभिहस्तांतरण योजना हाती घेतली. त्या योजनेच्या माध्यमातून चांगल्या प्रकारचे काम झाले. ठाणे विभागामध्ये त्यासंदर्भात काही तक्रारी आहेत. सदर तक्रारींची आम्ही चौकशी करुन न्याय देण्याचे काम आम्ही करु.

श्री.बाळासाहेब पाटील.....

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार वारंवार एक रास्त मुद्दा मांडत आहेत. मुंबई शहरामध्ये हौसिंग सोसायटयांचे फार मोठे जाळे आहे. त्यांच्या निवडणुका घेणे ही प्रक्रिया फार मोठी आहे. दरम्यानच्या काळात कोरोनामुळे आपण या निवडणुका स्थगित केल्या होत्या. २५० पेक्षा जास्त सदस्य संख्या असणाऱ्या सोसायटयांसाठी आपण ३५० निवडणूक अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या माध्यमातून या निवडणुका पार पडतील. परंतु या निवडणुका पार पाडण्यासाठी काही खर्चाची आवश्यकता असते. त्या अनुषंगाने खर्च आकारण्यात आले होते. हा खर्च कमी करावा अशी मागणी वारंवार आली. त्यासाठी मी व्यक्तिश: सर्वांशी चर्चा केली तसेच निवडणूक प्राधिकरणाच्या लोकांनाही हा खर्च जास्त असल्याबाबत सांगितले आहे. एकूणच आपले प्रयत्न सुरु आहेत. २५० पेक्षा कमी सभासद असणाऱ्या सोसायटयांसाठी आम्ही निर्णय घेतला आहे की, जो सदस्य निवडणुकीला उभा राहणार नाही किंवा निवडणुकीमध्ये भाग घेणार नाही अशा सभासदाच्या मार्गदर्शनाखाली म्हणजे त्याला निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमून निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य म्हणतील की मानधनाबाबत पुन्हा आश्वासन देत आहात. परंतु मी सांगू इच्छितो की, यासंदर्भातील अहवाल आल्यानंतर आम्ही निर्णय घेऊ... (अडथळा...) लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल. हा प्रश्न बऱ्याच दिवसांपासून प्रलंबित असल्याने साधारणत: १५ दिवसांमध्ये निर्णय घेऊ.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजेश पवार यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांची मी नोंद घेतली आहे. तसेच काही सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे पत्र दिले आहेत, त्यांचीही नोंद घेण्यात आली आहे. सन्माननीय सदस्य श्री.रमेश बोरनारे यांचे देखील जिल्हा बँकेच्या संदर्भात काही प्रश्न आहेत. काही सहकारी साखर कारखान्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये अद्याप देखील मोठया प्रमाणात ऊस

श्री.बाळासाहेब पाटील.....

शिल्लक असल्याचे सांगण्यात आले. त्याचे गळीत झाले पाहिजे यासाठी राज्यभर सूचना दिल्या आहेत की, सर्व ऊसाचे गाळप झाल्याशिवाय कारखाने बंद करु नयेत. त्याबाबत सहकार आयुक्त यांच्या माध्यमातून नियोजन केले जात आहे.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. बाळासाहेब पाटील...

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी सहकार पणन विभागाच्या मागणी क्रमांक व्ही २, ३ व ५ खाली सादर करण्यात आलेल्या योजनांसाठी रुपये १,५१८ कोटी ५३ लाख ५ हजार मात्रचा सन २०२२-२३ चा अर्थसंकल्प सभागृहाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. त्यास मान्यता देण्याची आपल्यामार्फत मी सभागृहास विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, सहकार व पणन विभागाच्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेदरम्यान सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या त्या सर्वांची नोंद घेण्यात आली आहे. म्हणून सहकार व पणन विभागाचा एकूण रुपये १,५१८ कोटी ५३ लाख ५ हजार मात्रचा सन २०२२-२३ चा अर्थसंकल्प मंजूर करण्याची मी सभागृहास विनंती करतो.

असुधारित प्रत

श्री. आदित्य ठाकरे (पर्यटन मंत्री) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेतून अनेक सन्माननीय सदस्यांनी येथे काही मागण्या केल्या आहेत आणि काही चांगल्या सूचना देखील केलेल्या आहेत. पर्यटन विभागाच्या मागण्यांवर एकंदरीत १८ सन्माननीय सदस्यांनी आपले मत नोंदविले आहे. त्यापैकी काही सन्माननीय सदस्य या ठिकाणी उपस्थित आहेत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती प्रतिभा धानोरकर यांची एक चांगली सूचना आली आहे. त्यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा व्याघ्र प्रकल्पात बससेवेची मागणी केली आहे. याची आम्ही नोंद घेतली आहे. हा व्याघ्र प्रकल्प वन विभागाच्या अखत्यारित आहे. तरी देखील चंद्रपूर जिल्ह्यामध्ये खिडकी किल्ला किंवा रामाणा तलाव यावर आम्ही काम करीत आहोत आणि लवकरच तेथे चांगले व शानदार टुरिझम सर्कीट उभे करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी देखील काही चांगल्या सूचना केल्या आहेत. त्यामध्ये ठाणे कारागृह, कोपेनेश्वर मंदिर याची देखील आम्ही नोंद घेतली आहे. ते प्रस्ताव आम्ही जिल्हाधिकारी यांच्याकडून मागवून त्यावर पुढील योग्य ती कार्यवाही करु.

अध्यक्ष महोदय, वांद्रे पश्चिम भागाचे सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी वांद्रे किल्ल्याबद्दल मत नोंदविले आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, मुंबईतील जे जे किल्ले असतील, मग त्यामध्ये वरळी, माहीम, वांद्रे, शिवडी, सायन, धारावी या सर्व किल्ल्यांसाठी आम्ही आराखडा तयार करुन त्यावर पुढे कसे काम करायचे यासंबंधी सांस्कृतिक कार्य विभागांशी चर्चा करुन आम्ही त्यावर काम करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री. दीपक केसरकर आणि ज्ञानराज चौगुले यांनी देखील काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. श्री. दीपक केसरकर यांनी पानबुडीबद्दल उल्लेख केला आहे. त्यावर आम्ही काम करीत आहोत. सन्माननीय सदस्य श्री. ज्ञानराज चौगुले यांनी एका मंदिरासंबंधी विषय मांडला आहे.

श्री. आदित्य ठाकरे...

या सर्व विषयांवर काम करीत असताना आज ज्या सूचना आल्या आहेत त्या विचारात घेतल्या जातील.

अध्यक्ष महोदय, मघाशी आपण "होता जीवा म्हणून वाचला शिवा" हे आपण महत्त्वाचे सांगितले आहे. त्यामुळे जेथे योग्य जागा असेल त्या ठिकाणी त्यांचा पुतळा आणि जे काही करायचे आहे ते आपण करु.

अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२-२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन मार्च २०२२ मध्ये पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत पर्यटन या उपविभागासाठी मागणी क्रमांक झेड डी ४, प्रधान लेखाशीर्ष ३४५२ पर्यटन या खाली सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी अनिवार्य खर्चासाठी रुपये ११० कोटी तर कार्यक्रम खर्चासाठी १७०४ कोटी अशा एकूण रुपये १८१४ कोटी इतक्या रकमेची अर्थसंकल्पीय तरतूद मान्य करण्याची विनंती सभागृहास करीत आहे.

असुधारित प्रत

श्री. दत्तात्रय भरणे (दुग्धविकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पीय चर्चेदरम्यान दुग्धविकास विभागाच्या संबंधित माननीय रविंद्र वायकर, डॉ. किरण लहामटे यांनी मुद्दे उपस्थित केले. तसेच इतर ३ सन्माननीय सदस्यांनी याबाबत मुद्दे उपस्थित केले. मी आपल्या माध्यमातून एवढेच सांगतो की, त्याची निश्चितपणे नोंद घेऊन पशुसंवर्धन, दुग्धविकास विभागाची मागणी क्रमांक डी ४, डी ५, डी ८ खाली सादर करण्यात आलेल्या अनिवार्य खर्चासाठी १७१८ कोटी व कार्यक्रम खर्चासाठी २५२ कोटी १८ लाख असे एकूण १९७० कोटी ५० लाख रुपयांचा सन २०२२-२३ चा अर्थसंकल्प सभागृहाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. त्यास मान्यता देण्याची मी आपणामार्फत सभागृहास विनंती करतो.

असुधारित प्रत

श्री. अस्लम शेख (मत्स्यव्यवसाय मंत्री) : अध्यक्ष महोदय, आज या विभागाच्या मागण्यांवर चर्चा करीत असताना सभागृहामध्ये सर्वश्री. योगेश कदम, दादाराव केचे, डॉ. किरण लहामटे, श्रीमती भारती लव्हेकर...

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. योगेश कदम यांनी एनसीडीसीचे थकित कर्ज माफ करण्याच्या दृष्टीने विनंती केली आहे. पण मी त्यांना सांगू इच्छितो की, एनसीडीसीचे कर्ज प्रोसेस करताना त्यातील १० टक्के रक्कम डीपीडीसीमार्फत प्रोसेस करण्यात येते.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. अस्लम शेख...

२० टक्के विशेष भागभांडवल असते आणि ५५ टक्के कर्ज घ्यायचे असते. या संदर्भात वेगवेगळ्या वेळी विभागातर्फे लागणाऱ्या ५ टक्क्यांच्या हिशोबाने १९१ लाख रुपये आणि २० टक्क्यांच्या हिशोबाने ७५५ लाख रुपये आणि ५५ टक्क्यांच्या हिशोबाने ४ हजार ७४१ रुपये एवढा भार सरकारवर येणार आहे. त्या संदर्भात सविस्तर माहिती घेऊन सरकार योग्य ती कार्यवाही करेल.

अध्यक्ष महोदय, डिझेल परताव्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी मागणी केली आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, महाराष्ट्र राज्यामध्ये एवढे मोठे संकट आल्यानंतर सुद्धा पॅकेज देण्यात आले. त्यानंतर सुद्धा डिझेलमध्ये कुठेही सबसिडी दिलेली नाही. ६० कोटी रुपये वितरीत करण्यात आलेले आहेत आणखी ३९ कोटी रुपये बाकी आहे ते यावर्षी देण्यात येणार आहेत. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी विशेष करुन कोळीवाडा सिमांकनच्या संदर्भात सांगितले आहे. त्याबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, त्या संदर्भात माननीय मंत्री श्री. बाळासाहेब थोरात यांनी बैठक घेतली. तसेच मी आणि माननीय मंत्री श्री. आदित्य ठाकरे यांनी सुद्धा मच्छीमार संघ तसेच कोळीवाडे यांच्याबरोबर बैठका घेतल्या आहेत. कोळीवाडयाचे सिमांकन झालेले आहे. फक्त एक्सटेंडेड पोर्शनच्या संदर्भात त्यांचे जे म्हणणे आहे त्याकरिता विधान परिषद सभागृहामध्ये माननीय सभापतींनी दालनात बैठक घेण्यात येईल असे सांगितले. त्या बैठकीमध्ये बाकीचे उरलेले प्रश्न सोडविण्यात येतील. सी-लिंक रॅम्पची त्याची साईज वाढविण्याबाबत एक प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. त्याबाबत आयुक्तांबरोबर बैठक झालेली आहे आणि मुख्य अभियंता यांच्या पातळीवर याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल. खार दांडाच्या संदर्भात मैदानचा सर्व्हे क्रमांक ४२३ या भूखंड ॲग्रीकल्चर म्हणून आपण त्याची माहिती दिली होती. त्याची जागा राखीव होती. स्लम डेव्हलपमेंटसाठी काहीतरी पेपर नोटीस आली आणि त्याची दखल घेण्यात आली आहे. त्याची सविस्तर माहिती घेऊन त्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल. खार दांडा येथील storm water pumping station बनविण्यात आले नाही, असा एक सन्माननीय सदस्यांचा महत्त्वाचा मुद्दा

श्री. अस्लम शेख...

होता. त्यामध्ये उरलेली जागा मासे सुकविण्यासाठी घेण्यासंदर्भात रिव्हेन्यू सोबत चर्चा करुन ती जागा शासनाची असेल तर आपल्याला त्याचा उपयोग करता येईल. त्यावर विचार करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, मत्स्यव्यवसाय विभागातील मागणी क्र. डी ६ व डी ९ खाली सादर करण्यात आलेल्या अनिवार्य खर्चाचा १४४.४२ कोटी रुपये व कार्यक्रमावरील खर्चासाठी २७८.११ कोटी रुपये असे एकूण ४२८.५३ कोटी रुपयांच्या सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या पुरवणी मागण्या सभागृहात मान्यतेसाठी सादर करण्यात आलेल्या आहेत. त्यास मान्यता देण्यासाठी मी आपल्यामार्फत सभागृहाला विनंती करतो.

असुधारित प्रत

प्रा. वर्षा गायकवाड (शालेय शिक्षण मंत्री) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रशांत बंब, सन्माननीय सदस्य श्री. योगेश कदम आणि जवळपास ३० सन्माननीय सदस्यांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभागावर बोलत असताना खूप मुलभूत अशा सूचना केल्या आहेत. त्या सर्वांची मला एकच भावना दिसली की, आपल्या मुलांचे भवितव्य कशाप्रकारे चांगले केले पाहिजे, त्यांचा शैक्षणिक दर्जा कसा चांगला केला पाहिजे आणि मुलांना काय सुविधा दिल्या पाहिजे. याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांनी काही मुलभूत सूचना केल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, सर्वसाधारणपणे जे विषय कॉमन होते त्यावर मी बोलणार आहे. कारण वैयक्तीक विषयाबाबत आपण नंतर चर्चा करु. परंतु सर्व सन्माननीय सदस्यांनी महत्त्वाचा एक विषय मांडला की, शाळांचा दर्जा सुधारला पाहिजे. याचा अर्थ पायाभूत सुविधा सुधारल्या पाहिजेत म्हणजे वर्गखोल्या, बेचेंस, शौचालये, पाण्याच्या सुविधा याबाबत सन्माननीय सदस्य श्री. योगेश कदम यांनी सांगितले आहे. त्यांनी स्वत:च्या अनुभवातून सांगितले आहे की, मी जिल्हा परिषद शाळेत जरी शिकलो असलो तरी आता मला चांगली इंग्रजी बोलता आणि या ठिकाणी मी चांगल्या प्रकारे काम करत आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय अर्थमंत्र्यांचे भाषण आपण वाचलेच असेल की, डीपीडीसीमधून कमीत कमी ५ टक्के निधी ठेवला पाहिजे आणि हे असे पहिल्यांदाच केले आहे. हा निधी भौतिक सुविधांवर म्हणजे आता आम्ही त्यातही बदल करीत आहोत की, कोणकोणत्या बाबींना प्राधान्य दिले पाहिजे. त्यामुळे ५ टक्के कमीत कमी ठेवला पाहिजे. सर्व माननीय पालकमंत्र्यांनाही आपण ती विनंती करीत आहोत. काही जिल्ह्याच्या माननीय पालकमंत्र्यांनी स्वत:हुन पुढाकार घेऊन सुद्धा मोठया प्रमाणावर निधी खर्च केलेला आहे. त्या ठिकाणी जिल्हा परिषद किंवा नगरपालिका अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांसाठी आपण निधी देत आहोत.

यानंतर श्रीमती करंदीकर....

प्रा. वर्षा गायकवाड ....

या व्यतिरिक्त आपण आदर्श शाळा आणलेल्या आहेत. या करिता ५४ कोटी रुपये दिले आहेत. पुढील वर्षाकरिता ३०० कोटी रुपये अर्थसंकल्पामध्ये मंजूर केले आहेत. सदनातील अनेक सदस्यांनी सांगितले की, मराठवाड्यात निजामकालीन शाळा आहेत. त्याला आपण राजमाता जिजाऊ शैक्षणिक विकास अभियान असे नाव दिले आहे. यापूर्वी पुरवणी मागण्यांमधून १६० कोटी रु ची तरतूद केली असून त्यातील ८० कोटी रुपये प्राप्त झाले व १२ कोटी रुपये असे एकूण रु९२ कोटी निजामकालीन शाळेकरिता दिले आहेत. ५ टक्के डीपीडीसी मधील निधी आहे. ३०० कोटी रु. पुढील वर्षी दिले जाणार आहेत तसेच १६० कोटी रुपये निजामकालीन शाळांना दिले आहेत. अशा प्रकारे जिल्हा परिषदेच्या शाळांना भरघोस निधी दिला जाणार आहे. सर्व आमदाराचे आम्हाला सहकार्य मिळावे, अशी मी विनंती करते.

अध्यक्ष महोदय, आम्ही केवळ भौतिक सुविधांवर काम करतो असे नाही. अभ्यासक्रम हा अतिशय महत्त्वाचा विषय आहे. अनेकांनी असे सांगितले की, सीबीएसई, आयसीएसई यांचा अभ्यासक्रम अशा प्रकारचा आहे. मी नम्रपणे सांगते की, आपले एक बोर्ड आहे, त्याचे अस्तित्व आहे. आपला अभ्यासक्रम कसा चांगल्या प्रकारे करता येईल या करिता आम्ही प्रयत्न करीत आहोत. राज्यातील पहिलीचा अभ्यासक्र आता बदलला जात आहे. तसेच आदर्श शाळांमध्ये दुसरीचा अभ्यासक्रम बदलला जात आहे. सन्माननीय सदस्य श्री. योगेश कदम यांनी सांगितले की, आपण इंग्रजीत बोलले पाहिजे. खरे तर प्रत्येक मुलाला त्याच्या मातृभाषेत चांगले कळते. मातृभाषेतील शब्दाला पर्यायी इंग्रजी शब्द काय असला पाहिजे हे पुस्तकात सांगितले आहे. पुस्तकांचे ओझे कमी करण्याकरिता आम्ही पालन करीत आहोत. इंटीग्रेटेड प्लस बायलँग्वेल ही पुस्तके या वर्षी पहिलीला करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री योगेश कदम यांनी सांगितले की, आपल्या शिक्षणाचा दर्जा सुधारला पाहिजे. या करिता आम्ही काही ऐतिहासिक

प्रा. वर्षा गायकवाड ....

शाळा घेतल्या असून त्यामध्ये त्यांच्या विभागातील २ शाळा आल्या आहेत. मात्र विदर्भ व मराठवाड्यातील काही शाळा आल्या नाहीत. त्या शाळा घेण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, ८ मार्च, जागतिक महिला दिनापासून नवीन उपक्रम केला जात आहे. सेल्फ डिफेन्स, गुड टच, बॅड टच, व्होकेशनल ट्रेनिंग, इंग्लिश स्पिकींग कोर्स व लायब्ररी यावर भर दिला जाणार आहे. मी अधिक काही बोलणार नाही. आम्ही कोणत्या धोरणात्मक गोष्टी करीत आहे, त्याचा उल्लेख मी करु इच्छिते. यामुळे भविष्यात आपल्या मुलांना सोयी उपलब्ध होतील. मुलांमध्ये सायंटिफिक टेंपर, क्रिटीकल थिंकींग यावे या करिता पिंपरी चिंचवड येथे राजीव गांधी आविष्कार नगरीचे काम केले जात आहे. या करिता ग्लोबल पातळीवर टेंडर केले असून **आरएफपी** तयार होत आहे. येणाऱ्या काळात त्याचे काम सुरु होईल. विभागीय स्तरावर आम्ही प्रयत्न करीत आहोत की, आपल्याला लहान लहान सायन्स सिटी केल्या पाहिजेत ज्यामुळे मुलांमध्ये सायंटिफिक टेंपर तयार होईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री राहुल पाटील यांनी सांगितले की, माननीय कृषी मंत्री व माझी बैठक झाली. कृषीबाबत आपल्या मुलांना माहिती असली पाहिजे. मुले अशा ठिकाणी सहलीला जातात की, त्यांना शेती कशी असते हे माहीतच नसते. येणाऱ्या काळात सहली देखील कृषी क्षेत्राचा वापर करुन काढल्या जातील. कृषी क्षेत्राचा अभ्यासक्रमात वापर केला जाईल. पर्यटन मंत्री महोदयांनी पर्यावरणाच्या संबंधी अभ्यासक्रम तयार केला आहे. या सर्व गोष्टींचा आम्ही पूर्णपणे अभ्यास करत आहोत.

अध्यक्ष महोदय, कोव्हिडने आम्हाला शिकवले की, तंत्रज्ञान किती महत्त्वाचे आहे. या काळात आम्ही विविध माध्यमांचा वापर केला. तेव्हा रेडियो, गुगल,

प्रा. वर्षा गायकवाड ....

व्हॉट्स ॲप इ. अनेक माध्यमे आम्ही वापरली. पहिल्यांदा राज्यात स्टेट टेक्नॉलॉजिकल फोरम तयार केला जात आहे. यामुळे भविष्यात विद्यार्थ्यांना संगणक, रोबोटीक लॅब, लँग्वेज लॅब या संबधी अभ्यासक्रम तयार होणार आहे. स्टेट असेसमेंट सेंटर आपण पहिल्यांदा करीत आहोत. येणाऱ्या काळात त्यांनी इच्छा व्यक्त केली की, शैक्षणिक क्षेत्रात मोठया प्रमाणात आमुलाग्र बदल झाले पाहिजे. तंत्रज्ञान, भाषा, अभ्यासिका, लॅब असावी. येणाऱ्या काळात प्रत्येक जिल्ह्यात ई-लायब्ररी,अभ्यासिका असावी जेणे करुन मुलांना कोणत्याही गोष्टीची माहिती मिळू शकेल.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी अनेक सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, कोव्हिडमध्ये डॉक्टर, पोलिसांनी काम केले तसेच शिक्षकांनीही काम केले, त्यांना प्रोत्साहित केले पाहिजे.

यानंतर श्रीमती गिरप...

प्रा.वर्षा गायकवाड ...

आम्ही आता पुढे जात आहोत. खरे तर ५० लाखांचा आपण उल्लेख केला. त्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित झालेला आहे. अशा तऱ्हेच्या ज्या फाईल्स आलेल्या आहेत, त्या मंजूर करण्याचे काम शालेय शिक्षण विभागाच्या माध्यमातून झालेले आहे. मी पुढे जाऊन सांगते की, जे शिक्षक अजून चांगले काम करतील... आम्ही पाहत आहोत की, ते विविध माध्यमांचा वापर करीत आहेत. आज केंद्र शासनाकडून आपल्या शिक्षकांना पुरस्कार मिळत आहेत. अशा शिक्षकांना भविष्यात फॉरेनलासुध्दा पाठविण्याचा आमचा विचार आहे. फिनलँड, ऑस्ट्रेलिया अशा ठिकाणी आपले शिक्षक जाऊन तेथील शिक्षणाची पध्दती समजून येतील. हा आमचा प्रयत्न असणार आहे.

अध्यक्ष महोदय, अन्य सन्माननीय सदस्य मला सभागृहात दिसत नाहीत. सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी खूप प्रश्न विचारले, खूप गोष्टींचा उल्लेख केला. त्यांनी भौतिक सुविधांचा उल्लेख केला, याचा मी ऑलरेडी उल्लेख केलेला आहे. निवृत्ती वेतनाच्या बाबतीत खूप चर्चा झाली. शिक्षकांच्या २-३ प्रश्नांवर खूप चर्चा झाली. एक सूर निवृत्तीवेतनाच्या बाबतीतील होता. एक सूर त्रुटी प्राप्त झालेल्या पात्र शाळांच्या बाबतीतील होता, एक सूर शिक्षकांच्या भरतीबाबतचा होता. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार आपण मुंबई महानगरपालिकेच्या सातव्या वेतनाबाबतचा प्रश्न विचारला. त्यामध्ये महानगरपालिकेने आम्हाला प्रस्ताव .... आपले हे सर्व प्रश्न सध्या प्रोसेसमध्ये आहेत. आम्ही त्या संदर्भात वित्त विभागाकडे सातत्याने पाठपुरावा करीत आहोत. मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये यावर चर्चा करीत आहोत. त्यामुळे येणाऱ्या काळात आम्ही नक्कीच हे विषय पुढे घेऊन जाऊ. तुम्ही हे विषय सांगितले तसेच त्या ताईंनी देखील सांगितले आहेत.

अध्यक्ष महोदय, या व्यतिरिक्त खूप विषय या चर्चेमध्ये मांडले गेले. आज खूप मोठ्या प्रमाणावर चर्चा झाली. आता खरे तर भाषणाला वेळ नाही. परंतु, आपल्या सर्वांच्या मौलिक विचारांची आम्ही नक्कीच नोंद घेतलेली आहे. त्यावर येणाऱ्या काळात काम करु. शालेय शिक्षण विभागात काम करीत असताना मला माझ्या सहकाऱ्यांना विनंतीपूर्वक सांगावयाचे आहे की, ही मुले म्हणजे आपली संपत्ती आहे, आपले भविष्य आहेत. तुमच्या सर्वांच्या सूचना आमच्यासाठी खूप मौलिक आहेत.

प्रा.वर्षा गायकवाड ...

त्यामुळे यामध्ये अजून काय बदलाव करता येतील व अजून चांगल्या तऱ्हेने आपल्या मुलांना शिक्षण कसे प्राप्त होईल याकरिता आपल्या सर्वांचे सहकार्य भविष्यात देखील रहावे, अशी मी नम्र विनंती करते.

अध्यक्ष महोदय, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या ई – १ ते ई – ५ अंतर्गत एकूण ६६ हजार, ८८६ कोटी, ३ लक्ष १३ हजार रुपयांच्या मागण्या मान्य कराव्यात, अशी मी सभागृहास विनंती करते. ...(अडथळा)... तुम्ही सांगितले होते की, ६ टक्क्यांपेक्षा जास्त असावा. आपल्या अर्थसंकल्पामध्ये शालेय शिक्षण विभागाला जवळपास १७ टक्के दिले जातात.

.....

असुधारित प्रत

श्री.दादाजी भुसे (कृषी मंत्री) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेत सन्माननीय सदस्य सर्वश्री सुभाष देशमुख, योगेश कदम, श्रीमती प्रतिभाताई धानोरकर, सर्वश्री शेखर निकम, संजय केळकर इत्यादी २४ सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडलेली आहेत.

अध्यक्ष महोदय, वेळेचे भान ठेवून सर्व सन्माननीय सदस्यांनी जे काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत, त्या प्रत्येक मुद्दयांचे लेखी उत्तर प्रत्येक सन्माननीय सदस्यांना दिले जाईल. चर्चा करीत असताना सर्व सन्माननीय सदस्यांनी काही अतिशय सकारात्मक सूचना कृषी विभागाच्या संदर्भात मांडल्या. त्यामध्ये प्रामुख्याने शेतकरी बांधवांसाठी लागणाऱ्या ज्या काही निविष्ठा आहेत, त्यांची उपलब्धता, लाभार्थ्यांची निवड, ठिंबकच्या संदर्भात किंवा कृषी मालावर व्हॅल्यू ॲडिशन काय करता येईल, या संदर्भातील मुद्दे अनेक सन्माननीय सदस्यांनी मांडले आहेत.

अध्यक्ष महोदय, आपल्याला माहीत आहे की, कृषी विभागाच्या माध्यमातून जी काही प्रक्रिया राबविली जाते त्यानुसार शेतकरी बांधवांना कृषी विभागाच्या योजनेचा लाभ घ्यायचा असेल तर आता ऑनलाईन ॲप्लीकेशनची पध्दती विकसित करण्यात आलेली आहे. शेतकरी बांधवांना या योजनेत सहभाग घ्यावयाचा असेल तर, घरी बसून या योजनेचा लाभ घेण्याकरिता ते अर्ज करु शकतात. जास्त लाभार्थी आले असतील संगणकीकृत लॉटरी काढून लाभार्थ्यांची निवड करण्यात येते. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार आपण सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्य महोदयांकडून माहिती घेतली तर, कुठलाही भेदभाव न करता आय.टी.च्या माध्यमातून त्या लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे. यापूर्वी तोंड पाहून काम केले जायचे. मात्र आता संगणकीकृत निवड केल्यामुळे कुठल्याही वशिलेबाजीला थारा न देता लाभार्थ्यांची निवड केली जाते.

नंतर श्री.शिंदे ...

श्री.दादाजी भुसे...

मला सांगण्यास आनंद होत आहे की, डीबीटी सिस्टमच्या माध्यमातून १ हजार कोटी रुपयांचे यशस्वी वितरण पूर्ण करण्यात आले आहे.

अध्यक्ष महोदय, "विकेल ते पिकेल" ही संकल्पना राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री महोदय यांची आहे. बाजारामध्ये ज्या वाणाला अधिक मागणी आहे तो माल शेतकरी बांधवांनी पिकवावा. व्हॅल्यू ॲडीशन करुन शेतकरी बांधवांचा माल थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवून त्यांना दोन पैसे अधिकचे मिळवून देण्याकरिता कृषि विभागाने अनेक लहान लहान योजनांच्या अंमलबजावणीचे काम हाती घेतले आहे.

अध्यक्ष महोदय, शेतमालावर प्रक्रिया आणि मूल्यवृद्धीकरिता प्रधान मंत्री अन्न प्रक्रिया योजना, मुख्यमंत्री अन्न प्रक्रिया योजना, पोक्रा योजना, स्व.बाळासाहेब ठाकरे स्मार्ट योजना अशा योजना एका छताखाली आणल्या आहेत. संपूर्ण राज्याच्या विभागनिहाय पीकांच्या पॅटर्नवर आधारित मूल्यवर्धन प्रकल्प उभे करण्याच्या दृष्टीकोनातून एक आराखडा तयार करण्यात येईल. मागील काही काळापासून व आता जलद गतीने अनेक शेतकरी बांधवांच्या फार्मा उत्पादन कंपन्या, महिला शेतकरी बचत गट यांचे बळकटीकरण होऊन हजारो शेतकऱ्यांचे लहान लहान प्रकल्प उभे राहत आहेत.

अध्यक्ष महोदय, आता शेतकरी बांधवांना कोणते पीक घ्यावे हे सांगण्याची आवश्यकता नाही. शेतकऱ्यांची मुले स्वत: प्रयोग करीत आहेत. नवीन उपक्रमांच्या व प्रयोगांच्या माध्यमातून ते स्वत: चांगले संशोधन करीत आहेत. त्यांनी कष्टाने पिकविलेला माल थेट ग्राहकापर्यंत पोहोचवून व्यापारी ते ग्राहक यांच्यामधील शेतकऱ्यांना न मिळणारी रक्कम शेतकऱ्यांना मिळवून देण्याकरिता विक्रीची एक स्वतंत्र व्यवस्था उभारण्यात येत आहे. याकरिता ठाणे, मुंबई, पुणे, संभाजीनगर, नागपूर अशा मोठ्या शहरांच्या जवळील अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांचा माल प्रकल्पांना थेट जोडून देण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. याकरिता अधिकाऱ्यांचा एक टास्क

श्री.दादाजी भुसे...

फोर्स निर्माण करण्यात आला आहे. शेतकऱ्यांनी पिकविलेला माल निर्यात योग्य दर्जाचा करणे, त्यासाठी त्याचे ग्रेडींग करणे, पॅकींग करणे याकरिता उक्त टास्क फोर्स कृषि विभागाने निर्माण केला आहे. सदरहू जबाबदारी अधिकाऱ्यांना दिली आहे. याचे चांगले परिणाम दिसून येत आहेत.

अध्यक्ष महोदय, काही सन्माननीय सदस्य यांनी सेंद्रीय शेतीचा मुद्दा उपस्थित केला आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, या प्रकरणी कृषि विभागाने शासनाची स्वतंत्र सेंद्रीय शेती प्रमाणिकरणाची यंत्रणा उभी करण्याचे काम हाती घेतले असून त्याचे सुमारे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना कमी खर्चात प्रमाणिकरण करुन मिळणार आहे.

अध्यक्ष महोदय, यापूर्वी काही जिल्ह्यांना व तालुक्यांना ठिबक सिंचनाचे अनुदान कमी टक्के मिळत होते. याकरिता मागील काळात ७५ व ८० टक्के अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

अध्यक्ष महोदय, आपल्या राज्यातील साधारणपणे २६ पिकांचे जीआय मानांकन रजिस्ट्रेशन यापूर्वीच करण्यात आले आहे. या वाणांना निर्यात करुन शेतकऱ्यांना दोन पैसे अधिकचा दर मिळवून देण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. लवकरच त्याचे चांगले परिणाम दिसून येतील.

अध्यक्ष महोदय, खरीप व रब्बी हंगामात राज्यातील शेतकऱ्यांना बियाणे व रासायनिक खतांची कमतरता भासलेली नाही. याकरिता सर्व विभागांना सोबत घेऊन चांगले नियोजन करण्यात आले होते. देश पातळीवर रासायनिक खतांचा मोठ्या प्रमाणात तुटवडा जाणवला होता. परंतु आपल्या राज्यात बफर स्टॉक करुन ठेवल्याने खतांचा तुटवडा जाणवला नाही. राज्यात काही ठिकाणी २-४ दिवस खतांची टंचाई भासली असेल परंतु मोठ्या प्रमाणात खतांची टंचाई भासणार नाही, याची काळजी घेण्यात आली आहे.

श्री.दादाजी भुसे...

अध्यक्ष महोदय, मी सभागृहाला अवगत करुन देऊ इच्छितो की, सद्य:स्थितीत युक्रेनमध्ये युद्ध सुरु असल्याने पुढील कालावधीत रासायनिक खतांसाठी आवश्यक असलेला कच्चा माल कोणत्या दराने उपलब्ध होईल, हा देश पातळीवर चिंतेचा विषय आहे. या संदर्भात राज्य सरकार मागील दीड महिन्यापासून केंद्र शासनाच्या संपर्कात आहे. पुढील कालावधीत रासायनिक खतांची टंचाई किंवा दरवाढ होणार नाही, याकरिता आम्ही केंद्र सरकारच्या संपर्कात आहोत.

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

श्री.दादाजी भुसे....

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्रामध्ये कापूस आणि सोयाबीन या दोन पिकांची मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते. त्यामुळे मूल्य साखळी बळकटीकरणासाठी या अर्थसंकल्पामध्ये एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. या बाबत काही सन्माननीय सदस्यांच्या सकारात्मक सूचना असतील तर त्या सूचनांचा देखील जरूर विचार केला जाईल. मागील काळात राज्य शासनाने सोयाबीन पिकाबाबत एक दिवसाच्या कार्यशाळेचे आयोजन केले होते. त्याच पद्धतीने कापूस पीकासंदर्भात देखील एका दिवसाच्या कार्यशाळा आयोजन करून बियाण्यापासून ते व्हॅल्यू ॲडिशनपर्यंत काय काय करता येईल, याबाबतचा विचार करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, आपण आधुनिकतेची कास धरत असताना जुन्या बी-वणांचे देखील संरक्षण झाले पाहिजे. म्हणून शासन त्यादृष्टीने देखील कामकाज करीत आहे. काजू, हळद, संत्रा, मोसंबी यापासून ते नवीन ॲव्होकॅडो सारख्या फळांवर विशेष लक्ष देऊन सरकारने कामकाज हाती घेतलेले आहे.

अध्यक्ष महोदय, आता सभागृहामध्ये फलोत्पादन मंत्री महोदय देखील उपस्थित आहेत. त्यांनी एमआरजीएसमध्ये द्राक्ष आणि केळीचा समावेश केलेला आहे. या माध्यमातून राज्यातील शेतकऱ्यांना चांगला सपोर्ट होणार आहे, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय एमआरजीएसच्या माध्यमातून मागील वर्षी साधारणतः २५ ते ३० हजार हेक्टर फळांची लागवड करण्यात आलेली आहे. तसेच यावर्षी देखील एमआरजीएसच्या माध्यमातून ४० हजार हेक्टरवर फळांची लागवड करण्यात आलेली आहे.

अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी आम्हाला असे आदेशित केले आहे की, महिलांचा सन्मान भाषणापुरता मर्यादित न ठेवता तो वास्तव्यात उतरविण्यात यावा. त्या अनुषंगाने कृषी विभागाने सकारात्मक निर्णय घेऊन व्यक्तिगत

श्री.दादाजी भुसे....

स्तरावरावरील ३० टक्के योजना महिलांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या होत्या. राज्यातील कोणत्याही शेतकरी महिलांनी कोणत्याही प्रकल्पासाठी अर्ज केल्यानंतर त्या अर्जावर तात्काळ कार्यवाही करून सदर प्रकल्पास न्याय देण्याचे धोरण कृषी विभागामार्फत निश्चित करण्यात आले आहे.

अध्यक्ष महोदय, यापूर्वी शेतकऱ्यांना शेततळ्यासाठी ५० हजार रुपयांचे अनुदान दिले जात होते. परंतु आता शासनाने त्यात वाढ करून ७५ हजार रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतलेला आहे.

अध्यक्ष महोदय, पीक विमासंदर्भात या सभागृहामध्ये अनेक वेळा विचारमंथन करण्यात आलेले आहे. यापूर्वीच्या योजनेमध्ये व सन २०१४-१५ च्या योजनेबाबत विचारमंथन करण्याची आवश्यकता आहे. पीक विमा योजने संदर्भात आम्ही वेळोवेळी चर्चा करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, राज्यातील शंभर शेतकऱ्यांनी पीक विम्यामध्ये सहभाग घेतला असेल तर अधिकृत आकडेवारीनुसार पे-आऊट फक्त ४२ शेतकऱ्यांना मिळालेला आहे. म्हणजे दरवर्षी सरासरी ५८ शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांची झालेली नुकसानभरपाई मिळाली नाही. शेतकऱ्यांनी पीक विमा भरल्यानंतर काही ना काही नुकसानभरपाई मिळावी, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा असते. आपण रक्कमनिहाय विचार केला. पूर्वीच्या योजनेचा सरासरी ९७ टक्के पे-आऊट होता. परंतु आता या योजनेचा साधारणतः ६७ टक्के पे-आऊट आहे. त्यामुळे सभागृहाने पीक विमा संदर्भात विचारमंथन करून प्रभावीपणे काही अंमलबजावणी करू शकतो का, याबाबतचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, विमा कंपन्यांना नफ्यामध्ये मर्यादित जबाबदारी व तोट्यामध्ये देखील मर्यादित जबाबदारी देण्याच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र शासनाने ८०:११० चे बीड मॉडेल आलेले आहे. मुख्यमंत्री महोदय, उपमुख्यमंत्री महोदय व माननीय श्री. अशोकराव चव्हाण यांच्या शिष्टमंडळाने सदर प्रस्ताव केंद्र सरकारकडे

श्री.दादाजी भुसे....

सादर केलेला आहे. उक्त प्रस्तावास मान्यता मिळविण्यासाठी राज्य शासन सतत पाठपुरावा करीत आहे. दुर्दैवाने या प्रस्तावास मान्यता मिळाली नाही तर या बाबत वेगळा काय विचार करू शकतो, या संदर्भात राज्य शासन विचार करीत आहे.

यानंतर श्री. कुलकर्णी.....

असुधारित प्रत

श्री. दादाजी भुसे.....

पीएम किसान योजनेच्या धर्तीवर शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट विशिष्ट रक्कम टाकता येईल काय, अशा विविध बाबींचा विचार विभागाकडून केला जात आहे. काही सन्माननीय सदस्यांनी हवामान केंद्राची संख्या वाढविली पाहिजे, असा मुद्दा उपस्थित केला आहे. ही अतिशय सकारात्मक सूचना आहे. याबाबतची घोषणा अर्थसंकल्पामध्ये यापूर्वीच करण्यात आली आहे. हवामान केंद्र यापूर्वी महसूल सर्कलनिहाय होते. आता एका महसूल सर्कलमध्ये दोन ते तीन हवामान केंद्र उभारण्यात येत आहेत. याबाबतचा निर्णय झालेला आहे. याद्वारे अचूक अनुमान होणार आहे. ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले असेल त्यांना नुकसानभरपाई मिळाली पाहिजे. याकरिता पारदर्शी पद्धतीने कामकाज होणार आहे.

अध्यक्ष महोदय, कृषि विद्यापिठाच्या संशोधन केंद्राबाबत विशेष लक्ष देऊन शेतकऱ्यांकरिता नवीन वाण निर्माण करणे, पिकावरील नवीन रोगांवर प्रभावी उपाययोजना करणे, याकडे लक्ष देण्यात येत आहे. याठिकाणी बियाणांच्या संदर्भातही चर्चा केली गेली. एकेकाळी महाराष्ट्र राज्य बियाणामध्ये मोठया प्रमाणात आघाडीवर होते. परंतु मध्यंतरी दुसऱ्या राज्यातून आपल्या राज्यात मोठ्या प्रमाणात बियाणे येत असे. स्वयंपूर्ण बियाणांमध्ये महाराष्ट्र राज्य ही संकल्पना घेऊन प्रयोग करण्यात येत आहेत. सोयाबिन पिकाकरिता घरच्या बियाणांचा वापर शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात केला आहे. मागील वर्षी अनेक संकटे असूनही सोयाबिनचे बियाणे कमी पडले नाही. बियाणाच्या संदर्भात बोटावर मोजण्याइतक्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. बियाणे किंवा इतर चुकीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले किंवा नुकसानभरपाई नियमानुसार मिळाली पाहिजे. हे सर्व नियम, कायदे केंद्र सरकारच्या मार्गदर्शनानुसार केले जातात. काही औषधे विकत असताना त्यातील एमआरपी वेगवेळा असतो. काहींना तेच औषध १००० रुपयांना विकले जाते तर काहींना ते ५०० रुपयांना विकले जाते. म्हणून एमआरपीबाबत आणि बियाणे किंवा इतर औषधीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले तर शेतकऱ्यांना ठोस नुकसानभरपाई मिळण्याकरिता नियम करण्याबाबत कृषि विभागाकडून अभ्यास करण्यात येत आहे.

अध्यक्ष महोदय, जालना सीड्स हबला लवकरच चालना देण्यात येणार आहे. मागील सरकारच्या काळात हा प्रकल्प हाती घेण्यात आला होता. दोन ते तीन जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात बियाणांचे काम सुरु आहे. जालना येथे सीड्स हब तयार करुन राज्यात अधिकाधिक बियाणे कशा प्रकारे निर्माण होईल, यादृष्टीने काम करण्यात येत आहे.

अध्यक्ष महोदय, सर्वच सन्माननीय सदस्यांनी अतिशय सकारात्मक सूचना केल्या आहेत. मी आपल्या अनुमतीने कृषि व फालोत्पादन विभागाच्या पृष्ठ क्र. ६ व ६८ वरील मागणी क्रमांक डी – २, ३, ७ व ११ खाली सादर करण्यात आलेला कार्यक्रमावरील व अनिवार्य खर्चासाठीचा सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचा रुपये १० हजार २९७.१८७८ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सभागृहाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे. त्यास मान्याता द्यावी, अशी मी आपल्यामार्फत सभागृहास विनंती करतो.

यानंतर श्री. चौधरी...

असुधारित प्रत

श्री.राजेंद्र पाटील-यड्रावकर (वस्त्रोद्योग राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, वस्त्रोद्योग विभागाच्या सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर अनेक सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगल्या सूचना केल्या. सन्माननीय सदस्य श्री.सुभाष देशमुख, श्री.प्रकाश आवाडे, श्री.रईस शेख, श्री.राजेश एकडे, श्री.रत्नाकर गुट्टे, श्रीमती प्रतिभाताई धानोरकर, श्री.रवि राणा, श्री.संजय जगताप यांनी आपल्या सूचना मांडल्या. त्यांच्या सूचनांची नोंद घेण्यात आली आहे.

अध्यक्ष महोदय, वस्त्रोद्योग विभागांतर्गत मागणी क्रमांक व्ही-२, व्ही-३ व व्ही-५ खाली सादर करण्यात आलेल्या योजनांसाठी रुपये ६१६ कोटी २५ लाख ५१ हजार मात्र च्या सन २०२२-२०२३ चा अर्थसंकल्प सभागृहाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे.

अध्यक्ष महोदय, वस्त्रोद्योग विभागाच्या अर्थसंकल्पावरील चर्चेदरम्यान सन्माननीय सदस्यांनी वस्त्रोद्योग क्षेत्रासंदर्भात ज्या सूचना केलेल्या आहेत त्यांची नोंद घेतलेली आहे. वस्त्रोद्योग विभागाच्या एकूण रुपये ६१६ कोटी २५ लाख ५१ हजार मात्र च्या सन २०२२-२०२३ चा अर्थसंकल्प मंजूर करण्याची मी सभागृहास आपल्या माध्यमातून विनंती करीत आहे.

श्री.राजेंद्र पाटील-यड्रावकर (सांस्कृतिक कार्य राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ या वर्षाकरिता सांस्कृतिक कार्य विभागाच्या कार्यक्रम खर्चासाठी रुपये १९३ कोटी फक्त व अनिवार्य खर्चासाठी रुपये ६३ कोटी ६ लाख ८९ हजार फक्त अशी एकूण रुपये ३५६ कोटी ६ लाख ८९ हजार फक्त अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर करण्यासाठी मी आपल्या माध्यमातून सभागृहास विनंती करीत आहे.

असुधारित प्रत

श्री.संदिपानराव भुमरे (फलोत्पादन मंत्री) : अध्यक्ष महोदय, फलोत्पादन विभागांतर्गत मागणी क्रमांक डी-३ खाली सादर करण्यात आलेला कार्यक्रमावरील व अनिवार्य खर्चासाठीचा सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाचा रुपये ७३६ कोटी १९ लक्ष ५८ हजार कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सभागृहाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती मी आपणामार्फत सभागृहास करतो.

असुधारित प्रत

श्रीमती वर्षा गायकवाड (शालेय शिक्षण मंत्री) : अध्यक्ष महोदय, क्रीडा विभागाची मागणी क्रमांक ई-३ अंतर्गत एकूण ५२३ कोटी ४ लक्ष ९८ हजार इतका सन २०२२-२०२३ साठीचा अर्थसंकल्प मान्य व्हावा, अशी मी आपल्यामार्फत सभागृहास विनंती करते.

तालिका सभाध्यक्ष : आता मी सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील १) कृषि, पशुसंवर्धन , दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग २) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग ३) वित्त विभाग ४) सार्वजनिक बांधकाम विभाग ५) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग ६) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक डी- २, डी-३, डी-४, डी-५, डी-६, डी-७, डी-८, डी-९, डी-११, ई -२, ई-३, ई-४, ई-५, जी- १, जी-२, जी-४, जी-५, जी-६, जी-७, जी-८, जी-१०,एच-२, एच-३, एच-४, एच-५, एच-६, एच-७, एच-८, एच-९, एच-११, व्ही-२, व्ही-३, व्ही -५,व्ही-६, झेडडी -१ , झेडडी-२, झेडडी-३, झेडडी-४, झेडडी-५, झेडडी-६ आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचित दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकतो.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

सभागृहाच्या कामकाजाबाबत

तालिका सभाध्यक्ष : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या मंगळवार, दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी सकाळी ०९.०० वाजता पुन्हा भरेल. सकाळी ०९.०० ते १०.४५ वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. उक्त बैठकीत लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. त्यानंतर सकाळी ११.०० वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक रात्री ०८ वाजून २९ मिनिटांनी मंगळवार, दिनांक २२ मार्च, २०२२ च्या सकाळी ०९.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत